UNIVERSAL LIBRARY
OU_196148
UNIVERSAL LIBRARY

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ७ वें

# हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें आणि पुनर्घटना

लेखक

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

★

अनुवादक

बाळूभाई मेहता

द्वितीयावृत्ति : १९४८ ]

[ मूल्य २॥ रुपये

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.
१२ टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
ह. मो. जोशी,
विश्वास प्रेस,
२९१ शनिवार पेठ, पुणें २

# डॉ. राधाकृष्णन् ह्यांचा अल्प परिचय

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, Kt; Cr., M. A., D. Litt. (Hon.), ह्यांचा जन्म ता. ५ सप्टेंबर १८८८ साली उच्च ब्राह्मणकुलांत झाला. त्यांचा शिक्षण-क्रम मद्रास ख्रिश्चन कॉलेजमध्यें पुरा होऊन १९११ ते १९१६पर्यंत त्यांनीं प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास, येथें प्रथम 'तत्त्वज्ञान' ह्या विषयाचे असिस्टंट प्रोफे-सर म्हणून काम करून त्याच कॉलेजमध्यें तत्त्वज्ञानशाखेचे मुख्य शिक्षणा-धिकारी ह्या नात्यानें १९१६ते१९१७पर्यंत काम केलें. १९१८ ते १९२१ पर्यंत म्हैसूर-युनिव्हर्सिटीचे तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. त्यानंतर १९२१ ते १९३१पर्यंत कलकत्ता-युनिव्हर्सिटीतील 'जॉर्ज दि फिफ्थ प्रोफेसर ऑफ फिलॉसफी' ह्या जागेवर त्यांची नेमणूक झाली. मध्यंतरीं १९२६ सालीं ऑक्स्फर्ड येथील मँचेस्टर कॉलेजमध्यें 'अप्टन लेक्च-रर' म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. त्याच वर्षीं अमेरिकेंतील शिकॅगो युनिव्हर्सिटीतर्फे 'हस्केल लेक्चरर' म्हणून त्यांची नेमणूक होऊन तें काम त्यांनीं १९३०पर्यंत केलें. दरम्यान १९२७ सालीं मुंबई येथें भरलेल्या 'अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदे'च्या अध्यक्षस्थानीं त्यांची निवडणूक करण्यांत आली होती. त्याचप्रमाणें १९२६ ते १९३१पर्यंत कलकत्ता येथील 'पोस्ट-ग्रॅज्युएट कौन्सिल इन् आर्ट्स्' ह्या संस्थेचे ते अध्यक्ष होते. १९२९ सालीं 'हिबर्ट लेक्चरर' म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९३१पासून बेझवाडा येथील आंध्र विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९३६ सालीं ऑक्स्फर्ड विश्वविद्यालयांत 'पौरस्त्य धर्म आणि नीतिशास्त्र' या विष याच्या अध्यापनासाठीं 'स्पाल्डिंग प्रोफेसर' या बहुमानाच्या जागेवर त्यांची नेमणूक करण्यांत आली. नंतर १९४१ सालीं कै. महामना पंडित मदन मोहन मालवीय ह्यांनीं त्यांची बनारस येथील हिंदु-विश्वविद्यालयाच्या उपकुल-गुरूच्या जागीं नेमणूक केली. १९४६च्या अखेरीस ते पॅरिसला गेले होते. वरचेवर होणारीं महायुद्धें थांबावीं आणि राष्ट्रांचा शैक्षणिक, विज्ञानशास्त्रीय आणि सांस्कृतिक विकास व्हावा म्हणून पाश्चात्य राष्ट्रांनीं United Nations Educational Scientific Cultural Organization (Unesco) ह्या

नांवाची एक संघटना निर्माण केली आहे. ह्या संस्थेची एक बैठक १९४६ च्या अखेरीस पॅरिस येथें भरली होती. ह्या बैठकीला हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून जाण्याचा मान डॉ. राधाकृष्णन् ह्यांना मिळाला होता. हिंदुस्थानच्या स्वराज्याची राजकीय घटना तयार करण्यासाठीं जी प्रातिनिधिक समिति नेमण्यांत आली आहे, त्या समितीचेहि डॉक्टरसाहेब एक सभासद आहेत.

डॉ. राधाकृष्णन् हे नामांकित ग्रंथकारहि आहेत. त्यांनीं विपुल ग्रंथरचना केली असून 'भारतीय तत्त्वज्ञान' ह्या नांवाचा एक मोठा ग्रंथ इंग्रजींत दोन भागांत लिहिला आहे. "The Counter Attack from the East" or "The Philosophy of Dr. S. Radhakrishnan" ह्या नांवाचा एक ग्रंथ Prof. C. E. M. Joad ( जोड ) ह्यांनी लिहिला आहे. प्रो. जोड हे इंग्लंडचे एक अत्यंत विद्वान् ग्रंथकार म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. त्यांनीं लिहिलेल्या ह्या महत्त्वाच्या ग्रंथावरून डॉक्टरसाहेबांच्या कीर्तीस अमरत्व प्राप्त झालें आहे.

डॉक्टरसाहेबांचें इंग्रजी भाषेप्रमाणेंच संस्कृत भाषेवरहि चांगलें प्रभुत्व आहे. तसेंच पौरस्त्य तत्त्वज्ञानाप्रमाणें पाश्चात्य तत्त्वज्ञानाचाहि त्यांचा अभ्यास फार मार्मिक आहे. त्यांच्या लिखाणामध्यें संस्कृत शिक्षणाचा परिणाम म्हणून ज्याप्रमाणें योग्य त्या प्राचीन गोष्टींबद्दल आदर आणि अभिमान आढळून येतो, त्याप्रमाणें पाश्चात्य शिक्षणामुळें येणारी विचिकित्सता आणि ग्रंथप्रामाण्याऐवजीं बुद्धिप्रामाण्याबद्दल आग्रहहि ठिकठिकाणीं दृग्गोचर होतो.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महात्मा गांधी, कविकुलगुरु रवींद्रनाथ टागोर, सर जगदीशचंद्र बोस आणि सर चन्द्रशेखर व्यंकट रामन् इत्यादि ज्या थोड्या थोर गृहस्थांनीं हिंदुस्थानची कीर्ति पाश्चात्य राष्ट्रांत वाढविली, त्यांमध्यें डॉ. राधाकृष्णन् यांचीहि गणना होते.

# प्रस्तावना

इ. स. १९३२ सालीं नाशिकच्या कारागृहांत असतांना प्रो. राधाकृष्णन् ह्यांचें 'The Hindu View of Life' हें पुस्तक वाचावयास मिळालें. हें पुस्तक मला बरेंच आवडलें. कारागृहांतील मित्रमंडळींनीं सदरहू पुस्तकाचा अनुवाद मीं करावा असें सुचविलें. प्रेमळ मित्रांची ही सूचना मला पटली. प्रस्तुत पुस्तक म्हणजे सदरहू पुस्तकाचा अनुवादच होय.

प्रो. राधाकृष्णन् ह्यांचें 'Hindu View of Life' हें पुस्तक म्हणजे १९२६ सालीं त्यांनीं विलायतेंत ऑक्स्फर्ड येथील मँचेस्टर कॉलेजमध्यें हिंदुधर्मावर दिलेल्या चार व्याख्यानांचें संकलन होय. ह्या पुस्तकामध्यें त्यांनीं हिंदुधर्माच्या मूलतत्त्वांचें विवेचन केलें असून त्या तत्त्वांनुसार आजकालचे कांहीं निकडीचे प्रश्न कसे सोडवावयाचे हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

आमच्या दृष्टीनें हा त्यांचा प्रयत्न हेंच या पुस्तकाचें वैशिष्ट्य होय. त्यांच्या व्याख्यानांमध्यें त्यांनीं " हिंदुधर्म हा स्थिर नसून विकसनशील आहे, परिस्थित्यनुसार ह्या धर्माच्या कांहीं बाबींमध्यें वेळोवेळीं योग्य ते फेरफार करण्यांत आले आहेत आणि आजहि त्याच धर्तीवर फेरफार करण्याची आवश्यकता आहे " ह्या विचारसरणीचा त्यांनीं आग्रहानें पुरस्कार केला आहे. त्यांच्या विचारसरणीचे कांहीं ठळक नमुने खालीं उद्धृत करीत आहोंत:—

( १ ) "हिंदु तत्त्वज्ञानाचे आणि आचारधर्माचे पुरस्कर्ते ह्यांची खात्री झाली आहे कीं, बदललेल्या काळांत हिंदुधर्माच्या **मूलतत्त्वांत फरक करण्याची आवश्यकता नाहीं. परंतु** अधिक गुंतागुंतीच्या आणि गतिमान् अशा समाजाच्या गरजांकडे लक्ष देऊन **त्या मूलभूत तत्त्वांची नव्यानें मांडणी करण्याची आवश्यकता आहे.** असा प्रयत्न म्हणजे हिंदुधर्माच्या इतिहासांत कित्येक वेळां घडून आलेल्या पद्धतीची पुनरावृत्ति करणें होय."

—व्याख्यान ४थें, शेवटचा परिच्छेद

( २ ) "जनतेचा बौद्धिक दर्जा सुधारून अखिल हिंदुस्थानला आध्यात्मिकतेच्या उच्च भूमिकेवर नेण्याचा कळकळीचा आणि व्यवस्थित प्रयत्न

अलीकडच्या काळांत झालेला नाहीं. परमेश्वराची अत्युच्च कल्पना जनतेपुढें ठेवून तिला अनुसरून जनतेची सुधारणा घडवून आणण्याचा हिंदुधर्माच्या पुढाऱ्यांनीं चिकाटीनें प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक आहे. अखिल भारतवर्षांत पसरलेलीं देवळें, मंदिरें आणि मठ हीं इतःपर केवळ प्रार्थनास्थानें किंवा पूजाविधींचीं स्थंडिलें न राहतां आध्यात्मिक बाबतींत हिंदूंना दिशा दाखविणारीं विद्यामंदिरें आणि नवविचारांचीं उगमस्थानें झालीं पाहिजेत."

—व्याख्यान १ लें, शेवटचा परिच्छेद

( ३ ) " अचूक मतप्रतिपादन हें धर्माचें लक्षण नसून सदाचारी जीवन म्हणजेच खरा धर्म होय. "

—व्याख्यान २ रें, एकोणिसावा परिच्छेद

( ४ ) " समाजाच्या गरजा पुरविणें एवढीच मनुष्याची इतिकर्तव्यता नाहीं, आत्मोन्नति हें त्याचें ध्येय आहे. "

—व्याख्यान ३ रें, शेवटचा परिच्छेद

(५) " एकाच प्रकारची संस्कृति आणि एकाच प्रकारचा समाज असलेलें एक साम्राज्य प्रस्थापित करणें हें जगाचें राजकीय ध्येय नसून जीवनक्रम, मानासिक उन्नति, संवयी आणि संस्था यांमध्यें पुष्कळ फरक असलेल्या परंतु बंधुत्वाच्या भावनेनें जवळजवळ राहणाऱ्या आणि शांतता आणि सुव्यवस्था व सलोखा आणि सहकार्य ह्यांचा उपभोग घेत असलेल्या स्वतंत्र राष्ट्रांचा संघ निर्माण करणें हें जगाचें ध्येय होय. "

—व्याख्यान २ रें, सत्ताविसावा परिच्छेद

( ६ ) " संस्कृति म्हणजे अधिक बुद्धिमान् लोकांकडून सांस्कृतिक दृष्ट्या कमी कार्यक्षम किंवा संस्कृतीमध्यें मागासलेल्या लोकांचें दमन नव्हे. ईश्वरानें दुर्बल किवा नालायक लोकांना 'गुलाम करण्याचा किंवा त्यांचा नाश करण्याचा हक्क आपणांस दिलेला नाहीं. एक मानववंश दुसऱ्याइतका बुद्धिमान् किंवा बलवान् नसला, तरी आपण आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या मानवसंघांना समान संधि द्यावी हें उच्चांत उच्च असें मानवी ध्येय आहे."

—व्याख्यान ४ थें, पांचवा परिच्छेद

अशीं आणखीहि उदाहरणें देतां येतील. ह्यावरून ह्या पुस्तकांतील विचार किती प्रगमनशील आहेत ह्याची वाचकांना सहज कल्पना येण्यासारखी आहे. हे विचार केवळ भारतवर्षालाच नव्हे, तर अखिल जगाला मार्गदर्शक होण्याजोगे आहेत.

डॉ. राधाकृष्णन् यांनीं या पुस्तकांत वेळोवेळीं दाखवून दिलें आहे कीं, हिंदुधर्मामध्यें कांहीं गोष्टी अशा घुसून गेल्या आहेत कीं त्या काढून टाकण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे. राष्ट्राचे ज्याप्रमाणें अस्तोदय असतात, त्याप्रमाणें धर्मालाहि भरती-ओहोटी लागलेली असते. हिंदुस्थानच्या गुलामगिरीबरोबर हिंदुधर्मालाहि ओहोटी लागली; परंतु आतां ज्याप्रमाणें स्वराज्याचा उपःकाल प्राप्त झाला आहे, त्याप्रमाणें हिंदुधर्माचेंहि पुनरुज्जीवन करण्याची वेळ आली आहे. हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें उदात्त आहेत; परंतु त्या तत्त्वांचें रहस्य आपण विसरलों असल्यानें आपण केवळ तत्त्वांच्या बाह्यांगालाच चिकटून बसलों आहोंत. तेव्हां तें बाजूला सारून पुनः मूलतत्त्वांची कांस धरली तरच आपला तरणोपाय आहे हें लक्षांत ठेवून या पुस्तकांत दर्शविल्याप्रमाणें हिंदुधर्मांतील मूलतत्त्वांची पुनर्घटना करण्याचें काम विचारवंत लोक हातीं घेतील काय ? विचारवंत लोकांनीं मूलतत्त्वामध्यें फरक करावयाचा नाहीं, फक्त त्या तत्त्वाची नव्यानें मांडणी करावयाची आहे, ही मुद्याची गोष्ट विसरतां कामा नये. ही पुनर्घटना करतांना आपण नवीन उपक्रम करतों असें नव्हे. अशा तऱ्हेचे प्रयत्न पूर्वी झाले आहेत त्यांचीच आपल्याला पुनरावृत्ति करावयाची आहे. इतिहासाच्या अभ्यासकांना 'इतिहासाची पुनरावृत्ति होत असते' हें वचन माहीत आहेच.

पुस्तकांत प्रतिपादन केलेल्या विषयांची आगाऊ कल्पना यावी म्हणून व्याख्यानांच्या आरंभीं प्रत्येक परिच्छेदांत आलेली मध्यवर्ती कल्पना परिच्छेदाचा आंकडा घालून पुढें मांडण्यांत आली आहे. ही योजना म्हणजे विषयांची जणुं विस्तृत अनुक्रमणिकाच होय. मूळ पुस्तकांत ही योजना नाहीं. तसेंच प्रत्येक व्याख्यानाला व्याख्यात्यांनीं दिलेला मथळा तितका अर्थपूर्ण न वाटल्यामुळें, त्याऐवजीं अधिक सूचक मथळे घातले आहेत. शिवाय ज्या

मुद्द्यांकडे वाचकांचें विशेष लक्ष वेधावेसें आम्हांस वाटलें, त्या मुद्द्यांवर कांहीं टीपा दिल्या आहेत. कारण, मूळ व्याख्यानें ज्या दर्जाच्या श्रोतृवृंदापुढें दिलीं होतीं, त्याहून वेगळ्या दर्जाच्या वाचकवर्गाकरितां हा अनुवाद करण्यांत आला आहे. ह्या सर्व योजनेमुळें पुस्तकाची उपयुक्तता निःसंशय वाढली आहे.

पुस्तकाचा अनुवाद शक्य तितक्या दक्षतेनें केला आहे. हा अनुवाद अथपासून इतिपर्यंत काळजीपूर्वक तपासून जेथें जेथें दुर्बोधता आणि क्लिष्टता आढळून आल्या तेथें तेथें योग्य ते शब्द आणि वाक्यप्रयोग सुचविण्याच्या कामीं आमचे कारागृहवासी मित्र श्री. नारायण गणेश गोरे, बी. ए., चिटणीस, युवक मंडळ, पुणें, आणि कै. श्री. रंगनाथ विष्णु रबडे वाङ्मयविशारद, माजी आचार्य, टिळक महाविद्यालय, पुणें, यांनीं मला जी मदत केली तिजबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

पुस्तकाला सूचि माझे मित्र श्री. विष्णु हरि निजसुरे, बी. ए., शिक्षक, गरुड हायस्कूल, धुळें, ह्यांनीं करून दिली, त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतों.

शेवटीं ह्या पुस्तकांत प्रतिपादन केलेलीं उदात्त तत्त्वें आणि उच्च विचार ह्यांप्रमाणें वागण्यास परमेश्वर आपणां सर्वांस बुद्धि देवो, अशी त्याच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

विजयादशमी,<br>
१७-१०-३४

—बाळूभाई मेहता

# व्याख्यान पहिलें

## वैचित्र्यांत ऐक्य

१ व्याख्यानमालेच्या योजकांचे आभार आणि प्रतिपाद्य विषयाचें दिग्दर्शन. २ व्यापक तत्त्वें आणि प्राचीन संस्कृतीमुळें हिंदुधर्माची व्याख्या करणें कठीण आहे. ३ हिंदु संस्कृतीला ' हिंदु ' हें नांव कसें प्राप्त झालें ? ४ हिंदुधर्माच्या वैचित्र्यांत ऐक्य आहे. ५ सत्याचें दर्शन, सत्याचा अनुभव म्हणजे धर्म होय. एकाद्या मताचा स्वीकार म्हणजे धर्म नव्हे. ६ धार्मिक अनुभव स्वतःसिद्ध असतात. ७ वेदानें हे अनुभव ग्रथित केले आहेत. ८ वैदिक ग्रंथ पवित्र मानले गेल्यानें संस्कृतीची परंपरा अखंड ठेवण्यास मदत झाली. ९ वेदांतील जें लिखाण बुद्धीला आणि शास्त्रीय शोधाच्या कसोटीला पटतें तेंच मान्य केलें जातें. १० हिंदुधर्म म्हणजे विशिष्ट निश्चित धर्ममत नसून व्यापक आणि अनुभवांचा कुशलतेनें विणलेला गोफ होय. ११ हिंदुधर्माच्या सबंध इतिहासांत ज्ञानी आणि व्यवहारकुशल लोक हे नवीन ध्येयांचा विकास करण्याच्या कामांत आणि नवीन नमुन्यांचे प्रयोग करण्याच्या बाबतींत सदैव गुंतलेले आहेत असें आढळून येतें. १२ प्रस्थानत्रयींतील प्रतिपाद्य विषय. १३ धार्मिक अनुभव घेणाऱ्यांची मानसिक तयारी जशी असेल त्याप्रमाणें त्यास अनुभव येत असतात. १४ परमेश्वराचीं निरनिराळीं वर्णनें एकच सत्य प्रतिपादन करतात. १५ विश्वव्यापी ब्रह्माच्या सत्यतेविषयीं हिंदूंनीं कधींहि शंका प्रदर्शित केली नाहीं. १६ हिंदु लोक 'ब्रह्मा'चें अनिर्वचनीयत्व ' नेति नेति ' शब्दांनीं व्यक्त करतात. १७ निरनिराळ्या देवांची उत्पत्ति कां झाली ? १८ ईश्वराविषयीं प्रत्येक कल्पना ही मानवी आत्म्याचें परमात्म्याशीं कोणतें ना कोणतेंतरी नातें व्यक्त करतें. १९ ईश्वराचीं निरनिराळीं, वर्णनें त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीं कांहीं कल्पना देत नाहींत, फक्त तो आपणांस कसा दिसतो हेंच प्रतिपादन करतात. २० सृष्टीच्या मूळ उत्पत्तीचा प्रश्न सोडवितांना प्रत्येक वेळीं निर्गुण ब्रह्माचें अथवा सगुणदेवाचें अस्तित्व मान्य करणें भाग पडतें. २१ आपल्या ईश्वरविषयक ज्ञानांत उत्क्रांति होत असते, ह्याबद्दल हिंदूंचा विश्वास आहे. २२ अखिल भारतवर्षांत पसरलेलीं देवळें, मंदिरें आणि मठ हीं केवळ प्रार्थनास्थानें किंवा पूजेचीं स्थंडिलें न राहतां आध्यात्मिक बाबतींत हिंदूंना दिशा दाखविणारीं विद्यामंदिरें आणि नवविचारांचीं उगमस्थानें झालीं पाहिजेत, अशी हिंदु पुढाऱ्यांनीं सुधारणा घडवून आणली पाहिजे.

---

# व्याख्यान दुसरें

## हिंदुधर्माचें व्यापक आणि उदात्त धोरण

१ सर्व धर्मांतील योग्यांच्या अनुभवांमध्ये एक प्रकारचें सादृश्य आहे, अनुभवांच्या मांडणीमध्यें मात्र फरक दिसून येतो. २ खऱ्या द्रष्ट्याला विशाल दृष्टि असते. ३ आमचीं परमेश्वरविषयक वर्णनें संपूर्ण आणि निर्णायक नाहींत. ४ हें लक्षांत घेऊन हिंदुधर्मानें व्यापक आणि उदात्त धोरणाचा स्वीकार केला आहे. ५ परमताबद्दल आदर आणि सौजन्य दाखविणें हें हिंदुधर्माचें वैशिष्ट्य आहे. ६ परधर्मीयांना आपल्या धर्मांत बाटविणें हें हिंदुधर्मानें केव्हांहि आपलें कार्य मानलें नाहीं. कारण हिंदुधर्म मतापेक्षां आचरणाला अधिक महत्त्व देतो. ७ देवतांचीं स्वरूपें कांहींहि असोत, त्यापासून उपासकांना आनंद, शक्ति किंवा तेज मिळालें म्हणजे पुरे, अशी आर्यांची दृष्टि होती. ८ नवीन जाती व त्यांचे देव आर्यांत पूर्णपणें मिसळून गेल्याचें वर्णन पुरातांतरीं आढळून येतें. ९ आर्येतरांवर आर्यलोक नेहमींच विजय मिळवीत, असें समजण्याची आवश्यकता नाहीं. १० हिंदुधर्म हा आपल्या व्यापक क्षेत्राखालील सर्व बऱ्यावाईट गोष्टींचें ऐक्य घडवून आणणारी एक जिवंत संस्था असून तिचें स्वरूप निश्चित आहे. ११ धार्मिक सुधारणा घडवून आणण्याची हिंदु पद्धति मुख्यतः प्रजासत्ताक स्वरूपाची आहे. हिंदूंनीं जंगली आणि असंस्कृत लोकांचे देवहि मान्य करून त्यांना आपल्या स्वतःच्या देवांच्या पंक्तींत बसविलें. १२ हिंदुधर्म धमक्या किंवा जबरदस्ती यांचा उपयोग न करतां सूचना आणि मतपरिवर्तन यांचा अवलंब करतो. १३ धार्मिक सुधारणा घडवून आणतांना हिंदुधर्माचा कटाक्ष नांव बदलण्यावर नसून अंतरंग बदलण्यावर असतो. १४ हिंदुधर्मांत जें जें दाखल होतें, मग तें मंत्रतंत्र असो वा निसर्गपूजन असो, त्याला हिंदुधर्म आत्मसात् करतो. १५ धर्म कोणत्याहि नांवानें ओळखला जात असला, तरी त्याच्या अत्युच्च स्वरूपांत प्रकट होणारीं नैतिक व आध्यात्मिक तत्त्वें हिंदुधर्माशीं बिलकुल विसंगत नसल्यामुळें हिंदू लोक धर्माच्या नांवाबद्दल चिकित्सा करीत बसत नाहींत. १६ सुधारणा घडवून आणण्याची हिंदु-पद्धति ही प्रत्येक संप्रदायाला आपलें पूर्व संबंध कायम ठेवण्यास, आपलें वैशिष्ट्य आणि जिव्हाळा यांचें रक्षण करण्यास समर्थ करते. १७ हिंदुधर्म, बौद्धिक खात्री आणि सत्याची जाणीव

उत्पन्न करून सहानुभूतीचें वातावरण निर्माण करतो. १८ परमेश्वराचें स्वरूप आणि उपासना याविषयीं विशिष्ट मत धारण करणाऱ्यांनाच मोक्ष मिळेल, अशा मर्यादित स्वरूपाची मोक्षाची योजना हिंदुधर्म केव्हांहि मान्य करणार नाहीं. १९ अचूक मतप्रतिपादन म्हणजे धर्म नसून सदाचारी जीवन म्हणजे धर्म होय. २० सत्यापेक्षां आपल्या संप्रदायावरच अधिक प्रेम करणाऱ्याचें पर्यवसान, संप्रदायापेक्षां आपल्या स्वतःवरच प्रेम करण्यांत होत असतें. २१ प्रत्येक मानवी प्राणी, प्रत्येक संघ आणि प्रत्येक राष्ट्र यांच्यांत आदरणीय असें कांहीं ना कांहीं तरी वैशिष्ट्य असतेच, हा हिंदु सिध्दांत हळूहळू मान्य होत चालला आहे. २२ हळूहळू सुधारणा घडवून आणण्याऐवजीं जबरदस्तीनें बाटवून हिंदुधर्माची उन्नति होणें शक्य होतें काय हा मोठा प्रश्न आहे. २३ हिंदुधर्माच्या भरभराटीच्या काळांत 'सत्यनिष्ठा' आणि 'यच्चयावत् मानवजातीबद्दल आदर' या दोन तत्त्वांना अनुसरून हिंदूलोक वागत असल्यामुळें त्यांच्या सर्वसाधारण धार्मिक जीवनामध्यें पुष्कळ सुधारणा झालेली दिसत होती; परंतु अलीकडे त्यांचे तेज नष्ट झालेलें दिसत आहे. २४ हिंदुधर्मामध्यें सर्वसामान्य असें तत्त्व आणि सर्वसामान्य असा उपासनेचा ठराविक नमुना नसतांहि त्यानें एका व्यापक योजनेमध्यें पुष्कळ संप्रदायांचा आणि उपासनांचा समन्वय केला आहे. २५ गेल्या कांहीं शतकांत 'सत्यनिष्ठा आणि मानवजातीबद्दल आदर' या ध्येयाप्रमाणें हिंदुधर्म वागत नसल्यानें असंस्कृत लोकांच्या उद्धाराच्या कार्याची हेळसांड होत आहे, ही फार दुःखाची गोष्ट आहे. २६ योग्य विचारसरणीचा अवलंब करण्याकरितां एखाद्या मनुष्यावर जबरदस्ती करणें, ही विचारसरणी हिंदुधर्माला मान्य नाहीं. २७ आपल्या धर्माशिवाय दुसरा प्रत्येक धर्म निपटून काढण्याचा प्रयत्न करणें हा एक धर्मातील बोल्शेव्हिझम्चा प्रकार आहे. हा टाळण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. सर्वांना एकाच धर्मांत ओढून त्यांचें ऐक्य घडवून आणण्याची हांव न बाळगतां, निरनिराळ्या धर्मांची ध्येयें एकच आहेत हें कळून आल्यावर जी एकी होईल, तिच्यावर जोर दिला पाहिजे. २८ आपलीं ध्येयें पसंत करण्याचें स्वातंत्र्य असणें आणि त्या दिशेनें प्रयत्न करणें हें प्रजासत्ताक पद्धतीचें हिंदुधर्माचें धोरण धर्माधर्मांतील वाद मिटविण्यास मदत करील असें वाटतें.

# व्याख्यान तिसरें

## ब्रह्म, जग आणि जीव ह्यांचे परस्परांमधील संबंध

१ ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' ह्या खोट्या तत्त्वापासून — मायावादाच्या कचाट्यांतून — आपली मुक्तता करणें हें आपलें ध्येय आहे. २ वैदिक विचारवंत लोक ' जग हें खरें आहे ' असें मानतात. उपनिषदें जगाच्यासापेक्ष सत्याचा आग्रह धरतात. ३ श्रीशंकराचार्य ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' मानतात हें अगदीं खरें आहे. ' जग मिथ्या आहे ' असें म्हणण्यांत शंकराचार्यांचा हा आशय आहे कीं, जगाला केव्हां तरी अंत येणार आहे. ' ब्रह्मा ' सारखी ती शाश्वत वस्तु नाहीं. ४ जगाचा शेवट होणार असेल तर आपली सर्व धडपड व्यर्थ आहे असें कित्येकांना वाटतें. म्हणून ते ' शाश्वत स्वर्ग ' आणि ' शाश्वत नरका'ची कल्पना पुढें मांडतात. परंतु ' शाश्वत स्वर्ग ' आणि ' शाश्वत नरक ' म्हणजे ' शाश्वत आलस्य ' होय. कारण तेथें हालचालीला — चळवळीला — कांहीं वाव नाहीं. ५ जगाचें रहाटगाडगें अनंत कालपर्यंत चालू राहणार असेंहि कधीं कधीं प्रतिपादण्यांत येतें. याचा अर्थ असा झाला कीं, जेव्हां सर्व व्यक्तींना मुक्ति मिळेल, असा कधींहि काल येणार नाहीं; परंतु या विचारसरणीनें ईश्वराचा हेतूच निष्फल ठरतो. ६ एकाद्या व्यक्तीला मोक्ष मिळाला म्हणजे सर्व जग नाहींसें होतें, असें नाहीं; फक्त जगाकडे पाहण्याची मिथ्या दृष्टि जाऊन खरी दृष्टि प्राप्त होते, असा शंकराचार्यांच्या सिद्धांताचा अर्थ आहे. ७ शंकराचार्य ईश्वर आणि जग यांचें तादात्म्य प्रतिपादन करीत नाहींत; फक्त जगाचें स्वतंत्र अस्तित्व अमान्य करतात. ८ अनंताच्या गर्भांतून ' सांता'ची उत्पत्ति कशी झाली हें अगम्य आहे, असें शंकराचार्यांचें म्हणणें आहे. ९ ' ईश्वर आणि जग यांचें काय नातें आहे ' हें गूढ उकलण्यास मानवी मन असमर्थ आहे, असें हिंदुस्थानचा आणि युरोपचा इतिहास सांगतो. १० असल्या परिस्थितींत विवेकपूर्ण ' अज्ञेयवाद ' अधिक कार्यक्षम ठरतो. ११ तें कांहींहि असलें तरी ' जग हें

स्वप्न आहे आणि अनुभवाच्या सर्व गोष्टी भ्रम आहे ' असा कोणताहि सिद्धांत प्रस्थापित झालेला नाहीं. १२ ' जग दैवी असल्यानें नैतिक नियमांची आवश्यकता रहात नाहीं ' असा दुसरा आक्षेप घेण्यांत येतो. १३ याला उत्तर असें आहे कीं, सर्व वस्तूंमध्यें भरून राहिलेल्या परमेश्वराचें स्वरूप कमीजास्त अंशानें व्यक्त होत असतें, म्हणून नीतिनियमांची आवश्यकता आहे. १४ ' कर्मविपाक ' हा आपल्या मानवी स्वातंत्र्यावर गदा आणणारा सिद्धांत आहे, असें मानण्यांत येतें; परंतु ' कर्म ' आत्म्याच्या खऱ्या स्वातंत्र्याच्या आड येत नाहीं. १५ कर्मविपाक केवळ बाह्य सृष्टीलाच नव्हे, तर मन आणि नीतिच्या प्रदेशालाहि लागू आहे. १६ ' कर्म ' हें यांत्रिक तत्त्व नसून आध्यात्मिक आवश्यकता आहे. कर्मविपाकानें नैतिक नियमांच्या पालनाला जीवनांत अग्रस्थान देण्याचा अट्टाहास केला आणि कर्म आणि ईश्वर एकच आहे असें प्रतिपादन केलें. परमेश्वर ' कार्याध्यक्ष ' आहे. १७ या योजनेमध्यें पश्चाताप आणि तज्जन्य क्षमा यांस अवकाश आहे. १८ व्यक्तीची परिस्थिति आणि त्याचें प्रारब्ध या दोन्ही गोष्टी कर्मविपाक लक्षांत घेतो. भूतकाल अटळ आहे, परंतु भविष्यकाल मात्र व्यक्तीच्या वर्तनावर अवलंबून आहे असें कर्मविपाकाचें म्हणणें आहे. १९ बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित असलेलें आत्मस्वातंत्र्य कर्मावर सत्ता गाजवूं शकतें. २० कारण, विश्वांतील प्रत्येक बारीकसारीक गोष्ट ही आगाऊ ठरलेली नसते. २१ आत्मोद्धार करण्याची वेळ अजून टळली नाहीं, असें सांगून कर्मविपाक मनुष्याला धीर देतो. २२ जेव्हां मनुष्य दुर्बल बनला, तेव्हां दुर्दैवानें कर्मविपाक आणि दैववाद हे एक आहेत असें समजून हिंदुस्थानांत घोटाळा माजला. २३ हिंदुधर्म हें एक प्रकारचें मत असण्यापेक्षां जीवनाचा एक मार्ग आहे. २४ धर्म म्हणजे सदाचार, अधर्म म्हणजे दुराचार. २५ सर्व मानवी कृतींचा उगम वासनांतून होत असतो. २६ ' वासना ' आणि ' आध्यात्मिक जीवन ' यांचा संबंध आहे, असें हिंदुधर्म मानीत असतो. २७ सर्व जगाचे संबंध नश्वर आहेत, म्हणून तेवढ्यामुळें त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ' सांत ' आणि ' अनंत ' हे परस्परांशी सलग्न असल्यामुळें त्यांची ताटातूट करणें धोक्याचें आहे. २८ द्रव्येषणा ही मनुष्यामध्यें नैसर्गिकच आहे. मानवी मनाची ठेवणच बदलल्याशिवाय तिचें

उच्चाटन करणें शक्य नाहीं. २९ द्रव्य आणि सुख न्याय्य मार्गानें मिळविलीं पाहिजेत. ३० मोक्ष म्हणजे आध्यात्मिक साक्षात्कार. ३१ पक्षी आकाशांत उड्डाण करीत असतांना किंवा मासे पाण्यांत पोहत असतांना मार्गे जसा मागमूस ठेवीत नाहींत, त्याप्रमाणें मुमुक्षूंनीं आपलें धोरण ठेवलें पाहिजे. ३२ ज्ञान, उपासना आणि कर्म हे ईश्वरोपासनेचे मार्ग आहेत. ३३ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास या शाश्वत जीवनाकडे नेणाऱ्या चार अवस्था होत. ३४ ब्रह्मचर्याश्रमामध्यें शरीर आणि मन ह्यांचा विकास करून शिस्त अंगीं बाणवावयाची असते. ३५ गृहस्थाश्रम — विवाहसंस्था — मानवी दौर्बल्याला एक सवलत असण्यापेक्षां आध्यात्मिक विकासाचें एक साधन आहे. ३६ संयम आणि सहिष्णुता या साधनांनीं आपण वैवाहिक प्रेमाचें दिव्य मूर्तीत रूपांतर करूं शकतों. ३७ आदर्श विवाहामध्यें पतिपत्नींचे खरे हितसंबंध पूर्णपणें साधले जातात. ३८ कौटुम्बिक हितसंबंधावर आग्रह धरल्यामुळें एकपत्नीत्वाच्या ध्येयांत शैथिल्य उत्पन्न झालें. ३९ सर्व स्त्रियांनीं लग्न केलेंच पाहिजे, अशी हिंदूंची समजूत असल्यानें बाल, प्रौढ आणि विधवाविवाह वगैरे जे बिकट प्रश्न उपस्थित होतात त्यांचाहि हिंदु पुढाऱ्यांनीं अधिक समाधानकारक रीतीनें निर्णय देणें आवश्यक आहे. ४० घटस्फोटाचा अवलंब करणें म्हणजे वैवाहिक जीवन सुखावह करण्याच्या प्रयत्नांत पराजय कबूल करणें होय. ४१ पुष्कळशा घटस्फोटांना अर्वाचीन परिस्थिति कारणीभूत आहे. ४२ हिंदूंचें स्त्रीविषयक धोरण उदात्तच आहे. ४३ वानप्रस्थाश्रमाचें ध्येय एकांत सेवन करून जीवनाच्या उच्च प्रश्नांचें चिंतन करणें होय. ४४ समाजाच्या गरजा पुरविणें एवढीच मनुष्याची इतिकर्तव्यता नाहीं. आत्मोन्नति हें त्याचें ध्येय आहे. ४५ संन्याशानें स्थितप्रज्ञ होऊन आध्यात्मिक स्वातंत्र्य — मोक्ष — मिळविणें हें त्याच ध्येय आहे. ४६ हिंदुधर्माला प्रत्येक आश्रमाची आवश्यकता आहे. ४७ मुक्तात्मा जगाच्या कल्याणाविषयीं उदासीन नसतो. ४८ या चतुर्विध आश्रमव्यवस्थेला अद्यापीहि हिंदु समाजामध्यें महत्त्वाचें स्थान आहे.

# व्याख्यान चाथें

## जातिसंस्था

## आणि

## हिंदुधर्माच्या मुख्य तत्त्वांचें सिंहावलोकन

१ जातिसंस्था म्हणजे हिंदूंच्या व्यापक आणि संकलनात्मक धोरणाचें उदाहरण होय. २ वंश, संप्रदाय, धंदा आणि देशांतर यांना अनुसरून जातींची उत्पत्ति झाली आहे. ३ संस्कृत 'वर्ण' शब्दावरून जाति या मूळ मानववंशाच्या 'रंगा' वरून ठरविल्या जात असें दिसतें. हिंदुस्थानांत कृष्णवर्णीय अनार्य, पीतवर्णीय मांगोल, धडधाकट द्राविड आणि शक्तिमान् आणि उत्साही आर्य लोक वस्ती करून राहिले होते. ४ या मानववंशीयांची भांडणें मिटविण्याच्या दृष्टीनें (१) त्यांचा उच्छेद करणें, (२) त्यांना कह्यांत ठेवणें, (३) त्यांच्याशीं तादात्म्य पावणें किंवा (४) त्यांच्याशीं सलोखा घडवून आणणें हे वैकल्पिक उपाय सुचविण्यांत येतात. ५ "आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या मानवसंघांना आपली उन्नति करण्याला समान संधि द्यावी" हें उच्चांत उच्च असें मानवी ध्येय आहे. ६ निरनिराळ्या मानववंशांमध्यें समरसता तडकाफडकी होत नाहीं, त्यास कालावधि लागतो. ७ निरनिराळ्या मानववंशांचे झगडे मिटविण्यासाठीं हिंदुधर्मानें लोकसत्ताक पद्धतीचा केवळ एकमेव असा सुरक्षित मार्ग पत्करला आहे. हा मार्ग दुसऱ्याच्या प्रगतीच्या आड न येतां प्रत्येक संघाला त्याच्यांत जें उत्तमोत्तम असेल त्याचा विकास करण्यास संधि देणें हा होय. ८ हिंदूंनीं अनार्यांनासुद्धां जंगलीपणाच्या कर्दमांतून काढून सभ्यपणाची दीक्षा दिली आहे. ९ हलक्या दर्जाच्या लोकांशीं समरस होतांना हिंदू विचारप्रवर्तकांनीं विवेकशून्य संकराला उत्तेजन दिलें नाहीं. हिंदु-शास्त्रांनीं अन्न आणि विवाह यांच्या बाबतींत निरनिराळे समाज पाळीत असलेले निर्बंध मान्य केले. १० जातींचें तत्त्व हें भिन्नभिन्न जातींच्या भरमसाट संकराला जरी अनुकूल नव्हतें, तरी नकळतपणें बहुतेशीं जातीजातींमध्यें संकर होत असत. अनुलोम आणि प्रतिलोम विवाहांच्या

योगानें निरनिराळ्या वंशांचें मिश्रण काळजीपूर्वक होऊं लागलें. ११ हिंदु धर्मानें सर्व प्रकारचे संकर हानिकारक समजून निंद्य ठरविले नाहींत. १२ सवर्ण विवाहाचें तत्त्व उदात्त आहे. १३ निसर्गाबरोबर जोपासनेचेंहि सहकार्य पाहिजे. १४ समाजव्यवस्थेचा आत्मघात जर टाळावयाचा असेल, तर वैवाहिक संबंधाच्या बाबतींत कांहीं निर्बंध पाळले पाहिजेत. १५ निरनिराळ्या मानववंशांमध्यें मोठाले बखेडे निर्माण न करतां हिंदुधर्मानें क्रमाक्रमानें त्यामध्यें सलोखा घडवून आणला आहे. १६ जातिसंस्थेमार्फत हिंदुधर्मानें आपल्यामध्यें समाविष्ट केलेल्या निरनिराळ्या जातींची सुधारणा घडवून आणली. १७ ज्या जगामध्यें प्रत्येक मानववंशाला आपल्या खास विशिष्ट गोष्टींना चिटकून राहण्याला आणि त्यांतील उत्तम गोष्टींचा विकास करण्याला वाव आहे, आणि सर्व वंशांना एकत्र आणून त्यांच्यामध्यें समरसता उत्पन्न करणें शक्य आहे, असें जग निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. १८ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी चतुर्विध वर्णसंस्था आहे. एकंदर समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें प्रत्येक वर्णाचें काम सारख्याच महत्त्वाचें आहे. १९ आध्यात्मिक ध्येयांचा विकास करणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य होतें. त्यांच्या पोषणाची जबाबदारी इतर वर्णीयांवर असे. 'सरकार' ही मुख्यता लष्करी बाण्याची संस्था होती. 'शांतता' आणि 'सुव्यवस्था' राखणें हें सरकारचें कर्तव्य होतें; २० ज्याप्रमाणें धर्म ही समाजाचें धारणपोषण करणारी संस्था आहे, त्याप्रमाणें सरकार म्हणजे जीवनाचा उत्तम विकास होण्याला सर्व अनुकूल परिस्थिति निर्माण करून देणारी संस्था होय. २१ 'अहिंसे'-चें तत्त्व हिंदु समाजाला प्रिय होतें; तथापि हिंदु समाजानें बलोपासक क्षत्रिय-वर्णाची योजना केली. २२ आपल्या लाभाला आळा घालून वैश्यांना संपत्तीबरोबर येणारी नैतिक जबाबदारी स्वीकारावी लागे. २३ सामान्य मजूर आणि शेतकरी या दोहोंचा मिळून 'गरीब' वर्ग होतो. २४ 'सहकार्य' आणि 'सलोखा' यांवर जातिसंस्थेचा आग्रह आहे. २५ जातींना वर्णाश्रम-धर्माप्रमाणें परंपरेनें आपल्याकडे जें काम आलें आहे, तें उत्तम रीतीनें करण्यांतच आपलें आध्यात्मिक कल्याण आहे या भावनेनें समाजाची सेवा करावयाची असल्यानें 'काम करणें ही अपमानास्पद गोष्ट असून गुलामगिरीप्रमाणें आहे, तें नाखुषीनें आणि केवळ आर्थिक हेतूनें करावयाचें आहे,' अशा तऱ्हेच्या समजुतीस जातिसंस्थेनें कधींहि उत्तेजन दिलें नाहीं. २६ प्रजासत्ताक राज्यपद्धतींमध्येंहि बुद्धिमान् आणि चारित्र्यवान् माणसें वर

तरंगून येणार आणि त्यांचेंच 'प्रधानमंडळ' राहणार; हे भेद राहणारच. २७ हिंदुस्थानला लवकरच औद्योगिक युगाबरोबर येणाऱ्या संकटाशीं तोंड द्यावें लागेल. २८ सबंध समाज म्हणजे एक जिवंत संस्था आहे, म्हणजे सर्वांनीं सर्वांच्या सुखदुःखांचे भागीदार झालें पाहिजे, ह्या उच्च कल्पनेपासून होणाऱ्या फायद्याकडे लोकांचें अधिकाधिक लक्ष जात आहे. २९ लोकसत्ता म्हणजे सर्व वैशिष्ट्य नष्ट करून सर्वांना एका सांच्यांत घालणें नव्हे; तर निसर्गानें दिलेल्या गुणांचा विकास करून त्याचा समाजाच्या कल्याणासाठीं उपयोग करणें होय. ३० हिंदु समाजव्यवस्थेंत सांस्कृतिक संस्था ह्या श्रेष्ठ आणि आर्थिक संस्था कनिष्ट प्रतीच्या समजल्या जातात. कारण सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उन्नति हेंच समाजाचें ध्येय आहे. ३१ एकादा मोठा अन्याय डोळ्यांसमोर घडत असतांना आत्म्याला जेव्हां तीव्र वेदना होतात, तेव्हां क्षत्रिय अन्याय करणाऱ्याला म्हणेल 'तुझ्या हातून असें कृत्य घडूं नये म्हणून मी तुला ठार करतों;परंतु त्याच परिस्थितींत ब्राह्मण असें विनवील कीं 'तूं असें करूं नकोस', त्यापेक्षां मी मरण पत्करीन.' ३२ हिंदु स्मृतिग्रंथ क्रमाक्रमानें सुधारणा घडवून आणण्यावर जोर देतात. ३३ निरनिराळ्या धंद्यांमध्यें पुढें लवकरच उच्च-नीच भेद पाडण्यांत आल्यानें जेव्हां वरिष्ठ जाती हक्क आणि विशिष्ट सवलतींची भाषा बोलूं लागले तेव्हां कांहीं जातींची त्यामुळें अधोगति झाली. ३४ मोक्षप्राप्ति करून घेण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. निरनिराळ्या संप्रदायांचे मोक्षप्राप्तीचे मार्ग भिन्न भिन्न असूं शकतील. ३५ निरनिराळ्या वर्णांमध्यें 'समता' असावी ह्याबद्दल हिंदुस्थानच्या इतिहासाच्या सुरुवातीपासून झगडे चालू आहेत. ब्राह्मण वसिष्ठ आणि क्षत्रिय विश्वामित्र ह्यांच्यामधील भांडण प्रसिद्धच आहे. ३६ जाति किंवा लिंगभेद लक्षांत न घेतां सर्वांना धर्मग्रंथ वाचण्याची मुभा पाहिजे. ३७ देव, जाति, मानववंश, लग्नांचे प्रकार इत्यादि बाबतींत हिंदु धर्मांत जरी पुष्कळ वैचित्र्य असलें, तरी त्या सर्वांमध्यें एकच हेतु अनुस्यूत आहे. ३८ आधिभौतिक जगाचें वैचित्र्य हें शाश्वत तत्त्वावर उभारलेलें आहे हें ओळखून त्याप्रमाणें आपल्या आयुष्याचें धोरण ठरविणें हा तो हेतु होय. ३९ सतत उत्क्रांतावस्थेंत असलेल्या विश्वामध्यें पाप, प्रमाद आणि कुरूपता हीं अपरिहार्य आहेत; तीं क्रमाक्रमानें नाहींशीं होऊन शाश्वत तत्त्व हस्तगत होत असतें. ४० अज्ञानांधकाराचा निरास जबरदस्तीनें होणार

नसून ज्ञानदीप प्रज्वलित केल्यानेंच होणार आहे. ४१ अमुक एका विशिष्ट प्रकारच्या—ब्रह्मचारी, गृहस्थ वा संन्यासी यांच्या जीवनानेंच मोक्ष मिळेल असें नाहीं. ४२ तुम्ही कोणत्याहि परिस्थितींत असा, तींत तुमच्या धर्माला अनुसरून तुम्ही वागलांत आणि त्यांत परमोच्च विकास केला तर तुम्हांस मोक्ष मिळेल. स्वर्ग आणि नरक हे शाश्वत मार्गावरील पुढचे आणि मागचे टप्पे आहेत. ४३ स्त्रियांचीं कार्यक्षेत्रें पुरुषांपेक्षां भिन्न असलीं म्हणून त्या कमी दर्जाच्या आहेत, असें ठरत नाहीं. ४४ जातिसंस्थेपासून पुष्कळ नुकसान झालें आहे. तरी तिजमध्यें कांहीं हितकर तत्त्वें अंतर्भूत झालीं आहेत. मागासलेल्या जातींच्या जिवंत भावना नष्ट न करतां त्यासंबंधीं आदर दाखवून त्यांचें पोषण करणें हें सुसंस्कृत लोकांचें कर्तव्य आहे. ४५ मानवी विकासाच्या एका स्थितीला अनुकूल आणि पथ्यकर असलेली संस्था दुसऱ्या स्थितींत ती तितकी कार्यक्षम ठरत नाहीं; एवढेंच नव्हे, तर हानिकारकहि होते. हिंदुधर्म प्रगमनशील आहे. मागील परंपरा कायम ठेवून त्यानें प्रगति केली आहे. ४६ हिंदुधर्माच्या मूल तत्त्वांत फरक करण्याची आवश्यकता नाहीं; परंतु समाजाची गुंतागुंतीची परिस्थिति पाहून त्या तत्त्वांची पुनर्घटना करण्याची आवश्यकता आहे, अशी हिंदु तत्त्वज्ञानाच्या आणि आचारधर्माच्या पुरस्कर्त्यांची खात्री झाली आहे.

# अनुक्रमणिका


१ वैचित्र्यांत ऐक्य ... ... ... १

२ हिंदुधर्माचें व्यापक आणि उदार धोरण ... २२

३ ब्रह्म, जग आणि जीव ह्यांचे परस्परांमधील संबंध... ४८

४ जातिसंस्थेच्या आणि हिंदुधर्माच्या मुख्य
तत्त्वांचें सिंहावलोकन ... ... ... ७९

# व्याख्यान पहिलें

## वैचित्र्यांत ऐक्य

१ 'हिंदु धर्माचीं मूलतत्त्वें' ह्या विषयावर व्याख्यान देण्यासाठीं ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं—विशेषतः प्रिन्सिपॉल जॅक्स यांनीं मला आमंत्रण देण्यांत जें सौजन्य दाखविलें त्याबद्दल मी प्रथम कृतज्ञता व्यक्त करतों. प्रिन्सिपॉल जॅक्स यांनीं माझ्या कामगिरीसंबंधीं जो गौरवपूर्वक उल्लेख केला, त्यामुळें कामाच्या माझ्या लायकीपेक्षां त्यांच्या मनाचा थोरपणा अधिक दिसून येतो. चार व्याख्यानांमध्यें हिंदुधर्माची उत्पत्ति आणि वाढ कशी झाली हें सांगणें किंवा त्याच्या तत्त्वज्ञानाचें आविष्करण करणें शक्य नाहीं. हिंदुधर्माच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वांचा निर्देश करून त्या तत्त्वांनुसार आजकालचे कांहीं निकडीचे प्रश्न कसे सोडवावयाचे हें दाखविण्याचा आणि तेंहि अगदीं संक्षिप्त रीतीनें दाखविण्याचा माझा हा आजचा प्रयत्न आहे.

२ अगदीं आरंभीं हिंदुधर्माच्या व्याख्येची अडचणच दत्त म्हणून उभी राहते. पुष्कळांना हिंदुधर्म म्हणजे केवळ पोकळ नांव आहे, त्यांत तथ्यांश कांहीं नाहीं असें वाटतें; अशा परिस्थितींत हिंदुधर्म म्हणजे नाना मतांचा गलबला, अनेक विधींचें कडबोळें, भूगोलावरील विशिष्ट प्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्या आचारांस दिलेलें नांव असें समजावयाचें कीं काय ? हिंदुधर्मांत कांहीं तथ्यांश आहे असें मानलें तर असें दिसून येईल कीं, भिन्न भिन्न काल आणि निरनिराळे संप्रदाय ह्यांना अनुसरून त्या तथ्यांशामध्यें फरक पडला आहे. वैदिक कालामध्यें जी हिंदुधर्माची कल्पना होती तीपेक्षां ब्राह्मण-कालाची कल्पना भिन्न होती, आणि बौद्धकालीन तर तिच्याहिपेक्षां वेगळी

होती. तसेंच हिंदुधर्माविषयीं शैवांची जी कल्पना आहे, तशी वैष्णवांची नाहीं; आणि शाक्तांची तर ह्या दोहोंपेक्षांहि निराळी आहे. आपल्या संपर्का-मध्यें जे जे लोक आले त्या त्या लोकांच्या कल्पना आणि चालीरीती यथावकाश आत्मसात् करणें हिंदुधर्माला जितकें सोपें वाटलें तितकेंच आम्हांला त्याच्या निरनिराळ्या स्वरूपांचा समन्वय करणारें सामान्य तत्त्व शोधणें कठिण वाटत आहे. त्याच्या निरनिराळ्या स्वरूपांना एकत्रित करणारें आणि त्याच्या इतिहासाच्या निरनिराळ्या कालखंडांची सांखळी जुळविणारें सामान्य तत्त्व जर आढळून आलें नाहीं, तर हिंदुधर्मानें केलेल्या कामगिरीचा आढावा घेणें शक्य नाहीं. 'निसर्गाचे नेहमींचे व्यापार खेरीज करून, जगामध्यें ज्या घडामोडी होत आहेत, त्या सर्वांचा उगम ग्रीस देशांत झाला आहे' हें विधान आपल्याहि[१] अंगवळणीं पडलें आहे; परंतु हें सर्वस्वीं खरें नाहीं. हिंदुधर्मानें पुरविलेल्या स्वतंत्र तत्त्वज्ञानाच्या पायावर जगांतील राष्ट्रांपैकीं जवळ जवळ निम्या राष्ट्रांच्या धर्माची उभारणी झालेली आहे. चीन आणि जपान, तिबेट आणि सयाम, ब्रह्मदेश आणि सीलोन हे सर्व देश हिंदुस्थान हें आपलें अध्यात्मिक माहेर आहे असें मानतात. खुद्द हिंदु संस्कृतीलाहि त्या सनातन तत्त्वामुळें दीर्घायुष्य लाभलें आहे. हिंदु संस्कृतीची ऐतिहासिक परंपरा चार हजार वर्षांपेक्षांहि अधिक प्राचीन आहे; आणि आज चार हजार वर्षे या संस्कृतीचा ओघ अखंडपणें—पण मधून मधून मंद होत होत आणि कोठें कोठें थबकत थबकत—वाहत राहिला आहे. चारपांच हजार वर्षांपेक्षांहि अधिक कालपर्यंत आध्यात्मिक विचार व अनुभव ह्यांच्या वादळांतून निभावून ही संस्कृति सुरक्षित राहिली आहे. इतिहासाच्या उषःकालापासून निरनिराळ्या मानववंशांच्या आणि संस्कृतींच्या लोकांचे लोंढे हिंदुस्थानांत लोटत आहेत व कांहीं धर्मांना आपल्या मतप्रचारासाठीं राजकीय सत्तेचें पाठबळ मिळत आहे तरी ते हिंदुस्थानच्या बहुसंख्याक लोकांचें मतपरिवर्तन करूं शकत नाहींत एवढेंच नव्हे तर हिंदुधर्माचें वर्चस्व अद्यापि कायम राहिलें आहे. भारतीय संस्कृतीमध्यें जो एक प्रकारचा जिवंतपणा दिसून येतो तो इतर कांहीं अधिक प्रभावशाली धर्मांमध्येंहि आढळून येत नाहीं. एखाद्या

१ श्री. राधाकृष्णन् हे युरोपियन श्रोतृसमुदायापुढें व्याख्यान देत असल्यानें आपल्या म्हणजे 'युरोपियन श्रोतृवृंदांच्या' असा अर्थ समजावयाचा. —अनुवादक

वृक्षांतून रस वाहतो की नाहीं हें पाहण्यासाठीं त्याचें छेदन करण्याची ज्याप्रमाणें आवश्यकता नाहीं, त्याप्रमाणें हिंदुधर्मामध्यें चैतन्य आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं त्याच्यावर आघात करण्याची आवश्यकता नाहीं.

३ वरील संस्कृतीला ' हिंदु ' संस्कृति असें म्हणण्याचें कारण तिचे उत्पादक किंवा तिचे प्रारंभींचे अनुयायी हे सिंधुनदीच्या कांठीं पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतांत राहत असतां सिंधुनदीच्या भारतवर्षाकडील भागाच्या लोकांना इराणी आणि त्यांच्यानंतर स्वारी करणारे पाश्चात्य लोक ' हिंदु ' ह्या नांवानें संबोधीत. पंजाबपासून निघालेल्या हिंदु संस्कृतीचा ओघ गंगेच्या प्रवाहाबरोबर वाहत गेला; वाहतां वाहतां, तिच्या कांठावर वस्ती करून राहिलेल्या मूळ जातीच्या पुष्कळ संघांशीं तिचा संबंध आला. दक्षिणेकडेहि जोरानें वाहतां वाहतां आर्यसंस्कृतीचा द्राविड लोकांशीं तिचा परिचय झाला आणि शेवटीं तिनें आपलें स्वरूप किंचित् बदलून त्या लोकांवर आपला पगडा बसविला ! अखिल भारतवर्षावर आर्यसंस्कृति पसरली असल्यानें तिचें स्वरूप जरी पुष्कळ पालटलें, तथापि तिनें सिंधू नदीच्या तीरावर जी प्राचीन वैदिक संस्कृति नांदत होती तिचीच परंपरा चालू ठेवली. आरंभीं ' हिंदु ' ह्या शब्दाला तात्त्विक महत्त्व नसून प्रादेशिक महत्त्व होतें. त्याचा उपयोग एका विशिष्ट प्रदेशांत राहणारे लोक ह्या अर्थानें केला जाई. मूळचे रानटी आणि अर्धसंस्कृत लोक, सुसंस्कृत द्राविड आणि वैदिक आर्य हे सर्व एकाच मातेचे पुत्र असल्यानें हिंदु होते. हिंदुस्थानांत वस्ती करून राहिलेल्या स्त्रीपुरुषांचे निरनिराळे समाज आहेत, ते निरनिराळ्या देवतांना भजतात आणि त्यांचे पूजाविधीहि भिन्न आहेत, ही ठळक गोष्ट हिंदु विचारप्रवर्तकांच्या लक्षांत आली होती.

४ जणूं हे भिन्न प्रकार पुरेसे नव्हते म्हणूनच कीं काय इतिहासाच्या आरंभापासून परकीय लोक हिंदुस्थानांत येत आहेत. ह्यांपैकीं कित्येकांनीं तर हिंदुस्थानांत कायमचें ठाणें दिलें आहे आणि अशा रीतीनें मूळचाच प्रश्न अधिक बिकट झाला आहे ! दक्षिणोत्तर २००० मैल लांब आणि पूर्वपश्चिम १८०० मैल रुंद अशा विशाल भूखंडावर पसरलेल्या हिंदु समाजाची, इतक्या भिन्न आणि म्हणूनच कित्येक बाबतींत समरसता उत्पन्न होण्यास जिच्यांत अनुकूल

अशी परिस्थिति फारच थोडी आहे अशा सामुग्रींतून, कशी उभारणी झाली अशी शंका उद्भवणें साहजिक आहे; परंतु थोड्या शतकांच्या अवधींतच सांस्कृतिक ऐक्याचें वारें देशांतील बऱ्याचशा मोठ्या प्रदेशावर पसरलें आणि संस्कृतींच्या भिन्न भिन्न पातळींतले मानववंश एका सर्वसामान्य वातावरणांत पोहूं लागले ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. हिंदुसमाजामधल्या निरनिराळ्या पोटजातींतील भेद हे वरवरचे असून अगदीं क्षुद्र आहेत. समान इतिहास, समान वाङ्मय आणि समान संस्कृति ह्यांमुळें हिंदूंचा एक स्पष्ट आणि ठळक असा सांस्कृतिक गट तयार होतो. श्री० व्हिन्सेंट स्मिथ[1] म्हणतात:— "भौगोलिक एकलकोंडेपणा किंवा राजकीय वर्चस्व ह्यामुळें उत्पन्न होणाऱ्या ऐक्यापेक्षांहि अत्यंत बलवत्तर असें दृढ, गंभीर आणि मौलिक, हिंदुस्थानचें ऐक्य ( Fundamental unity ) आहे. रक्त, वर्ण, भाषा, पोषाक, चालीरीती आणि पोटजाती इत्यादि अत्यंत विचित्र प्रकारांना पुरून उरणारें हें ऐक्य आहे." विजातीय द्रव्यांना एकत्रित करून त्यांचें आयुष्य शांतिमय आणि सुव्यवस्थित करण्याच्या बाबतींत हिंदुधर्माला आपले स्वतंत्र उपाय योजावे लागले. ह्या बाबतींत त्याला पोषक किंवा मार्गदर्शक होणारा असा ऐतिहासिक अनुभवाचा एकहि प्रयोग त्याच्या डोळ्यांपुढें नव्हता. आजचें जग हें मानववंशीय, सांस्कृतिक आणि धार्मिक गैरसमजुतींनीं भरलेलें असें आहे. आत्मविनाशी झगड्यांपासून आमचें संरक्षण करील अशी एखादी क्लृप्ति शोधून काढण्यासाठीं भयभीत अंतःकरणानें आम्ही सध्यां चांचपडत आहों. ह्या क्लृप्तीचा शोध करण्यांत एखादा नवा प्रयोग करतांना जशी मनाची स्थिति होते तशी आमची स्थिति झाली आहे. धार्मिक झगड्यांकडे पाहण्याची—ते गुंतागुंतींचे प्रश्न सोडविण्याची हिंदु लोकांची जी पद्धति आहे, तिजपासून आपणांला बराच बोध घेण्यासारखा आहे.

५ धर्माकडे पाहण्याचें हिंदूंचें धोरण मननीय आहे. मनुष्यानें बुद्धिगम्य अशीं कांहीं निश्चित मतें मान्य केलीं कीं त्यानें अमुक धर्माचा स्वीकार केला आहे असें सामान्यतः समजण्यांत येतें. परंतु हिंदुधर्म अशा तऱ्हेच्या मर्यादा घालीत

---

१ ह्यांनीं 'प्राचीन हिंदुस्थान'चा इतिहास लिहिला आहे.

नाहीं. हिंदुधर्म अंतःस्फूर्तीपेक्षां सिद्धांत ( Dogmas ) कमी महत्त्वाचे आणि अंतःसाक्षात्कारापेक्षां बाह्याचार कनिष्ठ दर्जाचे आहेत असें लेखतो. धर्म म्हणजे तात्त्विक मतांचा अंगीकार नव्हे किंवा विधिपूर्वक एखादा समारंभ साजरा करणें नव्हे. परंतु एक विशिष्ट प्रकारचा अनुभव किंवा एक विशिष्ट प्रकारचें जीवन म्हणजे धर्म होय. सत्याचें दर्शन किंवा सत्याचा अनुभव म्हणजे धर्म होय. हा अनुभव म्हणजे भावनात्मक स्फुरण नव्हे किंवा ज्ञात्याचे कल्पना-तरंगहि नव्हेत, तर त्यांच्याहि पलीकडे असलेल्या जीवात्म्याकडून सत्स्वरूपी परमात्म्याच्या हांकेला मिळालेला जबाब होय. बौद्धिक विचार, सौंदर्याविषयक आवडीनिवडी आणि नीति—अनीतीचा विवेक ह्या उपाधींनीं आत्मा वेष्टि-लेला असला तरी निरुपाधिक आणि शुद्ध अशा आत्मस्वरूपाची विशिष्ट अवस्था म्हणजेच धर्म होय.

६ धार्मिक अनुभव स्वतःप्रमाण व स्वतःसिद्ध असतो. त्याचीं प्रमाणपत्रें त्याच्या बरोबर असतात. परंतु धर्मद्रष्ट्याला ज्या गोष्टी अंतःकरणापासून पटल्या आहेत, त्यांचें समर्थन तत्कालीन विचारवंत लोकांना पटेल अशा रीतीनें करणें त्याला भाग पडतें. द्रष्ट्याच्या विचारसरणीवर बुद्धिमान् लोकांचें शिक्कामोर्तब झालें नाहीं तर द्रष्ट्याला श्रद्धेचाच अवलंब करावा लागतो. धर्माची उभारणी श्रद्धेवर असते असें म्हणण्यांत हा अर्थ अभिप्रेत असतो. स्वतः धर्माप्रमाणें आचरण करण्याची तसदी न घेतां जे केवळ श्रद्धा ठेवून धर्माचरण केल्याचें समाधान मानूं इच्छितात त्यांची ही अंधश्रद्धा अनुभवावर अधिष्ठित असलेल्या धार्मिक श्रद्धेपासून फार भिन्न आहे. ख्रिश्चन मेथॉडिस्ट—संघाचा संस्थापक वेल्सले[1] हा 'श्रद्धा' म्हणजे काय ? ह्या प्रश्नाचें असें उत्तर देतो कीं, "श्रद्धा म्हणजे एखादें मत नव्हे किंवा अनेक मतांचा—मग तीं मतें कितीहि खरीं असोत संग्रहहि नव्हे. ज्याप्रमाणें शारीरिक इंद्रियांनीं आधिभौतिक गोष्टींचें आकलन करतां येतें, त्याप्रमाणें आध्यात्मिक गोष्टींचें आकलन ज्या शक्तीच्या द्वारें होतें, तिला श्रद्धा म्हणतात. अर्थात् श्रद्धा म्हणजे आत्म्याचा दिव्य चक्षु होय." सांप्र-दायिक वचनावर अंधविश्वास ठेवल्यानें आपली उन्नति होत नाहीं. श्रद्धा म्हणजे प्रमाणभूत धर्मग्रंथांना निमुटपणें मान्यता देणें असा अर्थ ख्रिस्ती

१ इ. स. १७०३ ते १७९१.

धर्मानें युरोपमध्यें प्रसृत केला आहे. त्यामुळेंच दुर्दैवानें अंधविश्वास म्हणजे श्रद्धा अशी समजूत रूढ झाली आहे. ' मनोमग्न प्रचीति ' असा श्रद्धेचा अर्थ केला तर धर्म म्हणजे श्रद्धा किंवा अंतःस्फूर्ति होय. इतर गोष्टींच्या आकलनां-प्रमाणें आध्यात्मिक आकलनहि चुकण्याचा संभव असतो आणि तर्कशुद्ध विचारपद्धतीनेंच त्याला तावून सुलाखून घेण्याची आवश्यकता असते. म्हणू-नच केवळ अंतःस्फूर्तीला आपण श्रद्धा म्हणतों. जिच्यापासून विचार स्फुरतात आणि जिच्यामध्येंच ते विलीन होतात, त्या अंतःस्फूर्तीलाच धार्मिक स्फूर्ति म्हणतात. धार्मिक विषय खेरीज करून इतर गोष्टींचें आकलनहि ह्याच पद्ध-तीनें होत असतें. धार्मिक अनुभवानें सत्यदर्शन होतें व धर्मानें अनुभवास येणारी प्रचीति तर्काच्या कसोटीस उतरते हें दर्शविण्यासाठीं ह्या अनुभवाची बौद्धिक चिकित्सा करणें जरूर असतें. हिंदुविचारसरणी बुद्धीकडे साशंक दृष्टीनें पाहत नाहीं. मानवी मनाच्या ह्या दोन शक्तींमध्यें—बुद्धि आणि अंतःस्फूर्ति ह्यांमध्यें कायमची ताटातूट होणें शक्य नाहीं. आध्यात्मिक उन्नति आणि आत्म्याचा विकास करणारीं मतें हीं साक्षात् जगाचे नियम आणि स्वभावधर्म ( Nature and the laws of the world of reality ) ह्यांशीं सुसंवादी असलीं पाहिजेत. किंबहुना साक्षात् जगाशीं असें सुसंवादित्व उत्पन्न करणें ह्याकरतांच तीं मतें प्रतिपादन केलीं जातात. हिंदूंचे मुख्य पवित्र धर्मग्रंथ जे वेद ते पूर्ण विकसित आत्म्याच्या अंतःस्फूर्तीची नोंद कर-तात. वेद हे केवळ आग्रहानें मांडलेले सांप्रदायिक सिद्धांत नसून साक्षात् अनुभवाचीं शब्दचित्रें आहेत. आत्मसाक्षात्काराच्या भावनेनें प्रेरित झालेल्या आध्यात्मिक अनुभवांचें लेखन म्हणजेच वेद. हे धर्माच्या क्षेत्रांतील तज्ज्ञांचे अनुभव व्यक्त करतात म्हणून ते प्रमाणभूत ग्रंथ मानले जातात. जर वेदांच्या उद्गारांत आध्यात्मिक रहस्य सांठविलेलें नसतें, तर आमची श्रद्धा त्यांच्यावर बसली नसती. द्रष्ट्यांनीं ज्या यमनियमांचें पालन करून आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेतला, त्या यमनियमांचें यथार्थ पालन केलें तर वेदांनीं उकलून दाखविलेल्या गूढ तत्त्वांचा पुनः सुद्धां अनुभव घेता येईल. तर्कशास्त्राच्या मदतीनेंच केवळ नव्हे तर प्रत्यक्ष जीवनानें—त्याप्रमाणें आपला आयुष्यक्रम ठेवून सुद्धां धार्मिक अनुभवांमधील खऱ्याखोट्याचा विवेक आपण करूं शकतों. निरनिराळ्या धार्मिक कल्पनांचे प्रयोग करून आणि आपल्या उर्वरित आयु-

ध्यार्शी त्याचा पडताळा पाहून खरें नाणें कोणतें आणि कृत्रिम कोणतें हें आपण पारखूं शकतों.

७ वेद हे तत्कालीन धर्मप्रवृत्त लोकांनीं ज्या निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करून आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेतला त्या मार्गांचें एकीकरण करतात आणि धर्माच्या सामान्य तत्त्वांचें आणि धर्माची वाढ कशी झाली ह्याचें विवेचन करतात. ज्याअर्थी त्यांचे अनुभव विविध स्वरूपाचे आहेत त्याअर्थी त्यांचें लिखाणहि ' विश्वतोमुखी ' आहे. जयतीर्थानें आपल्या ' न्यायसुधा ' ग्रंथांत ' विश्वतोमुखी ' म्हणजे ' अनेक अर्थात्मक ' असा अर्थ लावला आहे.

८ प्रत्येक धर्माचा वारसा पवित्र समजला जावा, हें त्या धर्माच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. जो समाज आपल्या परंपरेच्या सभोंवतीं पावित्र्याचें वलय निर्माण करतो, तो समाज चिरस्थायी होऊन बलवान् होतो, हे त्या परंपरेपासून मिळणारे बहुमोल फायदे होत. वैदिक परंपरेभोंवतीं असेंच पावित्र्याचें वातावरण पसरलें गेल्यानें संस्कृति पिढ्यानपिढ्या चालू राहण्यास आणि तिचा अखंड प्रवाह कायम ठेवण्यास मदत झाली. धर्माचें रहस्य समजण्याइतकी ज्यांची बौद्धिक योग्यता नाहीं त्यांना सुद्धां पवित्र धर्मग्रंथ हे खऱ्याखुऱ्या आध्यात्मिक जीवनाचा लाभ देऊं शकतात. आयुष्याच्या धकाधकीच्या मामल्यांत निरनिराळ्या गुंतागुंतीच्या प्रश्नांशीं आणि आपत्तींशीं तोंड देतांना त्याचा साधकबाधक रीतीनें संथपणें विचार करण्यास, सामान्य माणसांना सवड नसते. अशा वेळीं त्यांना एकदम मान्य करतां येईल अशा तऱ्हेच्या जीवनसूत्राची किंवा आडाख्याची फार आवश्यकता असते. ह्या जीवनसूत्रामुळें किंवा अडाख्यामुळें त्यांच्या जीवनाला नवीन वळण लागतें. जिवंत परंपरा आमच्या अंतःशक्ती जागृत करते, आमच्या जीवनांमध्यें माणुसकी आणते आणि आम्हांस उच्च वातावरणांत उचलून नेते. त्या परंपरेस अनुसरून प्रत्येक पिढी विशिष्ट नमुन्याच्या मुशींतून बाहेर पडत असल्यानें संस्कृतीच्या प्रत्येक नमुन्याला एक प्रकारचें वैशिष्ट्य आणि जिव्हाळा प्राप्त होतो. ज्यांना स्वतः सत्यदर्शन करावयाचें आहे, त्यांना सुद्धां प्राथमिक अवस्थेंत एखाद्या मार्गदर्शकाची जरुरी असते.

९ हिंदूंचें वेदांसंबंधीं धोरण चौकसपणाच्या कसोटीनें तावून सुलाखून निघालेल्या श्रद्धेचें आहे. ' श्रद्धेचें ' आहे असें म्हणण्याचें कारण ज्या मतांनीं आणि विधींनीं आमच्या पूर्वजांचें जीवन सुकर करण्यास मदत केली तीं मतें आणि ते विधी आम्हांस उपयुक्त होऊं शकतील अशी आमची श्रद्धा आहे. ' चौकसपणाचें ' आहे असें म्हणण्याचें कारण तीं मतें आणि ते विधी ह्यांसंबंधीं गत कालाचा अभिप्राय कितीहि मूल्यवान् असला, तरी त्यामुळें तद्विषयीं चौकशी करून पुराव्याची छाननी करण्याचा वर्तमान कालाचा हक्क नष्ट होत नाहीं. प्राचीन द्रष्ट्याच्या आत्म्यांतून स्फुरलेले ईश्वरी संदेशाचे प्रतिध्वनी कितीहि मूल्यवान् असले तथापि ईश्वरी ' ज्ञानाचे आणि प्रेमाचे ' संदेश अद्यापि संपलेले नाहींत, हें सत्य मान्य करून त्या मान्यतेवर आमची तत्संबंधींची श्रद्धा कसोटीस उतरली पाहिजे. ह्याशिवाय आमच्या धार्मिक अनुभवापासून जो अर्थ आम्ही काढूं तो आधिभौतिक शोधांशीं सुसंगत असला पाहिजे. शास्त्रीय ज्ञानाबरोबर ईश्वराच्या कर्तृत्वशक्तीचें कौतुक वाढून ईश्वरविषयक आपल्या ज्ञानांतहि भर पडते. सबंध परंपरा मान्य न करतां, परंपरेपैकीं जे भाग तर्कशास्त्रदृष्ट्या सुसंगत आहेत ते, इंद्रियजन्य ज्ञानाच्या पुराव्यापेक्षांहि श्रेष्ठ दर्जाचे आहेत म्हणून, मान्य करावयाचे.[1]

१० हिंदुधर्मीय तत्त्वज्ञान अनुभवाच्या भूमिकेवर उभारलेलें असून अनुभवांतच त्याची परिसमाप्ति होते. मात्र ही अनुभवाची भूमिका मानवी स्वभावाइतकी व्यापक आहे. उलट पक्षीं इतर धर्म ह्या किंवा त्या विशिष्ट व्यक्तींच्या अनुभवावर उभारलेले आहेत. जीझसची आपल्या सद्सद्विवेकबुद्धीवर असणारी संपूर्ण सत्ता स्वतःसिद्ध आहे असेंच मानलें गेल्यानें आणि त्याचप्रमाणें अधोगतीस जाणाऱ्या आत्म्याचें संरक्षण करण्याची जीझसची लायकी आणि तत्परता ह्यांविषयीं शंकाच उपस्थित होत नसल्यानें एकट्या जीझसच्या आत्मानुभवावर संबध ख्रिस्ती धर्माची उभारणी झाली. अमुक एक विशिष्ट प्रकारचा आध्यात्मिक अनुभव

---

१ तात्पर्यवती श्रुतिः प्रत्यक्षाद्बलवती । न श्रुतिमात्रम्। —भामती.

वाचस्पतिमिश्र नांवाचे महापंडित काशीक्षेत्रीं दहाव्या शतकांत होऊन गेले. ब्रह्मसूत्र-शांकरभाष्यावर त्यांनीं जो टीकाग्रंथ लिहिला त्या ग्रंथाचें नांव 'भामती.' हा ग्रंथ अद्वैत पंडितांना अत्यंत मान्य आहे.

जे स्वतः घेतात किंवा दुसऱ्याच्या अनुभवावर विश्वास ठेवतात त्यांनाच ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें आपल्या अनुभवाशीं जुळतीं आहेत असें वाटतें आणि मग दुसऱ्या लोकांचे अनुभव मृगजलवत् आहेत आणि दुसरे धर्मग्रंथ अपूर्ण आहेत असें समजून त्यांचा त्याग करण्याचा मोह होतो. मुळापासून सत्यालाच चिकटून राहिल्यानें हिंदुधर्माची अशी फसवणूक झाली नाहीं. स्वतःच्या दृष्टिबिंदूपेक्षां भिन्न असे विचार असणें शक्य आहे हें ओळखून आपल्या मताइतकेच ते विचारार्ह आहेत अशी हिंदु विचारप्रवर्तकांची मान्यता आहे. प्रत्येक मनुष्य, मग तो कोणत्याहि देशांतील असो, कोणत्याहि वर्णाचा असो, संस्कृतीच्या कोणत्याहि दर्जाला पोंचलेला असो, ईश्वराचेंच लेंकरूं आहे; व हें जर खरें असेल तर तो सर्वशक्तिमान् जगत्पालक आपल्या अतुल चातुर्यानें व प्रेमानें प्रत्येक माणसाला त्याच्या शक्तीनुसार परमतत्त्वाचें ज्ञान संपादिण्यास मदत करीत असतो हेंहि आपल्याला कबूल केलें पाहिजे. हिंदूला जेव्हां आढळून आलें कीं, आत्मसाक्षात्कार हें निरनिराळ्या लोकांचें ध्येय असून तें त्यांनीं निरनिराळ्या साधनांनीं साध्य केलें आहे, तेव्हां तीं सर्व साधनें—साधनानामनेकता त्यानें औदार्यानें मान्य केलीं आणि धर्मांच्या इतिहासामध्यें त्यांच्या उपयुक्ततेप्रमाणें त्या त्या साधनांचें समर्थन केलें. निरनिराळ्या संप्रदायांना आपले विशिष्ट धर्मग्रंथ हे आपली अभिरुचि आणि बुद्धिमत्ता ह्यांच्या विकासाचें, आपल्या जीवनसमृद्धीचें, आपल्या विचारसंपत्तीचें, आपल्या भावना उद्दीपित करण्याचें आणि आपल्या प्रयत्नांच्या स्फूर्तीचें उगमस्थान—बहुधा 'एकमेवाद्वितीयम्' असें उगमस्थान वाटत असल्यामुळें त्यांची उन्नति घडवून आणण्याकरितां त्या विशिष्ट धर्मग्रंथांचा उपयोग केला गेला. श्रुतिस्मृतिपुराणोक्त असा हा हिंदुधर्म आहे. अंतःसाक्षात्काराच्या निरनिराळ्या अंतःस्फूर्तींचे आणि देशांतील लोकांच्या निरनिराळ्या धर्मग्रंथांचें महत्त्व ( सर्वागमप्रामाण्य ) मान्य केल्यानें हिंदुधर्म नानाविध रंगांच्या चित्रविचित्र लोलकांच्या सुंदर झुंबराप्रमाणें दिसतो. असंबद्ध कालानुक्रम आणि अद्भुत गोष्टी ह्यांनीं प्रचुर असलेलीं पुराणें हीं मुख्यत्वेंकरून काल्पनिक आहेत; परंतु त्यांमध्यें कांहींचें मन रमलें एवढ्याचकरतां पवित्र ग्रंथांमध्यें त्यांचा समावेश करण्यांत आला. ज्या तंत्रग्रंथांत मुख्यतः यौगिक साधनांचें आणि शिस्तीचें विवेचन करण्यांत आलें आहे,

आणि ऋग्वेदकालापासून कांहीं समाजांच्या जीवनावर ज्यांची छाप पडली आहे अशा तांत्रिक ग्रंथांची सुद्धां पवित्र ग्रंथांमध्यें गणना झाली आहे. हिंदूंच्या पुष्कळ समारंभांमध्यें तंत्रपूजेची छटा अद्यापिहि दिसून येते. हिंदुधर्मामध्यें मनुष्याच्या आध्यात्मिक उन्नतीस पोषक असें प्रत्येक वचन प्रमाणभूत मानण्यांत आलें आहे. " वेद, सांख्य, योग, पाशुपत आणि वैष्णव इत्यादि तत्त्वांपैकीं प्रत्येकाची कोठें ना कोठें तरी महती गाइलेली आढळते. रुचिवैचित्र्यामुळें कांहींना एक वचन बरें वाटतें तर इतरांना दुसरें बरें वाटतें. परंतु हे परमेश्वरा ! नद्यांचे प्रवाह कितीहि वळणें घेत गेले तरी ते अखेर समुद्रालाच जाऊन मिळतात, त्याप्रमाणें आम्हीं रुचिवैचित्र्याला अनुसरून निरनिराळ्या देवतांची उपासना जरी करीत असलों, तरी शेवटीं तुलाच येऊन मिळणारे ! " हिंदुधर्माला विशिष्ट निश्चल धर्ममतांचें स्वरूप आलेलें नाहीं. तो व्यापक आणि संमिश्र अशा आध्यात्मिक विचारांचा आणि आत्मानुभवांचा कुशलतेनें विणलेला गोफ आहे. मानवी आत्म्याला परमेश्वरप्रवण करणाऱ्या हिंदुधर्माच्या परंपरेचा युगानुयुगें अखंड विकास होत आला आहे.

११ श्रवण, मनन, निदिध्यास इत्यादि मार्गांनीं होणाऱ्या आत्मिक विकासाच्या आंदोलनामुळें धर्मामध्यें योग्य त्या सुधारणा घडवून आणण्यास वाव मिळवून हिंदुधर्माच्या सनातनत्वाला दृढता येते. 'कोसच्या' भाषेंत बोलावयाचें असल्यास धर्म आणि तत्त्वज्ञान, आचार आणि विचार, व्यवहार आणि तत्त्व, हीं आत्म्यांतून स्फुरणाऱ्या शाश्वत संगीताचीं आंदोलनें होत. आचारापासून विचाराकडे आणि विचारापासून पुनः आचाराकडे अशा रीतीनें विकास करीत करीत आत्मसाक्षात्काराच्या चढत्या पायऱ्या आपण चढत जातों. परंपरा म्हणजे स्थायी संस्था नव्हे; जिच्यामध्यें नेहमीं नवीन घडामोडी होतात तीच खरी परंपरा. आपल्या अनुयायांच्या स्वतंत्र हालचालींनीं परंपरेचें पुनरुज्जीवन होत असतें. नित्य पुनर्घटना होत राहील तरच

१ त्रयी सांख्य योगः पशुपतिमत वैष्णवमिति ।
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां ।
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥ —महिम्नस्तव.

२ इटालियन तत्त्वज्ञानी आणि टीकाकार (ज. १८६६)

ती बांधणी चिरकाल टिकूं शकेल. जर परंपरेचा विकास झाला नाहीं, तर त्याचा अर्थ एवढाच कीं, तिचे अनुयायी आध्यात्मिक दृष्ट्या मेलेले आहेत. हिंदुधर्माच्या समग्र इतिहासांत ज्ञानी आणि व्यवहारकुशल लोक हे नवीन परिस्थितीला जुळतील अशा नवीन ध्येयांचा विकास करण्याच्या कामांत आणि नवीन नमुन्यांचे प्रयोग करण्याच्या बाबतींत सदैव गुंतलेले असतात असें आढळून येतें. वेदकालीन आर्यलोक जेव्हां हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या संपर्कांत आले तेव्हां प्रगतीची पहिली लाट उसळली. आर्य लोक जेव्हां गंगाकिनारीं आले, तेव्हां प्रगतीची दुसरी लाट, जैन आणि बुद्धधर्मीय लोकांच्या विरोधी चळवळीच्या रूपानें, उसळली. अत्यंत सुसंस्कृत अशा द्राविड लोकांच्या परिचयानें वैदिक धर्माचें सगुणोपासनेमध्यें रूपांतर झालें. इस्लामी धर्माच्या प्रसारामुळें रामानंद, चैतन्य, कबीर आणि नानक इत्यादि धर्मसुधारकांना आपापले संप्रदाय स्थापन करण्याची स्फूर्ति मिळाली. पाश्चात्यांशीं संबंध जडल्यामुळें ब्रह्मसमाज आणि आर्यसमाज यांची उत्पत्ति झाली. असें असलें तरी हिंदुधर्म म्हणजे नानामतांची खिचडी आणि नानाविवादांचें माहेरघर असें समजून त्याज्य ठरवितां येत नाहीं. कारण वेदांताच्या सर्वसामान्य पार्श्वभूमिकेवर हिंदुधर्माच्या प्रत्येक स्वरूपा( Form )ची उभारणी झाल्यानें आणि त्याच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्याचा संबंधहि वेदांताशीं जडला असल्यानें हिंदुधर्म म्हणजे वेदांतरहस्याच्या संथ पण निश्चित वाढीचा एक नमुनाच आहे. जरी हिंदुधर्माच्या विचारसरणीमध्यें पुष्कळ क्रांति घडून आली आहे आणि तिनें मोठाले विजय मिळविले आहेत, तथापि मुख्य कल्पना चारपांच हजार वर्षांपर्यंत तशाच्या तशाच कायम राहिल्या आहेत. हिंदुधर्माचें बीज वेदांतांत सांपडतें.

१२ वेदांताची प्रस्थानत्रयी—उपनिषदें, ब्रह्मसूत्रें आणि भगवद्गीता स्थूल मानानें श्रद्धा, ज्ञान आणि शिस्त हे तीन टप्पे सूचित करते. उपनिषदांमध्यें द्रष्ट्यांचे अनुभव समाविष्ट झाले आहेत. तर्क आणि शिस्ताहि त्यांमध्यें आहेत; परंतु उपनिषदांचीं तीं मुख्य लक्षणें नव्हत. ब्रह्मसूत्रें उपनिषदांच्या मुख्य निर्णयांचा तर्कशुद्ध पद्धतीनें अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. भगवद्गीता मुख्यतः खरें धार्मिक जीवन आपण ज्या साधनांनीं संपादन करूं शकूं तीं साधनें दर्शविणारें योगशास्त्र होय. हिंदुधर्म जोखण्याचीं हीं तीन

सर्वमान्य निरपवाद साधनें होत. महाशक्तिमान् वेदांतकेसरी जोंपर्यंत गर्जना करीत नाहीं तोंपर्यंत अरण्यामध्यें इतर शास्त्रांची कोल्हेकुई चालू असते.[1] हिंदुधर्मांतील सर्व संप्रदाय आपापल्या धार्मिक मतांप्रमाणें वेदांताचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. वेदांत हा एखादा धर्मग्रंथ नसून अत्यंत व्यापक व गूढ अर्थानें धर्माची साक्षात् मूर्तीच आहे. अशा रीतीनें हिंदुधर्माचे निरनिराळे संप्रदाय एका सामान्य छत्राखालीं येऊं शकतात. त्यांना कधीं कधीं एकाच मुख्य सूत्राचें विपर्यस्त स्वरूप म्हणून समजण्यांत येतें. महाभारत म्हणतें त्याप्रमाणें जरी गैरसमजामुळें निरनिराळे वेद कल्पिण्यांत आले आहेत तरी वेद एकच आहे आणि त्याचें स्वारस्यहि एकजिनसीच आहे.[2] निरनिराळे संप्रदाय सामान्यतः वेदप्रामाण्य मानतात; त्यामुळें सांप्रदायिक वातावरण शुद्ध होण्यास फार मदत होते. नवीन संप्रदायाचें जे भाग वैदिक सूत्रांशीं सुसंगत नसतात ते गौण समजण्यांत येऊन कालांतरानें हळूहळू गाळले जातात. वेदांत हा कोणत्याच एका धर्मपंथाचा पुरस्कर्ता नसल्यामुळें कोणतेंहि धार्मिक तत्त्व अगर कोणत्याहि धार्मिक भावना शिळ्या अगर जीर्ण झाल्या ह्या सबबीवर उपटून टाकण्यांत आल्या नाहींत एवढेंच नव्हे तर वेदांताच्या संग्राहक छायेखालीं आणल्यामुळें त्यांची वाढ होत गेली.

१३ जर 'धर्म' म्हणजे 'अनुभव', तर असा प्रश्न उद्भवतो कीं, अनुभवाचा विषय कोणता? ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना कोणत्याहि दोन धर्मांचें एकमत होत नाहीं. योग्यांनीं निर्माण केलेल्या परमेश्वराविषयक अनेक शब्दचित्रांशीं परिचय करून हिंदु तत्त्वज्ञानानें आपल्या जीवनाला सुरुवात केली. अनेक धर्मांचा तौलनिक अभ्यास केला असतां आपल्याला आज योगदर्शनाचीं निरनिराळीं वर्णनें वाचावयास मिळतात. कांहीं ख्रिस्ती योगी असें जाहीर करतात कीं, त्यांच्या परमोच्च यौगिक स्थितींत त्यांना 'पिता, पुत्र आणि ईश्वरी स्फूर्ति' ह्या त्रयीचें दर्शन होतें. पुराणमतवादी मुसलमान योग्यांना ही कल्पना मान्य नाहीं. त्यांना 'महंमदा'मध्यें सत्याचें दर्शन होतें. ईश्वराच्या स्वरूपाविषयींच्या अशा भिन्नभिन्न अनुभवांपासून

---

१ तावद्गर्जन्ति शास्त्राणि जम्बुका विपिने यथा । न गर्जति महाशक्तिर्यावद्वेदान्तकेसरी ॥
२ एक एव द्विजो वेदो वेदाश्चैक एव तु । एकवेदस्य चाज्ञानाद्वेदास्ते बहवः कृताः ॥

ईश्वराविषयीं विचार करणारा मनुष्य ईश्वराला आपल्या कल्पनेप्रमाणें स्वरूप देतो, असें अनुमान काढण्याचा उतावीळपणा हिंदुतत्त्वज्ञान्यांनीं केला नाहीं. श्वेताश्वतरोपनिषदांत म्हटलें आहे, " हा प्रकाशात्मा विश्वकर्मा आहे ( म्हणजे सर्व विश्व ह्याच्या मायेनें निर्माण झालें आहे ). तो व्यापक असून सर्व प्राण्यांच्या हृदयांत सदा अवस्थित आहे. मनाचें नियमन करणाऱ्या अंतःकरणानें त्याचें आकलन करण्यांत येतें. जे त्याला जाणतात ते अमृत—अविनाशी होतात[1] " आध्यात्मिक अनुभव म्हणजे 'सत्या 'चें उघडेंनागडें दर्शन नव्हे तर अनुभव घेणाऱ्याच्या मनाची पूर्वकल्पना आणि पूर्वग्रह ह्यांनीं परिवेष्टित असें जें सत्याचें दर्शन त्याला आध्यात्मिक अनुभव म्हणतात. माणसाच्या मनामध्यें कप्पे नसतात; बुद्धि, भावना, इच्छाशक्ति, अशा तऱ्हेचे त्याचे वेगवेगळे भाग पाडतां येत नाहींत. 'सर्व मानवी प्राण्यांत आढळून येणारी बुद्धि एकाच स्वरूपाची आहे ' ह्या विधानाचें समर्थन ती बुद्धि शुद्ध आणि स्वयंभू स्वरूपांत दिसून येत नसल्यानें करतां येत नाहीं. ' निरनिराळीं धार्मिक तत्त्वज्ञानें हीं निरनिराळ्या मानवी स्वभावाचीं प्रतिबिंबें आहेत ' हें मत अलीकडे उपयुक्तता हीच सत्याची कसोटी असें मानणाऱ्या प्रॅगमॅटिस्ट लोकांनीं ( Pragmatist ) सिद्ध करून धार्मिक तत्त्वज्ञानाची प्रशंसनीय सेवा बजाविली आहे. मानवी प्राण्याच्या भोंवतीं ज्या प्रकारचें वातावरण असेल त्या वातावरणानें मर्यादित अशीच त्याची दैवी स्फूर्ति असणार. धर्मद्रष्ट्याच्या व्यक्तिविषयक, मानववंशीय आणि ऐतिहासिक संस्कारांना अनुसरून परमेश्वराचें गूढ दर्शन त्यास होत असतें. धार्मिक अनुभव सुद्धां मनाच्या द्वाराच घ्यावे लागतात, ह्याची जाणीव झाली कीं ईश्वरविषयक नानाविध कल्पनांचें रहस्य सहज पटतें.

१४ ' परमेश्वराविषयक वर्णनें परस्परविरोधी असतात ' असें कधीं कधीं प्रतिपादण्यांत येतें. ह्यावरून एवढेंच दिसून येतें कीं, त्याच्याविषयींच्या आपल्या कल्पना खऱ्या नसतात. परमेश्वरविषयक आपल्या कल्पना खऱ्या नसतात असें म्हणणें म्हणजे आपल्या कल्पना ज्याला उद्देशून असतात त्या

---

१ एष देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये सन्निविष्टः ।
हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥
—श्वेताश्वतर उपनिषद्, ४, १७.

परमेश्वराचें अस्तित्व नाकबूल करणें नव्हे. ‘ परमेश्वर ’ म्हणजे ‘ नीतिची मूर्ति ’ किंवा ‘ पवित्र प्रेम ’ ह्या सुधारलेल्या काळांतील व्याख्या व ‘ परमेश्वर ’ म्हणजे ‘ स्वर्गांतलि एक जुलमी सुलतान ’ ही प्राचीनकालीन असंस्कृत व्याख्या परस्परांना विरोधी होत असतील; परंतु त्या सर्व एकच सत्य सुचवितात. इंद्रियजन्य आकलन आणि शास्त्रीय विचिकित्सा ह्या बाबतींत, वैयक्तित भावना जर वस्तूचें सत्यस्वरूप दूषित करीत नाहींत, तर धार्मिक अनुभवाच्या बाबतींतहि वैयक्तिक भावना सत्याचें स्वरूप दूषित करीत असतलि असें गृहीत धरण्याचें कारण नाहीं.[1]

१५ विश्वव्यापी परमचैतन्याचीं वर्णनें, त्याच्या वास्तविक स्वरूपापेक्षां कितीहि कमी पडत असलीं तरी परमचैतन्याच्या सत्यतेविषयीं हिंदूला कधींहि शंका आली नाहीं. तत्त्वज्ञानी लोक कांहींहि म्हणोत, परंतु साधुसंत परमेश्वराविषयीं बोलतांना "आमच्या दृष्टिपथांतून पुष्कळ गोष्टी लपल्या आहेत" असेंच मत प्रतिपादन करण्यास उत्सुक असतात. परमेश्वर अव्यक्तच राहतो. परमचैतन्याच्या स्वरूपाविषयीं जो अज्ञेयवाद आम्हांला मुग्धता स्वीकारण्यास आज्ञा करतो त्यामध्यें पुष्कळ रहस्य भरलेलें आहे. दिव्यशक्तीच्या अगाधत्वाविषयीं व्यक्त अभिप्रायापेक्षां मुग्धतेंतच अर्थगांभीर्य अधिक आहे. ग्रीक–रोमन कालांतील अज्ञात देवतांसाठीं उभारलेलीं स्थंडिलें हीं केवळ दिव्य शक्तीच्या स्वरूपाविपर्यीं मानवी अज्ञान व्यक्त करतात. तीं स्थंडिलें म्हणजे अदृष्टाचा शोध करतांना मनुष्याला आलेल्या अपयशाचीं स्मारकें होत. ‘ परमेश्वराचें स्वरूपवर्णन करा ’ असा प्रश्न विचारला असतां उपनिषदांतील द्रष्टा स्तब्ध बसला आणि जेव्हां त्याला उत्तर देण्याविषयीं आग्रह करण्यांत आला तेव्हां तो ‘ शान्तोऽयमात्मा ’ असें उद्गारला. चैतन्य इतकें गूढ आहे कीं तें उकलण्यास वाणी किंवा इतर साधनें लटकीं पडतात. जेव्हां भाविक लोक परमेश्वराच्या आपल्या साक्षात्कारासंबंधाचे अनुभव सांगण्याचा प्रयत्न करतात,

---

[1] उदाहरणानें हें विधान अधिक स्पष्ट करून दाखवितां येईलः— साखरेची चव कोणींहि घेतली आणि पाण्याचें पृथक्करण कोणींहि केलें तरी त्यात जमा साखरेच्या व पाण्याच्या सत्य स्वरूपाचा थोडा तरी अंश असतोच, त्याप्रमाणें सर्व जगाचा नियता जो परमेश्वर त्याच्या स्वरूपाची कल्पना कोणींहि कशीहि केली तरी तींत ईश्वराच्या सत्यस्वरूपाचा थोडा तरी अंश असणारच. —अनुवादक

तेव्हां "दैवी अंधकार", "ज्याच्याविषयीं कांहींहि सांगतां येत नाहीं असें", या आणि अशाच दुसऱ्या वचनांचा ते उपयोग करतात.

१६ ज्ञानी हिंदु लोक अनिर्वचनीयत्वाची कल्पना नकारार्थी वचनांनीं व्यक्त करतात. "तेथें दृष्टि पोहोंचूं शकत नाहीं, वाणी लटकी पडते, मन मूढ बनतें, त्याचें ज्ञान कसें करून घ्यावें हें आपणांस कळत नाहीं आणि तें दुसऱ्यास कसें पटवून द्यावें ह्याचीहि कल्पना करवत नाहीं.[1]" जेथें याज्ञवल्क्य 'नेति' असें म्हणतो तेथें बर्नार्ड 'अज्ञेय' (Nescis) असें म्हणतो, राइस ब्रोक "जेथें प्रेमळ भक्तवृंद विलीन होतात" ह्या शब्दांनीं वर्णन करतो आणि डायानिशियस दि एरोपेगाईट, एकहार्ट आणि बोहेमे[2] हे नकारार्थी वर्णनांनींच वेळ भागवितात.

१७ परंतु 'नितांत शांतता' किंवा 'नकारार्थी वचनें' ह्यापासून मनाला कांहींच समाधान होत नाहीं. मनुष्याला आपले विचार वाणींत व्यक्त केल्यावांचून राहवत नाहीं. आपल्या स्वतःच्या अनुभवाच्या भाषेंत धार्मिक गूढ गोष्टींचा अर्थ करण्याचा तो आग्रह धरतो. 'कोणत्याहि मर्यादेच्या पलीकडचें आणि जें जें वर्णन करावें त्याहून निराळेंच असें परमेश्वराचें स्वरूप आहे' असल्या विधानांत असणाऱ्या अनिश्चिततेमुळें मनुष्याला सत्य स्वरूपाचा लाभ होण्याऐवजीं तो गोंधळून जातो. मानवी मन हें कांहीं तरी निश्चित आणि मर्यादित वस्तूसाठींच हपापलेलें असतें आणि म्हणूनच परमात्म्याला निश्चिताच्या कक्षेंत आणण्यासाठीं तें आपल्या साधनांचा उपयोग करतें. आमच्या कल्पनाशक्तीचा उपयोग केल्याशिवाय आम्ही परमेश्वराविषयीं विचारच करूं शकत नाहीं. स्वतःला झालेल्या दर्शनाचें वर्णन करण्यासाठीं धर्मद्रष्ट्याला कल्पनाशक्तीची मदत घ्यावी लागते. दृष्टांताच्या मदतीनें त्याला आपले विचार व्यक्त करणें सोपें जातें. दृष्टांताच्या पसाऱ्यांत सत्य लोपून जाऊं नये म्हणून जास्तींत जास्त जर कांहीं करतां येणें शक्य असेल तर तें 'आत्मानुभव व्यक्त करतांना कल्पनेचें सहाय्य घ्यावें लागतें, ह्याची पूर्ण

१ न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति न मनो न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यात् ॥
—केनोपनिषद्. खंड १, ३.

२ हीं सर्व युरोपच्या मध्ययुगांतील विद्वान् माणसें आहेत.

जाणीव बाळगणारा मनुष्य जी खबरदारी घेतो ती घेणें ' हें होय. आपण ' पुरुष ' असून ईश्वर ' पुरुषोत्तम ' आहे. आपण जर ' पुरुषत्वा 'च्या कल्पनेचें पृथक्करण केलें तर आपल्याला असें आढळून येतें कीं, तिजमध्यें ' जाणिव ', ' भावना ' आणि ' इच्छाशक्ति ' ह्यांचा समावेश होतो आणि ईश्वर म्हणजे सर्वज्ञ ब्रह्मा, परमकृपाळु विष्णु आणि संपूर्ण इच्छा-शक्तिवान् शिव होय. सर्वसामान्य जनतेच्या परमेश्वरविषयक कल्पनेप्रमाणें हीं अनुभवाचीं तीन स्वतंत्र केंद्रें नसून एकाच संमिश्र स्वरूपाचीं तीन अंगें होत. देशामध्यें परमेश्वरविषयक ज्या निरनिराळ्या कल्पना प्रचलित होत्या, त्यांचा ह्या देवत्रयीपैकीं कोणाशीं तरी संबंध जोडण्यांत आला.

१८ आत्म्याचें स्वरूप विविध असून त्याच्या भोंवतालची परिस्थिति विविध गुंतागुंतीची आहे. आत्मा ' अनंत ' आणि परिस्थितीहि मर्यादारहित असल्यामुळें तिच्यावर होणाऱ्या आत्म्याच्या प्रत्याघातांना ह्या किंवा त्या सूत्रांत गोंवून टाकतां येत नाहीं. जेव्हां आपणांला सांत सृष्टीचें दडपण असह्य होतें, तेव्हां आपण ' अनंता 'चा आश्रय घेतों. सांत सृष्टीचा दाब आपल्यावर इतक्या निरनिराळ्या ठिकाणीं पडत असल्यानें त्याचा परिणाम असा होतो कीं, परमेश्वरविषयक आपल्या कल्पना निरनिराळ्या बनत जातात. ' जशी मनुष्याची संस्कृति तसें त्याला परमेश्वराचें स्वरूप प्रतीत होतें ' असें केंब्रिज येथील प्लेटोचे अनुयायी जॉन स्मिथ म्हणतात. जगाच्या नश्वर स्वरूपाची यथार्थ कल्पना उपनिषत्कारांना आली असल्यानें त्यांनीं धुक्याप्रमाणें विरून न जाणाऱ्या ' अनंत सत्या 'चा शोध केला. जगाचें दुःख आणि यातना पाहून बुद्धाचा आत्मा पिळवटला, ह्या दृश्यानें सांत सृष्टीच्या मिथ्यात्वाविषयीं त्याची पूर्ण खात्री झाली आणि सदाचार-संपन्न जीवन हाच ह्यांतून सुटण्याचा मार्ग आहे असें त्यानें ठरविलें. कारण, सदाचारसंपन्न जीवन म्हणजेच शाश्वतधर्म असें त्यास वाटलें. विपर्यस्त नैतिक कल्पनांनीं तत्कालीन हिन्दु समाज खिळखिळा झाल्यानें दुष्कृतांचा विनाश आणि साधूंचें परित्राण करणाऱ्या सर्वशक्तिमान् आणि न्यायी परमेश्वराला ते शरण गेले. दुष्ट वासनांना जागच्या जागीं डांबून टाकणारे अमोघ आणि भव्य असे सदसद्विवेकबुद्धीचे आदेश ऐकून हिब्रू द्रष्टे आणि महंमद मंत्रमुग्ध

झाले होते. 'राजा हा सर्व अधिकारांचें उगमस्थान आहे' ही कल्पना त्यांच्या परिचयाची असल्यानें त्यांनीं परमात्म्याला 'प्रभूंचा प्रभु' आणि 'राजांचा राजा' बनविलें. प्रॉटेस्टंट ख्रिश्चन लोकांचा नैतिक आज्ञांच्या अनुल्लंघनीयतेपेक्षां परमात्म्याचें सहज औदार्य आणि सौजन्य ह्यांवरच जास्त विश्वास आहे. "परमेश्वर हा आपला स्वर्गीय पिता असून आपण त्याचीं उधळीं आणि उनाड अपत्यें आहों. त्यानें घालून दिलेल्या मार्गापासून आपण जरी दूर वाहवत जात असलों तरी जेव्हां आपण पुनः त्या मार्गावर परत येऊं, तेव्हां तो आपलें हंसतमुखानें स्वागत करण्यास सदैव तयार आहे."— अशी प्रॉटेस्टंट लोकांची विचारसरणी आहे. पिते न्यायी आणि माता दयाळू असतात म्हणूनच कॅथॉलिक ख्रिश्चन आणि शाक्त लोक परमेश्वराला 'आई' मानतात. गाय ज्याप्रमाणें आपल्या वांसरावरील घाण चाटून त्याच्यावरील वात्सल्य व्यक्त करते, त्याप्रमाणें ही दयाळू आई पुत्रवात्सल्यानें प्रेरित होऊन त्यावर प्रेमाचें सिंचन करते. अगदीं पूर्वकालीन **निसर्गप्रजेपासून** तों सेंट फ्रॅन्सिसचें पितृप्रेम आणि रामकृष्ण परमहंसांचें मातृप्रेम यांपर्यंतचें परमेश्वर-विषयक प्रत्येक मत, मानवी प्राणी आणि दैवी शक्ति ह्यांमध्यें असणारें नातें कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत व्यक्त करतें. परमेश्वराकडे जाण्याची प्रत्येक वाट, परमेश्वराला संबोधण्याची प्रत्येक पद्धति, मानवी मनाच्या ठेवणीला अनुरूप अशी असते. ह्यांपैकीं प्रत्येक मार्ग जरी अंशतः सत्य–कथन करतो, तथापि सत्याचा सर्व गड्डा कोणीच मिळवून देत नाहीं. हुकमत करणाऱ्या कायद्यापेक्षां, शिक्षा ठोठावणाऱ्या न्यायाधीशापेक्षां, संकोच करविणाऱ्या प्रेमापेक्षां, आपल्या अस्तित्वाबद्दल ज्याचे आपण ऋणी आहों अशा पित्यापेक्षां, आपल्या सर्व आकांक्षांचा आधार जिच्या आशीर्वादावर अवलंबून आहे अशा मातेपेक्षांहि परमेश्वर अधिक आहे. 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति[1]', 'बहूनि मम नामानि कीर्तितानि महर्षिभिः[2]' अशीं परमेश्वराचीं निरनिराळीं वर्णनें मान्य करणें म्हणजे 'अनेकदेव–वादा'मध्यें घसरणें नव्हे. देवांची संख्या सांगण्याविषयीं याज्ञवल्क्यांना प्रश्न विचारला असतां त्यांनीं प्रथम ३३०६ या लोकप्रिय संख्येपासून सुरुवात करून पुढें

१ ऋग्वेद. १,१६४,४६. २ शांतिपर्व.

कमी करीत करीत त्याचा शेवट एका ब्रह्मामध्यें केला. हें अविनाशि आणि अटल सत्य एकमेव आहे.[1]

१९ हीं निरनिराळीं वर्णनें ईश्वराच्या स्वतंत्र आणि निरपेक्ष अस्तित्वाविषयीं कांहींच कल्पना देत नाहींत, फक्त तो आपणांस कसा दिसतो ह्याचें प्रतिपादन करतात. परमेश्वराची देव–मानुष (anthropo—morphic देवाचें जीवन मनुष्याच्याप्रमाणें आहे अशी) कल्पना आपल्या गरजांना सापेक्ष अशी आहे. परमेश्वर म्हणजे फुलें आणि तारे, लहान पक्षी आणि लहान मुलें, यांचें पालनपोषण करणारा अशी आपली त्याच्याविषयींची कल्पना आहे. परमेश्वराचें अस्तित्व केवळ आमच्या अशा कल्पनांवर अधिष्ठित झालेलें नसून तो स्वयंभू आहे. मानवी प्रगतीचें एक साधन ह्या दृष्टीनें परमेश्वराकडे पाहणें म्हणजे आपलें महत्त्व फुगवून सांगण्यासारखें आहे. परमेश्वर आमची पारख करण्याऐवजीं आम्हीच परमेश्वराची पारख करतों. तुकाराम महाराज म्हणतातः—

जेणें तुज झालें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आम्ही ॥ १ ॥
नाहीं तर तुज कोण हें पुसतें । निराकारीं तेथें एकाएकी ॥ २ ॥
अंधारें दीपका आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणाची ॥ ३ ॥
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें तें ॥ ४ ॥
अमृतासी मोल विषाचिये गुणें । पितळें[2] तरी सोनें उंच नीच ॥ ५ ॥
तुका म्हणे आम्हीं असोनियां जाण । तुज देवपण आणियेलें ॥ ६ ॥[3]

मानवांना प्रतीत होणारें ईश्वराचें स्वरूप मूळ ईश्वरी स्वरूपाहून भिन्न असणें शक्य आहे.

२० धार्मिक दृष्टीनें सृष्टीच्या मूळ आधाराचा प्रश्न सोडवितांना प्रत्येक वेळीं निर्गुणाचें अथवा सगुणाचें अस्तित्व मान्य करणें भाग पडतें. बुद्धिप्रामाण्यवादी, नैयायिक आणि योगी हे निरपवाद रीतीनें परमेश्वराचें निर्गुण स्वरूपच मान्य करतात. उलट पक्षीं नैतिक देववादी लोकांचा कल

१ एकधैवानुद्रष्टव्यमेतदप्रमेयं ध्रुवम् । —बृहदारण्यक उपनिषद्, (४) ४,२०.

२ पितळें=पिवळें.

३ तुकारामाची गाथा—निर्णयसागर प्रत, प्रकरण 'देवाशीं प्रेमाचें भांडण', अभंग ९८६.

सगुण स्वरूप मान्य करण्याकडे असतो. उपनिषत्कालापासून आजपर्यंत हिंदु विचारसरणी अशा प्रकारची आहे. ख्रिस्ती धर्मामध्येंहि असाच घोटाळा दृष्टीस पडतो. ख्रिस्ती योग्यांना जे अत्युच्च अनुभव आले आहेत, त्यांवरून सगुणाच्या पलीकडील ' निर्गुण ' स्वरूपच त्यांना अधिक आकर्षण करतें. कांहीं हिंदु द्रष्ट्यांना आत्मसाक्षात्काराचे जे उच्च आणि विपुल अनुभव आले ते सगुणोपासनेमुळेंच लाभले असें हिंदुधर्म प्रतिपादन करतो. दिव्य शक्तीच्या मूर्त स्वरूपाची कल्पना करणें बुद्धीला आवश्यकच होतें. हिंदु विचारसरणी परमात्म्याचें सगुण स्वरूप जरी मान्य करते तरी मध्यवर्ती चिच्छक्ति ही निर्गुणात्मक आहे ह्या तत्त्वाचाहि विसर ती आम्हांला पडूं देत नाहीं. जे लोक परमेश्वराचें सगुण स्वरूप मान्य करतात, ते देखील असें प्रतिपादन करतात कीं, बुद्धीला अगम्य अशीं परमेश्वराचीं विविध अद्भुत स्वरूपें आहेत. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति आणि तिचा लय ह्यांचें आद्य कारण हें तुलनेंत स्वसंवेद्य स्वरूपाहून—आत्म्याहून कमी भरणार नाहीं. इतर जड वस्तुजातांपैकीं एक जड वस्तु अगर सचेतन प्राण्यांपैकीं एक प्राणी, असें त्याचें स्वरूप नसून तें सर्वत्र संचरून राहणारें आदिकारण आणि प्रवर्तक तत्त्व आहे. सत्याचीं निर्गुण आणि सगुण स्वरूपें हीं त्याला व्यक्त करणाऱ्या निरपेक्ष आणि सापेक्ष पद्धति होत. जेव्हां आपण सत्याच्या साक्षात्स्वरूपावरच भर टाकतों तेव्हांच आपणांस निर्गुण ब्रह्माचें आकलन होतें; परंतु जेव्हां सत्य आणि मनुष्य प्राणी ह्यांमधील परस्पर—संबंधावर भर दिला जातो, तेव्हां भगवंताची सगुण मूर्ति आपणांसमोर उभी राहते.[1]

२१ परमेश्वरविषयक आपल्या ज्ञानांत उत्क्रांति होत असते यावर हिंदूंचा विश्वास आहे. सत्याच्या गाभाऱ्यांत प्रवेश करीपर्यंत आपणाला परमेश्वरविषयक कल्पना एकसारख्या बदलाव्या लागतात. सबंध मानववंशाला लागू होईल अशी एखादी कल्पना मान्य करून हिंदुधर्म परमेश्वरविषयक कल्पनांपैकीं अमुक एक कल्पना खरी किंवा अमुक एक खोटी असा भेद करीत नाहीं. मनुष्य—समाज आपल्या निरनिराळ्या मानसिक अवस्थांत निरनिराळ्या मार्गांनीं ईश्वराचें ध्येय शोधीत असतो आणि संशोधनाच्या प्रत्येक टप्प्याबद्दल त्याला सहानुभूति वाटत असते, ही गोष्ट हिंदुधर्म स्पष्टपणें मान्य करतो.

१ वदन्ति तत्त्वविदस्तत्त्वं यज्ज्ञानमद्वयम्। ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ॥

ज्याप्रमाणें वृक्षांना हिरवी पालवी फुटावयाला लावणारा व त्यांच्या आरक्त पुष्पांचाहि विकास करणारा जीवनरस एकच असतो, त्याप्रमाणें एका अवस्थेंत महा-शक्ति (उदा० सूर्य, अग्नि वगैरे), दुसऱ्या अवस्थेंत भव्य मूर्ति (उदा० शंख-चक्र-गदा-धारी श्रीकृष्ण) आणि तिसऱ्या अवस्थेंत सर्वव्यापी चैतन्य, यांप्रमाणें भासणारा परमेश्वर एकच आहे. आरक्त फुलें मात्र खरीं आणि हिरवीं पानें तेवढीं सर्व खोटीं असें कांहीं आपण म्हणत नाहीं. सर्व धार्मिक मतें वस्तुस्थितिदर्शक आहेत असें हिंदुधर्म मान्य करतो आणि त्यांच्या कमीजास्त अर्थगांभीर्याप्रमाणें--महत्त्वाप्रमाणें त्यांची मांडणी करतो. सामान्य जनतेचे तेहतीस कोटी देव आणि शिष्टांचा--सूज्ञांचा एकमेवाद्वितीय परमेश्वर हीं निरनिराळ्या बौद्धिक अवस्थेंतील एकाच शक्तीचीं बाह्य स्वरूपें होत. धिमेपणें उन्नति करणें आणि परमेश्वरविषयक आपल्या ज्ञानाचा विकास करणें यांवर हिंदुधर्माचा कटाक्ष आहे. निर्गुणोपासक सर्वांत श्रेष्ठ दर्जाचे, त्यांच्या खालीं सगुणोपासक, त्यांनंतर राम, कृष्ण, बुद्ध या अवतारांचे भक्त, मग पूर्वज, देवर्षि आणि साधु यांचे पुजारी आणि शेवटीं क्षुद्र देवता आणि प्रेतें यांना भजणारे, असा या विविध[1] उपासकांचा क्रम आहे. तसेंच कांहीं लोकांच्या देवता जलांत राहणाऱ्या,[2] तर त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या लोकांच्या देवांचें वसतिस्थान स्वर्गांत व धर्माच्या बाबतींत बालकांप्रमाणें जे अज्ञानी आहेत त्यांचे देव काष्ठलोष्ठांचे, तर ज्ञानी पुरुषांचा देव आत्मस्वरूपी. कर्मयोगी लोकांना तेजांत, भावनाप्रधान लोकांना हृदयांत, अल्पबुद्ध लोकांना मूर्तींत आणि ज्ञानी लोकांना सर्वत्र परमेश्वर आढळून येतो.[3] द्रष्ट्यांना परमेश्वराचें दर्शन मूर्तींत होत नसून स्वतःच्या आत्म्यांत होत असतें. शिवमात्मनि पश्यन्ति प्रतिमासु न योगिनः ।

---

१ उपासना ब्रह्मण· प्राक् द्वितीया सगुणस्य च ।
तृतीया स्मर्यते लीलाविग्रहोपासना बुधैः ॥
उपान्त्या पितृदेवर्षिगणानामस्त्युपासना ।
अन्तिमा क्षुद्रदेवाना प्रेतादीना विधीयते ॥

२ अप्सु देवा मनुष्याणा दिवि देवा मनीषिणाम् ।
बालाना काष्ठलोष्टेषु बुद्धस्यात्मनि देवता ॥

३ अग्नौ क्रियावतां देवो हृदि देवो मनीषिणाम् ।
प्रतिमास्वल्पबुद्धीना ज्ञानिना सर्वतः शिवः ॥

२२. तथापि दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, बहुसंख्याक हिंदु लोक वरील क्रम लक्षांत घेऊन आपआपल्या मानसिक विकासाला अनुरूप होतील अशा देवतांची उपासना न करतां, बोलून चालून असमाधानकारक अशा परमेश्वरविषयक कल्पना उराशीं बाळगतात. सुसंस्कृत लोक 'परमेश्वरविषयक लोकप्रिय कल्पना या अगम्य अशा परमेश्वराचीं अपूर्ण दर्शनें आहेत' हें जाणून त्यांकडे दुर्लक्ष करीत असले तरी सर्वसामान्य लोक त्या कल्पना प्रमाणभूत आणि समर्थनीय आहेत असें समजतात. जे ज्ञानी हिंदु आहेत, ते नाना देवतांच्या ब्रह्मघोटाळ्यांतून निसटून परमात्म्याच्या शांतीचा अनुभव घेण्याची इच्छा बाळगतात हें जरी खरें, तरी सामान्य जनता देव कोठें तरी आकाशांत आहे अशा कल्पनेनें वर डोळे लावून पाहत असते. सहिष्णुतेच्या नावानें आम्हीं धर्मभोळेपणाचे कांहीं विधी आणि रूढी यांचें प्रयत्नपूर्वक जतन केलें आहे. 'न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्' या सोयीस्कर वचनावर विश्वास ठेवून, ज्यांना निरानिराळ्या विधींचें आणि रूढींचें धार्मिक रहस्य पूर्णपणें समजलें आहे ते सुद्धां, स्वतःस ते ज्या मतांचे अनुयायी म्हणवितात, त्यांना विसंगत असें वर्तन करण्यांत गुंग असतात. जनतेचा बौद्धिक दर्जा सुधारून अखिल हिंदु समाजाला आध्यात्मिकतेच्या उच्च भूमिकेवर नेण्याचा कळकळीचा आणि व्यवस्थित प्रयत्न अलीकडच्या काळांत झालेला नाहीं. परमेश्वराची अत्युच्च कल्पना जनतेपुढें ठेवून जनतेमध्यें सुधारणा घडून येईल अशा रीतीनें चिकाटीनें हिंदु पुढाऱ्यांनीं प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक आहे. अखिल भारतवर्षावर पसरलेलीं देवळें, मंदिरें आणि मठ हीं इतःपर केवळ प्रार्थनास्थानें किंवा पूजाविधीचीं स्थंडिलें बनून न राहतां आध्यात्मिक बाबतींत हिंदूंना दिशा दाखविणारीं विद्यामंदिरें आणि नव–विचारांचीं उगम–स्थानें झालीं पाहिजेत.

---

# व्याख्यान दुसरें

## हिंदुधर्माचें व्यापक आणि उदात्त धोरण

१ जरी आत्मानुभवाचीं वर्णनें वेगवेगळीं असलीं तरी यौगिक अनुभवें सार्वत्रिक असतात, या गोष्टीचें महत्त्व योगाभ्यासी लोकांच्या लक्षांत आलें आहे. जगांतील आत्मानुभवी लोकांचा—मग ते हिंदु असोत, ख्रिश्चन असोत वा मुसलमान असोत—एक बंधुसमाजच असून त्यांच्यांत एक प्रकारचें कौटुंबिक सादृश्य ठळकपणें दिसून येतें. कुमारी एव्हिलिन अंडरहिल या लिहितात, "जरी पौर्वात्य आणि पाश्चात्य पुराणें यांमध्यें फार फरक असला, जरी त्यांनीं प्रतिपादिलेलीं जीवनध्येयें भिन्न असलीं, तरी संतांना आत्मसाक्षात्कार झाला असतां हे विरोध नाहींसे होतात. जेथें परमेश्वराची कृपा झाली तेथें विविधतेला अवकाशच मिळत नाहीं. कारण, आत्मा हा वैचित्र्याच्या पलीकडे जाऊन परमात्म्यामध्यें विलीन होत असतो[२]." विशिष्ट अनुभवांच्या दृष्टीनें छाननी केली असतां प्लॉटीनस आणि शंकराचार्य यांचे अनुभव व सेंट जॉन आणि सेंट पॉल यांचे अनुभव यांमध्यें विशेष फरक आढळून येत नाहीं. कुमारी अंडरहिल म्हणतातः—"ब्राह्मण, सूफी किंवा ख्रिश्चन योगी यांचे अनुभव पाहिले तर त्यांमध्यें मोठा फरक आहे असें विधान कोणीहि प्रामाणिकपणें करूं शकणार नाहीं.[३]" योगशास्त्राचा प्रतिकूल टीकाकार जर्मन सगुणोपासक हर्मन यानेंहि आपल्या परीनें या मताचें मंडनच केलें आहे. ख्रिश्चन योगी

---

१ यौगिक अनुभव म्हणजे आत्मानुभव किंवा आत्मसाक्षात्कार होय. —अनुवादक.

२ Introduction to the autobiography of Devendranath Tagore, Page x b.

३ Essentials of Mysticism.

लोकांसंबंधीं तो म्हणतो, "जेव्हां जेव्हां त्यांच्या धार्मिक भावना अत्युच्च भराऱ्या मारतात, तेव्हां तेव्हां ते खिस्ताच्या सगुण रूपाच्या पलीकडे जातात आणि सर्व युगांतील खिस्तेतर योगी ज्या वातावरणांत विहरतात त्याच वातावरणांत तेहि विहरतात.[१]" तोच पुढें म्हणतो, "ऑगस्टाइननें त्रिमूर्तीवर[२] पंधरा खंडांचा एक महान् ग्रंथ लिहिला आहे. तथापि ऑस्ट्रिया येथील घराच्या खिडकींत तो आपल्या आईजवळ उभा असतां, "ईश्वर आपणास हृदयाशीं घट्ट कवटाळींत आहे" हा रोमांचकारी अनुभव तिला विशद करून सांगतांना त्यास त्रिमूर्तींचा विसर पडून, ज्याच्या दर्शनानें उन्नत झालेला आत्मा केवळ मुग्ध होऊन जातो अशा एका परमेश्वराविषयींच तो बोलला.[३]"

२ आत्मदर्शन झालेल्या द्रष्ट्यानें देवळांत, चर्चमध्यें किंवा मशिदींत कोठेंहि बसून आपल्या सत्यदर्शनाचा मार्ग चोखाळलेला असला तरी हरकत नाहीं. ज्यांना परमात्म्याचें दिव्य दर्शन झालें आहे, ते बाह्य साधनांना फाजील महत्त्व देण्याच्या विरुद्ध असतात. निरनिराळ्या सांप्रदायिकांचीं प्रमेयें जशीं हटकून फूट पाडतात तशी आत्मद्रष्ट्यांची भाषा सर्व भक्तगणांचें हटकून ऐक्य घडवून आणते. खऱ्या द्रष्ट्याला विशाल दृष्टि असते आणि त्याचें हृदय इतकें मृदु असतें कीं, विविध आणि वैचित्र्यपूर्ण अशा मानवी स्वभावावर वर्चस्व गाजविणाऱ्या निरनिराळ्या ऊर्मी आणि भावना ह्यांचा त्याच्यावर तत्काल परिणाम होतो. ज्याची परमेश्वरावर दृढ श्रद्धा आहे, त्याला आयुष्यांत आलेला कोणताहि अनुभव अगदीं टाकाऊ असा वाटतच नाहीं. परमेश्वराच्या अमर्याद स्वरूपाविषयीं आणि त्याला शक्य अशा व्यक्त स्वरूपाच्या अनंतत्वाविषयीं त्याची खात्री झालेली असते.

३ धार्मिक गूढांचीं—आत्मानुभवाचीं बौद्धिक स्वरूपें सापेक्ष आणि सांकेतिक असतात. प्लेटोच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास आमचीं परमेश्वरविषयक वर्णनें संभवनीय गोष्टींच्या स्वरूपाचीं असलीं तरी तीं दंतकथात्मक

१ The Communion of the Christian with God, p. 16.

२ ख्रिस्ती धर्मामध्यें ईश्वर (God), ईश्वरपुत्र (Son of God जीझस), आणि ईश्वरी प्रेरणा (Holy Ghost), ह्यांची त्रिमूर्ति मानण्यांत आली आहे. —अनुवादक.

३ The Communion of the Christian with God, p. 29.

आहेत. त्यांतील एकहि वर्णन संपूर्ण आणि निर्णायक नाहीं. समुद्रांतून शिंपांनीं पाणी भरणाऱ्या समुद्रकिनाऱ्याबरील लहान मुलांप्रमाणें आमची स्थिति आहे. जरी आम्ही समुद्राचें पाणी आटवूं शकलों नाहीं तरी आमच्या चिमुकल्या शिंपांनीं जो एकएक थेंब आम्ही गोळा करतों, तो खऱ्या पाण्याचा अंश असतो यांत शंकाच नाहीं. आमचीं बौद्धिक वर्णनें भिन्न असतात याचें कारण तीं एकाच मध्यवर्ति सत्याचे निरनिराळे पैलू असतात. उपनिषदांच्या ऋषींपासून तों थेट टागोर आणि गांधी यांपर्यंत सर्व हिंदूंनीं हें मान्य केलें आहे कीं, सत्य हें निरनिराळ्या रंगांचीं प्रावरणें धारण करतें आणि अपरिचित भाषेंतून आपणांशीं बोलत असतें. इतर धर्मांच्या योग्यांनींहि याबद्दल असाच अभिप्राय दिला आहे. बोह्मे ( Boehme ) म्हणतो, " आपल्या जंगलांतील पक्ष्यांचा विचार करा. त्यांतील प्रत्येक जण आपापल्या परीनें निरनिराळ्या सुरांत आणि भिन्न भिन्न प्रकारांनीं परमेश्वराची स्तुति करीत असतो. या वैचित्र्यानें परमेश्वराला त्रास होत असून तो ते विसंवादी आवाज बंद पाडूं इच्छितो असें तुम्हांस वाटतें काय ? सृष्टि–मात्राचीं सर्व स्वरूपें खुद्द अनंत ब्रह्माला प्रिय आहेत. केंब्रिजचे प्रोफेसर ब्राउन यांनीं सूफीच्या[1] एका वचनाचा केलेला अनुवाद पाहा:—

" कुंभारानें काळजी घेऊन तयार केलेलीं किंवा यदृच्छया जशीं होतील तशीं तयार झालेलीं खुजा, चंबू, वाडगा किंवा घडा हीं भांडीं कितीहि जाड किंवा बारीक, ओबडधोबड किंवा सफाईदार, असलीं तरी तीं सर्व दारू भरण्यासाठीं केलेलीं असतात. जर त्या भांड्यांमध्यें भरली जाणारी दारू एकाच प्रकारची आहे तर आपण एकाचा स्वीकार आणि दुसऱ्याचा त्याग करणें रास्त ठरेल काय ? "

४ हें महत् सत्य लक्षांत घेऊन हिंदुधर्मानें दुर्दमनीय अशा संकुचित मताच्या ऐवजीं व्यापक आणि उदार धोरणाचा विकास केला आहे. उदाहरणार्थ, त्यानें मूळच्या लोकांच्या शेंकडों देवांना आणि परसंस्कृतींतील कित्येक देवांना आपल्या धर्मांत जागा देऊन त्यांचें समर्थन केलें. त्यामुळें

---

१ हिंदुधर्माप्रमाणें अद्वैतमत प्रतिपादन करणारा मुसलमानी धर्माचा एक पंथ.—अनुवादक.

परमेश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या सर्व लोकांचें एकीकरण झालें. पुष्कळ निरनिराळीं मतें धारण करणारे अनेक संप्रदाय हिंदुधर्माच्या कक्षेंत राहूं शकतात. पाखंडी लोकांना हुडकून त्यांचा छळ करणें, हें जें इतर पुष्कळ धर्मांचें आवडतें काम आहे, त्याचा हिंदुधर्मामध्यें कोठें मागमूसहि नाहीं.

५ पारलौकिक गतीसंबंधीं अमुक एक विशिष्ट सिद्धांत मान्य केलाच पाहिजे आणि तो जर मान्य केला नाहीं तर तें भयंकर पाप असून त्याबद्दल शाश्वत नरकवासाची शिक्षा होते, हा जो सेमिटिक[1] धर्मांचा चमत्कारिक जुलूम आहे त्यापासून हिंदुधर्म मुक्त आहे. हिंदूंच्या वाङ्मयामध्यें सांप्रदायिक कडवेपणाच्या स्फोटांचे उल्लेख इतस्ततः आढळून येत असले, तरी ते ( स्फोट ) निरनिराळे संघ एका कक्षेंत सामील होत असतांना त्यांमध्यें सुरुवातीला उडालेल्या चकमकींचे द्योतक होत. परंतु हिंदुधर्माचा मुख्य सूर म्हटला म्हणजे दुसऱ्यांच्या मताबद्दल आदर आणि सौजन्य दाखविणें हा होय. शैवांबद्दलची तेढ मनांत कायम ठेवून एक वैष्णवभक्त जेव्हां विष्णूच्या मूर्तीची उपासना करूं लागला, तेव्हां मूर्तीच्या मुखकमलावर एका बाजूला शिव आणि दुसऱ्या बाजूला विष्णु असें दृश्य त्यास दिसलें. तीं दोन स्मितमुखें पाहून त्या कट्टया भक्ताची खात्री झाली कीं, 'विष्णु आणि शिव हे एकच आहेत'. या गोष्टींत फार अर्थ भरलेला आहे.

६ एका अर्थी हिंदुधर्म हें प्रचारकार्य अंगीकारणाऱ्या धर्मांचें जगांतील पहिलें उदाहरण असें मानतां येईल. फरक इतकाच कीं, बाटविण्याचें कार्य करणाऱ्या धर्मांनीं अंगीकारिलेल्या धोरणापेक्षां हिंदु धर्माच्या प्रचारकार्याचें धोरण भिन्न आहे. कोणत्याहि एका विशिष्ट मताचा प्रसार करून तें इतरांना मान्य करावयास लावणें किंवा त्यांना बाटविणें हें हिंदु धर्मानें आपलें कार्य मानलें नाहीं. कारण हिंदु धर्माचा मुख्य कटाक्ष मतावर नसून आचरणावर आहे. भिन्न भिन्न उपास्यें आणि भिन्न भिन्न उपासनाविधि पाळणाऱ्यांना हिंदु धर्मामध्यें समाविष्ट करण्यांत आलें आहे. कारण भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें,

---

[1] बॅबिलोनिया, ॲसीरिया, फोनिशिया, पॅलेस्टाइन, सीरिया, अरेबिया व ॲबिसिनिया या देशांत राहणाऱ्या आणि ती ती भाषा बोलणाऱ्या मुसलमान आणि ज्यू लोकांचा धर्म.

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ३२ ॥ अध्याय ९.

श्रीकृष्ण केवळ दलितवर्ग, स्त्रिया आणि शूद्र यांचाच उद्धार करतो असें नव्हे तर किरात आणि हूणे यांसारख्या पापयोनींचा सुद्धां उद्धार करतो. तांड्य ब्राह्मणामध्यें प्राचीन व्रात्यस्तोमाच्या प्रायश्चित्त–विधीचें जें संपूर्ण वर्णन करण्यांत आलेलें आहे, त्यावरून असें दिसतें कीं, केवळ कांहीं थोड्याशा व्यक्तीच नव्हेत तर सबंध जातींच्या जाती हिंदुधर्मामध्यें समाविष्ट करून घेण्यांत येत असत.

७. आर्य लोकांनीं जेव्हां आपल्या भयंकर प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून त्यांच्याशीं तह केला तेव्हां स्वतःच्या मानानें त्यांच्या जंगली दिसून येणाऱ्या चालीरीतींच्या त्यांनीं उपहास केला नाहीं. उत्तर हिंदुस्थानच्या मूळ रहिवाशांनीं नैसर्गिक शक्तींना पौराणिक कल्पनांचा भपकेदार पोषाख चढविला आणि वेळोवेळीं वेष पालटणाऱ्या निसर्गांतून रम्य कल्पना घेऊन त्यांपासून देव, देवता, यक्ष, किन्नर, अशी परंपरा तयार केली; आणि वैदिक आर्यांनीं या उर्वांचा स्वीकार करून ज्या स्वर्गीय देवतांकडे ते स्वतः आदरानें पाहत त्यांच्या मालिकेंत त्यांना गोंवून दिलें. 'त्या ओबडधोबड देवतांना त्यांचे उपासक आपल्या जीवनाच्या आनंदाचे झरे आणि शक्तींचीं केंद्रस्थानें मानतात' एवढें समाधान त्यांस पुरेसें होतें. ऋग्वेदांतील देव आणि अथर्ववेदांतील भूतें हीं तत्त्वज्ञानरूपी प्रभावशाली रसायनानें वितळलीं आणि त्यांचा एक रस होऊन त्यांचें परमचैतन्यामध्यें रूपांतर झालें. आणि त्या सत्यावर आपापल्या कल्पनांप्रमाणें विशिष्ट गुणांचे साज चढविले गेल्यामुळें त्याला निरनिराळीं नामाभिधानें प्राप्त झालीं.

---

१ किरातहूणान्ध्रपुलिन्दपुक्कसा । आभीरक कायवनाः खसादयः ।
येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाच्छुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः ॥

२ पाहा.—पंचविंश ब्राह्मण, (१७), १–४; बौद्धायन, ( १७ ), २४–६; कात्यायम, २२ (४), कात्यायन, (८), ६. पुष्कळ अर्वाचीन सम्प्रदाय—चैतन्य, राधास्वामी, कबीरपंथी, शीख, ब्रह्म समाज आणि आर्यसमाज—परधर्मीयाना आपल्यामध्यें समाविष्ट करून घेतात. जबरदस्तीनें बाटविलेले लोक, भ्रष्ट करून पुष्कळ वर्षेपर्यंत डांबून ठेवलेल्या स्त्रिया आणि जे लोक स्वार्थानें प्रेरित होऊन परधर्माचा स्वीकार करतात ते यांच्या साध्या शुद्धीसंबंधीं देवल–स्मृतीनें कांहीं नियम घालून दिले आहेत.

८ नवीन जाती व त्यांचे देव आर्यांत पूर्णपणें मिसळून गेल्याचें वर्णन पुराणांतरीं आढळतें. निरनिराळ्या संप्रदायांतील वाद आणि भिन्न संस्कृतींशीं संबंध यांचें पर्यवसान हटकून एका समाजाचें दुसऱ्या समाजावर वर्चस्व स्थापण्यांत होतेंच असें दिसून येत नाहीं. भिन्न संस्कृतींच्या भिन्न समाजांचा खरा परिचय झाला असतां परस्परांच्या चालीरीतींची आणि सुधारणांची देवाणघेवाण होते. मात्र एवढेंच कीं, परकीयांच्या गोष्टी स्वीकारतांना त्यांना नवीन पोषाख चढविण्यांत येतो. जुन्या चालीरीतींशीं ज्या भावना संलग्न असतात, त्या भावना नव्यांवर लादण्यांत येऊन जुन्या बैठकींवर नव्या गोष्टी पक्क्या बसविण्यांत येतात. पुष्कळ जाति आणि मानववंश पशुपक्षि–पूजक होते. ते जेव्हां हिंदुसमाजामध्यें दाखल झाले, तेव्हां त्यांच्या देवतांना आर्य देवतांचीं वाहनें किंवा सहचारी बनविण्यांत आलें. यांपैकीं एक मयूरावर आरूढ झाला आहे, तर दुसरा हंसावर, तिसऱ्याचें वाहन बैल आहे आणि चौथ्याचें वाहन बकरा आहे. रामाचा सेवक म्हणून हनुमानाची योजना ही प्राचीन निसर्गपूजा आणि तदनंतरची सगुणोसना यांचा मेळ घालते. कालिया नागाच्या मस्तकावर नृत्य करणारी कृष्णमूर्ति जरी नागपूजेचा समूळ नाश दर्शवीत नसली तरी तिला प्राप्त झालेलें गौणत्व दर्शवितें. त्याचप्रमाणें रामानें केलेल्या शिवधनुर्भंगाच्या द्वारें वैदिक ध्येय आणि शिवोपासना यांमधील विरोध व्यक्त केला गेला आहे. यामुळें शिवाचें उत्तरेकडील प्राबल्य कमी होऊन तो दाक्षिणेचा स्वामी ( दक्षिणामूर्ति ) बनला. वैदिक आणि अवैदिक मतांचा समेट दर्शविणाऱ्या इतरहि गोष्टी पौराणिक वाङ्मयामध्यें आढळून येतात. विभूतिपदास चढलेले पूर्वज, स्थानिक संत, ग्रह आणि अनार्य देव हे परमचैतन्याचे अंशभाक् समजले गेल्यानें त्याच्या(परमचैतन्या)पेक्षां त्यांचें स्थान जरी गौण मानण्यांत येत होतें, तथापि हिंदूंच्या देवतामंडलामध्यें त्यांचा समावेश करण्यांत आला होता. अनेक देवांची संघटना एकेश्वरोपासनेच्या तत्त्वानुसार करण्यांत आली होती. अन्य मतानुयायांबद्दल मनात सर्वस्वीं असहिष्णुताच वागविली पाहिजे असला आग्रह धरणाऱ्या एकेश्वरी पंथांत मात्र त्याचें रूपांतर झालें नाहीं.

९ आर्य लोक या धार्मिक झगड्यांत नेहमीं विजयीच झाले असें मानण्याचें कारण नाहीं. आर्येतरांचें वर्चस्व आर्यांनीं कबूल केल्याचे अनेक प्रसंग

आहेत आणि त्यांचें हें करणें योग्यच होतें. निरनिराळ्या आर्येतर देवांनीं आर्यांच्या देवांवर ज्या रीतीनें आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें, तिचें वर्णन पुराणें करतात. उदाहरणार्थ, श्रीकृष्णाला वैदिक देवांचा देव जो इंद्र त्याच्याशीं झगडावें लागलें.[1] शिवोपासनेचा उदय हें दुसरें उदाहरण होय. यज्ञाचा पुरस्कर्ता जो दक्ष त्यानें जेव्हां शिवाविरुद्ध शस्त्र उपसलें, तेव्हां त्याच्याच घरांत मतभेद होऊन स्त्रीधर्माची आणि भक्तीची केवळ मूर्तिच अशी त्याची मुलगी 'सती' हिच्या मनांत शिवाविषयीं आत्यंतिक प्रेम उत्पन्न झालें.

१० ख्रिस्ती सनाच्या प्रारंभींची केल्टिक–आयरिश संस्कृति, होमरची ग्रीक संस्कृति अथवा ख्रिस्तपूर्व ट्यूटन आणि स्लाव्ह या संस्कृती इत्यादि संस्कृतींशीं वैदिक संस्कृतीचें साम्य असून तिच्यावर द्राविड लोकांची छाप पडल्यानें पौराणिक कालांत तिचें हिंदु संस्कृतींत रूपांतर झालें. पितृस्वरूपी आकाशाला किंवा उंचावरून प्रकाशमान होणाऱ्या दुसऱ्या एखाद्या तेजःपुंज शक्तीला याज्ञिकानें आवाहन करावें आणि त्या उपास्यांना चरबी, मांस, पोळ्या किंवा दारू यांचा हवि अर्पण करावा, अशी प्राचीन आर्यांची उपासनेविषयीं कल्पना होती. परंतु लगेच होमाच्या ऐवजीं पूजा सुरू होते. द्राविड लोकांच्या भक्तीचें प्रतिमापूजा—मूर्तिपूजा हें जें ठळक अंग होतें तें आर्य लोकांनीं मान्य केलें. वनस्पत्याहार आणि अहिंसा या ध्येयांचीहि वाढ झाली. आगमिकांनीं वैदिक परंपरेवर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें होतें; आणि आज हिंदु संस्कृतीवर वेदांइतकीच आगमांची (पुराणांची) छाप पडली आहे. स्वतंत्रपणें परंतु जवळजवळ वाढणाऱ्या वृक्षांप्रमाणें आर्य आणि द्राविड संस्कृतींची वाढ झालेली नसून एका वृक्षावर ज्याप्रमाणें दुसऱ्या वृक्षाचें कलम बांधावें त्याप्रमाणें द्राविड संस्कृतीवर आर्य संस्कृतीचें बेमालूम कलम

---

१ इंद्र ही वेदांतील प्रमुख देवता आहे. पण पुढें त्याची उपासना मागें पडत चालली. श्रीकृष्णानेंच गोकुळांत होणारा इंद्राचा उत्सव बंद करून गोवर्धन–उत्सव सुरू केला. त्यासंबंधांत इंद्रानें रागानें गोकुळावर अतिवृष्टि केली; पण श्रीकृष्णानें गोकुळाचें रक्षण केलें. इंद्राची पूजा एकदां मागें पडली ती कायमच पडली.

२ शिव हा अनार्यांचा देव म्हणून दक्ष त्याची पूजा करण्यास नाकबूल होता. पण शंकरानें दक्षयज्ञाचा विध्वंस करून अखेरीस दक्षाला व इतर देवांना शरण यावयास लावलें.—अनुवादक.

बांधण्यांत आलें आहे. हिंदुधर्म हें त्या कलमाला आलेलें फळ होय. या हिंदुधर्म-रूपी आम्रफलाची चव म्हणजे स्वतंत्र वृक्षांच्या फळांच्या चवींची नुसती गोळा-बेरीज नसून त्यांत कलमी फळाला लाभणारी सर्वस्वीं नवीन गोडी चाखतां येते. हिंदुधर्माच्या वाढीच्या इतिहासांत वेद आणि आगम यांचा बहुतांशीं मेळ घातलेला दिसतो. तथापि त्यांच्यांत प्रसंगोपात्त उत्पन्न झालेल्या विरोधांचेंहि दिग्दर्शन तो करतो. विशाल ऐतिहासिक दृष्टीनें विचार केला असतां, हिंदुधर्म म्हणजे कित्येक शतकांची संथ वाढ आहे. त्यानें आपल्यामध्यें चांगल्या आणि खऱ्या, त्याचप्रमाणें वाईट आणि चुकीच्या गोष्टींचाहि समावेश केला आहे. हिंदुधर्मानें वाईट आणि चुकीच्या गोष्टी आपल्यांतून काढून टाकण्याचा जरी सतत प्रयत्न केला तरी तो नेहमींच यशस्वी ठरला नाहीं. हिंदुधर्म ही आपल्या व्यापक क्षेत्राखालील सर्व बऱ्यावाईट गोष्टींचें ऐक्य घडवून आणणारी एक जिवंत संस्था असून तिचें स्वरूप निश्चित आहे. सर्वांच्या मनःकल्पना आपल्या विविध शक्तींच्या द्वारें पूर्ण करणाऱ्या आणि वर्ग अथवा वर्ण यांच्या संपर्कांत सुद्धां अलिप्त राहणाऱ्या सत्याची उपासना करावी असा उपनिषदांचा आदेश आहे.

११ हिंदुधर्मामध्यें भिन्नभिन्न संप्रदायांचा समावेश करण्यांत आल्यानंतर उच्च विचारसरणीच्या प्रभावानें त्यांच्यांत परिवर्तन घडून येतें. धार्मिक सुधारणा घडवून आणण्याची हिंदु पद्धति ही मुख्यतः लोकशाहीच्या स्वरूपाची आहे. कारण, प्रत्येक संप्रदायाला आपापल्या परंपरेनुसार मानसिक आणि नैतिक शिस्त पाळून सत्य–शोधन करण्यास मुभा आहे. प्रत्येक संप्रदायाला आपली स्वतःची अशी ऐतिहासिक परंपरा आहे आणि तिच्याशीं समरस होणें हें आत्मविकासाच्या दृष्टीनें योग्य ठरतें. अगदीं जंगली मनुष्य सुद्धां आपल्या धर्मभोळ्या समजुतींना श्रद्धेनें आणि अट्टाहासानें चिकटून राहतो. त्या समजुतींना आपण जरी पोरकट कल्पनांपेक्षां जास्त महत्त्व देत नाहीं, तथापि त्याला तीं मतें जीवनाला मार्गदर्शक होणाऱ्या जिवंत शक्तीप्रमाणें वाटत असतात. जंगली लोकांच्या धर्मभोळ्या समजुतींना धक्का देणें म्हणजे त्यांची नीतिमत्ता, त्यांच्या सामाजिक चालीरीती आणि त्यांचें मानसिक स्वास्थ्य नष्ट करण्यासारखें आहे. धार्मिक पूजाविधी आणि सामाजिक संस्था यांचें स्वरूप कसेंहि असलें तरी त्या शेंकडों वर्षांच्या अनुभवानें तयार झालेल्या

असतात. जेव्हां हिंदु जिज्ञासूनें आपल्या धर्मक्षेत्रांतील नानाविध सांप्रदायिक मतांचें निरीक्षण केलें, तेव्हां त्यास तत्तकालीन संप्रदायावर सांप्रदायिकांच्या समाजव्यवस्थेचा ठसा उमटला होता असें आढळून आलें. त्यांचें आजचें स्वरूप इतिहासानेंच घडविलेलें असल्यामुळें त्यांच्यामध्यें एकदम क्रांति घडवून आणणें शक्य नव्हतें. शिवाय परमेश्वरी इच्छेनेंच अखिल मानववंशाची उत्पत्ति झाली आहे. दुसऱ्यांनीं मान्य करावे असे प्रत्येक जातीचे काांहीं निसर्गसिद्ध हक्क असतातच. ईश्वराच्या अस्तित्वावांचून कोणत्याहि प्रकारचा समाज संभवतच नाहीं, "सन्मार्गापासून च्युत होण्याची बुद्धि सुद्धां ईश्वरापासूनच होते" असें जें रॉबर्ट बर्न्सनें[1] म्हटलें आहे, तें बरोबर आहे. दुसऱ्या लोकांच्या देवांची निर्भत्सना करणें म्हणजे त्या लोकांचाच तिरस्कार करण्यासारखें आहे. कारण ते आणि त्यांचे देव हे एकमेकांशीं निगडित झालेले असतात. हिंदूंनीं जंगली आणि असंस्कृत लोकांचेहि देव मान्य करून त्यांना आपल्या स्वतःच्या देवांच्या पंक्तींत बसविलें.

१२ कोणत्याहि संप्रदायाच्या ओबडधोबड मतांना सफाईदार स्वरूप देण्याचा मार्ग म्हणजे मानसिक दुराग्रह नष्ट करणें हा होय. परमेश्वराविषयींच्या कोणत्या मताबद्दल मनुष्य आग्रह धरतो हें तो मनुष्य कोणत्या प्रकारचा आहे—त्या मनुष्याची मानसिक उन्नति किती झाली आहे यावर अवलंबून आहे. मनुष्याचा स्वभाव आणि त्याचें शिक्षण, त्याचप्रमाणें त्याच्या भोंवतालची परिस्थिति हीं बहुतांशानें त्याच्या धार्मिक मतांचें स्वरूप निश्चित करतात. मनुष्याच्या स्वभावांतील एखादा दोष किंवा त्याच्या अनुभवाचा एकांगीपणा यांचें प्रतिबिंब मनुष्याच्या परमेश्वरविषयक मतांत हटकून पडतें. मनुष्याचें परमेश्वरविषक ज्ञान हें त्याच्या आकलनशक्तीवर अवलंबून असतें. सुधारकांचें ध्येय एखाद्या मतावर नुसती टीका करण्याचें न राहतां त्यांतील दोष सुधारण्याचें असावें. आध्यात्मिक जीवनाला जेव्हां चालना मिळते तेव्हां धार्मिक मतें आपोआपच बदलतात. खऱ्या मतक्रांतींत प्रथम अंतःशुद्धि आणि नंतर बाह्यशुद्धि असा क्रम असावा. परंपरेमध्यें सुधारणा केल्याशिवाय मतांचा विकास होऊंच शकत नाहीं. नवीन मत लादण्यापेक्षां जिज्ञासा जागृत करणें हेंच

---

१ स्कॉटलंडचा मोठा कवि ( १७५९ ते १७९६ ).

धर्मप्रचारकाचें खरें कार्य आहे. जर आपण डोळे उघडून पाहिलें तर सत्य-दर्शन होईल. हिंदु पद्धति धमक्या किंवा जबरदस्ती यांचा उपयोग न करतां सूचना आणि मतपरिवर्तन यांचाच अवलंब करते. चूक ही केवळ अपरिपक्वता सूचित करते. चूक होणें म्हणजे कांहीं महत्पाप करणें नव्हे. कालांतरानें आणि सहिष्णुतेनें ती नाहींशी करतां येईल. बलवान् आत्म्यांशीं—बाणेदार माणसांशीं—वागतांना हिंदुधर्म कितीहि कठोर असला तरी दुर्बळांशीं वागतांना तो त्यांच्या दोषांकडे कानाडोळाच करतो.

१३ धार्मिक सुधारणा घडवून अणतांना हिंदु पद्धतीचा विशेष कटाक्ष नांव बदलण्यावर नसून अंतरंग बदलण्यावर असतो. नांव पूर्वीचेंच राहतें; परंतु तत्त्वविवेक मात्र सूक्ष्मतर आणि जास्त खोल होत जातो. तुमच्या[1] परिचयाचें ख्रिस्ती धर्मांतील एक उदाहरण घेऊं या. जुन्या करारांतील मोझेसच्या पांच पुस्तकांत ज्यू लोकांचा देव 'यहवे[2]' ( Yahaveh ) हा एक मानवी राक्षस होता असें वर्णन करण्यांत आलें आहे. त्याचा मत्सराग्नि भडकला कीं, तो स्त्री, पुरुष, मुलें आणि पशु यांची सर्रास कत्तल करण्याचा हुकूम करीत असे. परंतु पुढें याच देवाची उत्क्रांति होत होत 'जो यज्ञयागापेक्षां दयेचा भुकेलो आहे, जो 'अग्नये स्वाहा' ही पद्धति निंद्य मानतो आणि जो आपल्या भक्तांस दर्शन देतो,' अशी कल्पना या पवित्र आत्म्या(Holy one)विषयीं 'इसाया' आणि 'होसिया' या दोन ख्रिस्ती द्रष्ट्यांनीं आपल्या लिखाणांत—बायबलाच्या जुन्या करारांत केली आहे. जीझसप्रणीत धर्मांतहि—नव्या करारांतहि—परमेश्वर म्हणजे 'संपूर्ण प्रेम' अशीच कल्पना आहे. 'यहवे' हा आध्यात्मिक विकासाचे निरनिराळे टप्पे सांधणारा दुवा होय. नव्या संप्रदायाला आपल्यामध्यें दाखल करून घेतांना हिंदुधर्म त्याचें जुनें नांव कायम ठेवतो; परंतु तत्त्वाची मात्र सुधारणा घडवून आणतो. प्राचीन संस्कृत वाङ्मयांतील एक उदाहरण घेऊं या. निरनिराळीं स्वरूपें धारण करणारी

---

१ ऑक्सफर्डच्या ख्रिस्ती उमाजाला उद्देशून हे उद्गार आहेत. —अनुवादक.

२ जुन्या करारात मूळ नांव जीहोव्हा ( Gehovah ) असें असून पुढें त्याचें यहवे ( Yahaveh ) असें रूपांतर झालें आहे. —अनुवादक.

'काली' ही आर्येतर देवता आहे; परंतु क्रमाक्रमानें परमात्म्याशीं ती एकरूप झाली असें तिचें वर्णन करण्यांत आलें आहे. कालीला उद्देशून काढलेले उद्गार पाहाः—

"हे देवते! तूं कल्याणकारिणी आहेस. तुला शरण आलेल्या दुःखी लोकांचें दुःख तूं निवारण करतेस. तूं वाणी, मन आणि बुद्धि यांसहि अगम्य आहेस. वाणीनें तुझी स्तुति करण्यास कोणीहि समर्थ नाहीं.

"हे ब्रह्मस्वरूपे, जगदम्बिके, हे दयामूर्ते, आम्ही तुला वारंवार नमस्कार करतों.

"जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांचीं कार्यें हे तुझ्या विलासाचे केवळ तरंग आहेत. हें सर्व तूं क्षणांत करण्यास समर्थ आहेस. हे सर्वशक्तिमति देवि, तुला नमस्कार असो! जरी तूं निर्गुण आणि निराकार आहेस, जरी पदार्थ-मात्राच्या पलीकडे तुझें अस्तित्व आहे, जरी तूं अतींद्रिय आहेस, जरी तूं एक, अखंड, अद्वितीय आणि विभु आहेस, तथापि भक्तांच्या कल्याणार्थ सगुणरूप धारण करून तूं निःश्रेयस प्राप्त करून देतेस. हे देवि, तूं त्रिभावरूपा आणि भावगम्या आहेस. उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचें व्यक्त स्वरूप धारण करणाऱ्या हे देवि! आम्ही तुला नमन करतों.[२]

---

१ महाभारतामध्यें (५, ७) मद्यमास आणि पशूचे बली घेण्यामध्यें तिला (कालीला) आनद होतो. अस वर्णन करण्यात आले आहे. गौडवहो (इ. स. ७००) कालीला अर्पण कलेल्या पाशवी आणि मानवी बलीचा उल्लेख करतो. मिर्झापूरच्या विंध्याचल येथील दुर्गेच्या मूर्तीसबधीं बोलताना 'शूद्र कमलाकर' (इ. स १५००) म्हणतो कीं, 'काली ही किरातांची आणि इतर अनार्य जातीची देवता असून म्लेंच्छ, ठग इत्यादि तिची आराधना करतात. (आर्येतर 'काली' देवींचे हे चित्र आहे. आता परमात्मस्वरूपी कालीचे जे चित्र रेखाटण्यांत आलें आहे, ते पाहा. दोहोंमध्यें जमीनअस्मानाचा फरक दिसून येईल.) —अनुवादक.

२ देवि प्रपन्नार्तिहरे शिवे त्व वाणीमनोबुद्धिभिरप्रमेया।
यतोऽस्यतो नैव हि कश्चिदीशः स्तोतु स्वशब्दैर्भवती कदाचित्॥

× × ×

ब्रह्मस्वरूप जगदाम्बकेऽलम्। दयामयीं त्वां सततं नमामः॥

× × ×

सर्गस्थितिप्रत्यवहारकार्यं। भवद्विलासस्य तरंगमात्रम्।
कर्तु क्षणे नाखिलमस्यलं त्व। नमोस्त्वतस्तेऽखिलशक्तिरूपे॥
त्वं निर्गुणाकारविवर्जिताऽपि। त्वं भावराज्याच्च बहिर्गताऽपि।
सर्वेन्द्रियागोचरतां गताऽपि। त्वेकाह्यखण्डा विभुरद्वयाऽपि॥
स्वभक्तकल्याणविवर्धनाय। धृत्वा स्वरूपं सगुणं हितेभ्यः।
निःश्रेयसं यच्छसि भावगम्या। त्रिभावरूपे भवतीं नमामः॥

त्याचप्रमाणें वसुदेव-देवकीचा मुलगा कृष्ण याचें वर्णन भगवद्गीतेनें 'पुरुषोत्तम' असें केलें आहे.

१४ जेव्हां विद्यार्थी आपल्या आचार्याकडे धार्मिक शिक्षण घेण्यासाठीं जातो, तेव्हां तो त्यास 'तुझी इष्ट देवता कोणती?' असा प्रश्न विचारतो. कारण प्रत्येक मनुष्याला आपली भक्ति जडेल अशा देवतेची निवड करण्याचा आणि आपणाला पटेल तें मत मान्य करण्याचा हक्क आहे. गुरु आपल्या शिष्यास, 'देवतेसंबंधीं तुझी असलेली कल्पना ही अमूर्ताचें मूर्त स्वरूप व्यक्त करते' असें सांगून क्रमाक्रमानें त्यास निर्गुणाचें आकलन करण्यास शिकवितो. कल्पना करा कीं, एक ख्रिश्चन गृहस्थ आध्यात्मिक ज्ञान संपादन करण्याच्या उद्देशानें एका हिंदु गुरूकडे गेला; तर गुरु त्यास ख्रिस्तभक्तीचा त्याग करण्यास सांगणार नाहीं परंतु 'तुझें ख्रिस्तविषयक ज्ञान सत्यदर्शनाला पुरेसें नाहीं' असें सांगून खऱ्या ख्रिस्ताचें—अमूर्त परमात्म्याचें ज्ञान करून देईल. हिंदु धर्मानें मान्य केलेल्या प्रत्येक देवाला उज्ज्वल स्वरूप देऊन शेवटीं त्याचें परमात्म्याशीं तादात्म्य झालें आहे असें दाखविलें आहे; आणि हा परमात्मा आणि हृदयस्थ जीवात्मा हे एकच होत. हिंदु देवतामंडलामध्यें नवीन देवांची भर पडल्यानें त्याला धक्का पोहोंचत नाहीं. "हिंदु धर्म म्हणजे अध्यात्म-विद्येची मुरड घातलेले मंत्रतंत्र, किंवा तत्त्वज्ञानांत रूपांतर पावलेली निसर्गपूजा"—अशा तऱ्हेच्या झालेल्या टीकांतहि तथ्य आहे. कारण अध्यात्म-विद्येचा संस्कार झालेले मंत्रतंत्र आणि निव्वळ जादूटोणा यांमध्यें फरक आहे. जें जें हिंदु धर्मांत दाखल होतें, मग तें मंत्रतंत्र असो वा निसर्गपूजन असो, त्याला त्याला हिंदु धर्म आत्मसात् करतो व उच्च पदावर नेतो.

१५ धर्म कोणत्याहि नांवानें ओळखला जात असला तरी त्याच्या अत्युच्च स्वरूपांत प्रकट होणारीं नैतिक व आध्यात्मिक तत्त्वें हिंदु धर्माशीं बिलकुल विसंगत नसल्यामुळें हिंदु लोक धर्माच्या नांवाबद्दल चिकित्सा करीत बसत नाहींत. निरनिराळ्या नांवांनीं सूचित होणाऱ्या मूलतत्त्वाची कल्पना, भिन्नभिन्न नांवें वस्तुतः समानार्थक आहेत असें दाखवून, जनतेला आणून दिली जाते. ब्रह्मा, विष्णु शिव, कृष्ण, काली, बुद्ध आणि इतर ऐतिहासिक नांवें हीं निर्गुण सत्य व्यक्त करण्याकरतां भरमसाट रीतीनें वापरण्यांत येतात.

उदाहरणार्थ हा श्लोक पाहा:—" ज्या त्रैलोक्यनाथ हरीची शैव ' शिव ' या नांवानें, वेदांती ' ब्रह्म ' या नांवानें, बुद्धानुयायी ' बुद्ध ', नैय्यायिक 'कर्ता', जैन ' मुक्त ' आणि मीमांसक ' कर्म ' या नांवांनीं उपासना करतात, तो आम्हांस प्रसन्न होवो ! "[१] महान् तत्त्वज्ञानी शंकराचार्य हे परमात्म्याला एकमेवाद्वितीय असें सत्य मानतात. मतिभेदामुळें याच सत्याला लोक ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर[२] या नांवानें ओळखतात. दक्षिण हिंदुस्थानांत खालील लोकगीत प्रचलित आहे:—

प्रत्येक दिशेकडील टेकड्यांतून वाहणारे प्रवाह हे, निरनिराळ्या उगमां-प्रमाणें जरी त्यांचीं नावें भिन्न असलीं तरी, शेवटीं एकाच महासागरास येऊन मिळतात. त्याचप्रमाणें प्रत्येक देशांतील लोक भिन्न भिन्न नांवें असलेल्या देवांची उपासना करीत असले तरी शेवटीं ती एकाच परमेश्वराला जाऊन पोंचते.[३]

१६ धर्मात सुधारणा घडवून आणण्याची ही हिंदु पद्धति, प्रत्येक संप्रदायाला आपले पूर्वसंबंध कायम ठेवण्यांत आणि आपलें वैशिष्ट्य व आपला जिव्हाळा यांचें रक्षण करण्यास मदत करते. कारण, ज्याप्रमाणें विद्यार्थी आपल्या कॉलेजाचा अभिमान बाळगतात, त्याप्रमाणें सांप्रदायिक लोक आपल्या विशिष्ट देवताचे अभिमानी असतात. ध्येयप्राप्तीसाठीं विद्यार्थ्यांना एका कॉलेजांतून दुसऱ्या कॉलेजांत बदलण्याची आपणाला गरज नाहीं. परंतु प्रत्येक कॉलेजचें वातावरण उच्चतर करण्याचा प्रयत्न करावा, कॉलेजचा दर्जा सुधारावा आणि ध्येयें अधिक स्पष्ट आणि सुरेखित करावीं, म्हणजे ते कोण-त्याहि कॉलेजांत असले तरी त्याच ध्येयाची प्राप्ति होईल. जोंपर्यंत सर्व कॉलेजां-तून एकाच प्रकारचें वारें खेळत असतें आणि एकाच ध्येयाची शिकवणूक सर्व कॉलेजांतून मिळते, तोंपर्यंत आपण कोणत्याहि कॉलेजांत असलों तरी काळजी करण्याचें कारण नाहीं. अलबत संकुचित अभिमानानें प्रेरित झालेले कांहीं वेडेपीर निघतीलच. ते ' बॅलियल ' कॉलेज ' सर्वोत्कृष्ट ' अथवा ' मॅगडेलेन ' कॉलेज ' सुधारलेलें ' असें जोरानें प्रतिपादन करतील; परंतु निःपक्षपाती प्रेक्षकाला निरनिराळीं कॉलेजें हीं निरनिराळ्या भूमिकांवर असणाऱ्या स्वतंत्र पायऱ्यां-

---

१ पृष्ठ ४७ खाली पहा. २ हरिस्तुति, १८.

३ Gover. 'The Folksongs of Southern India—' p 165.

प्रमाणें न दिसतां फक्त एकाच शिखराकडे नेणाऱ्या निरनिराळ्या शिड्या आहेत असें दिसून येईल. आपण कोणत्याहि एका कॉलेजांत असलों तरी सुद्धां शिडीच्या अगदीं खालच्या किंवा उंच पायरीवर असणें आपणास शक्य आहे. ध्येयप्राप्तीच्या मार्गावरील आपलें स्थान कोठें आहे, हें आपल्या कॉलेजवर अवलंबून नसून तें आपल्यावरच, आपल्या कर्तृत्व–शक्तीवरच अवलंबून आहे. जशीं हिंदुसमाजात बरींवाईट माणसें आहेत, तशीं ख्रिश्चन समाजांतहि आहेत.

१७ धर्मांत सुधारणा घडवून आणण्याच्या हिंदु पद्धतीवर तात्त्विक आणि व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंनीं टीकेचे हल्ले चढविण्यांत आले आहेत. प्रो० क्लेमंट वेब लिहितात, "देवाचे युगायुगाचे ठायीं निरनिराळ्या रूपात अवतार होतात अशी हिंदु धर्माची परंपरा असल्यानें आणि प्रत्येक स्थानिक साधु, संप्रदाय–संस्थापक अथवा संन्यासी भक्त हीं सर्व परमेश्वराचीं व्यक्त स्वरूपें आहेत असें हिंदु धर्म मानीत असल्यानें, एकीकडे जगाचा त्याग करण्यास सांगणाऱ्या संन्यासधर्माच्या अत्युच्च भराऱ्या व दुसरीकडे त्याच्याच जोडीला अत्यंत हिडीस आणि बीभत्स अशीं संकेतचिन्हें आणि दंतकथा यासहि हिंदु धर्माची हरकत नसल्यानें, हिंदु धर्माचा इतर कोणत्याहि धर्मापेक्षां अगदीं सहज रीतीनें, गतकालीन अखंड परंपरेचा त्याग न करता विश्वधर्मांत विकास होऊं शकला. प्रत्येक संप्रदाय म्हणजे शाश्वत सत्य जाणण्याच्या इच्छेचाच एक अंश आहे असें जाणून त्या सर्वांचा हिंदु धर्मानें आपणामध्यें समावेश केला आहे खरा; परंतु निरनिराळ्या संप्रदायांच्या रूपानें मनुष्यांना व्यक्त होत असलेल्या अगर निरनिराळ्या धर्ममतांत प्रच्छन्नपणें वावरणाऱ्या शाश्वत सत्याची ओळख करून घेण्याबद्दल सर्वांमध्यें सारखीच उदासीनता असते[1]" हें विधान हिंदु धर्माचा सर्वसाधारण कल कोणीकडे आहे हें व्यक्त करीत असलें तरी, निरनिराळ्या साक्षात्कारांमध्यें निवड करण्याला हिंदु धर्मामध्यें वाव नाहीं असें विधान करणें हें सर्वस्वी योग्य नव्हे. हिंदु धर्म उदासीनतेला सहिष्णुता मानीत नाहीं. तो तर असें सांगतो कीं, हे सर्व साक्षात्कार जरी एकाच सत्याचे द्योतक असले, तरी

---

१ Needbam 'Science, Religion and Reality'.

त्यांचें महत्त्व एकसारखें नसतें. मागील व्याख्यानाच्या शेवटीं मीं या मुद्द्याचें विवेचन केलें असल्यामुळें येथें त्याचा विस्तार करण्याची अवश्यकता नाहीं. उच्चतम साक्षात्कार होईपर्यंत प्रत्येक मनुष्यानें जीवनरहस्याचें अखंड मनन करावें अशी हिंदु धर्माची अपेक्षा आहे. ज्यांना आत्मोन्नतीच्या पायऱ्या एकदम चढतां येत नाहींत, अशा लोकांच्या हिताच्या दृष्टीनें मूर्तिपूजेसारख्या कमी महत्त्वाच्या साधनांकडे जरी सहिष्णुतापूर्वक पाहण्यांत येतें, तरी प्रथम-पासून ' शाश्वत सत्यासारखी व्यापक कल्पना ' आणि ' शुद्धतर उपासना ' यांवर भर देण्यांत येतो. पायऱ्या भराभर ओलांडल्यानें आत्मोन्नति होते, असें हिंदु धर्म मानीत नाहीं. आकलन करूं न शकणाऱ्या लोकांना जेव्हां आपण उच्चतर आत्मानुभव सांगतों, तेव्हां जन्मांधांना प्रत्यक्ष सृष्टीची कल्पना आणून देणाऱ्या डोळस माणसासारखी आपली स्थिति होते. त्यांचे आध्यात्मिक डोळे उघडल्याशिवाय, द्रष्टे सांगतात तें, ते पाहूं शकणार नाहींत. मनुष्याची नीतिमत्ता, बुद्धि, शिक्षण व परिस्थिति यांवर मनुष्याची विचार करण्याची स्वाभाविक पद्धति अवलंबून असते. हिंदु धर्म मनुष्याच्या या विचार करण्याच्या स्वाभाविक प्रद्धतींत ढवळाढवळ न करतां त्याच्या-बद्दल सहानुभूति दाखवून तो जेथें उभा असेल तेथें आपल्या हाताचा आधार देऊन त्याची अधिकाधिक आध्यात्मिक उन्नति उडवून आणतो. सत्यदर्शना-साठीं लोकांना बळेंच खेंचून आणण्याच्या विरुद्ध हिंदु धर्म असला तरी सदसद्विवेकबुद्धि अधिक जागृत आणि सत्यसंवेदना अधिक संस्कारक्षम करण्याविषयीं त्याचा आग्रह आहे. निर्णय देण्यांत झालेली चूक म्हणजे नैतिक च्युति नव्हे. विषयाकलनाची दुर्बलता ही हृदयाच्या अधोगतीचें गमक नसते. दिव्य चैतन्याचें संपूर्ण आकलन झाल्यावांचून मोक्ष मिळणें अशक्य झालें, तर आपणांपैकीं कितीसे नरकाच्या जबड्यांतून सुटतलि ? शक्तिगीता म्हणते:—" हे देवि ! तत्त्वांच्या आकलनामध्यें दोष राहिल्यानें आदर्श तत्त्वांनीं भरलेल्या तुझ्या स्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्यास असमर्थ अशा भक्तांवर तूं आपल्या अपार दयेचा वर्षाव करतेस." आपणांला कदाचित् परमेश्वराचें आकलन होणार नाहीं; परंतु परमेश्वर आपणांला खात्रीनें ओळखतो.

१८ आपल्या आत्मिक विकासाच्या आड येणारीं बंधनें तोडण्याची आत्म्यामध्यें शक्ति आहे, अशी हिंदु धर्माची श्रद्धा आहे. ईश्वर म्हणजे सर्व धर्मांनीं मान्य केलेलें मुध्यवर्ति परमचैतन्य होय. हा परमेश्वर, मनुष्यांना सहज जे धर्म प्राप्त झाले आहेत, त्या सर्वांची उत्क्रांति घडवून आणतो. त्वरित प्रगति करण्याच्या उद्देशानें यमनियमांची एक परंपरा सोडून तिच्यापेक्षां अधिक खडतर अशा दुसऱ्या परंपरेचा फार घाईघाईनें अवलंब केल्यानें मनुष्याची उन्नति न होतां अधःपात होतो असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. इतिहास घडवितांना ईश्वराचीं चक्रें फार हळूहळू फिरतात. उत्कट सुधारक आपले आवडते कार्यक्रम लादून आपल्या हयातींत जगाची सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतां, यशःश्री त्यांच्या गळ्यांत माळ घालीत नाहीं. मानवी स्वभावाची कुतरओढ करून ध्येयसिद्धि होणार नाहीं. शिवाय अमुक एका विशिष्ट तत्त्वाशीं जुळत नसणाऱ्या सर्व गोष्टी जबरदस्तीनें काढून टाकून मतें व उपासना या बाबतींत कृत्रिम नियमबद्धता—एकसूत्रीपणा आणल्यानें आपली प्रगति होते असें हिंदु धर्म मानीत नाहीं. कायद्याच्या उपायांनीं जनतेला मोक्ष—प्राप्ति करून घेता येईल अशी हिंदु धर्माची कल्पना नाहीं. परमेश्वराचें स्वरूप आणि त्याची उपासना यांविषयीं विशिष्ट मत धारण करणाऱ्यांनाच मोक्ष मिळेल अशा मर्यादित स्वरूपाची मोक्षाची योजना हिंदु धर्म केव्हांहि मान्य करणार नाहीं. असला एककल्लीपणा आणि असली अरेरावी, सर्वप्रेमी अशा विश्वव्यापी परमेश्वराशीं विसंगत आहेत. अमुक विशिष्ट लोक हे देवाचे लाडके आहेत, मानव—जातीच्या धार्मिक विकासामध्यें त्यांचाच धर्म मध्यवर्ति स्थान पटकावीत आहे आणि इतर सर्वांनीं त्यांच्यापासून धर्माच्या कल्पना ग्रहण कराव्या, नाहीं तर अधःपात पत्करावा, असें गृहीत धरणें मनुष्याला अथवा ईश्वराला शोभणार नाहीं.

१९ खरें पाहतां, मनुष्याच्या मतांपेक्षां त्याच्या वर्तनावरच सगळें अवलंबून असतें. मनुष्यांच्या मतांपेक्षां त्यांच्या कृतींच्या परिणामावरूनच आपणांला त्यांच्या हृदयाचा ठाव अधिक लागतो. अचूक मत हें धर्माचें लक्षण

नसून सदाचारी जीवन म्हणजे धर्म होय[1]. खरे धार्मिक लोक दुसऱ्या लोकांचीं धर्ममतें आपल्या मताशीं जुळतात किंवा नाहीं याबद्दल फिकीर करीत नाहींत. "या कळपांत नसणारीं कित्येक मेंढरें आहेत; पण त्यांनाहि मी आपलींच समजतों" ही जीझसची महदुक्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. जीझस हा जन्मतः ज्यू ( यहुदी ) असून मृत्युसमयींहि त्याचा धर्म 'ज्यू'च होता. ज्या ज्यू लोकांत त्याचा जन्म झाला, त्यांना त्यानें "ज्यू होणें हें दुष्टपणाचें लक्षण आहे; खिस्ती व्हा." असा उपदेश केला नाहीं. उलट ज्यू धर्मांतलि दोष काढून टाकण्यासाठीं त्यानें शिकस्तीचा प्रयत्न केला. तो हिंदु धर्मांत जन्मला असता, तर हिंदु धर्मासंबंधींहि त्यानें हेंच धोरण स्वीकारलें असतें. खरा सुधारक पूर्वार्जित विचारसंपत्तींतील दोष काढून टाकून ती शुद्धतर करतो आणि तिची वाढ करतो. तो त्या संपत्तीला हिणवीत नाहीं; मग ती नाकबूल करण्याची गोष्ट तर दूरच राहिली !

२० सत्यापेक्षां आपल्या संप्रदायावरच अधिक प्रेम करणारे, शेवटीं आपल्या संप्रदायापेक्षा आपल्या स्वतःवरच अधिक प्रेम करूं लागतात. 'खिस्ती धर्म हाच एक धर्म' येथून सुरुवात होऊन मग 'प्रॉटेस्टंट' हाच एक खरा धर्मपंथ आहे' असें जोरानें प्रतिपादन करण्यांत येतें. 'एपिस्कोपॉलियानिझम हाच फक्त खरा प्रॉटेस्टंट पंथ', 'हाय चर्च[2]' हाच फक्त खरा एपिस्कोपल प्रॉटेस्टंट खिस्ती धर्म' आणि 'आमचें विशिष्ट मत हेंच हाय चर्च पंथाचें खरें आविष्करण होय'—अशा तऱ्हेनें पुच्छगति होत जाते.

२१ 'प्रत्येक मानवी प्राणी, प्रत्येक संत्र आणि प्रत्येक राष्ट्र यांच्यांत आदरणीय असें कांहीं ना कांहीं तरी वैशिष्ट्य असतेंच' ही हिंदु विचारसरणी

---

१ डच तत्त्ववेत्ता स्पायनोझा (१६३२-७७) म्हणतो, 'धर्म हा मानवी वंशाइतका विश्वव्यापी आहे जेथे जेथे कायदा आणि वटहुकूम याच्या जागी न्याय आणि प्रेम ह्यांचा कायद्याप्रमाणें प्रभाव आहे, तेथे परमेश्वरी राज्य नांदत असतें.' (Religion is universal to the human race. Wherever Justice and Charity have the force of law and ordinance, there is God's kingdom.)

२ हीं खिस्ती धर्मांतील निरनिराळ्या पंथांची नांवे आहेत —अनुवादक.

हळू हळू मान्य होत चालली आहे. या विचारसरणीप्रमाणें आपण प्रत्येक संघाला त्याच्या स्वाभाविक सद्गुणांचा आणि वैशिष्ट्याचा परमोच्च विकास करण्यास स्वातंत्र्य द्यावें हें क्रमप्राप्तच्च होतें. प्रत्येक वैशिष्ट्य असें असतें कीं, त्याची दुसऱ्या कशाशींहि तुलना करतां येत नाहीं किंवा त्याचें रहस्य दुसऱ्यास कळविणेंहि शक्य नसतें; आणि म्हणून एकाला उपयोगी अशी गोष्ट प्रत्येकाला तितक्याच प्रमाणांत उपयोगी पडेल असें गृहीत धरणें म्हणजे सत्यस्वरूपाची अवगणना करण्यासारखें आहे. भिन्नरुचीच्या लोकांना समाविष्ट करील इतकें हें जग व्यापक आहे.

२२ हिंदु धर्म आपल्या अनुयायांचें जीवन अधिक स्वतंत्र आणि व्यापक करण्यास मदत करीत नाहीं, असें कधीं कधीं प्रतिपादन करण्यांत येतें. अशा संदिग्ध आरोपाचें खंडन करणें कठिण आहे. कांहीं झालें तरी हिंदु धर्मानें जर जुन्या कल्पनांचें उच्चाटन केलें असतें, उदाहरणार्थ क्रमाक्रमानें विकास करून सुधारणा घडवून आणण्याऐवजीं धर्मांतर आणि बाटाविणें ( Conversion & Proselytism ) या पद्धतींचा अवलंब केला असता तर आपली अधिक परिणामकारक उन्नति केली असती कीं काय, हा मोठा प्रश्न आहे. हें अगदीं खरें आहे कीं, हिंदु धर्मानें मंत्रतंत्र किंवा पुराणमतवाद्यांचा हटवादीपणा यांचें बेसुमार वाढलेलें तण, मन घट्ट करून उपटून टाकलें नाहीं. फाजील वाढ कापून काढण्यापेक्षां मुळांचा रस शोषून घ्यावयाचा ही हिंदु धर्माची सुधारणा घडवून आणण्याची पद्धति आहे.

२३ हिंदुधर्माच्या भरभराटीच्या काळांत ‘ सत्य–निष्ठा ’ आणि ‘ यच्चयावत् मानव जातीबद्दल आदर ’—या तत्त्वांना अनुसरून हिंदु लोक वागत असल्यामुळें त्यांच्या सर्वसाधारण धार्मिक जीवनामध्यें पुष्कळ सुधारणा झालेली दिसत होती; परंतु अलीकडे अलीकडे त्यांचें तेज नष्टप्राय झाल्याचें दिसत आहे. हिंदु धर्मामध्यें धर्मभोळेपणाला बळी पडलेले पुष्कळ लोक आहेत; परंतु हलक्या संस्कृतीला खो देऊन उच्च संस्कृतीनें आपलें ठाणें दिलेल्या देशांत सुद्धां हलक्या संस्कृतीचे अवशेष अद्यापिहि दिसून येतातच. असे अवशेष धुंडण्यासाठीं आपणांला फार दूर जाण्याची अवश्यकता नाहीं. या बाबतींत मोठे अधिकारी लेखक सर जेम्स फ्रेजर[1] आहेत ते म्हणतातः—“ हजारों वर्षां-

१ सुप्रसिद्ध आंग्ल मानवशास्त्रज्ञ ( ज. १८५४ ).

पूर्वी हिंदुस्थान आणि ईजिप्त यांची जी स्थिति होती किंवा आज सुद्धां जगांतील कानाकोपऱ्यांत अगदीं निकृष्टावस्थेंत असलेल्या जंगली लोकांची जी स्थिति आहे तीच आधुनिक युरोपच्या अज्ञानी आणि धर्मभोळ्या वर्गाची आहे. " एखाद्या नाठाळ जमीनदाराला किंवा धर्मोपदेशकाला ठार मारण्याकरतां खिळे ठोकलेली एक मूर्ति स्कॉटलंडमध्यें आढळून आली. आयर्लंडमध्यें एका स्त्रीला डाकीण समजून हळूहळू भाजून ठार मारण्यांत आलें. मानवी चरबी घालून केलेल्या मेणबत्तीच्या प्रकाशांत चोरांना आपलें कार्य कोणाच्याहि नजरेस न पडतां करतां येतें, अशा समजुतीनें ती चरबी मिळविण्यासाठीं रशियामध्यें एका मुलीला ठार करून तिचे तुकडे तुकडे करण्यांत आले. "[१] अशा मजकुराचा वर्तमानपत्रांतील एखादा परिच्छेद सुधारलेल्या जगाला मधून मधून धक्का देतच असतो. [२]हे पुष्कळ ख्रिश्चन लोक मंत्रतंत्र आणि जादू-टोणे यांवर विश्वास ठेवनात. मानवी संघांच्या संवयी जितक्या दीर्घकालीन असतील, तितकें त्यांचें उच्चाटन करणें दुरापास्त होतें. झपाट्यानें सुधारणा घडवून आणणें अशक्य असतें आणि धर्माची प्रवृत्ति मूळ पदावर येण्याची असल्यामुळें आस्ते आस्ते सुधारणा घडवून आणणें देखील फार जड जातें. कांहीं उदाहरणें पाहा:— ( १ ) पुरुष किंवा स्त्री उपास्यें असलेल्या मूळ अनार्य जातींनीं जेव्हां बुद्ध धर्माची दीक्षा घेतली, तेव्हां त्यांनीं बुद्धाच्या बरोबरीला ' तारा ' ही देवता सुद्धां असावी याबद्दल आग्रह धरला. ( २ ) ॲस्टोरेथ[३], इसिस आणि ॲफ्रोडाइट यांची उपासना करणाऱ्या ग्रीक-रोमन लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तेव्हां ख्रिस्त-माता ' मेरी ' इची उपासना वाढली. ( ३ ) बाटलेल्या एका हिंदी गृहस्थाची अशी गोष्ट सांगतात कीं, तो रविवारीं चर्चमध्यें जाई आणि शुक्रवारीं कालीचें दर्शन घेई. मिशनऱ्यानें ' तूं ख्रिश्चन नाहींस काय ? ' असें

१ हीं सर्व ख्रिश्चन समाजांत प्रचलित असलेल्या धर्मभोळेपणाची उदाहरणें होत.

२ ' The Golden Bough ', abridged edition, p.:56.

३ 'ॲस्टोरेथ' ही ग्रीक ( ? ) देवता आहे. इसिस ही शर्नाची मुलगी असून प्राचीन ईजिप्शियन लोकांच्या अनेक देवतांपैकी एक मुख्य देवता होती. ॲफ्रोडाइट हें 'शुक्रा'चें नांव
—अनुवादक

विचारलें असतां तो म्हणाला, "होय, मी आहें, परंतु त्यामुळें मीं माझा धर्म सोडला असा अर्थ निघतो कीं काय ? " हिंदु धर्म सोडून मग इतर धर्मांची दीक्षा घेतलेले लोक आजारी पडले असतां, संकटांत सांपडले असतां, मृत्यूच्या भीतीनें घेरले गेले असतां किंवा प्रत्यक्ष काळाच्या तोंडांत असतां, वेळोवेळीं हिंदु देवांना भजतात. आपण बाह्यतः ज्या मतांचे अनुयायी आहों असें म्हणवितों, त्यांचीं मुळें आपल्या अंतरंगापर्यंत पोहोंचलेलीं नसतात. सुधारकाच्या आज्ञेनुसार आपण एकदम हृदयाच्या आंतल्या कप्प्यातल्या कप्प्यांत दडवून ठेवलेला भावनांचा ठेवा सोडूं शकत नाहीं. उच्च दर्जाचें बौद्धिक आणि नैतिक शिक्षण मिळाल्याशिवाय जुन्या कल्पनांचें उन्मूलन करतां येत नाहीं.

२४ धर्मामध्यें सुधारणा घडवून आणण्याची ही हिंदु पद्धति सर्वस्वीं अयशस्वी ठरली नाहीं. सर्व दिशांनीं प्रगति झाली आहे; तथापि अद्यापिहि पुष्कळ सुधारणा घडवून आणण्यास वाव आहे. हिंदु धर्मामध्यें सर्वसामान्य असें तत्त्व आणि सर्वमान्य असा उपासनेचा ठराविक नमुना नसतांहि, त्यानें एका व्यापक योजनेमध्यें पुष्कळ संप्रदायांचा आणि उपासनांचा समन्वय केला आहे. इ. स. १९११च्या खानेसुमारीच्या अहवालात श्री० बर्न्स लिहितातः— 'चौकशीअंतीं मला असें कळून आलें कीं, बहुसंख्याक हिंदूंची एका ईश्वरावर—मग त्याला परमेश्वर म्हणा, भगवान् म्हणा किंवा नारायण म्हणा—दृढ श्रद्धा आहे[1].' हिंदु कल्पना आणि ध्येयें यांच्या प्रसाराविषयीं सर हर्बर्ट रिस्ले म्हणतात, 'या कल्पना म्हणजे विद्वानाचा मक्ता नव्हे. सामान्य माणसांच्याहि पुष्कळ अंशीं अशाच कल्पना असतात. एखाद्या चांगल्या बुद्धिमान् शेतकऱ्याशीं जर तुम्ही परमात्मा, कर्म, माया, मुक्ति वगैरेंविषयीं बोलाल तर अशा बाबतींत तुमचें लक्ष वेधलें गेल्याबद्दल त्याला वाटणाऱ्या आश्चर्याचा भर ओसरल्यावर तुम्हांला असें आढळून येईल कीं, वरील सर्व शब्द त्याच्या परिचयाचे आहेत आणि त्यांवर त्यानें आपल्या भावि जीवनासंबंधीं कामचलाऊ व ओबडधोबड असें धोरण रचिलें आहे[2].' हिमालयापासून कृष्णाकुमारीपर्यंत सर्व हिंदूंचें एक प्रकारचें मूलभूत ऐक्य आहे.

---

१ भाग पहिला, पृष्ठ ३६२. २ The People of India.

२५ एका बाजूला डोंगराळ जातींचे संस्कारविहीन असे संघ आणि दुसऱ्या बाजूला अर्धसुधारलेले मानवांचे समुदाय यांचा एकजीव करण्याचें काम रेंगाळत झालेलें असून तें कोणत्याहि दृष्टीनें अगदीं पूर्ण झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. रानटी आणि आडमुठ्या विचारांचे कित्येक लोक हिंदुस्थानांत आहेत, परंतु हिंदु संस्कृतीला त्यांच्या अंतःकरणांत मूळ धरून बसलेल्या विचारांचें उन्मूलन करतां आलें नाहीं. गेल्या कांहीं शतकांत हिंदु धर्म आपल्या ध्येयापासून च्युत झाला आहे आणि असंस्कृत लोकांच्या उद्धाराच्या कार्याचीहि हेळसांड झाली आहे ही दुःखाची गोष्ट होय.

२६ उन्मादावस्थेंत आत्महत्या करणाऱ्या माणसावर जबरदस्ती करून त्याला वांचविणें हे न्याय्य आहे; परंतु एखाद्यानें योग्य विचारसरणीचा अवलंब करावा म्हणून त्याच्यावर जबरदस्ती करणें हेंहि तितकेंच न्याय्य आहे असें हिंदु धर्म मानीत नाहीं. इतर कांहीं धर्मांच्या लोकांनीं मात्र आपली अशी समजूत करून घेतली होती असें दिसतें. उदाहरणार्थ, ज्यू लोक घ्या. ते एकेश्वरवादी होते. पॅलेस्टाइनच्या टापूंत येण्यापूर्वी ते इतस्ततः भ्रमण करीत असत; त्यांचें स्थायि असें ठिकाण नव्हतें. अशा स्थितींत या लोकांच्या टोळ्या प्रथम जेव्हां पॅलेस्टाइनच्या आसमंतांत आल्या तेव्हां तेथील मूळचे रहिवासी ‘ अनेकेश्वरवादी ’ होते. संकुचित एकेश्वरवादी ज्यू लोकांनीं या ‘ अनेकेश्वरवादी ’ लोकांना जिंकलें व त्यांचा छळ केला. या एकेश्वरवादी लोकांच्या परधर्म—असहिष्णुतेचा वृत्तांत मानवी इतिहासांत रक्ताच्या अक्षरांनीं लिहिला गेला आहे! जित लोकांवर केलेल्या अत्याचारांबद्दल ईश्वराची मंजुरी मिळविण्याकरितां ते त्याची प्रार्थना करीत! जुन्या लोकांचें धर्मवेड आनुवंशिक रीतीनें ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मांकडे आलें आहे. पॅलेस्टाइननें पाश्चात्य संस्कृतीला वळण देण्याऐवजीं जर तें काम ग्रीक लोकांनीं केलें असतें तर संस्कृतीच्या दृष्टीनें तें बरें झालें असतें कीं नाहीं हें युरोपियन लोकांनींच ठरवावयाचें आहे. धर्मवेडापासून धर्मयुद्धें होतात. हा धर्मवेडेपणा निरनिराळीं मतें धारण करणाऱ्या परकीयांचा नाश करण्यास मनुष्यांस उद्युक्त करतो आणि त्या धर्मवेडेपणाचा आधार घेऊन मनुष्यें आपल्या कृत्यांचें समर्थन करतात. असलीं धर्म—युद्धें हीं हिंदूंना जवळजवळ माहीतच नाहींत. धर्मवेडेपणाचे स्फोट इतस्ततः झाले आहेत खरे; परंतु अश्रद्ध

माणसांचा छळ करण्यास कधींहि प्रोत्साहन द्यावयाचें नाहीं असा हिंदु धर्माचा दंडक होता. सापेक्षतया विचार करतां हिंदु धर्माचें नांव या बाबतींत कलंकित झालेलें नाहीं. पुष्कळ आणि विविध अशा मानवी समाजांचा समन्वय करून हिंदु धर्मानें त्यांना शांतिपाठ शिकविला आहे. हिंदु धर्माप्रमाणेंच अखिल मानववंशापैकीं जवळजवळ एकपंचमांश लोक अनुयायी असलेल्या बुद्ध धर्मानेंहि दुसऱ्या धर्मासंबंधीं नेहमीं आदर दाखविला आहे, त्यानें त्यांचे जबरदस्तीनें उच्चाटन करण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं. बुद्धधर्मविषयक अगदीं प्राचीन पुस्तकांपैकीं एका पुस्तकात असा उल्लेख आहे कीं, बुद्धानें आपल्या वेळच्या धार्मिक विवादकांमध्यें प्रचलित असलेल्या "आपल्या स्वतःच्या तत्त्वांचें प्रदर्शन करणें आणि दुसऱ्यांचीं निंद्य ठरविणें"—या प्रवृत्तीचा निषेध केला. [1]बुद्ध आपल्या अनुयायांना निरनिराळ्या संप्रदायांमध्यें असंतोष माजविण्याचा संभव असणारे सर्व वादविवाद टाळण्याविषयीं आज्ञा करतो. अशोकाच्या अनेक शिलालेखांपैकीं एका लेखात धार्मिक सहिष्णुतेचें विवेचन आहे. "परमेश्वराचा आवडता राजा प्रत्येक धर्माविषयीं आदर बाळगतो; परंतु धार्मिक तत्त्वांच्या विकासाइतकी तो दुसरी कोणतीहि गोष्ट महत्त्वाची समजत नाहीं. कारण, आपल्या स्वतःच्या धर्माबद्दल आदर बाळगणें आणि इतरांच्या धर्माचा कधींहि उपहास न करणें हा धर्माचा मूल सिद्धांत आहे. या सिद्धांताविरुद्ध वर्तन करणारा इतरांच्या धर्माची हानि करून स्वतःच्या धर्माचीहि नुकसान करतो." "माझ्या राज्यांत सर्व धार्मिक सांप्रदायिकांना आपआपल्या विशिष्ट मतांप्रमाणें वागण्यास परवानगी आहे." [2]भारतवर्षीय हिंदु आणि बौद्ध राजे या तत्त्वाला अनुसरून वागले असल्यामुळें गांजलेल्या आणि स्वदेशत्याग केलेल्या सर्व मोठमोठ्या धर्मांच्या अनुयायाना हिंदुस्थानांत आश्रय मिळाला. ज्यू, खिश्चन, पार्शी,

१ सुत्तनिपात ७८२ आणखी अंगुत्तरनिकाय ३ (५७-१) हेंहि पाहा ह्या पुस्तकात बुद्धानें 'बुद्धानुयायानी बुद्धेतराना दान द्यावें' असे प्रोत्साहन दिले आहे. बुद्धेतराचा स्वर्गाचा हक्क त्यानें मान्य केला आहे. मज्झिमनिकाय (१, पृ. ४८३) मध्ये ' एका विशिष्ट आजीवकाने कर्मावर श्रद्धा बाळगल्याने स्वर्ग मिळविला' असे लिहिले आहे. खरे नैतिक जीवन व्यतीत करणाऱ्या ब्राह्मणाबद्दल त्याला फार आदर होता.

२ बारावा शिलालेख.

यांना आपआपल्या धर्मांचा विकास करण्यास पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें. प्रयाग येथील महोत्सवप्रसंगीं राजा हर्षानें पहिल्या दिवशीं बुद्धाला एक पुतळा अर्पण केला, दुसऱ्या दिवशीं आपल्या पित्याची प्रिय उपास्य देवता जो सूर्य त्याला आणि तिसऱ्या दिवशीं शिवाला एक एक पुतळा अर्पण केला असें चिनी प्रवासी यूएन श्वंग लिहितो. स्थाणुरवीचे सुप्रसिद्ध कोट्टायम ताम्रपट ( नववें शतक ) आणि विजय रागदेवाचे कोचीन येथील ताम्रपट यांत स्पष्ट उल्लेख आहे कीं, हिंदु राजांनीं खिस्ती धर्माबद्दल सहिष्णुता बाळगली एवढेंच नव्हे तर त्या धर्माच्या अनुयायांना खास सवलती दिल्या. परवांच म्हैसूरच्या हिंदु राजानें आपल्या राज्यामध्यें खिस्ती चर्चचा जीर्णोद्धार करण्यास देणगी दिली.

२७ आधिभौतिक शास्त्राचे साहसी प्रयत्न आणि चमत्कार यांनीं अशी परिस्थिति निर्माण केली आहे कीं, जगाच्या विस्तारामुळें व्यवहारांत भासत असणाऱ्या अडचणी नष्ट झाल्या आहेत. परराष्ट्रें हीं जणूं आपल्या अगदीं शेजारीं आलीं आहेत असें वाटतें. भिन्नभिन्न लोकांच्या मिश्रणानें विचारविनिमय होत आहेत. 'जग' हा सहकारी संघ आहे, असें हळूहळू आपल्या प्रत्ययास येत आहे. दुसरे धर्म आपणांला प्रतिस्पर्धी अशा प्रबल शक्ति बनले आहेत आणि त्यांच्याशीं आपण सलोख्यानें आणि शांततेनें कसे राहूं शकूं याचे मार्ग आणि याचीं साधनें यांचा आपण शोध करीत आहों. "फक्त आमच्याजवळ ज्ञानाचा प्रकाश आहे आणि दुसरे सर्व अज्ञानांधःकारांत चांचपडत आहेत" असें जोंपर्यंत आपण प्रतिपादन करीत राहूं तोंपर्यंत आपणांला धार्मिक ऐक्य आणि शांति लाभणें शक्य नाहीं. वरीलप्रमाणें प्रतिपादन करणें हेंच युद्धाला आव्हान आहे. एकाच प्रकारची संस्कृति आणि एकाच प्रकारचा समाज असलेलें एक साम्राज्य प्रस्थापित करणें हें जगाचें राजकीय ध्येय नसून जीवनक्रम, मानसिक उन्नति, संवयी आणि संस्था यांमध्यें पुष्कळ फरक असलेल्या परंतु बंधुत्वाच्या भावनेनें जवळजवळ राहणाऱ्या आणि शांतता, सुव्यवस्था, सलोखा आणि सहकार्य यांचा उपभोग घेत असलेल्या 'स्वतंत्र राष्ट्रांचा संघ' निर्माण करणें हें जगाचें राजकीय ध्येय होय. या संघांतील प्रत्येक राष्ट्र

आपल्याजबळ उत्तम, अपूर्व, विशिष्ट आणि इतर राष्ट्रांच्या वजनांमापांनीं बरोबर तोलतां न येणारें असें जें कांहीं असेल तें 'राष्ट्रसंघा'ला अर्पण करील. राष्ट्र—संघाच्या या आमच्या ध्येयामध्यें अठराव्या शतकांतील विश्वकुटुंबत्व आणि एकोणिसाव्या शतकांतील राष्ट्रीयत्व या दोहोंचा सुंदर मिलाफ झाल्यानें मानवी कुटुंबाच्या प्रत्येक शाखेला मनुष्यमात्राच्या या व्यापक जीवनामध्यें स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि आत्मविकास करण्याला पूर्ण मुभा आहे. हें राजकीय ध्येय जर धार्मिक क्षेत्राला लागू करण्यांत आलें नाहीं तर जगाचें धार्मिक भवितव्य उज्ज्वल राहील अशी आशा मला वाटत नाहीं. जेव्हां दोन अथवा तीन निरनिराळे धर्म असें अट्टाहासानें प्रतिपादन करतात कीं, आमच्या धर्मांमध्येंच खरें तत्त्व आणि खरा दिव्य संदेश सांठविलेलीं आहेत आणि याचा स्वीकार हाच स्वर्गाचा एकमेव असा मार्ग आहे,तेव्हां वाद अनिवार्य होतात. अशा वादांमध्यें एक दुसऱ्याला आपणावर चढाई करूं देणार नाहीं आणि जग रसातळाला जाईपर्यंत कोणालाहि वर्चस्व प्रस्थापित करतां येणार नाहीं. आपल्या धर्माशिवाय दुसरा प्रत्येक धर्म निपटून काढण्याचा प्रयत्न करणें हा धर्मांतील बोल्शेव्हिझमचा एक प्रकार आहे. हा टाळण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. भिन्नधर्मीयांत सलोखा घडवून आणण्यास धर्ममतांच्या एकसारखेपणाची तितकी अवश्यकता नसून त्यांचें ध्येय एक असलें म्हणजे पुरे असें हिंदुधर्म मानतो. हिंदूंच्या या मार्गाचा आपण अवलंब केला तरच धार्मिक बोल्शेव्हिझमची आपत्ति टळेल. सर्वांना एकाच धर्मांत ओढून त्यांचें ऐक्य मारून मुटकून घडवून आणण्याची हांव न बाळगतां निरनिराळ्या धर्मांचीं ध्येयें एकच आहेत हें कळून आल्यावर जी एकी उत्पन्न होईल तीवरच जास्त भर दिला पाहिजे; कारण अशा एकीमुळें केवळ प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल एवढेंच नव्हे तर उपयोगी म्हणून ठरलेल्या प्रत्येक संघटित धर्मपंथालाहि स्वातंत्र्य लाभेल. कारण ऐतिहासिक जीवन आणि ऐतिहासिक विचारसरणी यांचे बहुतेक सर्व प्रकार अनुभवाची मान्यता आणि ईश्वराचा पाठिंबा आम्हांला आहे असें म्हणूं शकतात. जर एकाच धर्ममतानें इतर धर्ममतें शोषून घेतलीं तर जगाच्या विचारसंपत्तीचें दिवाळें निघेल ! ईश्वराला वैचित्र्यहीन नियमबद्धता आवडत नसून वैचित्र्यपूर्ण सुसंवादित्व आवडतें. हिंदु धर्माच्या व्यापक आणि संकलना-

त्मक धोरणानें सहस्रहस्तांचा एक विराट् पुरुष निर्माण केला. त्याचा प्रत्येक हात कार्यक्षम असून परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें तो त्याला नेमून दिलेलें काम करीत असतो. प्रत्येकानें आपणाला नेमून दिलेलें कार्य करावें आणि सर्वांनीं एकाच दैवी कार्यांत सामील होऊन जीवनामध्यें कांहीं विसंवादी सूर असले तरी—हेरॅक्लिटसच्या[1] म्हणण्याप्रमाणें—अत्युत्कृष्ट सुसंवादित्व आणावें, हेंच आपलें ध्येय असावें.

२८ धर्माधर्मांतील वाद मिटविण्याची ही हिंदु पद्धति भविष्यकालीं मान्य केली जाण्याचा संभव आहे हें बहुतेक निश्चित आहे, असें मला वाटतें. आपलीं ध्येयें पसंत करण्याचें स्वातंत्र्य असणें आणि त्या दिशेनें आपण प्रयत्न करणें हें प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें धोरण आणि त्या धोरणावरील निस्सीम निष्ठा या दोन गोष्टींमुळें मला असें वाटतें. स्वयंनिर्णीत गोष्टीच चांगल्या ठरतात. स्वयंनिर्णयावांचून इतर कोणत्याहि निर्णयाला कांहींच किंमत नसते. निरनिराळे धर्म हे जगांतील प्रत्येक भागांतल्या इतर धर्मांशीं सहानुभूतीनें वागण्याचे धडे हळूहळू गिरवीत आहेत. आजचें माझें येथील व्याख्यान हेंच या विधानाचें द्योतक आहे. सर्व धर्मपरिषदा आणि सर्व धर्मांतील उदारमतवाद्यांच्या सभा या परस्परांचे दृष्टिबिंदू समजण्यास आणि परस्परांमध्यें सलोखा घडवून आणण्यास मदत करतात. धर्मांचा तौलनिक अभ्यास परधर्माबद्दल आपलें धोरण अधिक सहानुभूतिपर ठेवण्यास प्रवृत्त करतो. धर्मांचा तौलनिक अभ्यास, "लोकांची बुद्धिमत्ता, तत्कालीन वातावरण आणि तत्कालीन गरजा हीं प्रत्येक धर्माचें स्वरूप ठरवितात" हें दर्शवून सर्व धर्मांच्या मूलभूत तत्त्वांचें ऐक्य आपल्या मनावर ठसवीत असतो. धर्मांच्या परस्पर-संबंधाविषयीं स्पष्ट विचार कसा करावा, याचें शिक्षण आपण घेत आहों. आम्ही निरनिराळे धर्म विसंवादी आहेत असें समजत नसून ते परस्परांना पूरक आहेत असें समजतों आणि म्हणून एक ध्येय साध्य करून घेण्यासाठीं ते अवश्यक आहेत. इतर धर्मांचा अधिक निकट परिचय झाल्यामुळें अमुक या किंवा त्या धर्मामध्येंच धैर्यशाली, सहिष्णु, आत्मनिरपेक्ष प्रेम करणारीं आणि नवविचारप्रवर्तक माणसें निर्माण झालीं

[1] हा एक ग्रीक तत्त्ववेत्ता (खिस्तपूर्व ५३५ ते ४७५) होता. यानें 'धर्म आणि राजकारण' ह्यावर पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत.

ही समजूत पार नष्ट होते. प्रत्येक मोठ्या धर्मानें, विषयलोलुप, लोभी आणि क्रोधांध लोकांना आपापल्या दुर्गुणांपासून परावृत्त करून सन्मार्गाला लावलें आहे. धर्माच्या विश्वव्यापी संग्रामध्यें अगदीं मूळच्या जंगली धर्माला देखील स्थान आहेसें वाटतें. कारण, फुलें भपकेदार असलीं तरी त्यांचीं मुळें चिखलांतच रुतलेलीं असतात. आत्मानुभवाला अधिक महत्त्व प्राप्त होत असून सांप्रदायिक वचनांना गौणत्व येत आहे.[1] बुद्धिमान् लोक विजातीय वस्तू अलग काढून त्यांना निरनिराळ्या दालनांत बंद करतात, तर उच्च प्रकारची अंतर्दृष्टि प्राप्त झालेले लोक वस्तूंचे स्वाभाविक फरक लक्षात घेतात आणि सर्वांचा समन्वय करून ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. अर्धवट धार्मिक आणि अधार्मिक लोक सांप्रदायिक वचनांबद्दल भाडत बसतात. स्विफ्टच्या कडक शब्दांत बोलावयाचें म्हणजे "परस्पराचा द्वेष करण्यास मात्र आपणांस धर्मात आधार सापडतो, परंतु परस्परांवर प्रेम करण्याच्या वेळीं धर्माची आठवण होत नाहीं." जसजसा आपला आध्यात्मिक विकास होत जाईल तसतशी परमताबद्दल अधिकाधिक सहिष्णुता आपल्या अंगीं बाणेल.

---

१ सुप्रसिद्ध आंग्ल लेखक डीन इंगे (ज. १८६०) म्हणतो, "धर्मातील गुरुत्वाकर्षण, प्रामाण्यापासून निघून अनुभवाकडे गेले आहे .. आत्मानुभवाचीं मूलतत्त्वें हीं आता व्यापक प्रमाणावर मान्य केलीं जात आहेत आणि मुख्यत सुशिक्षित लोकांना श्रद्धेचा खात्रीपूर्वक तोच मुख्य आधार आहे"

१ पृष्ठ ३४ ओळ १ करिता टीप.—

१ य शैवा समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिन ।
बुद्धा बुद्ध इति प्रमाणपटव. कर्तेति नैयायिका ॥
अर्हन्नित्यथ जैनशासनरता. कर्मेति मीमांसका. ।
सोऽय वै विदधातु वाछितफल त्रैलोक्यनाथो हरि ॥

# व्याख्यान तिसरें

## ब्रह्म, जग आणि जीव ह्यांचे परस्परांमधील संबंध

१ हिंदु धर्माच्या व्यावहारिक बाजूकडे वळण्यापूर्वी हिंदु नीतिशास्त्राच्या कल्पनेविरुद्ध घेण्यांत आलेल्या मुख्य आक्षेपांचा विचार करून आपला मार्ग साफ करणें अवश्यक आहे. प्रथमतः मायावादाविरुद्ध घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांचा विचार करूं या:— ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या सिद्धांताला मायावाद म्हणतात. " या मायावादाचा स्वीकार केला म्हणजे आपले नैतिक संबंध अर्थशून्य होतात, निसर्गाची सृष्टि ही मिथ्या भासते, मानवी इतिहास हा मृगजलवत् होतो, 'काला'ला महत्त्व राहत नाहीं, जीवनांतहि कांहीं अर्थ वाटत नाहीं आणि मानववंशावर वर्चस्व गाजवीत असलेल्या या 'माये'पासून मुक्ति मिळविणें हेंच सर्व मानवी प्रयत्नांचें ध्येय बनतें " असें आक्षेपकांचें म्हणणें आहे.

२ वेदकालीन विचारवंत लोकांनीं ' जग सत्य आहे ' ही विचारसरणी मान्य केली आहे. उपनिषदांमध्यें जग हें सापेक्ष सत्य आहे, असें आग्रहानें प्रतिपादन करण्यांत आलें आहे. सतार आणि तिजपासून निघणारे ध्वनी, तसेंच माती व सोनें आणि त्यांपासून तयार केलेल्या वस्तू, हे दृष्टांत देऊन असें प्रस्थापित करण्यांत आलें आहे कीं, जगांतील यच्चयावत् पदार्थ परमचैतन्यापासून निर्माण झाले आहेत. याज्ञवल्क्य म्हणतात त्याप्रमाणें जगांतील प्रत्येक वस्तु आत्मज्ञान करून देणारी असल्यामुळेंच तिला महत्त्व आहे. श्वेताश्वतर उपनिषद् परमात्म्याला मायेचा अधिपति समजत असल्यानें असें सुचवितें कीं, ही आश्चर्यकारक सृष्टि ही त्याचीच कृति आहे. ' ही सृष्टि म्हणजे केवळ अज्ञ लोकांनाच खरा वाटणारा असा

परमात्म्यानें निर्माण केलेला मायावी देखावा होय ' हें मत उपनिषदें मान्य करीत नाहींत. बहुसंख्याक हिंदु लोकांनीं मान्य केलेल्या निरनिराळ्या सगुणोपासना मायावादाचा पुरस्कार करीत नाहींत. हिंदु विचारसरणीचे प्रतिनिधि म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीशंकराचार्यांनीं हा मायावाद मान्य केला आहे[1].

३ श्रीशंकराचार्य या जगाला माया समजत असून आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ कित्येक कारणें पुढें मांडतात ही गोष्ट अगदीं खरी आहे. त्यांची विचारसरणी अशी आहे:—" निरनिराळ्या ठिकाणीं आणि निरनिराळ्या काळीं आलेले नाना अनुभव हे सदा अपूर्ण असल्यानें आपण त्यांचें एकीकरण करूं शकत नाहीं. अनुभवाचें कितीहि एकीकरण केलें तरी त्या क्षेत्रात ज्यांचा अंतर्भाव होऊं शकत नाही असे पुष्कळ अनुभव शिल्लक राहतातच. काल आणि स्थल यांनीं व्यापिलेल्या जगाचें व्यवस्थित एकीकरण करतां येत नाहीं. यावरूनच हें सिद्ध होतें कीं, जग हें अपूर्ण असून मिथ्या आहे. शिवाय सत्तत्त्व हें स्थित्यंतरापासून मुक्त असून तिन्ही काळांत टिकून राहणारें—कालत्रयसत्तावत्—असलें पाहिजे. पण या जगांतील घडामोडी सदासर्वकाळ टिकत नाहीत; त्या प्रत्येक क्षणाला बदलतात. "लोके यदारब्धं तदनित्यम्"—या विचारसरणीचा आता आपण आपल्या समजुतीप्रमाणें अर्थ करूं. जीवात्म्याचा जीवनहेतु साध्य झाला कीं, त्याचा प्रवास थांबतो. जर आपलें ध्येय कधींच साध्य होणार नसेल, जर अप्राप्य वस्तूंच्या शोधांतच आपलें आयुष्य व्यर्थ घालवावयाचें असेल, जर सदासर्वकाळ पर्यटनच करावें लागणार असेल आणि मुक्कामाचें ठिकाण कधींहि येणार नसेल, तर जगाचें चक्र निर्हेतुकपणें फिरत आहे आणि सर्व मिथ्या

१ 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' हे मत वैदिककालीं किंवा उपनिषत्काली प्रचलित नव्हतें आणि म्हणून तत्कालीन समाज कर्तव्यपरायण, स्वावलंबी आणि तेजस्वी होता ही गोष्ट लक्षात टेवण्यासारखी आहे. ह्या मताचा जोराने पुरस्कार श्रीशंकराचार्यांनी केला आहे आणि बुद्धोत्तर कालात त्याचा जास्त प्रसार झाला व त्यामुळे तत्कालीन समाजात कर्तव्यशून्यता, दैवायत्तता, परावलंबन इत्यादि दुर्गुणाचे प्राबल्य माजले

( ह्यासंबंधी वे० शा० भिडेशास्त्री ह्यांच्या ईशोपनिषदातील उपक्रम व उपसंहार वाचनीय आहेत. )

—अनुवादक.

आहे असें जें कंठरवानें म्हणण्यांत येतें तें खरें आहे असें म्हणतां येईल. पण गाण्याला शेवटचें कडवें नाहींच असें कसें होईल? पद कधीं तरी संपलेंच पाहिजे. जन्ममरणाचें रहाटगाडगें हेंच जर जीवनसर्वस्व नसेल आणि अप्राप्य ध्येयाचा अखंड शोध करणें एवढेंच जर आमच्या नशिबीं लिहिलेलें नसेल, तर जीव करीत असलेल्या प्रवासाच्या कोणत्या तरी एका टप्प्यावर आपणांस पूर्णावस्था प्राप्त झाली पाहिजे. अशी पूर्णावस्था प्राप्त होणें म्हणजेच जन्ममरणापासून—संसारापासून मुक्त होणें होय. निरनिराळे जन्म हे आपला जीवनहेतु साध्य करण्याचे टप्पे असून आपण सिद्धीच्या जवळ जवळ जात आहों. प्रत्येक व्यक्तीचा जीवनहेतु साध्य झाला म्हणजे त्याला मोक्ष मिळाला असें म्हणतां येईल. मोक्षप्राप्ति झाल्यावर जन्ममरणाचें बंधन राहत नाहीं. व्यक्तीचा जीवनहेतु सफल झाला म्हणजे तिची दृष्टि विश्वव्यापिनी होते; तथापि कार्याला प्रेरक शक्ति असावी म्हणून तिचें व्यक्तित्व कायमच राहतें. जेव्हां अखिल विश्व आपलें ध्येय साध्य करतें, त्या वेळीं मुक्त व्यक्ती परमात्म्याच्या शांतीमध्यें विलीन होतात. रजःकणाप्रमाणें ही पृथ्वी ज्यामध्यें फिरत आहे, अशा या तारकामय नभोमंडळाचा नाश करण्याकरितांच जणूं निर्माण झाल्या आहेत, असें भासणाऱ्या ज्या महाशक्ती गुप्तपणें संचार करीत आहेत त्या इष्ट कार्य तडीस नेतील यांत शंका नाहीं. विश्वसंहारानें जगत्कर्त्याचा हेतु सिद्धीस जाणार आहे. इन्स्टीनची[1] 'सापेक्ष–मीमांसा' (Theory of Relativity) 'जग हें दिक्कालांच्या परिमाणांनीं मर्यादित असून त्याचें माप काढणें शक्य आहे' असें गृहीत धरीत असल्यानें, ती देखील जगाच्या अशा प्रलयाला विरोधी ठरत नाहीं; परंतु या प्रलयाचा सर्वशक्तिमान् अशा अनंत परमेश्वरावर कांहींच परिणाम होत नाहीं. या जगावर प्रलयरूपी पडदा पडेल; परंतु दुसरें कथानक, दुसरें नाटक, सुरू होईल आणि युगानयुगें चालू राहील.

४ कांहींना असें वाटतें कीं, जगाचा असा अंत होणें म्हणजे आपल्या धडपडीचें अगदींच क्षुद्र रीतीनें पर्यवसान होण्यासारखें आहे; आणि

---

१ इन्स्टीनः—जर्मन तत्त्वज्ञानी (ज. १८७९). 'सापेक्षमीमांसे'मुळेंच ते प्रसिद्ध आहेत.

म्हणून ते ' शाश्वत स्वर्ग ' किंवा ' शाश्वत नरक ' यांचेंहि चित्र आमच्या पुढें उभें करतात. परंतु या शाश्वत स्थितीवरून चिरंतन आलस्य सूचित होतें. हर्बर्ट स्पेन्सरनें[1] म्हटल्याप्रमाणें पूर्णत्वापासून च्युत होणें किंवा जीव आणि परिस्थिति यांची बरोबर सांगड न बसणें हें नाशाचें चिन्ह आहे. पूर्णत्वाची स्थिति म्हणजे निष्क्रिय शांतता, स्तंभन आणि मृत्यूच होय. पौर्वात्य आणि पाश्चात्य राष्ट्रांत अशा विचारसरणीचे लोक आहेत की, त्यांच्या मतें ' स्वर्ग ' म्हणजे असें एक स्थल आहे की, तेथें परमेश्वराची स्तुतिस्तोत्रें गाणें एवढेंच आपलें काम आणि तीं न कंटाळता ऐकणें एवढाच परमेश्वराला उद्योग ! धडपड करणाऱ्या मानवी प्राण्यांना मदत करणें हीच फक्त मुक्त आत्म्यांची उपयुक्त कामगिरी होय. जोंपर्यंत मुमुक्षूंना मोक्षज्ञानाची जरूरी आहे, तोंपर्यंत मुक्त आत्म्यांना करावयास थोडें तरी काम असतें; परंतु जर आपण असें गृहीत धरलें की, जगाचा हेतु साध्य झाला आहे, सर्व व्यक्तींचा परमोच्च विकास झाला आहे तर करावयाचें असें कांहींच रहात नाहीं. ॲरिस्टॉटल म्हणतो, एखादी अवस्था कायमची टिकणारी असली म्हणजे ती सध्या आहे तीपेक्षा अधिक चांगली वाटेल किंवा सध्या जें शुभ्र आहे, तें शुभ्रतर होईल असें नाहीं[2]. प्रसूतिवेदनावांचून उत्पत्ति होत नाहीं आणि सर्वांचा परमोच्च विकास म्हणजे उत्पादक चळवळींची इतिश्री होय. ब्रॅडलेच्या म्हणण्याप्रमाणें संपूर्ण सत्याला पोहोंचलेलें सर्व वस्तुजात अचल असतें. चळवळ किंवा धडपड हें या जगचक्राचें वैशिष्ट्य आहे; त्याच्यात पूर्णावस्थेला स्थान नाहीं. कारण पूर्णावस्था प्राप्त झाली तर कोणत्याहि गोष्टीची उणीव पडणार नाहीं आणि कांहीं कार्य करण्याचेंहि कारण राहणार नाहीं.

५ असें कधीं कधीं प्रतिपादन करण्यांत येतें कीं, जगाचें रहाटगाडगें अनंत कालपर्यंत चालणार असल्यानें कर्मांची (कामें करण्याची) परंपरा नेहमीं चालू राहणारच. निराळ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे ह्या मताप्रमाणें

---

१ एकोणिसाव्या शतकांतील आंग्ल तत्त्वज्ञानी ( १८२० ते १९०३ ). —अनुवादक.

२ Nicomachean Ethics, 16.

सर्व व्यक्तींचा परमोच्च विकास कधींच होणार नाहीं; परंतु असें झाल्यास परमेश्वराचा हेतु विफल होईल. जगाचें रहाटगाडगें जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत मुक्तात्म्यांचें व्यक्तित्व कायम राहतें. सर्वांना मुक्ति मिळाली (सर्व-मुक्ति) म्हणजे त्यांच्या व्यक्तित्वाचा लय होतो

६ श्रीशंकराचार्यांचा सिद्धांत म्हणजे भ्रमवाद आहे असें म्हणणें युक्त नाहीं. बाह्य पदार्थांना स्वप्नातील पदार्थांप्रमाणें केवळ प्रातिभासिक सत्ता आहे, म्हणजे ते केवळ आभासरूप आहेत हें विज्ञानवादी बौद्धांचें मत त्यांनीं खोडून टाकून त्या पदार्थांना प्रातिभासिक सत्तेहून अधिक सत्ता आहे असें म्हटलें आहे. बाह्य अर्थ आपणांस जेव्हां प्रतीत होतात, तेव्हांच ते अस्तित्वांत येतात व जेव्हां प्रतीत होत नाहींत तेव्हां नष्ट होतात. हा दृष्टि–सृष्टि–वादाचा सिद्धांत शंकराचार्यांचा नव्हे. आपण केवळ कल्पनाच मनश्चक्षूपुढें उभ्या करतों असें नव्हे, तर प्रत्यक्ष वस्तूंचें आकलन करतों. शंकराचार्य जागृत अवस्थेंत आलेले अनुभव आणि स्वप्नें ह्यांमध्यें फरक करतात आणि दोघांमध्यें घोंटाळा न होऊं देण्याविषयीं इषारा देतात. स्वप्नांतील अनुभव ज्याप्रमाणें जागृतावस्थेंत बाधित होतात (खोटे ठरतात), त्याप्रमाणें जागृत अवस्थेंतील अनुभव आपल्या तर्कानें बाधित होत नाहींत[1]. व्यावहारिक अनुभवाच्या दृष्टीनें त्यांचा सिद्धांत जगत्–सत्यत्व–प्रतिपादक असाच आहे असें म्हणतां येईल. अनुभव हे वस्तुतंत्र असतात (केवळ पुरुषतंत्र नाहींत[2]). श्रीशंकराचार्यांचा अविद्येविषयींचा सिद्धांत ह्याच मताला बळकटी आणतो. अविद्येच्या प्रभावाचें क्षेत्र कोणाहि विशिष्ट व्यक्तीपुरतेंच मर्यादित नाहीं. तिच्यामुळें अनंता( Infinite )ला सांता( Finite )चें स्वरूप प्राप्त होत असल्यामुळें तिचा प्रभाव सर्वच मनांवर सारखाच चालू असतो. पृथिव्यादि प्रपंचाचें तीच सर्वसाधारण आदिकारण आहे. एखाद्या व्यक्तीला मोक्ष मिळाला म्हणजे सर्व जग नाहींसें होतें असें नाहीं, फक्त जगाकडे पाहण्याची त्याची मिथ्या दृष्टि (अविद्येची दृष्टि) जाऊन खरी दृष्टि (विद्यादृष्टि) त्याला प्राप्त

१ नैव जागरितोपलब्धं वस्तुस्तम्भादिकं कस्यांचिदप्यवस्थायां बाध्यते।
—श्रीशंकराचार्यकृत ब्रह्मसूत्रावरील भाष्य, २, २ व २९.

२ न वस्तु याथात्म्यज्ञानं पुरुषबुद्ध्यपेक्षम्, आणखी. भूतवस्तुविषयानां प्रामाण्यं वस्तुतन्त्रम्

होते. शास्त्रीय ज्ञानामुळें मृगजलासंबंधींचा आपल्या मनांतील भ्रम नाहींसा झाल्यावरहि मृगजल दिसतच असतें; मात्र त्यामुळें आपली फसवणूक होत नाहीं. जग नाहींसें होत नाहीं, फक्त त्याच्याकडे पाहण्याची आपली दृष्टि बदलते.

७ तार्किक बुद्धीला पटणारें ज्ञाता आणि ज्ञेय यांच्यांतील द्वैत हें पारमार्थिक दृष्ट्या खरें नाहीं असा श्रीशंकराचार्यांचा विश्वास आहे. तें द्वैत अद्वैतावर अधिष्ठित झालें आहे. ज्ञाता आणि ज्ञेय हे आत्म्याचेच धर्म आहेतः 'आत्मन एव धर्माः'। ब्रह्माव्यतिरिक्त त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं. "चेतन, अचेतन स्वरूपांचे अनेक विलक्षण सामान्याविशेष आहेत. त्यां सर्वांचा परंपरेनें एकाच प्रज्ञानघन-महासामान्यामध्यें अंतर्भाव होऊं शकतो[1]." श्रीशंकराचार्य ईश्वर आणि जग ह्यांचें तादात्म्य प्रतिपादन करीत नाहींत, फक्त जगाचें स्वतंत्र अस्तित्व अमान्य करतात[2]. टीकाकार म्हणतात त्याप्रमाणें "जग ब्रह्माशीं तादात्म्य पावलेलें नाहीं, फक्त त्याला आद्य कारणाहून स्वतंत्र अस्तित्व नाहीं[3]." जेव्हां श्रीशंकराचार्य कार्याला अस्तित्व नाहीं असें म्हणतात तेव्हां त्याचा अर्थ कार्याला कारणाहून पृथक् अस्तित्व नाहीं एवढाच वस्तुतः असतो[4].

८ अनंताच्या गर्भांतून सांताची उत्पत्ति कशी झाली या प्रश्नाला श्रीशंकराचार्यांचें उत्तर असें आहे कीं, ती अगम्य गूढ माया आहे. दिक्कालाद्यवच्छिन्न असें सत्तत्त्व आहे. आमच्या इंद्रियांना प्रतीत होणारें जग हेंहि आमच्या समोर असून तें ब्रह्मावर अधिष्ठित झालें आहे, येथपर्यंतच आमच्या ज्ञानाची धांव जाऊन पोहोंचते; परंतु अनंत ब्रह्मापासून सांत जगाची उत्पत्ति कशी झाली हें मात्र आम्हांस समजत नाहीं. हें जग परमेश्वरानें निर्माण केलें आहे असें मानणेंहि तत्त्वतः टिकणार नाहीं. कारण या उपपत्तीचा असा अर्थ

---

१ अनेकादिविलक्षणाश्चेतनाचेतनरूपाः सामान्यविशेषास्तेषां पारम्पर्यगत्यैकस्मिन्महासामान्यन्तर्भावः प्रज्ञानघने । श्रीशंकराचार्य, बृहदारण्यकोपनिषद् २, ४ व ९.

२ न खल्वनन्यत्वमित्यभेद ब्रूमः किंतु भेदं व्यासेधाम. ।—भामती.

३ कारणात्पृथक् सत्ताशून्यत्व साध्यते न त्वैक्याभिप्रायेण ।

४ कारणव्यातिरेकेण ब्रह्मव्यातिरेकेण ।

होतो कीं, परमेश्वरानें एकएकट्या स्थितींत कांहीं काल घालविल्यानंतर त्याला एकदम संगीताची जरुरी भासली आणि नंतर त्यानें हें जग निर्माण केलें. जग हें परमेश्वराचें व्यक्त स्वरूप आहे ही कल्पना सुद्धां अधिक समाधानकारक आहे असें नाहीं; कारण सांत जग हें अनंताला कसें व्यक्त करूं शकतें हें कळणं कठिण आहे. परमेश्वराचें जगामध्यें रूपांतर झालें असें जर आपण म्हटलें तर प्रश्न असा उद्‌भवतो कीं, संपूर्ण परमेश्वराचें रूपांतर झालें आहे कीं फक्त त्याच्या अंशाचें रूपांतर झालें आहे ? जर संपूर्ण परमेश्वराचें रूपांतर झालें असेल तर मग या जगाच्या पलीकडे परमेश्वर नाहीं असें होईल. जर परमेश्वराच्या अंशाचेंच रूपांतर झालें असेल तर त्याचा अर्थ असा होतो कीं, परमेश्वराची विभागणी करणें शक्य आहे. परंतु परमेश्वराचे विभाग करून त्यांत उच्चनीचपणा कल्पिणें शक्य नाहीं. असें करणें म्हणजे अर्धा पक्षी भाजीसाठीं ठेवून दुसरा अर्धा अंडीं घालण्यासाठीं ठेवून घेण्यासारखें आहे[1]. तर्कशास्त्रदृष्ट्या जग आणि परमेश्वर यांचा संबंध ठरविणें शक्य नाहीं असें श्री० शंकराचार्यांचें मत आहे. ‘ दोन्ही टोंकें घट्ट धरून ठेवा ’ असें त्यांचें म्हणणें आहे. तीं दोन्ही टोंकें मिळतात हें शोधून काढण्यास जरी आपण असमर्थ ठरलों, तरी त्यामुळें फारसें कांहीं बिघडत नाहीं.

९ युरोप आणि हिंदुस्थान ह्या दोहोंच्या तत्त्वज्ञानांचा इतिहास म्हणजे जग आणि परमेश्वर ह्यांमधील संबंधाचें गूढ उकलण्यास असमर्थ अशा मानवी मनाचा एक लांबलचक इतिहास होय. ‘हा संबंध गूढ आहे’ आणि ‘मानवी मन सर्वज्ञ नाहीं’ अशी खात्री पटून समाधान मानून घेणारे हे सर्वांत मोठे विचारवंत लोक होत. पौर्वात्य शंकराचार्य आणि पाश्चात्य ब्रॅडले हे, अज्ञेयवादाचें हें शहाणपणाचें धोरण मान्य करतात. वैचित्र्यपूर्ण विश्व आपल्यापुढें पसरलेलें आहे; तें स्वयंपूर्ण नाहीं, तें दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूवर अधिष्ठित आहे आणि ती वस्तु म्हणजे ‘ ब्रह्म ’ होय. विश्व आणि ब्रह्म यांचा संबंध अज्ञात आहे. ‘ईश्वरानें प्रत्येक वस्तु निर्माण केली आणि त्याची प्रत्येक कृति चांगलीच वठली’ एवढें म्हटल्यानें कोडें उलगडत नाहीं. ह्या म्हणण्यांत

---

१ न हि कुक्कुटादेरेकदेशो भोगाय पच्यत एकदेशस्तु प्रसवाय कल्प्यते विरोधात् ।

—आनंदगिरि ब्रह्मसूत्रावरील भाष्य, १, २–८.

जग फार चांगलें आहे असें गृहीत धरलेलें असतें; आणि आम्हांला तर त्याविषयीं शंका आहे. निसर्गाची निर्घृणता आणि ईश्वराचें दयालुत्व यांचा मेळ न घालतां आल्यामुळें प्लेटोनें असें प्रतिपादन केलें कीं, ईश्वरानें निसर्गाला ताब्यांत ठेवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु निसर्गाच्या हटवादीपणामुळें ईश्वराच्या अंगच्या सौजन्याची प्रभा पडावी तितकी पडली नाहीं. ज्ञेयवादी लोकांनीं 'सैतानानें निर्माण केलेलें जग सुधारण्याचा परमेश्वर प्रयत्न करीत आहे' ही कल्पना प्रसृत केली. ह्या कल्पनेवरच ऑगस्टाइननें 'संपूर्ण अधःपाताची आणि मोक्षाची' योजना बसविली. ज्यांचा ईश्वराच्या सर्वशक्तिमत्त्वावर विश्वास आहे त्यांनीं सैतान सुद्धां ईश्वरानेंच निर्माण केला असें प्रतिपादून, जॉन स्टुअर्ट मिल[1] म्हणतो त्याप्रमाणें, एक प्रकारें ईश्वराची निंदागर्भ स्तुति केली आहे. लैब्निझ[2] म्हणतो, "हें जग जरी पुष्कळ दृष्टींनीं सदोष असलें तरी सर्व प्रकारच्या संभवनीय जगांमध्यें तेंच उत्तम आहे." परंतु ह्या वचनामध्यें परमेश्वराच्या शक्तीबद्दल निंदा अभिप्रेत आहे. हेगेलचा[3] 'ब्रह्मवाद' (Absolutism) पूर्णाचें अपूर्णामध्यें अधःपतन कसें होतें ह्याचा खुलासा करण्यास असमर्थ आहे. बर्गसॉं[4] (Bergson) हा ह्या जगांतील 'जड' आणि 'चेतन' यांच्या विरोधावर भर देतो. त्याची अशी समजूत आहे कीं, त्या दोन वस्तू म्हणजे एकाच मूळ चैतन्याचीं विधिनिषेधरूप अंगं आहेत; परंतु आद्य तत्त्वापासून दोन प्रवृत्तींचा उगम कसा झाला हें त्यास सांगतां येत नाहीं. क्रोस[5], (Croce) हा आत्म्याचीं तात्त्विक आणि व्यावहारिक अशीं निरनिराळीं स्वरूपें कल्पितो; परंतु एकाच तत्त्वापासून ह्या स्वरूपाप्रत कसें पोहोंचतां येतें ह्याचें आध्यात्मिक दृष्ट्या विवेचन करूं शकत नाहीं. या निरनिराळ्या स्वरूपांतच सर्व सत्य सांठविलेलें असेल तर

---

१ एकोणिसाव्या शतकातील आंग्ल तत्त्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहासकार (१८०६–१८७३).

२ सतराव्या शतकांतील जर्मन तत्त्वज्ञानी (१६४६ ते १७१६). ह्यानें 'विश्वाचें आद्य तत्त्व चिदणु आहे' असे प्रतिपादन केलें आहे.

३ हेगेलः—(१७७० ते १८३१) सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञानी. 'जें सत्य आहे तें बुद्धीला पटणारें आहे आणि जें बुद्धीला पटणारे आहे तें सत्य आहे' हें तत्त्व त्यांनी प्रतिपादिलें.

४ बर्गसॉंः— एकोणविसाव्या शतकांतील फ्रेंच तत्त्वज्ञानी. (ज. १८५९).

५ इटालियन तत्त्वज्ञानी आणि टीकाकार (ज. १८६६).

ब्रह्माचें अस्तित्व उरत नाहीं आणि जरी ब्रह्म असलें तरी तें विस्कळित आहे असें दिसतें.

१० असल्या परिस्थितींत विवेकपूर्ण असा अज्ञेयवाद अधिक कार्यक्षम ठरतो. परंतु मनुष्याचें तर्कशुद्ध मन पराजय कबूल करण्यास तयार नसतें. 'ब्रह्म हें अगम्य आहे आणि त्याच्यावर जग कसें तरी टांगलेलें आहे.' अशा कल्पनेवर तें स्थिर होऊं शकत नाहीं. तें अव्यक्त ब्रह्माला व्यक्त स्वरूप देतें आणि जग हें त्याची लीला आहे असें मानून, दोहोंचा संबंध जोडतें. मानवी मनाच्या दौर्बल्याचा विचार करून श्रीशंकराचार्यांनीं हे दृष्टांत मान्य केले आहेत. सर्वश्रेष्ठ कारागीर अशा परमेश्वराच्या ओसंडून वाहणाऱ्या शक्तींचा प्रवाह जगाच्या स्वरूपानें व्यक्त होत असतो. कोणत्याहि निर्मिती( Creation )मध्यें अंतर्भूत होणाऱ्या तर्कशुद्धता, स्वतंत्रता आणि स्फूर्तिजन्य आनंदप्रद क्रीडा यांचा जगन्नायकाच्या लीलेमध्यें उत्कर्ष झाला आहे. 'परमेश्वर हा व्यक्त स्वरूप धारण करणारा प्रभु आहे आणि स्वतःला प्रकट करण्याची आणि स्वतःचें मनोगत व्यक्त करण्याची शक्ति त्याच्या ठिकाणीं आहे' असें आपण मानतों. या शक्तीवांचून पूर्णतेची कल्पनाच करणें शक्य नाहीं. जगद्रूपानें अविर्भूत होण्याच्या परमेश्वरी शक्तीलाहि 'माया' असें म्हणतात. याच शक्तीच्या योगानें ज्ञाता आणि ज्ञेय असें द्वैत उत्पन्न होऊन त्यांच्या परस्पर—संबंधाच्या योगानें ज्ञातृरूप जीवात्म्याला आपली शक्ति प्रकट करतां येते.

११ तें कसेंहि असलें तरी कोणताहि सिद्धांत "आयुष्य हें स्वप्न आहे आणि अनुभवलेल्या सर्व गोष्टी भ्रम आहेत" असें केव्हांहि प्रतिपादन करीत नाहीं. श्रीशंकराचार्यांचे एकदोन उत्तरकालीन अनुयायी हा सिद्धांत उचलून धरतात; परंतु हिंदु विचारसरणीचा मुख्य कल त्या सिद्धांताकडे झुकत आहे असें मानतां येणार नाहीं.

१२ आतांपर्यंत मायावादाविरुद्ध येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला. आतां हिंदुधर्मावरील दुसऱ्या आक्षेपाकडे वळूं या. 'सबंध जग हें दैवी कार्य आहे असें हिंदु लोक मानीत असल्यानें नैतिक नियम हे त्यांना अर्थशून्य वाटतात,' हा तो दुसरा आक्षेप होय. पहिला आक्षेप एका टोंकाला जाणारा

आहे. 'प्रत्येक वस्तु ही जर परमेश्वरच आहे, तर मग खिसेकातरू आणि खोटे दस्तऐवज करणारा यांचेहि धंदे पवित्रच होत आणि त्यांत ढवळाढवळ करण्याचा आपणांला काय अधिकार ?' असा या आक्षेपाचा रोख आहे. 'सर्वत्र ईश्वर भरला आहे' असें जें हिंदु धर्माचें एक तत्त्व आहे, त्याचें खंडन 'पिकॅडेली सर्कस[1] म्हणजे ईश्वर आहे काय ? हाईडपार्क कॉर्नर[1] म्हणजे ईश्वर आहे काय ?' असे प्रश्न विचारून करतां येईल अशी या टीकाकारांची समजूत असते. 'परमेश्वर हा जगाच्या बाहेर, आणि जगाहून सर्वस्वी दूर आहे ह्या नीरस आणि मामुली कल्पनेविरुद्ध हिंदु विचारसरणी बंड करते. निसर्गाचे नियम हे ईश्वराच्या सर्वोत्कृष्ट हेतूंनींच प्रेरित झाले आहेत. निसर्गाची नियमबद्धता, विश्वाचा व्यवस्थितपणा आणि उत्क्रांतीच्या प्रवाहाची संथ प्रगति—हीं सर्वज्ञ परमात्म्याचें सूत्रचालकत्व सूचित करतात. या सर्व गोष्टी चैतन्यरहित यंत्रांनीं होत नसतात. विश्व हें परमेश्वराचें निवासस्थान आहे, याचा अर्थ असा नव्हे कीं ईश्वराचें विश्वाशीं तादात्म्य आहे. या दुसऱ्या मताप्रमाणें प्रत्येक वस्तूमध्यें परमेश्वराचें अस्तित्व इतकें स्वाभाविक आणि स्पष्ट आहे कीं, ईश्वरदर्शनासाठीं फक्त डोळे उघडे ठेवण्याचीच तसदी आपण घेतली म्हणजे पुरे. वस्तुसमुच्चयापलीकडे ईश्वराचें अस्तित्वच नाहीं. ईश्वरानें आपलें स्वरूप आपल्या समोर पसरलेलें आहे, जग हें केवळ परमेश्वराचें एक व्यक्त स्वरूप आहे एवढेंच नव्हे, तर तेंच परमेश्वराचें संपूर्ण स्वरूप आहे. परंतु सर्व चराचर सृष्टीला व्यापून परमेश्वर उरला आहे अशी हिंदु तत्त्वज्ञानाची विचारसरणी आहे. तो भूतभृत् आहे, परंतु भूतस्थ नाहीं. परमेश्वरामध्यें जग आहे, परंतु जगामध्यें परमेश्वर सामावलेला नाहीं. विश्वामध्यें व्यक्तीचें स्वतंत्र अस्तित्व असतें. व्यक्तीमध्यें जळणाऱ्या दिव्य ज्योतीचा प्रकाश मंद असो वा तेजःपुंज असो, मध्यवर्ति चैतन्यापासून निघणाऱ्या या स्वतंत्र ठिणग्या आहेत, हें मात्र स्पष्ट आहे.

१३ सर्व वस्तूंमध्यें परमेश्वर भरून राहिला असला तरी निरनिराळ्या वस्तूंमध्यें परमेश्वराचें स्वरूप कमीजास्त अंशानें व्यक्त होत असतें, ही विचारसरणी हिंदूंना मान्य आहे. जिच्यांत परमेश्वरी तेजांश नाहीं, अशी

---

१ हीं लंडनमधील ठिकाणें आहेत. —अनुवादक.

एकहि वस्तु जरी विद्यमान नसली तरी निरींद्रिय पदार्थांपेक्षां सेंद्रिय वस्तूं-मध्यें, अचेतन वस्तूंपेक्षां सचेतन वस्तूंमध्यें, क्षुद्र प्राण्यांपेक्षां मनुष्यांमध्यें आणि दुष्ट मनुष्यांपेक्षां सुष्ट मनुष्यांमध्यें परमेश्वराचें स्वरूप अधिक पूर्णपणें व्यक्त होत असतें. परंतु जगातील अगदीं नीच प्राणी पूर्णपणें देवांशविहीन आहे, नरकांत टाकण्यास योग्य आहे, असें आढळून त्याज्य ठरत नाहीं. ईश्वर आपल्यामध्यें वास करीत आहे आणि ईश्वर सर्वत्र भरलेला आहे ही विचार-सरणी हिंदु धर्माला मान्य असली तरी आपणांला आढळून येणारी प्रत्येक वस्तु तिच्या विद्यमान स्थितींतच परमेश्वरस्वरूपी आहे, असें मात्र तो धर्म म्हणत नाहीं. तथापि परमेश्वरानें सूत्रें हलविल्यावाचून पिकॅडिलीचें सुद्धां अस्तित्व असूं शकणार नाहीं. नीचांत नीच माणसांत सुद्धां दैवी गुण गुप्तपणें दड-लेले असतात. अत्यंत पापी गणलेल्या मनुष्याला सुद्धां परमेश्वराचा आधार असतो. मनुष्य कितीहि पापी असला तरी त्याची सुधारणा होणार नाहीं असें नाहीं. सामान्यतः प्रत्येक संताचें पूर्वचरित्र दोषपूर्ण असतें असें जर आपण पाहतों, तर प्रत्येक पापात्म्याचा भविष्यकाळ उज्ज्वल असणें शक्य आहे अशी आशा कां करूं नये ! प्रत्येक मनुष्याला वाटतें तितका चांगला किंवा वाईट तो नसतो. लोकाना पिळून काढणाऱ्या पापी मनुष्याच्या अंतः करणांतील दैवी गुण जागृत करण्याच्या कामालाच जगांतील महात्मे स्वतःला वाहून घेतात.

१४ " 'कर्म–मीमांसा' म्हणजे सर्व नैतिक सद्‌गुणांचा पाया समजल्या जाणाऱ्या मानवी स्वातंत्र्यावर गदा आणणारें तत्त्व " असा अर्थ कधीं कधीं केला जातो. परंतु योग्य दृष्टीनें विचार केला असतां, कर्म हें खऱ्या स्वातं-त्र्याच्या आड येत नाहीं. कर्म हें जादूटोण्यावरील विश्वास उडविणारें किंवा जगांतील शक्तींना आपण आपल्या इच्छेप्रमाणें नाचवूं शकतों या कल्पनेचा निरास करणारें शास्त्रीय तत्त्व आहे. निसर्गाचा प्रवाह हा नैसर्गिक शक्तींच्या तंत्रानुसार चाललेला नसून अनुल्लंघनीय अशा नियमांनीं निश्चित होत असतो. सूर्य आणि चंद्र नभोमंडलांतील दैनंदिन प्रवास करीत असतात व ऋतूंचें निःशब्द चक्र पृथ्वीभोंवतीं अहोरात्र एकसारखें फिरत राहतें, याचें कारण त्यांच्यापेक्षांहि श्रेष्ठ अशी शक्ति त्यांच्या प्रवाहांचें मार्गदर्शन करते हें होय. याज्ञवल्क्य आपल्या पत्नीला उद्देशून म्हणतात, " खरोखर हे गार्गी ! त्या

अविनाशी तत्त्वाच्या आज्ञेनेंच सूर्य आणि चंद्र, पृथ्वी आणि आकाश, पळें, घटी, दिवस, रात्री, पक्ष, मास, ऋतू व संवत्सरें पृथक्पणें राहूं शकतात. त्या अविनाशी परमात्म्याच्या आज्ञेनेंच बर्फाच्छादित पर्वतापासून कांहीं नद्या पूर्वेकडे आणि कांहीं पश्चिमेकडे स्वैरपणें वाहत जातात[1]. " विश्वांत अंतर्बाह्य नियमबद्धता आहे.

१५ कर्मविपाकाचा अंमल आधिभौतिक आणि आध्यात्मिक अशा उभय क्षेत्रांत सारखाच चालू असतो. ऋत ( सत्य ) निसर्गांत आणि मानवी समाजांत सारखेंच व्यक्त होत असतें. आपल्या प्रत्येक कृतीमुळें आपला स्वभाव आणि आपली भवितव्यता यांना आपण नवीन वळण लावीत असतों. आपण जें जें कार्य करतों, तें विफल होत नाहीं आणि त्याच्या सिद्धीचा मार्ग कशानेंहि अडविला जात नाहीं[2]. 'ज्या ध्येयाची आम्हांस सारखी तळमळ लागली आहे, त्याच्या प्राप्तीची आशा या शरीराचा नाश होतांच नष्ट होणारी नाहीं. अशा रीतीनें अविनाशित्वाची खात्री पटल्यामुळें जीवनाला एक प्रकारची स्फूर्ति मिळते.

१६ पूर्वी एके काळीं अज्ञानानें अधर्मास धर्म मानून मनुष्यप्राणी तामसी—राक्षसी कृत्यें करीत होता आणि हें सर्व परमेश्वरी इच्छेनेंच होत आहे असें समजून समाधान मानीत होता. अशा वेळीं कर्ममीमांसेनें नैतिक नियमांच्या पालनाला जीवनांत अग्रस्थान देण्याचा आग्रह धरला आणि ईश्वर आणि कर्म एकच आहेत, असें प्रतिपादन केलें. सर्वत्र नियमांचें साम्राज्य आहे, त्याचप्रमाणें सर्वत्र ईश्वराचें अस्तित्व आहे. 'कर्म' हें कांहीं तरी निर्जीव यंत्र नसून आध्यात्मिक विकासाचें अवश्यक साधन आहे. परमेश्वराचें मन आणि इच्छा यांचें तें मूर्तिमंत स्वरूप आहे. परमेश्वर 'कर्माध्यक्ष' आहे. न्याय हा परमेश्वराचा गुण आहे. जीझसनें वर्णिल्याप्रमाणें परमेश्वराचा स्वभाव निश्चल आहे. ज्याप्रमाणें वस्तूचें प्रतिबिंब हुबेहूब असतें, त्यामध्यें कांहीं फरक होत नाहीं, त्याप्रमाणें परमेश्वराच्या स्वभावामध्यें फरक होत

---

१ बृहदारण्यक उपनिषद्, ३ ( ८ व ९ ).

२ नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ —श्रीमद्भगवद्गीता, २, ४०.

नाहीं. न्यायाच्या अदृश्य अशा विश्वव्यापी तराजूमध्यें प्रत्येक कृत्य, प्रत्येक विचार जोखला जातो. आपल्या कृत्याबद्दल परमेश्वराचा निर्णय हा दूरच्या भविष्यकाळीं होणार नसून येथल्या येथें आतांच होणार आहे. या न्यायापासून कोणाचीहि सुटका होणें शक्य नाहीं. दैवी कायदे टाळणें शक्य नाहीं. हे कायदे बाहेरून कोणीं आपणांवर लादलेले नसून त्यांचा आपल्या स्वभावांतच परिपोष झाला आहे. पापांत परमेश्वराच्या उपमर्दापेक्षां आत्म्याच्या प्रेरणेची अवहेलना आणि नीतीच्या नियमभंगापेक्षां स्वतःची फसवणूकच अधिक असतात. आपण आपल्या सबंध भूतकाळाचें ओझें आपल्या पाठीवर वाहत असतों. गतायुष्यरूपी वहींत आपलीं सर्व कृत्यें लिहिलेलीं असतात. कालानें त्यांतील अक्षरें पुसटहि होत नाहींत किंवा मृत्यूमुळें तीं खोडलींहि जात नाहींत.

१७ या योजनेमध्यें पश्चात्ताप आणि तज्जन्य क्षमा यांनाहि अवकाश आहे. "कर्मविपाकावर श्रद्धा ठेविल्यानें आध्यात्मिक जीवन—प्रार्थना आणि उपासना या गोष्टी अशक्य होतात" अशी टीका करणाऱ्याला कर्म—मीमांसेचें रहस्यच बरोबर कळत नाहीं. परमेश्वराच्या न्यायासनावर परमेश्वर बसत नसून त्याच्या जागीं तत्प्रणीत नियमच जणूं काय अधिष्ठित झाले आहेत असें तो समजतो. त्याच्या मतें 'तुफानापासून शक्तीची आणि धरणीकंपापासून पापक्षालनाची याचना करण्या' इतकेंच परमेश्वराची प्रार्थना करणें धर्मभोळेपणाचें व कुचकामाचें आहे. अर्थातच प्रार्थना म्हणजे कोणतीहि इष्ट वस्तु प्राप्त करून देणारा 'चिंतामणि' आहे असें हिंदु मानीत नाहींत. परमेश्वर म्हणजे सूर्याची गति रोखणारा किंवा बंदुकीची गोळी स्तंभित करणारा जादूगार नव्हे. परंतु नीतिनियमांच्या कडक पालनामध्यें परमेश्वराचें सत्य, सनातनत्व, दया आणि न्याय यांची मूर्तीच आढळून येते. क्षमा म्हणजे परमेश्वराच्या न्यायाचा कांटेतोलपणा कमी करणें नसून तिच्यांत केवळ न्यायाचेंच आविष्करण होत असतें. आम्ही नीतिनियमांच्या कठोरपणाबद्दल ठासून विधानें करीत असतांनाहि आमच्या पापांची क्षमा ईश्वर करीलच करील असा विश्वास आपण बाळगूं शकतों. बाकीच्या विश्वाचे व्यवहार ज्या प्रकारच्या नियमांप्रमाणें हमेशा चालतात, तशाच प्रकारच्या नियमांनीं आध्यात्मिक विकास आणि अनुभव यांचेंहि नियमन होत असतें. आपण

आपल्या वासनांचे कोड जर पुरवूं लागलों, तर शेवटीं अनाचार हेंच फळ मिळणार ! भ्रष्ट माणसाच्या वांट्याला क्षीण झालेली बुद्धिमत्ता आणि तमोगुणानें व्याप्त झालेला आत्मा हींच येतात. नैतिक आणि आध्यात्मिक प्रकाशाकडे डोळेझांक करून जर आपण जाणूनबुजून पाप करूं लागलों, तर परमेश्वराच्या दरबारामध्यें पाप आपणांला हुडकून काढील आणि आपलें स्वेच्छया स्वीकृत अंधत्व आपणांला खड्ड्यामध्यें टाकल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आपली खात्री असूं द्यावी. मनुष्याच्या कर्मांचें न्याय्य फळ त्याला देण्याचें न्यायी परमेश्वर नाकारूं शकत नाहीं. आपल्या कर्मांचें फळ भोगण्यास दुसरा कोणी तरी मनुष्य उभा करण्यानें आपली गतकालीन पापें नष्ट होणार नाहींत[1]. आपल्या दुष्कृत्यांचा भार आपणच वाहिला पाहिजे. वासना जिंकतांना होणाऱ्या दुःखानेंच त्यांचें परिमार्जन होईल. परमेश्वराला लांचलुचपतीनें वश करून घेणें शक्य नाहीं आणि पापावर मुलामा देणेंहि शक्य नाहीं.

१८ व्यक्तीची परिस्थिति आणि तिला निसर्गतः प्राप्त झालेली साधन सामुग्री या दोहोंचा विचार कर्म–मीमांसेंत होतो. कर्म–मीमांसेप्रमाणें भूतकाल अटल आहे. तथापि, भविष्यकाळ मात्र आपल्या वर्तनावर अवलंबून असतो. मनुष्याच्या अंतःकरणांत वसत असलेलें आत्मतत्त्व त्याला त्याच्या स्वभावाच्या मर्यादेंतच कां होईना पण स्वतंत्रपणें विहार करण्यास परवानगी देतें. मनुष्य हा केवळ नैसर्गिक प्रवृत्तीं( instincts )चें बनलेलें यंत्र नव्हे. त्याच्या अंतःकरणांत वसत असलेला आत्मा, त्याला गुलाम करूं पाहणाऱ्या नैसर्गिक प्रवृत्तींवर विजय मिळवूं शकतो. ‘उद्धरेदात्मनात्मानम्’ असें भगवद्गीता आपणांस सांगते. परमेश्वरानें दिलेल्या सामुग्रीचा उपयोग करून आपण आपल्या ध्येयांचा विकास करूं शकतों. जीवनरूपी खेळाचे पत्ते आपणांस देण्यांत आले आहेत; आपण त्यांची निवड करीत नाहीं. आपल्या मागील जन्मानुसार ते आपणांला मिळालेले आहेत; परंतु वाटेल ती उतारी आपण करूं शकतों, वाटेल तो डाव आपण

---

१ मुनिर्मनुते मूर्खो मुच्यते ।

बोलूं शकतों आणि जिंकणें अथवा हरणें हें आपल्या खेळण्याच्या कौशल्यावर अवलंबून राहतें. आपणांला स्वतंत्रता आहे ती हीच होय.

१९ पूर्वकर्मामुळें मनुष्याच्या हातून घडणाऱ्या गोष्टी केवळ लहरी-प्रमाणें होत नसल्या तरी त्यांच्याविषयीं आगाऊ भाकीत करण्याइतक्या त्या निश्चित स्वरूपाच्या नसतात. ज्या मानानें त्याचीं कृत्यें यांत्रिक स्वरूपाचीं असतील म्हणजे इच्छास्वातन्त्र्यानुसार न घडतां तीं केवळ त्याच्या सवयी-प्रमाणें घडत असतील, त्या मानानें त्यांच्याविषयीं आगाऊ अंदाज करणें शक्य आहे; परंतु इच्छास्वातंत्र्य असणें म्हणजे लहरीप्रमाणें वागण्याची मोकळीक असणें असेंहि नव्हे. इच्छास्वातन्त्र्य ही अनियमित, असंबद्ध आणि कारणरहित अशी बाब आहे, हें मत मान्य होण्यासारखें नाहीं. तथापि इच्छास्वातंत्र्याचेंहि पृथक्करण करणें अवश्य आहे. नेहमींच्या कार्यकारणांच्या नियमांनीं तें बद्ध नाहीं. अनियंत्रितपणें त्याचें काम चालत असल्यानें त्याबद्दल आगाऊ आडाखे बांधतां येत नाहींत. जर मानवी कृत्यें कर्मविपाकानें आगाऊच ठरलीं जातात असें मानिलें तर गुन्ह्याबद्दल शिक्षा करणें किंवा चारित्र्य घडविण्यासाठीं योग्य शिक्षण देणें ह्या दोन्ही गोष्टी निरर्थकच ठरतील. कर्मविपाकाचें तत्त्व मान्य करूनहि मनुष्याला, प्राप्त झालेल्या सामुग्रीचा आपल्या ज्ञानाप्रमाणें उपयोग करण्याची मुभा असते. निसर्ग, मन आणि समाज ह्यांच्यांतील नियमबद्ध गोष्टींचें मनुष्य एका तऱ्हेनें नियंत्रण करूं शकतो. अशा रीतीनें कर्ममीमांसेप्रमाणें खऱ्या बुद्धिजन्य स्वातन्त्र्याला वाव मिळतो. परंतु जगांतील सर्व गोष्टी यदृच्छेनें होत असून कशाचा कशाशीं संबंध नाहीं असें मानलें म्हणजे मनुष्य खोट्या दैववादाची कांस धरतो.

२० विश्वांतील प्रत्येक बारीकसारीक गोष्ट आगाऊ ठरलेली नसते. आपणांला पूर्वसंकल्पित योजनेचे केवळ कप्पे उघडावयाचे असतात, अशी वस्तुस्थिति नाहीं. आपणहि परमेश्वराचे सहकारी असल्यामुळें तो सर्व आगाऊच आंखून ठेवीत नाहीं. परमेश्वराचें स्थान कोठें तरी आका-शांत किंवा आपल्या आकलनशक्तीच्या बाहेर नाहीं. तो आपल्या अंतःकर-णांत सुद्धां आहे. आपल्यामध्यें वसत असलेल्या दैवी शक्तींचा जर आपण

उपयोग केला तर आपणांला कल्पना नसलेलीहि सुधारणा अचानकपणें घडवून आणतां येईल. जगाच्या विकासांत कांहीं नावीन्य निर्माण होणें अशक्य नाहीं. कारण, चेतनसृष्टि ही केवळ यंत्राप्रमाणें जड नसून सतत विकास होणें हा तिचा स्वभावधर्म आहे.

२१ आत्मोद्धार करण्याची वेळ अजून टळून गेलेली नाहीं असें सांगून कर्ममीमांसा पापी मनुष्याला धीर देते. कर्ममीमांसेप्रमाणें निराशा आणि हालअपेष्टा, अपराध आणि संकटें यांनीं ग्रस्त झालेल्या लोकांनाहि आशा-मंदिराचे दरवाजे बंद होत नाहींत. पापी मनुष्याशीं अधिक सहानुभूतीनें वागण्याविषयीं कर्ममीमांसा आपलें मन वळवितें; कारण, मनुष्य हा हाडाचा दुष्ट नसून, त्याच्यांत दुर्बलता अधिक आहे. तेव्हां पापी माणसाकडे पाहण्याची आपली दृष्टि सदयतेची असावी अशी कर्ममीमांसेची शिकवणूक आहे. मनुष्याचें अंतःकरण अतिशय दुष्ट आहे, तो सद्गुणांपेक्षां दुर्गुण व स्वर्गाकडे नेणाऱ्या उंच चढणींपेक्षां नरकाकडे जाणारी उतरंडच अधिक पसंत करतो, असें म्हणणें खरें नाहीं.

२२ जेव्हां मनुष्य दुर्बल बनला आणि आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावण्याकडे त्याची वृत्ति होईना, तेव्हांच दुर्दैवानें कर्ममीमांसा आणि दैववाद हे एक आहेत अशी समजूत प्रचलित होऊन हिंदुस्थानांत घोंटाळा माजला. दैववादाची सबब पुढें करून शैथिल्य आणि भित्रेपणा यांना कवटाळण्यांत आलें आणि आशेच्या ऐवजीं निराशेचे सूरच जिकडेतिकडे ऐकूं येऊं लागले. दैववाद पाप्याला म्हणाला, "तूं नष्टात्मा आहेस आणि नष्टात्मा होणें हेंच कालाच्या आरंभापासून तुझ्या नशिबीं लिहिलेलें आहे; यावांचून तुला दुसरी अवस्था प्राप्त होणें शक्यच नव्हतें." असलें निराशाजनक तत्त्वज्ञान कर्ममीमांसेचा अपरिहार्य परिणाम नव्हे, हें झालेल्या विवेचनावरून समजून येईलच.

२३ आतां आपण हिंदु धर्माच्या व्यावहारिक बाजूकडे वळूं या. हिंदु धर्म हा एक मत नसून जीवनाचा एक मार्ग आहे असें म्हणणें रास्त होईल. विचाराच्या क्षेत्रांत विहार करण्यासाठीं हिंदु धर्म पूर्ण स्वातंत्र्य देतो खरा; पण

वेगळ्या असल्या, त्या एकमेकींशीं कधींहि मिश्रित झाल्या नाहींत, किंवा त्यांनीं एकमेकींचें स्वरूप कधीं पालटलें नाहीं, तर त्यांचीं व्यक्त स्वरूपें भिन्न, पृथक् पृथक् अशीं होतील. कौटुंबिक जीवनाचा आर्थिक धंद्याशीं कांहीं संबंध राहणार नाहीं. औद्योगिक संबंधामध्यें नीतीचा लवलेश उरणार नाहीं. धार्मिक चळवळी जीवनाच्या ऐहिक अंगासंबंधीं उदासीन राहतील. परंतु मनुष्याला सर्व अंगांचा साकल्यानें विचार करावयाचा असल्यानें त्याच्या सर्व हालचालींचें रूपांतर शेवटीं ऐक्यांत होतें. मनुष्यमात्रांत कामवासना, पुत्रैषणा, सत्ता आणि द्रव्यलोलुपता, सर्वांच्या कल्याणाची इच्छा आणि अदृष्टाशीं संबंध जोडण्याची उत्कटता असतात. या निरनिराळ्या प्रवृत्तींचे एकमेकींवर आघात व प्रत्याघात होतात आणि त्यांमुळें त्यांचीं स्वरूपें बदलतात. मनुष्याच्या जीवनामध्यें त्या प्रवृत्ती परस्परावलंबी असतात. जसें जीवन एक आहे, तसें जीवनाचें महाशास्त्रहि एकच आहे. या शास्त्रानें धर्म (सद्‌गुणी जीवन), अर्थ (द्रव्य), काम (कलाविषयक आणि सांस्कृतिक जीवन) आणि मोक्ष (आध्यात्मिक स्वातंत्र्य) हे चार पुरुषार्थ मान्य केले आहेत. वासनांचें योग्य नियमन करून त्यायोगें शाश्वत तत्त्वाची प्राप्ति करून घेतां येते असें हिंदु स्मृतिग्रंथ प्रतिपादन करतात. त्यांनीं ऐहिक आणि पारमार्थिक कल्याणाचा समन्वय केला आहे.

२६ एका बाजूला स्वाभाविक वासनांचें मानवी जग आणि सामाजिक ध्येयें आणि दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक जीवनाची शिस्त आणि आकांक्षा यांमध्यें कायमचें भांडण आहे असें हिंदु धर्म मानीत नाहीं. श्रेय आणि प्रेय हीं दोन्ही हिंदु धर्माला मान्य आहेत. तथापि श्रेयावर अधिष्ठित नसलेलें प्रेय तो मान्य करीत नाहीं. या जगावर आणि या जगांतील चांगल्या चांगल्या गोष्टींवर शक्तिसर्वस्व खर्च करणाऱ्या मनुष्याचें जीवन समाधानकारक नसतें. कारण, ऐहिक वैभवाची परमावधि झाली तरी शेवटीं त्यांचा नाशच होणार आहे. आपल्या ऐहिक परमोत्कर्षाच्या क्षणीं सुद्धां हें जग आणि आपल्याला प्रिय असलेल्या या जगांतील सर्व वस्तू आपणांस सोडून जातील. शाश्वतापासून वेगळें काढलेलें जग हें नश्वर आहे आणि त्याचें वैयर्थ्य तर करुणास्पद आहे, अशी हिंदुतत्त्वज्ञानी मनुष्याची विचारसरणी असते.

वेगळ्या असल्या, त्या एकमेकींशीं कधींहि मिश्रित झाल्या नाहींत, किंवा त्यांनीं एकमेकींचें स्वरूप कधीं पालटलें नाहीं, तर त्यांचीं व्यक्त स्वरूपें भिन्न, पृथक् पृथक् अशीं होतील. कौटुंबिक जीवनाचा आर्थिक धंद्याशीं कांहीं संबंध राहणार नाहीं. औद्योगिक संबंधामध्यें नीतीचा लवलेश उरणार नाहीं. धार्मिक चळवळी जीवनाच्या ऐहिक अंगासंबंधीं उदासीन राहतील. परंतु मनुष्याला सर्व अंगांचा साकल्यानें विचार करावयाचा असल्यानें त्याच्या सर्व हालचालींचें रूपांतर शेवटीं ऐक्यांत होतें. मनुष्यमात्रांत कामवासना, पुत्रेषणा, सत्ता आणि द्रव्यलोलुपता, सर्वांच्या कल्याणाची इच्छा आणि अदृष्टाशीं संबंध जोडण्याची उत्कटता असतात. या निरनिराळ्या प्रवृत्तींचे एकमेकींवर आघात व प्रत्याघात होतात आणि त्यांमुळें त्यांचीं स्वरूपें बदलतात. मनुष्याच्या जीवनामध्यें त्या प्रवृत्ती परस्परावलंबी असतात. जसें जीवन एक आहे, तसें जीवनाचें महाशास्त्रहि एकच आहे. या शास्त्रानें धर्म (सद्गुणी जीवन), अर्थ (द्रव्य), काम (कलाविषयक आणि सांस्कृतिक जीवन) आणि मोक्ष (आध्यात्मिक स्वातंत्र्य) हे चार पुरुषार्थ मान्य केले आहेत. वासनांचें योग्य नियमन करून त्यायोगें शाश्वत तत्त्वाची प्राप्ति करून घेतां येते असें हिंदु स्मृतिग्रंथ प्रतिपादन करतात. त्यांनीं ऐहिक आणि पारमार्थिक कल्याणाचा समन्वय केला आहे.

२६ एका बाजूला स्वाभाविक वासनांचें मानवी जग आणि सामाजिक ध्येयें आणि दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक जीवनाची शिस्त आणि आकांक्षा यांमध्यें कायमचें भांडण आहे असें हिंदु धर्म मानीत नाहीं. श्रेय आणि प्रेय हीं दोन्हीं हिंदु धर्माला मान्य आहेत. तथापि श्रेयावर अधिष्ठित नसलेलें प्रेय तो मान्य करीत नाहीं. या जगावर आणि या जगांतील चांगल्या चांगल्या गोष्टींवर शक्तिसर्वस्व खर्च करणाऱ्या मनुष्याचें जीवन समाधानकारक नसतें. कारण, ऐहिक वैभवाची परमावधि झाली तरी शेवटीं त्याचा नाशच होणार आहे. आपल्या ऐहिक परमोत्कर्षाच्या क्षणीं सुद्धां हें जग आणि आपल्याला प्रिय असलेल्या या जगांतील सर्व वस्तू आपणांस सोडून जातील. शाश्वतापासून वेगळें काढलेलें जग हें नश्वर आहे आणि त्याचें वैयर्थ्य तर करुणास्पद आहे, अशी हिंदुतत्त्वज्ञानी मनुष्याची विचारसरणी असते.

२७ सर्व ऐहिक गोष्टी नाशवंत आहेत; परंतु तेवढ्यामुळें त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्या चिरकाल टिकणाऱ्या नाहींत म्हणून त्या आस्तित्वांतच नाहींत असें समजून वागणें, म्हणजे आपल्यावर आपण होऊन आपत्ति ओढवून घेण्यासारखें आहे. शाश्वताचें स्वरूप क्षणभंगुर गोष्टींमध्यें व्यक्त होतें; आणि शाश्वताकडे जाण्याचा मार्ग नाशवंत गोष्टींतूनच गेलेला आहे. सांत स्वरूपांतील सत्य अनंत सत्याकडे नेत असतें. ' सांत ' ही सांत वस्तु आहे असें समजून तिची आसक्ति सोडणें आणि सांत म्हणजे अनंताचें मूर्त स्वरूप आहे या दृष्टीनें त्या सांतावर आसक्ति ठेवणें याचें नांव संन्यास. सांत आणि अनंत हे परस्परांशीं संलग्न असल्यामुळें त्यांची ताटातूट करणें धोक्याचें आहे. उपनिषद् म्हणतें, " जगाची उपासना करणारे अंधारांत आहेत. परंतु केवळ अनंताची उपासना करणारे अधिक अंधारांत आहेत. ' जग ' आणि ' अनंत ' दोन्ही मान्य करणारा मनुष्य जगाचें ज्ञान संपादन करून मृत्यूपासून बचाव करून घेतो आणि अनंताचें आकलन करून अमर बनतो[1]. '

२८ मनुष्याचें ' आर्थिक आणि राजकीय जीवन, सत्ता आणि धनलोलुपता ' यांचा विचार ' अर्थ ' या पुरुषार्थामध्यें होतो. द्रव्येषणा ही मानवी स्वभावामध्यें जवळजवळ उपजतच आहे. मानवी मनाची प्रत्यक्ष ठेवणच बदलल्याशिवाय 'धना'च्या कल्पनेचें उच्चाटन करणें शक्य नाहीं. पुष्कळ मनुष्यांना ' धन ' हें आपलें व्यक्तित्व आणि दुसऱ्याशीं आपला संबंध व्यक्त करण्याचें माध्यम आहे असें वाटतें.

२९ धन आणि सुख प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणें ही न्याय्य मानवी आकांक्षा आहे खरी; परंतु धन आणि सुख हीं जर परिणामीं मोक्षप्रद व्हावयास हवीं असतील, तर त्यांचें संपादन न्याय्य मार्गानें केलें पाहिजे. धन आणि सुख मिळवावयाचीं असतील तर नैतिक शिस्तीची अवश्यकता आहे. केवळ व्यक्तिविषयक वासनांचा त्याग करून आणि शिस्तीचीं बंधनें

---

१ अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥ ९ ॥
विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥ ११ ॥—ईश.

पाळूनच स्वातंत्र्य मिळविणें शक्य आहे. इच्छेस येईल त्याप्रमाणें भोग भोगतां यावे यासाठीं सुद्धां प्रथम आपणास आपल्या स्वतःला मर्यादित करावें लागतें. आणि कांहीं मार्गांनीं आपल्या इच्छेला—वासनेला बंधनें घालावीं लागतात. राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असलेल्या देशाचे आचार आणि विचार बहुवंशीं मर्यादित असतात. आचारस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य यांचा पुष्कळ संकोच केल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य शक्य नसतें. आध्यात्मिक मोक्ष संपादन करण्याच्या दृष्टीनें हिंदु समाजानें आपल्या दैनिक जीवनाच्या पुष्कळशा बारीकसारीक गोष्टींवर नियत्रण घातलें आणि हेच आचारधर्मांचे नियम होत. देशांतील सर्वच भागात किंवा मानवी इतिहासाच्या सर्वच काल-खंडांमध्यें हेच नियम प्रचलित नाहींत. सिंधूपासून कन्याकुमारीपर्यंत संस्कृ-तीचा जसजसा प्रसार होत गेला तसतशा हिंदुस्थानातील मूळ जातींच्या विविध रूढी हिंदु स्मृतिकारांनीं मान्य केल्या. रूढींतील नैतिक दृष्ट्या आक्षेपार्ह भागांवर संस्करण करण्याचा प्रयत्न स्मृतिकारांनीं केला; तथापि त्यांनीं रूढींचें वैचित्र्य मान्य केलेंच[1]. ह्या सर्व रूढी मान्य करून त्यांचा एक आदर्श नमुना ते लोकांपुढें ठेवतात, त्यामुळें बेमालूमपणें त्यांमध्यें सुधारणा घडून येते. तैत्तिरीय उपनिषदांत एका तरुण मनुष्याला असें सागण्यांत आलें आहे कीं, " तुला ' किं कर्म किमकर्मेति ' अशी शंका उपस्थित होईल, त्या त्या वेळीं तसल्या परिस्थितींत निर्णय देण्यास लायक, योग्य व भाविक अशा सद्गुणी ब्राह्मणांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेव. " मनु म्हणतो:—" त्रैवर्णिकांपैकीं शिष्ट आणि धार्मिक लोकांचे व्यवहार सर्व देशांच्या, कुटुंबांच्या आणि जातींच्या चालीरीतींशीं सुसंगत ( अविरुद्ध ) आहेत, असें समजण्यांत यावें. "

३० मोक्ष म्हणजे आध्यात्मिक आत्मसाक्षात्कार होय हिंदु धर्म म्हणतो कीं अन्न, काम, भांडवल, महत्त्वाकांक्षा, बाह्य सृष्टीशीं संबंध किंवा तिच्यावर सत्ता एवढ्याच गोष्टी मनुष्याचें जीवन व्यतीत करण्यास पुरेशा होत नाहींत. त्याच्या जीवनाची प्रेरक शक्ति त्याचा आत्मा असली पाहिजे. मोक्ष म्हणजे स्वमुक्ति, शाश्वत परमात्म्यामध्यें जीवात्म्यानें विलीन होणें होय. ही विलीनता हीच

[1] बौद्धायन , बृहस्पति, देवल व गौतम यांच्या स्मृती पाहा.

शेवटीं आत्म्याला शांति देते. इतर सर्व हालचाली या शांतीच्या सिद्धयर्थ होत असतात.

३१ मोक्ष मिळविण्याच्या पद्धतीसंबंधीं विचारवंत हिंदु लोकांनीं फार व्यापक धोरण स्वीकारलें आहे. " ज्याप्रमाणें पक्षी आकाशांत उड्डाण करतात, मासे समुद्रांत पोहतात, परंतु मागें कांहीं मागमूस ठेवीत नाहींत, त्याप्रमाणें मुमुक्षूनें आपला मोक्षमार्ग आक्रमण करावा[1]."

३२ ज्ञान, भक्ति आणि कर्म ( सेवा ) हे मोक्षप्राप्तीचे तीन ढोबळ मार्ग आहेत. हे परस्परांपासून सर्वस्वीं अलग नसून हे सर्व मोक्षप्राप्तीच्या प्रमुख साधनांवरच जोर देतात. ज्ञान म्हणजे बुद्धीची तीव्रता अथवा वाद-विवादात्मक शक्ति नव्हे; ज्ञान म्हणजे आत्मसाक्षात्काराचा अनुभव. आपल्या सर्व कृत्यांचा साक्षी परमेश्वर आहे, ही जाणीव ठेवून आपण जेव्हां जगांत वावरतों, तेव्हां पापापासून आपण बचावतों. जर आपणांला खरें रहस्य समजलें तर आपल्या हातून आपणांला न कळून सुद्धां योग्य आचरणच घडेल. सत्यद्रष्ट्याचें आचरण नेहमीं योग्यच असणार. अयोग्य आचरण त्याच्याकडून घडणेंच शक्य नाहीं. भक्तिमार्ग सर्वांत लोकप्रिय आहे. पापी आणि संत, अज्ञ आणि विद्वान्, मूर्ख आणि शहाणा या सर्वांना हा सुलभ उपाय आहे. प्रार्थना आणि विनवणी, उपवास आणि यज्ञ, ध्यान आणि आत्मनिरीक्षण या सर्वांचा भक्तीमध्यें अंतर्भाव होतो. भक्तीचा परमोच्च विकास झाला कीं, ज्ञान आणि भक्ति एकरूप होतात; आणि त्या दोहोंचेंहि पर्यवसान धर्मानुसार आचारांत किंवा सद्गुणी जीवनांत होतें.

३३ कर्माच्या व्यक्तिविषयक आणि सामाजिक बाजू ह्या परस्परांशीं पूर्णत्वानें संलग्न झाल्या असल्यामुळें वर्णव्यवस्था अगर जातिव्यवस्था सामाजिक जीवनावर आणि आश्रमव्यवस्था व्यक्तिविषयक जीवनावर जोर देतात. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास हे चार आश्रम म्हणजे शाश्वत जीवनाकडे नेणाऱ्या चार अवस्था होत.

---

१ शकुनीनामिवाकाशे जले वारिचरामिव ।
यथा पदं न दृश्येत तथा ज्ञानविदां गतिः ॥

३४ ब्रह्मचर्याश्रमामध्यें शरीर आणि मन यांना शिक्षण देऊन शिस्त अंगीं बाणवावयाची असते; कोंवळ्या तरुणाला कर्तव्योन्मुख करावयाचें असतें. विद्यार्थ्याला आपल्या गुरुगृहीं ठराविक मुदतीपर्यंत राहावें लागतें. तेथें त्याला त्याच्या भावि आयुष्यांत उपयोगी पडणाऱ्या कलांचें आणि शास्त्राचें शिक्षण दिलें जातें. स्त्रियाना सुद्धा ब्रह्मचर्याश्रमाची दीक्षा घेण्याचा अधिकार होता[1]. त्याना आपापल्या वर्णाचें शिक्षण दिलें जात होतें आणि अशा रीतिनें आपत्तीच्या वेळीं आपापल्या जातींचीं कामें करण्यास त्या समर्थ होत असत. जेव्हा निरनिराळ्या चालीरीतींच्या आणि भिन्न मानववंशांच्या स्त्रियांचीं लग्नें लावण्यात आलीं, तेव्हा वैदिक अभ्यासाविषयीं निर्बंध घालण्यात आले.

३५ ब्रह्मचर्याच्या पुढचा गृहस्थाश्रम होय. मनुष्य हा सामान्यतः स्वयंपूर्ण नसतो. ॲरिस्टॉटलनें कल्पिलेल्या ईश्वराला एकांतवासांत सुख लाभत असेल; परंतु या जगांतील स्त्रीपुरुषाना तें शक्य नाहीं. वैवाहिक जीवनाचा स्वीकार करण्यास लोकास उत्तेजन देण्याकडेच सर्वसाधारण प्रवृत्ति आहे[2]. 'राजरोस रीतीनें आणि पूर्णपणें वासनाची तृप्ति केल्यानें होणाऱ्या दुष्परिणामापेक्षां वासना दाबल्या तर त्याचा अधिक वाईट परिणाम होतो' हें युरोपात लोकमान्य होत चाललेलें फ्रूडचें[3] तत्त्व हिंदुस्थानला कित्येक शतकांपासून माहीत आहे. मानवी प्राण्यांत उद्भवणारे हे सहज विकार सामान्यपणें

---

१ पुरा कल्पेषु नारीणां मौञ्जीबन्धनमिष्यते ।
अध्यापनं च वेदानां सावित्रीवचनं तथा ॥
(ह्यावरून पूर्वीच्या काळीं सुद्धा स्त्रीशिक्षण दिलें जात होतें हें स्पष्ट दिसून येतें.
——अनुवादक.)

२ पराशर संहितेवरील आपल्या टीकेत ( Bombay Sanskrit Series, Part II, p. 82 ) सायनाचार्यांनी उद्धृत केलेल्या हारीतस्मृती ( २०,२३ )प्रमाणें मुलींचे दोन वर्ग पाडण्यांत येतात :—(१) ब्रह्मविद्येचें शिक्षण घेण्यासाटीं स्वतःला वाहून घेतलेल्या 'ब्रह्मवादिनी' आणि लग्न करून घेणाऱ्या 'सद्योवधू' प्राचीन संस्कृत वाङ्मयातील काही सुप्रसिद्ध स्त्रिया—उदाहरणार्थ, बृहदारण्यक उपनिषदांतील 'गार्गी', महाभारतातील 'सुलभा' आणि रामायणातील 'शबरी'—ह्या आजन्म अविवाहित होत्या. हिंदु सामाजिक स्मृती ह्या अपवादात्मक उदाहरणाविषयीं विवेचन न करता चालू रहाटीचेंच दिग्दर्शन करीत असतात.

३ व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) विश्वविद्यालयाचे प्रोफेसर, नामांकित मानसशास्त्रज्ञ आणि ग्रंथकार.

शांत होईपर्यंत वैराग्यवृत्तीला आळा घालण्यांत येत असे. समरांगणापासून पळून जाणारा आणि लग्नाच्या बोहल्यापासून परत फिरणारा हीं एकाच कोटींतील माणसें होत. जीवनकलहात नालायक ठरलेलीं माणसेंच, ज्या गृहस्थाश्रमांत सद्गुणांचा विकास करण्यास पूर्ण अवसर मिळतो त्यापासून दूर पळतात. विवाह पवित्र मानला जातो; प्रत्यक्ष देवांचेहि विवाह झालेले आहेत. हिंदु भक्त जेव्हां निर्गुणोपासनेवरून खालीं उतरून सगुणोपासना करतो, तेव्हां त्याच्या देवाला सहधर्मचारिणीहि नेहमी असतेच. तो ब्रह्मचारी देवाची किंवा कुमारी देवतेची उपासना करीत नाहीं. स्त्री व पुरुष हीं एकएकटीं स्वयंपूर्ण नाहींत. तीं सहकारी व परस्परावलंबी आहेत, हें अर्धनारीनटेश्वराची मूर्ति सूचित करते. पतिपत्नीसंबंधामध्यें अहितकर किंवा पापमय असें कांहींच नाहीं. विवाहसंस्थेच्या द्वारा घडवून आणलेल्या वैवाहिक जीवनात स्त्रीपुरुषांचा बौद्धिक आणि नैतिक दृढ परिचय होतो. विवाहसंस्था ही मानवी दौर्बल्याला एक सवलत असण्यापेक्षां आध्यात्मिक विकासाचें एक साधन आहे. व्यक्तीच्या विकासासाठीं आणि कौटुंबिक ध्येयाची परंपरा अखंड राहण्यासाठीं विवाह–संस्थेची योजना आहे. ह्या दृष्टीनें विवाह–संस्था समाजाला हितकारक आहे. प्रत्येक कुटुंबांत मृत आणि विद्यमान माणसें यांची भागीदारी असते. श्राद्धसमारंभ हा कुटुंबाच्या प्रत्येक घटकाच्या मनावर कौटुंबिक ऐक्याची कल्पना ठसविण्याकरितां योजिलेला आहे. श्राद्ध करणारा श्राद्धसमारंभाच्या शेवटीं 'पूर्वजांनो, मला वीरपुत्र द्या' अशी याचना करीत असतो[1].

३६ आदर्श हिंदु वैवाहिक जीवन हें पतिपत्नींच्या व्यक्तिविषयक आणि सामाजिक कर्तव्यांवरच जोर देतें. हिंदूंच्या वैवाहिक जीवनामध्यें पति हा सर्व–सत्ताधारी नसतो, किंवा पत्नी ही पतीची गुलाम नसते. पतिपत्नी हीं दोघेंहि उच्च ध्येयाचे सेवक आहेत. ह्या ध्येयाप्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या व्यक्ति-विषयक प्रवृत्तींना गौण स्थान दिलें पाहिजे. विषयासक्तीचें आत्मनिरपेक्ष प्रेमांत रूपांतर करावयाचें असतें. हिंदु जीवनांत विवाह ही क्षुल्लक बाब गणली गेली नसून त्याला फार महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें आहे. आभि-

1 'वीर मे दत्त पितर. ।' ह्या प्रार्थनेची 'सुवीरासो भवेम' (आमच्यामध्यें मोठाले वीर असू द्या) ह्या वैदिक प्रार्थनेशीं तुलना करा

रुची, स्वभाव, ध्येयें आणि हितसंबंध, इत्यादि प्रत्येक बाबतींत परस्परांची मतें जुळतीं असणारें दांपत्य कादंबऱ्यांशिवाय इतरत्र आपणांला आढळून येत नाहीं. पतिपत्नींमध्यें कधींहि न जुळणाऱ्या अशा कांहीं विशिष्ट गोष्टी राहणारच. अशा परिस्थितींत या सर्व विभिन्न गोष्टींचा सुसंवादी जीवनांत विकास होईल असा उपयोग करून घेणें हें विवाहसंस्थेचें कार्य आहे. नैसर्गिक प्रवृत्ती आणि मनोविकार या कच्च्या द्रव्यांचा, संपूर्ण ध्येय प्राप्त करून घेण्यामध्यें उपयोग करून घ्यावयाचा असतो. आपल्या सहचाऱ्याची निवड करण्याच्या बाबतींत जरी थोडा वाव असला तरी अगदीं उत्तम गणल्या गेलेल्या विवाहांमध्यें सुद्धां यदृच्छेचाच पुष्कळ अंश असतो. यद्यपि अज्ञात असलेल्या द्रव्यापासून सोज्वळ अशी जीवनमूर्ति घडविण्याचा आपण कितीहि प्रयत्न केला, तरी नशिबाच्या अगर यदृच्छेच्या काळसर रेषा मूर्तीच्या अंगावर मधून मधून उमटलेल्या दिसणारच. यदृच्छया मिळालेला सवंगडी जीवनाचा सहचारी बनला तर विवाह यशस्वी झाला असें म्हणतां येईल. विवाह हा जीवन—कलहाचा शेवट नसून, कष्टाळू जीवनाचा तो केवळ आरंभच होय. विवाहामध्यें आपल्या खासगी हितसंबंधांना आणि प्रवृत्तींना गौण स्थान देऊन आपण अधिक व्यापक ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करतों. एकाच ध्येयाच्या उपासनेसाठीं अतिशय विसदृश व्यक्ती सुद्धा एकत्र नांदूं शकतात. प्रेमाला त्यागाची अपेक्षा आहे. संयमानें आणि सहिष्णुतेनें आपण प्रेमाला दिव्य मूर्ति बनवूं शकतों.

२७ आदर्श विवाहामध्यें दोन व्यक्तींचे खरे हितसंबंध परस्परांना पूर्णपणें पूरक असे झालेले असतात. आदर्श नैतिक विवाह म्हणजे एकपत्नीविवाह होय. राम आणि सीता, अथवा सावित्री आणि सत्यवान् यांचा पतिपत्नीसंबंध हिंदु धर्मग्रंथांमध्यें आदर्श समजण्यांत आला आहे. कारण, सबंध जग जरी त्यांच्यावर उलटलें तरी त्यांनी परस्परांचा त्याग केला नाहीं. निरपवाद पूर्णत्व प्राप्त होतच नसेल तर निदान पूर्णत्वाच्या जवळजवळ जाऊन पोहोंचलेल्या गोष्टीवर समाधान मानून घेणें प्राप्त आहे. तथापि आपण विवाहाच्या उच्च आणि नीच प्रकारांमध्यें घोंटाळा करण्याची अवश्यकता नाहीं. हिंदु स्मृतींमध्यें आठ निरनिराळ्या प्रकारचे विवाह मान्य करण्यांत आले आहेत. मनूनें आपल्या कालांत प्रचलित असलेल्या चालीरीतींकडे डोळेझांक केली

नाहीं. त्यानें निरनिराळ्या विवाहांचा व्यवस्थित क्रम लावला आहे. व्यक्तिविषयक आवडीनिवडींना गौण स्थान देणारे विवाह हे श्रेष्ठ दर्जाचे मानण्यांत आले असून, परस्परांची पसंती ( गांधर्व ), जबरदस्ती ( राक्षस ), खरेदी ( आसुर ) यांनीं घडवून आणलेले विवाह कनिष्ठ प्रकारचे मानण्यांत येतात. नीचांत नीच असा वैवाहिक प्रकार म्हटला म्हणजे 'पैशाच' होय[1]. निद्रावस्थेंत असलेल्या, निशा केलेल्या अथवा वेड लागलेल्या कुमारीशीं तिच्या इच्छेविरुद्ध एखाद्या आपकानें संभोग केला तर तो 'पैशाच' विवाह होय. हा अंगदींच कनिष्ठ प्रकारचा विवाह आहे. तथापि व्याभिचरित स्त्रीला पत्नीचा आणि संततीला औरसपणाचा दर्जा प्राप्त व्हावा, या प्रशंसनीय हेतूमुळें तो कायदेशीर मानण्यांत आला आहे.

३८ पतिपत्नींच्या संबंधापेक्षा कौटुंबिक हितसंबंध अधिक महत्वाचे असा आग्रह धरण्यांत आल्यामुळें एकपत्नीत्वाच्या ध्येयांत ढिलाई उत्पन्न झाली. एकपत्नीत्वाचें ध्येय सर्वोत्कृष्ट आहे असें जरी मानण्यांत आलें आहे, तथापि अनेकपत्नीत्वाबद्दलसुद्धा सहिष्णुता दाखविण्यांत येत असे. जर तुम्हांला मुलगा नसेल, किंवा पहिली बायको असून चुकीनें म्हणा किंवा यदृच्छया म्हणा तुम्हीं एखाद्या स्त्रीला भ्रष्टविलें असेल, तर तिच्या असहाय स्थितीपासून आणि लोकच्छलापासून तिचें संरक्षण करणें, दुष्कीर्तीच्या आणि अधोगतीच्या जीवनापासून तिचा बचाव करणें आणि आपल्या आईबापांच्या वर्तनाबद्दल बिलकुल जबाबदार नसलेल्या संततीचें रक्षण करणें हें तुमचें कर्तव्य आहे. अनेकपत्नीकत्वाची चाल अशा कारणांमुळें मान्य करण्यांत आली आहे. रामायणाच्या कथानकापासून अनेक महत्त्वाच्या गोष्टी शिकावयाच्या आहेत, त्यांपैकीं अनेकपत्नीकत्वाचे दुष्परिणाम ही एक गोष्ट आहे. अनेकपत्नीकत्वामुळें दशरथाचा राजवाडा म्हणजे कारस्थानांचें एक माहेरघर बनलें होतें. परंतु कथानायक रामानें एकपत्नीकत्वाचें ध्येय उचलून धरलें.

३९ हिंदुसमाजांत सामान्यतः सर्व स्त्रियांनीं लग्न केलेंच पाहिजे अशी प्रथा असल्यामुळें कांहीं दोष उत्पन्न झाले आहेत; तथापि आयुष्यांत ज्यांना कसलीच हौस वाटत नाहीं, अशा अविवाहित स्त्रियांची संख्या मात्र या

१ मनुस्मृति, ( ३ ), ३४.

पद्धतीनें हिंदुस्थानांत वाढत नाहीं. या पद्धतीमुळें विधवांच्या पुनर्विवाहाला विरोध करावा लागला[1]. या पद्धतीमुळेंच मुलींच्या लग्नाचें वय उतरविण्याकडे न कळत प्रवृत्ति होते. लग्नासंबंधीं हिंदूंच्या कल्पना काय आहेत हें लक्षांत घेऊन हिंदु पुढाऱ्यांनीं अधिक समाधानकारक व्यवस्था लाविली पाहिजे.

४० लग्नाचें ध्येय आध्यात्मिक आहे ही गोष्ट मान्य केल्यानें वैवाहिक संबंध अभेद्य आहेत असें मानणें आपणांस भाग पडतें. जोपर्यंत आपल्या जीवनाची दृष्टि संकुचित असते आणि आपण क्षणिक भावना व कल्पना प्रवृत्त करतात त्याप्रमाणें वागतों तोंपर्यंत विवाहसंबंध कायमचा आहे अशी भावना होणें शक्य नाहीं. मोहाच्या पहिल्या आवेशांत आपल्या सहधर्मचाऱ्यांना आपण स्वर्गीय देवतांप्रमाणें मानीत असतों; परंतु लवकरच एकमेकांविषयींचें कुतूहल कमी कमी होत जातें. अशा परिस्थितीत पतिपत्नींमध्यें हरएक बाबतींत एकवाक्यताच असली पाहिजे असा आग्रह धरल्यास, कित्येक वेळां परस्परांबद्दल असंतोष उत्पन्न होतो आणि क्वचित् प्रसंगीं तर परस्परांचीं मतें एकमेकांविषयीं विटतातहि. हा असंतोष खोट्या ध्येयाचा परिणाम होय. आदर्श वैवाहिक संबंध अनायासें लाभत नसतो. प्रयत्नानींच ती गोष्ट साध्य होत असते. पतिपत्नींमध्ये छत्तिसाचा आंकडा असेल तर त्यांच्यामध्यें सलोखा घडवून आणण्यासाठीं फार नेटाचे प्रयत्न केले पाहिजेत. अशा परिस्थितींत घटस्फोटाचा अवलंब करणें म्हणजे पराजय कबूल करणें होय. आदर्श वैवाहिक जीवन बनविण्याचा प्रयत्न फसला तर वितुष्टें उत्पन्न होऊन अनवस्थाप्रसंग ओढवतात !

४१ पुष्कळशा घटस्फोटांना आणि फारकतींना आधुनिक परिस्थितीच कारणीभूत आहे: जीवनाची कुतरओढ चालली आहे; परस्परांचें ह्रद्गत समजून घ्यावयाला आपणांला वेळच मिळत नाहीं. आपल्या वर्तनाचें समर्थन करण्यासाठीं आपण आपले वैयक्तिक हक्क फुगवून सांगतो आणि शिस्तीविरुद्ध जोरानें ओरड करतों. वस्तुतः नैसर्गिक प्रवृत्ती आणि मनोविकार ह्यांच्या तंत्रानें आपण वागत असतांना आत्मस्वातंत्र्य आणि आत्मविकास या तत्त्वांना अनुसरूनच आपलें जीवन चाललें आहे अशी आपण

---

१ परंतु ऋग्वेद, (१०), १८, ८, आश्वलायन, (४), २, १८ व अग्निपुराण, १५३ पाहा.

आपली भ्रामक समजूत करून घेतों. ‘ आध्यात्मिक व्यक्ती ’ या दृष्टीनें आपण आपल्या जीवनाकडे न पाहतां ‘ धष्टपुष्ट प्राणी ’ ह्या दृष्टीनेंच पाहण्याची आपली प्रवृत्ति असते. इतिहासाच्या आरंभापासून पाप आपणांला चिकटलेलेंच आहे; परंतु आपण अलीकडे त्याची पूजाअर्चा करूं लागलों आहों. परस्परांना कंटाळलेल्या पतिपत्नींनीं आपले नवे सहधर्मचारी निवडून घेणें ही गोष्ट फारशी आधुनिक नाहीं; परंतु त्या कृत्याचें समर्थन करणारें नवीन तत्त्वज्ञान हीं मात्र खरी आधुनिक गोष्ट आहे. पापी मनोभावना प्रागतिक विचारांचा बुरखा घेऊन वावरत आहे. पहिला पति सोडून दुसरा पति वरणाऱ्या स्त्रीचा, दांभिक नीतिनियम आणि लटक्या भावना ह्यांचें जूं झुगारून देणारी ‘ धारिष्ट्वती स्त्री ’, असा बडेजाव करण्यांत येतो; आणि उलट पक्षीं नवऱ्यासंबंधीं बऱ्यावाईट गोष्टी कानीं आल्या असतांहि आपल्या पतीला चिकटून राहणारी स्त्री ही भित्री आणि रूढीला बळी पडणारी आहे असें समजण्यांत येतें. स्त्री–पुरुषांमधील शिथिल संबंध भीतिप्रद न वाटतां अधिक लोकप्रिय होत चालले आहेत.

४२ स्त्रीच्या दुष्टपणाचें चित्र जास्त भडक रंगात रंगविण्याचा अतिशयोक्तीचा प्रयत्न आमच्यांतहि जरी झाला असला आणि स्त्री म्हणजे पुरुषाला नेहमींच असत्प्रवृत्त करणारी मोहिनी, नरकाकडे खेंचून नेणारी वागुरा ( जाळें ) आणि डोनाल्डसननें म्हटल्याप्रमाणें पुरुषरूपी लढाऊ जहाजाच्या नेहमीं बाजूबाजूनें राहून त्याचा साफ धुव्वा उडवून देण्यास टपून बसलेली अग्निनौका, अशा तऱ्हेचीं कांहीं वचनें आमच्यांतहि असलीं, तरी हिंदूंचें स्त्रीविषयक धोरण एकंदरींत उदात्तच आहे. हिंदु धर्म स्त्रीला पुरुषाची सहधर्मचारिणी मानतो[1]. जगाच्या संस्कृतींत स्त्रीचें असें विशिष्ट कार्य आहे, तिच्याकडे कांहीं खास जबाबदारीचीं कामें आहेत आणि तिचीं कांहीं खास कर्तव्यें आहेत असें हिंदु धर्म मानतो. प्रागतिक मताच्या मिसेस बरट्रंड रसेलसारख्या विदुषीनें सुद्धां असें मान्य केलें आहे कीं, “ अखिल

१ “ऋग्वेदावर टीका करताना सायनाचार्य म्हणतात —“नवरा आणि बायको हे एकाच पदार्थाचे समसमान अर्धे भाग असून प्रत्येक बाबतींत समसमान आहेत ऐहिक आणि धार्मिक अशा सर्व कामात दोघांनी सारखा भाग घ्यावा ” मनु आणि याज्ञवल्क्य यांच्या काहीं लिखाणामध्ये हे ध्येय खाली ओढण्यांत आले आहे.

समाजाची ज्ञानसंपत्ति आणि एकंदर प्रगति ह्यांमध्यें भर टाकण्याची अनन्य-साधारण शक्ति समाजाच्या प्रत्येक वर्गांत—पुरुषांत त्याचप्रमाणें स्त्रियांतहि वास करीत आहे. आणि प्रत्येक वर्ग किंवा स्त्री–पुरुष हीं दुसऱ्याचें केवळ अंधानुकरण करतील तर तीं स्वतः आणि तीं ज्या समाजाचे घटक आहेत तो समाजहि, त्या ज्ञानाला आणि विचाराला मुकतील[1]." जोंपर्यंत मुलें आभाळातून पडत नाहींत आणि जोंपर्यंत मुलांची धारणा आणि त्यांचें पोषण आईच्या पोटांतच होत राहतील तोंपर्यंत स्त्रियांची अशी विशिष्ट कामगिरी राहणारच. अपत्योत्पादन आणि त्यांचें संगोपन ह्यांकडे स्त्रियांना पुष्कळ वेळ आणि लक्ष द्यावीं लागत असल्यानें कुटुंबांच्या आर्थिक जबाबदारीपासून त्यांची मुक्तता करण्यांत आली आहे. 'यज्ञप्राधान्य' हें पुरुषाचें आणि 'तपप्राधान्य' हें स्त्रीचें वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ असा कीं, पुरुषानें ऐहिक व्यवसाय करावे आणि स्त्रीनें श्रेष्ठ दर्जाचें आत्मसंयमन करावें आणि स्वार्थत्याग करावा. स्त्रियांच्या बाबतींत नीतिनियम अधिक कडक करण्यांत आले आहेत, ह्यांत वास्तविक त्यांचा गौरवच आहे. कारण ते नीतिनियम स्त्रियांचें नैसर्गिक श्रेष्ठत्व मान्य करूनच करण्यांत आले आहेत; पण आधुनिक स्त्रीच हा आपला स्वाभिमान घालवीत आहे. आधुनिक स्त्री ही आपलें व्यक्तित्व आणि वैशिष्ट्य यांची उपासना न करतां पुरुषाचें अनुकरण करीत असल्यानें नकळत पुरुषाचें श्रेष्ठत्व कबूल करीत आहे[1]. स्त्रीजीवन हें ह्यामुळें पुरुषी थाटाचें आणि यांत्रिक स्वरूपाचें बनत चाललें आहे. साहसी कृत्यें स्त्रीनें अंगीकृत केल्यानें तिला आपल्या अंतर्गत नैसर्गिक स्वभावाशीं झगडावें लागत आहे.

४३ मनुष्य जेव्हां घरच्या जबाबदारींचा त्याग करतो, तेव्हां तो तृतीय आश्रमांत—वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करतो. जर पतीचें आध्यात्मिक ध्येय पत्नीला मान्य असेल तर ती सुद्धां नवऱ्याबरोबर वनांत जाते. मनुष्यानें नातवाचें मुख पाहिलें, त्याच्या कातडीला सुरकुत्या पडूं लागल्या किंवा त्याचे केस पिकूं लागले म्हणजे त्यानें वानप्रस्थाश्रम स्वीकारावा असें मनु म्हणतो. मनुष्याच्या शारीरिक शक्ती क्षीण होऊं लागल्या म्हणजे वनांत

[1] Hypatia.

जाऊन खऱ्या आध्यात्मिक जीवनाची तयारी करण्याची वेळ आली असें समजावें. धकाधकीच्या मामल्यांतून निसटून जीवनाच्या उच्च प्रश्नांचें मनन करण्यासाठीं अरण्यात जाऊन एकांतवास पत्करावयाचा हा ह्या आश्रमाचा हेतु आहे.

४४ समाजाच्या गरजा पुरविणें, एवढीच मनुष्याची इतिकर्तव्यता नाहीं. धनाचा उत्पादक, देशाचा संरक्षक किंवा संस्कृतीचा रखवालदार ह्यापेक्षा मनुष्याची योग्यता फार मोठी आहे. त्याची सामाजिक कार्यक्षमता हें त्याच्या आध्यात्मिक विकासाचें माप नव्हे. आमचें आध्यात्मिक जीवन आत्म्यावर—'आत्मोन्नती'वर अवलंबून आहे. ह्या आत्म्यामध्येंच अनंतत्व साठविलेलें आहे. मनुष्याला सर्व जगाचें वैभव मिळालें, परंतु त्यानें आपला आत्मा गमावला, तर त्यात त्यानें काय साधलें ? महाभारतांत म्हटल्याप्रमाणें " कुटुंबाकरितां व्यक्तीचा, समाजाकरिता कुटुंबाचा, देशाकरिता समाजाचा आणि आत्म्याकरितां अखिल जगाचा त्याग करावा[1]." कुटुंब आणि देश, राष्ट्र आणि जग हीं मनुष्याच्या अंतःकरणातील आत्म्याला शांति देऊं शकत नाहींत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनात केव्हां ना केव्हा तरी आपली बायको आणि आपलीं मुलें, आपली जात आणि आपलें कार्य यांचा त्याग करण्यास धर्म सांगतो. जीवनरूपी मार्गाचा शेवटचा भाग हा एकएकट्यानेंच आक्रमण करावयाचा असतो.

४५ बाह्य जीवनाच्या काळजींतून स्वतःला मुक्त करणें हें संन्याशाचें ध्येय नसून, ज्याची प्राप्ति झाली असतां आपण संपत्तीच्या अथवा सन्मानांच्या मोहाला बळी पडणार नाहीं, यशानें फुगून अथवा अपयशानें निराश होऊन जाणार नाहीं, अशा तऱ्हेचें आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविणें हें त्याचें ध्येय होय. तो स्थितप्रज्ञता प्राप्त करून घेतो आणि म्हणून " स्वतः धीमेपणानें अपमान सहन करतो, परंतु दुसऱ्याचा अपमान करीत नाहीं. तो आपल्या शरीरस्वास्थ्यासाठीं कोणाचा द्वेष करीत नाहीं[2]." हे मुक्त पुरुष व्यक्ति-

---

१ त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥—विदुरनीति.

२ मनु. ६, ४७.

विषयक लळा किंवा खासगी महत्त्वाकांक्षा यांपासून जरी अलिप्त असले तरी त्यांना आपल्या स्वतःच्या आत्म्यामध्यें जगाचें स्वातंत्र्य प्रतीत होत असतें. त्यांची दृष्टि पृथ्वीप्रमाणें विशाल[1], वृत्ति प्रेममय आणि त्यांचें जीवन सद्गुणसंपन्न असें असतें. संन्यासी हा समाजाचें आधिभौतिक कल्याण करीत नसल्यानें आणि समाजाच्या चालीरीतींची तो पर्वा करीत नसल्यानें, तो परोपजीवी आहे असें समाज मानतो. कोणतेंहि राजघराणें, कोणताहि धार्मिक संप्रदाय व कोणताहि मानव–वंश किंवा कोणतेंहि राष्ट्र यांपैकीं कोणाबद्दलहि त्याला एकांतिक अभिमान नसल्यानें सरकारहि त्याच्याकडे संशयग्रस्त दृष्टीनेंच पाहतें. तो कारखान्यांत राबत नाहीं, समाज-व्यवस्थेंत घडपडत नाहीं अगर राज्ययंत्रांत भाग घेत नाहीं.

४५ जें राजकीय धोरण मानवी प्राण्याला जगामध्यें राहणें असुरक्षित करतें, अशा धोरणाला संन्यासी उचलून धरीत नाहींत. हे संन्यासी मनुष्यांना यंत्रवत् बनविणाऱ्या आमच्या उद्योगधंद्यांची भरभराट करीत नाहींत कीं युद्ध-प्रवर्तक राष्ट्रीय अहंकाराचा पुरस्कार करीत नाहींत. स्वदेशाभिमानाची भावना, या उदात्त आत्म्यांना पुरेशी वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या किंवा इंग्लंडच्याच संकुचित जीवनाकडे नव्हे तर अवघ्या जीवमात्राकडे त्यांचें लक्ष वेधलेलें असतें. ते सर्व मनुष्यांना आणि सर्व संप्रदायांना सारखें ( समता सर्वास्मिन् ) लेखतात.

४६ ख्रिस्ती आणि बौद्ध धर्मांचे कांहीं संप्रदाय, संन्याशाच्या जीवनापेक्षां संसारी मनुष्याचें जीवन हलक्या प्रकारचें आहे असें लेखीत असल्यामुळें सर्व मनुष्यांना सरसकट एकदम संन्यास–दीक्षा देतां आली असती तर त्यांच्या दृष्टीनें फार बरें झालें असतें. हिंदु धर्मानें संन्याशाच्या जीवनाचें कौतुक करतांना गृहस्थाश्रमाचा धिक्कार केलेला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हिंदु धर्माच्या दृष्टीनें प्रत्येक आश्रम अवश्यक आहे; आणि ज्याअर्थी प्रत्येक आश्रमाची अवश्यकता आहे, त्याअर्थी तो चांगला आहे. वृक्षाला मोहोर आला तरी पानें निरर्थक ठरत नाहींत; आणि पानांमुळें देठांचें अस्तित्व आणि देठांमुळें बीजाचें अस्तित्व निरर्थक

[1] वाराणसी मेदिनी.

ठरत नाहींत. सर्वसामान्य नियम हा आहे कीं, आपण एका टप्प्यापासून दुसऱ्या टप्प्यापर्यंत क्रमाक्रमानें जावें.

४७ मुक्त आत्मा जगाच्या कल्याणाविषयीं उदासीन नसतो[1]. बुद्धाविषयीं असें सांगतात कीं, 'निर्वाण' त्याच्या दृष्टिपथांत आलें असतां, तो तेथून परतला आणि जोंपर्यंत एकहि प्राणी दुःखानें व्याकूळ आहे, तोंपर्यंत निर्वाणाचा अनुभव घ्यावयाचा नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली. हीच कल्पना भागवताच्या एका उदात्त श्लोकांत[2] व्यक्त झाली आहे: "मी राज्याची, स्वर्गाची, किंवा पुनर्जन्माच्या विरामाची (पुनर्जन्म थांबण्याची) इच्छा करीत नाहीं, दुःखानीं त्रस्त झालेल्या माणसाचीं दुःखें नाश पावावीं एवढीच माझी इच्छा आहे." योगिराज महादेवानें जगाकरता विष प्राशन केलें. जीवनाच्या अत्युच्च भूमिकेवर मिळणारें स्वातंत्र्य हें खालच्या भूमिकेवर दुःखें सहन करण्याला, त्याग करण्याला आणि मृत्यूला आलिंगन देण्याला लागणाऱ्या धैर्याच्या स्वरूपात व्यक्त होतें.

४८ या चतुर्विध आश्रम–व्यवस्थेला अद्यापिहि हिंदु लोकांच्या मनांत महत्त्वाचें स्थान आहे. समाजाचे घटक जे सर्वसाधारण लोक ते समाजाचा सर्वसाधारण स्वभाव नेहमीं उत्तम रीतीनें व्यक्त करतातच असें नाहीं. प्रत्येक समाजामध्यें निसर्गतःच उत्तम व निवडक असे लोक असतात. हे लोक सर्व लोकांचा आत्मा, त्यांचीं उच्च ध्येयें, त्यांच्या प्रबळ भावना आणि त्यांची मुख्य प्रवृत्ति इतरांपेक्षां उत्तम रीतींनीं व्यक्त करूं शकतात. हे लोकच समाजामध्यें अनुकरणीय ठरतात. वातीचें टोंक पेटलें म्हणजे सबंध दिवा जळूं लागला असें म्हणण्याचा प्रघात आहे.

---

१ सन्यास म्हणजे 'मी आणि माझे' या अहकाराच्या भावना नष्ट करणे होय, शास्त्रविहित कर्मे सोडणें नव्हे.

अहंकार–ममकार–त्याग एव सन्यासो वक्ष्यते, नाशेषशास्त्रार्थत्यागः ।

—मनुस्मृति, ६, ३२३वरील मेधातिथीची टीका.

२ न त्वह कामये राज्य न स्वर्गं नापुनर्भवम्
कामये दुःखतप्ताना प्राणिनामार्तिनाशनम् ॥

# व्याख्यान चौथें

## जातिसंस्थेच्या आणि हिंदुधर्माच्या मुख्य तत्त्वांचें सिंहावलोकन

१ भिन्नभिन्न संस्कृतींचें सहकार्य आणि निरनिराळ्या मानववंशांचें एकीकरण करणें शक्य आहे असें हिंदूंना वाटत असून, जातिसंस्था म्हणजे हिंदूंच्या व्यापक आणि संकलनात्मक धोरणाचें एक उदाहरण होय. जातिसंस्था ही सहिष्णुता आणि परस्परांमधील विश्वास यांचा परिणाम आहे असें म्हणणें 'वदतो व्याघाता'सारखें वाटलें तरी खरें आहे. जातिसंस्था ही आतां जरी जुल्म आणि असहिष्णुता यांचें साधन झाली आहे, जरी विषमता कायम करण्याकडे आणि एकलकोंडेपणाची वृत्ति वाढविण्याकडे तिची प्रवृत्ति आहे, तथापि हल्लीं दिसून येणारे दुःखदायक परिणाम हे कांहीं जातिसंस्थेचे मूलभूत हेतू नाहींत. हिंदुस्थानच्या प्रगमनशील विचारप्रवर्तकांच्या हातीं नैतिक अधिकाराप्रमाणेंच कायदेशीर सत्ता असती तर त्यांनीं अशा तऱ्हेनें तिचें स्वरूप पार बदलून टाकलें असतें कीं, नव्या स्वरूपांत ती ओळखूंहि आली नसती; असो. या संस्थेचे दुष्परिणाम सांगणें हा कांहीं माझ्या व्याख्यानाचा विषय नाहीं. या संस्थेंत अंतर्भूत असलेल्या तत्त्वांकडे तुमचें लक्ष मी वेधूं इच्छितों.

२ हल्लींच्या जातींचें निरीक्षण केलें असतां त्यांची उत्पत्ति किती विविध स्वरूपाची आहे, हें कळून येतें. जाती या वंश, संप्रदाय आणि धंदा यांना अनुसरून झाल्या आहेत. कांहीं जाती देशांतर केल्यामुळें उत्पन्न झाल्या आहेत. जेव्हां जुन्या जातींचे लोक, देशाच्या निराळ्या भागांत जाऊन वस्ती करतात, तेव्हां तेथें त्यांची नवीन जात निर्माण होते.

३ संस्कृत ' वर्ण ' या शब्दावरून हें स्पष्ट दिसतें कीं, ' जाती ' या मूळ मानववंशांच्या रंगावरून ठरविल्या जात. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाकडे पाहिलें असतां, त्याच्यावर एकापाठीमागून एक अशा निरनिराळ्या मानववंशांनीं आपलें वर्चस्व गाजाविलें आहे असें आपणांस दिसून येतें. ऐतिहासिक कालाच्या सुरुवातीला सुद्धां हिंदुस्थानांत निरानिराळे मानववंश—कृष्णवर्णीय अनार्य, पीतवर्णीय मोंगोल, धडधाकट द्राविड आणि शक्तिमान् आणि उत्साही आर्य—वस्ती करून राहिले होते. नंतर थोड्याच अवधींत इराणी, ग्रीक आणि सीथियन लोकांशीं हिंदुस्थानचा परिचय झाला. यांपैकीं कांहीं हिंदुस्थानात येऊन राहिले. हिंदुस्थानाशिवाय जगांतील दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राला इतके निरानिराळे मानववंशविषयक प्रश्न सोडवावे लागले नाहींत.

४ उपरिनिर्दिष्ट मानववंशीयांचीं भांडणें मिटविण्याच्या दृष्टीनें ( १ ) त्यांचा उच्छेद करणें, ( २ ) त्यांना कह्यात ठेवणें, ( ३ ) त्यांच्याशीं तादात्म्य पावणें किंवा ( ४ ) त्याच्याशीं सलोखा घडवून आणणें हे वैकल्पिक उपाय सुचविण्यांत येतात. जगाच्या इतिहासात, ह्यापैकीं पहिल्या उपायाचा पुष्कळ वेळां उपयोग करण्यांत आला आहे. अशा रीतीनें मानवी उत्क्रांतीच्या इतिहासांत अकालीं मृत्युमुखीं पडलेले मानवसमाज ठिकठिकाणीं आढळून येतात. मानवी प्राण्यांचा असा नाश करण्याला कांहीं सबळ कारण आहे काय ? एक मानववंशीय संस्कृति नष्ट झाल्यानें जगाचें किती नुकसान होतें, ह्याची आपणांला कांहीं कल्पना आहे काय ? रेड इंडियन लोकांनीं बाह्यतः जगाच्या संस्कृतीला हातभार लावला नाहीं, ही गोष्ट खरी; परंतु त्यांच्या अविकसित शक्तींचा योग्य वेळीं विकास होऊन तिला किती गोड फळें लागलीं असतीं, ह्याबद्दल आपणांला कशी कल्पना करतां येणार ? राष्ट्रांत प्रत्यक्ष दिसणाऱ्या आणि कालमानानें त्यांच्यांतून पुढें निर्माण होणाऱ्या इतर संस्कृती, संस्था आणि चालीरीती ह्यांपेक्षां आमची संस्कृति, आमच्या संस्था आणि चालीरीती ह्या निःसंशयपणें अत्यंत श्रेष्ठ आहेत असें मानण्याइतकें आपलें, जगाचें आणि ईश्वराच्या हेतूचें ज्ञान आपणांला असतें काय ? एखाद्या मानववंशाच्या ठायीं काय काय शक्ती असूं शकतील, ह्याचें आपणांला आगाऊ आकलन करतां येत नाहीं. संस्कृतीचा विकास एका दिवसांत होत नाहीं. दैवाची अधिक कृपा झाली असती आणि ' आपण अज्ञानी

आहों ' याची जाणीव राखून जर कमी उद्दामपणा दाखविला असता, तर मी छातीठोकपणें असें सांगतों कीं, रेड इंडियन लोकांच्या कर्तबगारीनें जगाच्या संस्कृतींत चांगलीच भर पडली असती ! मानवी प्राचीनत्व आणि मानववंशाचे निरनिराळे प्रकार यांच्याशीं तुलना केली असतां, आपली संस्कृति अगदीं अलीकडची आहे. सुधारलेल्या राष्ट्रामध्यें अग्रेसरत्वाचा मान पटकावलेल्या आजच्या प्रबल ब्रिटिशांच्या पूर्वजांपैकीं कांहीं पूर्वजांची फारशी प्रगति झाली नव्हती, असें जूलियस सीझरच्या वर्णनावरून प्रत्ययास येतें. पूजेच्या वेळीं कातडीं पांघरून आपल्या देवांना संतुष्ट करण्याकरितां जिवंत माणसें जाळणाऱ्या जंगली ब्रिटिश लोकांमध्यें इतक्या शक्ती सुप्तावस्थेंत असतील याची कोणाला कल्पना आली होती ? ट्यूटन[1] लोकांच्या पूर्वजांशीं परिचय असलेल्या कोणत्याहि माणसाची अशी अपेक्षा नव्हती कीं, वादनशास्त्र आणि अध्यात्मविद्या या बाबतींत ते इतकी गौरवपूर्ण कामगिरी बजावतील. मानवी प्राण्याच्या सुप्त शक्ती ( Potentialities ) इतक्या मोठ्या आहेत आणि वंशांवंशांतील मूलभूत भेदांचें आमचें ज्ञान इतकें कोतें आहे कीं, क्रूरपणें मुस्कटदाबी करणें आणि मानव-वंशांचा उच्छेद करणें हें शहाणपणाचें ठरणार नाहीं. मानवी स्वभाव आणि इतिहास यांचा अभ्यास, हा आपणांला रानटी आणि प्राचीन लोकांशीं, तसेंच जंगली आणि मागसलेल्या लोकांशीं, सहानुभूतीनें वागण्यास शिकवील. आणि आपणांला असें दिसून येईल कीं, ते सुद्धां दिव्य तेजानें झळकत राहिलेल्या ब्रह्माकडे नेणारी अरुंद आणि खऱ्या चढणीची वाट आपापल्या अल्प सामर्थ्याप्रमाणें चढत आहेत. प्रत्येक समाज, प्रत्येक जात—ती कितीहि मागसलेली असली तरी मानसिक विकासाचा एक नमुना आहे. अशा प्रत्येक नमुन्याला आपलें हृद्गत व्यक्त करण्याच्या कामीं मदत करणें व त्याला तसें शिक्षण देणें हें मानवसमाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें अवश्यक आहे. कोणत्याहि मानवसमाजाचें जीवन आणि मरण ह्यांचे परिणाम केवळ त्या मानवसमाजापुरतेच मर्यादित नसतात. मानव-वंश मागसलेले असतात याचें कारण त्यांच्या भोंवतालची प्रादेशिक, सामाजिक

---

१ ट्यूटन म्हणजे जर्मन.

आणि सांस्कृतिक परिस्थिति होय. या मानववंशांना बाह्य प्रोत्साहन दिलें असतां परिस्थितीशीं कसें जुळवून घ्यावें हें चांगलें समजतें.

५ उच्छेद करणें अशक्य असेल, तेव्हां जगांतलि प्रबल मानववंश इतर मानववंशांना आपल्या दास्यांत ठेवण्याचा मार्ग स्वीकारतात. दास्य पत्करणाऱ्याला जीवदान देणें आणि त्याविरुद्ध बंड करणाऱ्याला ठार करणें, हें त्यांच्या वागणुकीचें सूत्र असतें. जगांतील श्रेष्ठ मानववंशांनीं आफ्रिकेंतील कांगो नदीवर, ब्राझिलमध्यें, बॉक्सर बंडाच्या वेळीं पेकिंगमध्यें आणि आजच्या अमेरिकेंतहि भिन्नवर्णीयांशीं आपली वागणूक कशी आहे याचें जर एकवार स्मरण केलें तर त्यांची सदसद्विवेकबुद्धि "आपण न्याय्य रीतीनें वागलों" अशी ग्वाही त्यांस देईल असें वाटत नाहीं. लॉर्ड मिल्नरनें नुकताच असा कबुलीजबाब दिला आहे कीं, "ब्रिटिश साम्राज्य म्हणजे फक्त समान रक्ताच्या समाजांचा (ब्रिटिशांचा) बंधुसंघ ( Brotherhood ) असून त्यांतील ब्रिटिशेतर गुलाम देशांवर मात्र ब्रिटिशांचेंच वर्चस्व आहे." परंतु संस्कृति म्हणजे बुद्धिमान् लोकांकडून बौद्धिक दृष्ट्या कमी कार्यक्षम किंवा कमी बुद्धिमान् लोकांचें दमन नव्हे. ईश्वरानें आपणांस दुर्बल किंवा नालायक लोकांना गुलाम करण्याचा किंवा त्यांचा नाश करण्याचा हक्क दिलेला नाहीं एक मानववंश दुसऱ्याइतका बुद्धिमान् किंवा बलवान् नसला तरी "आपण आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या मानव—संघांना आपआपली उन्नति करण्यास समान संधि द्यावी" हें उच्चांत उच्च मानवी ध्येय आहे. प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याबद्दल आपणांला आदर असला पाहिजे आणि मागसलेलीं राष्ट्रें आपणांला अनुकूल असलेल्या ( Opportunities ) संध्यांचा उपयोग करून घेतलि आणि आपल्या ठळक, नैसर्गिक, विशिष्ट गुणांचा विकास करून घेतील अशा रीतीनें आपण त्यांचें मार्गदर्शक झालें पाहिजे.

६ थोड्या कालावधींत निरनिराळ्या मानववंशांमध्यें मोठ्या प्रमाणांत एकजीवता ( Fusion ) निर्माण करणें ही अशक्य गोष्ट आहे. कारण शतकानुशतकें चालत आलेली सामाजिक परंपरा आणि निसर्गतः प्राप्त झालेल्या आनुवंशिक गोष्टी ह्यांनीं स्वभाव, मानसिक वृत्ति आणि शरीरयष्टि ह्यांमध्यें ठळक भेद निर्माण केले आहेत. हे भेद तडकाफडकीं नष्ट होत नाहींत.

मानववंशाचा प्रश्न सोडविण्यास त्यांचें वैशिष्ट्य किंवा त्यांमधील भेद नष्ट करण्याची अवश्यकता नाहीं. ऐक्य म्हणजे सर्व बाबतींत तंतोतंत एकसारखे-पणा नव्हे.

७ दुसऱ्याच्या प्रगतीच्या आड न येतां प्रत्येक संघाला आपल्यांतलि उत्तमोत्तम बाबींचा विकास करण्यास संधि देणें हा लोकशाहीचा हितकारक ठरलेला एकमेव मार्ग हिंदु धर्मानें निरनिराळ्या मानववंशाचे झगडे मिट-वितानाहि स्वीकारला आहे. प्रत्येक ऐतिहासिक मानववंशाचें कांहीं ना कांहीं तरी अपूर्व वैशिष्ट्य असल्यामुळें त्यालाहि मानवी विकासात महत्त्वाचें स्थान आहेच; आणि म्हणून आपण त्याच्या व्यक्तित्वाबद्दल आदर दाखवावा, हें नीतिशास्त्रांतलि उच्चतम तत्त्व आहे. मानववंशांच्या दृष्टीनें विचार करता, जातिसंस्था ही मानवी समाजाच्या अनंत वैचित्र्याची साक्षच देते. वैदिक आर्यांनीं आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहों असें समजून हिंदुस्थानांतलि आपल्या जीवनास जरी कडक आणि संकुचित निर्बंध घालून सुरुवात केली, तरी लवकरच त्यांची दृष्टि व्यापक होऊन अखिल मानव—समाजाला लागू पडेल असा मानवधर्म त्यांनीं निर्माण केला. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या मानव-वंशांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करणारे लोक ‘ हिंदु समाजाचे स्रष्टे ’ म्हणून पूजिले जातात. दक्षिणेंत सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं रामानें मूळच्या अनार्य जातींचा उपयोग करून घेतला. त्यानें आर्य आणि आर्येतर लोक एकत्र आणले. कृष्णानें आणि बुद्धानेंहि तेंच केलें.

८ मूळच्या अनार्यांनीं आणि इतर जातींनीं जेव्हां हिंदु दृष्टिकोन मान्य केला तेव्हां त्यांनीं आपलें वैशिष्ट्य अजीबात सोडलें असें नाहीं; त्यांनीं जसा आपल्या विचारसरणींत फरक केला, तसाच उलट आत्मसात् केलेल्या हिंदु विचारसरणींतहि फरक घडवून आणला. हिंदु धर्मांत नव्यानेंच प्रविष्ट झालेला मानवसंघ आणि हिंदु धर्माचें जुनें तत्त्व यांमध्यें सारखाच फरक घडून आला. व्यापक हिंदु धर्मामध्यें मूळ जातींचा समावेश करण्यांत आला, तेव्हां त्यांना एक प्रकारची संधि मिळाली आणि त्यांच्यावर एक प्रकारची जबाबदारीहि येऊन पडली. त्यांना हिंदूंच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक जीवनाचा लाभ घेण्याची संधि मिळाली; आणि जीवनाची विचारसरणी,

नैतिक प्रगति आणि आध्यात्मिक श्रेष्ठता यांस, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्राच्या जीवनाला पोषक अशा सर्व गोष्टींस आपला हातभार लावण्याची जबाबदारीहि त्यांच्यावर येऊन पडली. प्रत्येक मानववंशानें आपल्या विशिष्ट पद्धतीनें हिंदु कल्पनांचा स्वीकार केला. ' अनार्य जातींची प्रगति खुंटली ' ह्या म्हणण्याला वाजवीपेक्षां फाजील महत्त्व देण्याची अवश्यकता नाहीं. त्यांना सुद्धां जंगलीपणाच्या कर्दमांतून बाहेर काढून सभ्यपणाची दीक्षा देण्यांत आली आहे. एकाच भूमीचा आश्रय घेतलेल्या व समान हित-संबंधांनीं बद्ध झालेल्या निरनिराळ्या घटक जातींची उत्पत्ति जरी वैचित्र्य-पूर्ण होती, तरी समान नैतिक आणि मानसिक परिस्थितीच्या वातावरणांत उत्क्रांत होत होत त्यांनीं केवळ आपला दर्जा वाढविला. एवढेंच नव्हे तर परस्पराच्या जीवनांत ते समरस झाले. मि० व्हॅलेंटाइन चिरोल म्हणतात, " इतिहासपूर्व कालांत हिंदु धर्माच्या लवचीक आणि सूक्ष्म शक्तींनीं नानाविध मानववंशांचीं परस्पर–विरोधी मतें आणि त्यांच्या तसल्याच चालीरीती एकत्र गुंफून एक व्यापक परंतु इतकी लवचीक संस्कृति निर्माण केली कीं, तिच्या लवचीकपणामुळें हिंदुस्थानांतील सर्व जाती तींत समावल्या गेल्या; परंतु तिच्यांतील टणकपणामुळें आर्य हिंदूंचें वर्चस्व मात्र कायम राहिलें. "

९ हिंदु विचारप्रवर्तकांनीं मानववंशांच्या विवेकशून्य संकराला उत्तेजन दिलें नाहीं. हिंदु शास्त्रांनीं अन्नाच्या आणि विवाहाच्या बाबतींत निरनिराळे समाज पाळीत असलेले निर्बंध मान्य केले. हलक्या समजल्या गेलेल्या जातींच्याहि, पुरातन काळापासून परंपरेनें चालत आलेल्या खास रूढी, तद्वतच नियम, मतें, फार काय पण निषिद्ध गोष्टी सुद्धां असतातच. जातीच्या प्रत्येक घटकाला जातीचे परंपरागत संस्कार मिळतातच. ह्या संस्कारांचा होणारा उपयोग आणि त्यांची वाहिवाट कशी होते, ह्यांवरून एक जात दुसऱ्या जातीपेक्षां भिन्न आहे कीं नाहीं हें ओळखतां येतें. विशिष्ट रूढि हेंच खरोखर जात ओळखण्याचें गमक[1] होय. दुसऱ्या जातींचीं मतें आणि रूढी ह्या जरी आपणांला ओबडधोबड आणि खोट्या दिसत असल्या तरी तीं मतें आणि त्या रूढी पाळल्यानें त्या जातींना स्वास्थ्य लाभतें

1 न कुलं कुलमित्याहुराचारः कुलमुच्यते ।

आणि इतर जातींशींहि त्या जाती सलोख्यानें नांदू शकतात, ही गोष्ट आपणांला नाकबूल करतां यावयाची नाहीं. प्रत्येक जातीच्या माणसांनीं आपापल्या जातीमध्यें लग्न करणें हें सामाजिक प्रतिष्ठेचें लक्षण मानण्यांत येतें. हलक्या जातीची स्त्रीहि परज्ञातीयाशीं—मग तो तिच्यापेक्षां श्रेष्ठ जातीचा असला तरी—लग्न करण्याचें नाकारील.

१० स्त्रीपुरुषांचे अनिर्बंध संबंध जातिसंस्था मान्य करीत नसली तरी भिन्न भिन्न जातींमधील लग्नादि व्यवहार, बहुवंशानें न कळत होऊं लागले आहेत आणि जातींजातींमधील ठळक फरकहि थोडथोडे कमी होत चालले आहेत. एकाच निर्भेळ मानववंशाचे संघ फक्त मूळच्या जंगली लोकांमध्येंच आढळून येतात, मानवसमाजाची प्रगति घडवून आणणाऱ्या जातींमध्यें आढळून येत नाहींत. हिंदु मानववंशामध्यें सामान्यतः परकीय रक्तानें मिश्रण झाले आहे आणि खुद्द हिंदु समाजांतील जातींजातींमध्यें सुद्धां ब्राह्मणापासून चांडाळांपर्यंत रक्तानें मिश्रण संथपणें चाललेलें आहे. जरी भरमसाट मिश्रणाच्या प्रवृत्तीला उत्तेजन देण्यांत आलें नाहीं, तथापि अनुलोम आणि प्रतिलोम विवाहांनीं जातींजातींमधील रक्तांच्या अंतर्मिश्रणाचें काळजीपूर्वक नियमन केलेलें आहे. मनु सवर्णीयामधील विवाहांची शिफारस करीत असला तरी तो अनुलोम विवाहा(रा ( उच्चवर्णीय पुरुष आणि खालच्या वर्णाची स्त्री ह्यांच्या विवाहाचा ) निषेध करीत नाहीं. जरी तो प्रतिलोम विवाहाचें (उच्चवर्णीय स्त्री आणि खालच्या वर्णाचा पुरुष ह्यांच्या विवाहाचें) समर्थन करीत नाहीं, तथापि तो असल्या विवाहापासून होणाऱ्या निरनिराळ्या संततीचें वर्णन करतो. जरी हे विवाह योग्य मानण्यांत येत नसले, तथापि ते प्रचलित होते यांत शंका नाहीं. निषिद्ध अथवा रूढीनें किंवा कायद्यानें अमान्य केलेल्या, परंतु थोड्या कालानंतर क्षम्य ठरलेल्या विवाह-पासून जी प्रजा निर्माण झाली, तिचें सामाजिक स्थान नियमित करण्यासाठीं ‘ मिश्र जाती ’ बनविल्या गेल्या. आज अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींपैकीं कांहीं जातींची उत्पत्ति अनिर्बंध संकरापासून झाली आहे, अशी समजूत आहे.

११ ह्या प्रश्नाचा विचार आपण करीत असतांना, असें म्हणतां येईल कीं, हिंदु समाज सर्वच प्रकारचे मिश्र विवाह अपायकारक आहेत असें

मानीत नाहीं. आणि म्हणून त्यानें ते सर्वच निंद्य ठरविलेले नाहींत. समान दर्जाच्या घराण्यांतील मिश्र विवाह समाजाला अत्यंत हितकारक होत असतात. याला विरोधक म्हणून युरेशियन लोकांचें शोचनीय उदाहरण वारंवार पुढें करण्यांत येतें; परंतु या दोन स्त्रीपुरुषांमध्यें जमीन–अस्मानाचा फरक असतो. शिवाय ज्या परिस्थितींत त्यांचा जन्म आणि त्यांचें शिक्षण झालेलीं असतात ती परिस्थिति उत्तम माणसांना सुद्धां अपाय केल्यावांचून राहणार नाहीं. हिंदी स्त्रीला भुलविणारा गोरा मनुष्य ती मातृपदारूढ झाली कीं बहुधा तिचा त्याग करतो, जन्माला येणारें मूल व्याभिचारजन्य ठरल्यामुळें त्याची निर्भत्सना होते व त्यामुळे त्याचें चांगलें पालणपोषण न होतां अनिष्ट परिस्थितींतच तें लहानाचें मोठें होतें. केवळ आनुवंशिक संस्कारांचाच नव्हे, तर परिस्थितींचाहि विचार करावयास पाहिजे.

१२ समान दर्जाच्या घराण्यांतील मिश्र विवाह समाजाला हितकारक असले तरी सवर्ण विवाहांचें तत्त्व उदात्त आहे. केवळ सवर्णीय विवाहांपासून होणाऱ्या आनुवंशिक संस्कारांचे परिणाम त्या विवाहांचें समर्थन करण्याइतके महत्त्वाचे असतात कीं नाहीं या प्रश्नावर निर्णय देणें हें कठिण काम आहे. निसर्ग ( Nature ) विरुद्ध जोपासना ( Nurture ) या मुद्द्यावर अद्यापिहि कडाक्याचे वादविवाद होतातच. लोकसत्तावाद्यांची अशी खात्री आहे कीं, आनुवंशिक पद्धतीनें मनुष्याच्या अंगांत मुरलेल्या विशिष्ट रक्तामुळें किंवा विशिष्ट संस्कारांमुळें उच्च–वर्णीयांचें श्रेष्ठत्व सिद्ध होत नाहीं. तथापि हिंदु विचारसरणीला प्राचीन ग्रीक मतांचा किंवा आधुनिक शास्त्राचा पाठिंबा आहे. आनुवंशिक संस्कारांवर ग्रीक लोकांचा विश्वास होता; म्हणून प्रत्यक्ष आपला वंश सुधारण्याच्या दृष्टीनें, 'दुर्बल किंवा कृश' अपत्यें जन्मलीं कीं तीं तणासारखीं निवडून काढून त्यांचा नाश करणें आणि सशक्त गोंडस मुलांची जोपासना करणें या पद्धतीचा त्यांनीं जोरानें पुरस्कार केला. इसवी सनापूर्वी सहा शतकें ग्रीक कवि 'मेगाराचा थिऑग्निस' यानें असें लिहिलें आहे कीं, "शुद्ध बीजापोटीं, फळें रसाळ गोमटीं" या तत्त्वावर विश्वास ठेवून आपण मेंढ्या, गाढवें व घोडे यांची निवड करतांना तीं उत्तम अवलादीचीं आहेत अशाबद्दल खात्री करून घेतों. असें असून सुद्धां सदाचारी पुरुषाला कुलहीन मनुष्याच्या कुटिल मुलीशीं लग्न लावण्यामध्यें दिक्कत वाटत

नाहीं,......उच्च कुलाचा नीच कुलाशीं संबंध जडल्यामुळें आपला वंश बिघडला आहे याबद्दल त्याला हळहळ वाटत नाहीं. '' ' वंश सुधारण्याची उत्तम पद्धति म्हणजे जीवशास्त्रा( Biology )ला अनुसरून केलेली निवड होय ' या प्लेटोच्या मताशीं आपण सगळे परिचित आहों. उत्तम अवलादीचीच वाढ करावी असें ॲरिस्टॉटलचें सुद्धां मत होतें. ' सर्व मानवी प्राणी निसर्गतःच समान दर्जाचे आहेत ' या मतावर अठराव्या शतकामध्यें अधिकाअधिक जोर देण्यांत येत होता. अमेरिकन आणि फ्रेंच स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचे आद्य विचारप्रवर्तक अनुक्रमें लॉके आणि रूसो यांचीं मतें मान्य करून एकोणिसाव्या शतकांतील सुप्रसिद्ध आंग्ल ग्रंथकार बकल[1] यांनीं असें प्रतिपादन केल आहे कीं, मऊ मातीला ज्याप्रमाणें आपण वाटेल ते घाट देऊं शकतों, त्याप्रमाणें मानवी प्राण्यांमध्यें सुद्धां परिस्थितीप्रमाणें परिवर्तन घडत असतें. आधुनिक शास्त्रें मात्र असें प्रतिपादन करतात कीं, हें मत व्यक्त करतांना बकलनें परिस्थितीचें महत्त्व फुगवून सांगितलें आहे. प्रगति केवळ परिस्थितीमध्यें फरक घडवून आणण्यावर अवलंबून राहत नाहीं. ' आनुवंशिक संस्कारांच्या भांडवलावर उत्क्रांति होत असते,' हें डार्विनचें[2] तत्त्व गाल्टनें[3] वेसिमन (Weismnan) आणि डेव्ह्रीस ( De Vries ) यांसारख्या जीवशास्त्रज्ञांनीं उचलून धरलें; त्यामुळें आज ' सुप्रजाजननशास्त्र ' हें कांहींसें सुरक्षित आणि मजबूत पायावर उभारलें गेलें आहे. बीजजंतूंना काळजीपूर्वक अलग करून, त्यांच्यावर बाह्य संस्कार होणार नाहींत अशी खबरदारी घेतली, तर जंतू आपल्या आगाऊ ठरलेल्या क्रमाप्रमाणें उत्क्रांतीचा मार्ग आक्रमण करीत असतां, त्यांच्यामधील प्रवाही द्रव्यामध्यें स्वतःचा विकास करण्याची शक्ति किती आश्चर्यकारक असते हें दिसून येतें. जंतूंच्या उत्क्रांतीच्या मार्गांत जरी

---

१ ह्यांनीं ' The History of the Civilisation of England ' हा ग्रंथ लिहिला आहे.

२ डार्विन ( १८०९ ते १८८२ ), सुप्रसिद्ध आंग्ल जीवशास्त्रज्ञ. यानीं ' उत्क्रांतिवाद ' शोधून काढला.

३ गाल्टन ( १८२२ ते १९११ ), नामांकित आंग्ल शास्त्रज्ञ व 'सुप्रजाजननशास्त्रा'च्या अभ्यासाचा उत्पादक. ' गुन्हेगारांच्या अंगठ्यांचे ठसे ' घेण्याची कल्पना ह्याच्या लिखाणातून निघाली.

ढवळाढवळ करण्यांत आली, तथापि विरोधाला जिंकून आपला नेहमींचा मार्ग पुनः स्वीकारण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. आपल्या शरीरांतील प्रत्येक पेशीमध्यें चिमुकले रंगग्राही तंतू ( Chromosomes ) असतात. ते जवळजवळ आपलें अस्तित्व, उंची, वजन, आकार, वर्ण, प्राणशक्ति, स्वभाव आणि बुद्धि ठरवितात. आपल्या शरीरांतील प्रत्येक पेशींतील रंगग्राही तंतूंपैकीं अर्धे बापापासून आणि अर्धे आईपासून मिळतात आणि ते आपल्या आई-बापांचे गुण आपल्यामध्यें अत्यंत बिनचूकपणें संक्रमण करीत असतात. आपल्या आईबापांचा, आजोबांचा किंवा पणजोबांचा मूर्खपणा किंवा वेडेपणा आपल्या मुलांमध्यें किंवा मुलांच्या मुलांमध्यें उतरेल. कदाचित् चांगली प्रेरणा झाली म्हणून म्हणा किंवा तत्त्व अनुभवाला पटलें म्हणून म्हणा, पण विचारवन्त हिंदु लोकांनीं आनुवंशिक संस्कारांची गोष्ट गृहीत धरली आणि जवळजवळ समान चालीरीतींच्या आणि दर्जाच्या व्यक्तींच्या लग्नांना उत्तेजन दिलें. उच्च दर्जाच्या कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीनें कुलहीन घराण्यामधल्या कुटुंबांतील व्यक्तीशीं लग्न लाविलें तर एकाचे चांगले अनुवंशिक गुण दुसऱ्याच्या अवगुणांमुळें विकृत होतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, मुलाला आयुष्याच्या सुरुवातीलाच पुष्कळ अडचणींशीं झुंजावें लागतें. जर समान घराण्यांतील आईबाप असतील तर मुलांमध्यें जवळजवळ आईबापांचे गुण उतरतील. रक्ताचा परिणाम [1]झाल्यावांचून

---

१ काहीं दिवसापूर्वीं Popular Science Siftingsमध्ये मार्टिन कलाकक नांवाच्या मनुष्याची मनोरंजक हकीकत देण्यात आली आहे — " मार्टिन कलाकक हा एक (फ्रेंच) राज्यक्रांतिकारक युद्धामधील तरुण सैनिक होता. त्याचे पूर्वज थोर होते. युद्धकालीन सर्व-सामान्य शैथिल्य आणि असामान्य सामाजिक परिस्थिति ह्यामुळे त्याला आपल्या थोर घराण्याचा विसर पडला. एका सुंदर परंतु कोत्या मनाच्या मुलीवर त्याचं प्रेम जडले. त्या प्रेमाचा परिणाम म्हणजे त्याला एक दुर्बल मनाचा मुलगा झाला. मोठा झाल्यावर त्याने आपल्यासारख्याच हलक्या दर्जाच्या मुलीशी लग्न लाविले. त्याना पुष्कळ संतति झाली ह्या मुलानी आपल्याच दर्जाच्या मुलींशीं लग्ने लाविलीं. आणि आता सहा पिढ्या झाल्या, तो वंश वाढत आहे ह्या घराण्यानें आपल्या वंशाचं मूळ थेट मार्टिन कलाकक आणि ती अज्ञात मुलगी यांपर्यंत भिडविले असून त्याच्या अधःपतनाच्या पहिल्या रात्रीपासून आतापर्यंत त्यांच्या वंशाचा विस्तार ४८० वंशजांचा झाला आहे. ह्यापैकी १४३ दुर्बल मनाचे, ३३ अनीतिमान्, ३६ बेकायदेशीर, ३ फेप्रां, ३ गुन्हेगार आणि ८ वेश्यागाराचे चालक आहेत.

हें एक चित्र झाले; आतां दुसरे चित्र पाहाः—

[ पुढील पृष्ठाखाली समाप्त. ]

राहत नाहीं. परिस्थितीची सर्व प्रकारें मदत मिळूनाहि सामान्य माणसांतून बुद्धिमान् माणूस किंवा जन्मतः मूर्ख मनुष्यापासून चांगला कर्तबगार मनुष्य निपजूं शकत नाहीं.

१३ ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, निसर्गच सर्व घडवून आणतो आणि जोपासनेमुळें कांहींच घडून येत नाहीं. जाति आणि तिचा दर्जा ह्यांवर जोपासनेचें स्वरूप अवलंबून असतें. जोंपर्यंत जातिव्यवस्था होती, तोंपर्यंत निसर्ग आणि जोपासना ह्यांचें सहकार्य असे. व्यक्तीच्यांप्रमाणें समाजाचेहि आनुवंशिक संस्कार असतातच. प्रत्येक पिढीनें जागरूक राहून प्रयत्न केला, तर ती समाजाचे गुण सम्पादन करूं शकते.

१४ सामाजिक व्यवस्थे( Social Order )च्या आत्मघात जर आपणांला टाळावयाचा असेल तर विवाहाच्या बाबतींत कांहीं निर्बंध पाळले पाहिजेत. विवाह आपल्या स्वतःच्या जातीच्याच स्त्री–पुरुषांशीं व्हावे, अशी अवश्यकता नाहीं; परंतु ते जवळजवळ समान संस्कृतीच्या आणि समान सामाजिक विकासाच्या लोकांमध्यें व्हावे. कारण व्यक्तीच्या प्रमाणें जातींची सुद्धां अवनति होत असते. मुलांनीं आपल्या वडिलांचेच धंदे करावे अशी अपेक्षा असल्यानें, श्रेष्ठ व्यक्तींना आपल्या जातीपेक्षां उच्च जातींत समाविष्ट होण्यास परवानगी नाहीं आणि जातींतील कनिष्ठ प्रकारच्या लोकांना त्यांना अनुरूप अशा खालच्या जातींत ढकलण्याची योजना नाहीं. आहे या स्थितींत, जातिसंस्थेनें उच्चवर्णीय नालायक लोकांना खालच्या जातींत ढकलण्याची आणि नीचवर्णीय बुद्धिमान् लोकांना वरच्या जातींत प्रवेश मिळवून देण्याची सोय केलेली नाहीं. शिक्षण देऊन आणि नैतिक बाबतींत मन वळवून दुर्बल आणि हलक्या लोकांना अधिक प्रभावशाली करण्यासाठीं

---

मूळ पुरुष मार्टिन याने मात्र, ह्या वन्य फळाच्या (Oats) बेमुमार पिकाचे बीजारोपण केल्यावर एका थोर घराण्यातल्या आणि उत्तम बुद्धिमान् अशा तरुण क्रेकर स्त्रीशी लग्न लाविले. ह्या दांपत्याचे सरळ ४९६ वंशज आहेत ह्यापैकी पुष्कळसे गव्हर्नर, सैनिक, डॉक्टर, वकील, न्यायाधीश, शिक्षणशास्त्रज्ञ, जमीनदार, उपयुक्त नागरिक (एक एका मोठ्या विश्वविद्यालयाचा संस्थापक) आणि सामाजिक जीवनाच्या प्रत्येक अंगात प्रामुख्याने भाग घेणारी अशी प्रशंसनीय मातापितरे आहेत यापैकी प्रत्यक्ष पुरावा देणारा शेवटचा वंशज एक श्रीमंत वजनदार गृहस्थ आहे ”

शक्य तेवढे सर्व प्रयत्न करण्यांत यावे. अनिर्बंध वैवाहिक संबंध हे नेहमींच स्पृहणीय असतात असें नाहीं.

१५ निरानिराळ्या मानववंशांमध्यें मोठाले बखेडे निर्माण न करतां, हिंदु धर्मानें क्रमाक्रमानें त्यांच्यामध्यें सलोखा घडवून आणला आहे. निर-निराळ्या मानववंशांची सामाजिक संघटना करण्याच्या दृष्टीनें भिन्न जातींच्या एकीकरणास सुरुवात झाली. हिंदु समाजानें आत्मसात् केले नाहींत असें पुष्कळ निसर्गोपासक[1] आहेत, याबद्दल शंका नाहीं. हिंदु लोकांनीं जेव्हां आपलें स्वातंत्र्य गमावलें तेव्हांपासून निरनिराळ्या जातींचें एकीकरण करून त्यांमध्यें सुधारणा घडवून आणण्याचें काम थांबलें. आतां मात्र ' या बाब-तींत कांहीं तरी केलें पाहिजे ' या जबाबदारीची जाणीव हिंदु पुढाऱ्यांना हळूहळू होऊं लागली आहे.

१६ जातिसंस्थेनें कोणती कामगिरी केली आणि निरनिराळ्या जातींची उन्नति कशी झाली या मुद्द्याकडे आतां वळतों. हिंदु धर्मावर बाहेरून जे हल्ले झाले त्यांचा प्रतिकार जातिसंस्थेनें केला. जातिसंस्थेमार्फत, हिंदु धर्मानें आपल्यामध्यें समाविष्ट केलेल्या मूळ जंगली समाजाची सुधारणा घडवून आणली. कोणताहि लोकसंघ, कोणत्याहि दृष्टीनें इतरांपासून अलग असा दिसूं लागला कीं, तेवढ्यांची एक जात समजण्यांत येत असे. जेव्हां एकएक संघ मानव–वंशाच्या एकएका नमुन्याचा प्रतिनिधिरूप बनला तेव्हां जात निर्माण झाली. धर्माच्या मूलतत्त्वांमध्यें जर पाखंड निर्माण झालें आणि त्याचा प्रसार होऊन एक संघ निर्माण झाला, तर पाखंड्यांची नवी जात निर्माण होई. हिंदु समाजानें बुद्धीला पटतील असे जितके नमुने करणें शक्य होतें, तितके नमुने केले आहेत; आणि जसजसे नवीन नमुने निर्माण होतील तसतसा त्यांचाहि समावेश करून घेण्याची त्याची तयारी आहे. हिंदु समाज म्हणजे, विविधता (परंतु तींतहि व्यवस्थितपणा), वैचित्र्य (परंतु त्यांतहि सुसंवादित्व), एकता (परंतु तींतहि अनेकता), इत्यादि गुणांचा आदर्श आहे. विश्वाच्या रचनेची किल्लीहि या आदर्शांतच सांपडते.

१७ आज पुष्कळ तेजस्वी लेखक, निरानिराळ्या मानववंशांमध्यें

---

१ पञ्चमहाभूतांना देव मानणाऱ्या असंस्कृत जाती.

जगड्व्याळ लढा होईल असा इषारा आपणांस देत आहेत. प्रत्येक मानववंशाचा स्वाभिमान जागृत होऊं लागला आहे, ही आपल्या काळाची विशिष्ट गोष्ट आहे. निरनिराळ्या वर्णांचे लोक जगाच्या नियंत्रणामध्यें आपापला भाग असावा, याबद्दल हाकाटी करीत आहेत. राजकीय दृष्टया गुलाम असलेले लोक स्वातंत्र्याची मागणी करीत आहेत. ज्या देशांतील लोक वसाहती करण्यासाठीं बाहेर पडतात तो देश आणि ज्या देशांत ते वसाहत करतात तो देश अशा दोन राष्ट्रांमधील झगडा अत्यंत तीव्र असतो. जेव्हां दुर्बल, अज्ञानी आणि आळशी मानववंशांचा उच्छेद करण्यांत आला किंवा त्यांना कह्यांत ठेवण्यांत आलें, तेव्हां या पद्धतीच्या समर्थनार्थ असें सांगण्यांत आलें कीं, "मूळच्या जंगली लोकांनीं आपलें वसतिस्थान सुरक्षित राहील अशी अपेक्षा करतां कामा नये; कारण शेतें पडीत ठेवणें आणि भूगर्भांतील खनिज संपत्ति तशीच खणल्यावांचून राहूं देणें हें इतःपर जगाला परवडणार नाहीं. अर्थात्‌च अशा सधन प्रांतांचें स्वामित्व ज्यांस यदृच्छया प्राप्त झालें, ते जर आळसामुळें त्या साधनसंपत्तीचा भरपूर उपयोग करून घेत नसतील, तर पडीत जमिनी लागवडीस आणणाऱ्या लोकांकडून अशांची हकालपट्टी होणें अवश्यक आणि न्याय्य ठरेल. अहेतुकपणें भटकत असतां एखाद्या जातीनें ज्यांचें अस्तित्व आणि ज्यांचा उपयोग यांपैकीं कशाचीच माहिती नाहीं अशा हिऱ्यांच्या खाणी अगर तेलांच्या विहिरी यांजवळ वस्ती केली, एवढ्यावरूनच त्या खाणीवरील तिचा निरपवाद हक्क सिद्ध होत नाहीं. 'आपला देश फक्त आपल्यापुरताच' असा संकुचितपणा कोणालाहि करतां यावयाचा नाहीं. कारण जगाच्या गरजा लक्षांत घेणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे." वरील विचारसरणी ठीक आहे; परंतु सध्यांच्या परिस्थितीला मात्र ती लागू करण्यांत येत नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. कारण, एकीकडे लोकसंख्येची बेसुमार वाढ झाल्यानें हजारों लोक आपले देश सोडून कामाच्या शोधार्थ इतरत्र कोठें तरी जातात आणि दुसरीकडे अगदीं विरळ लोकसंख्या असलेल्या प्रदेशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची वाढ करण्याकरितां बुद्धिमान् मजुरांची अवश्यकता भासत असते. अशा दोन देशांत सहकार्य घडून येण्यास योग्य सवड मिळत नाहीं. निरनिराळ्या वर्णांच्या लोकांना अमेरिका, ऑस्ट्रे-

लिया, दाक्षिण आफ्रिका इत्यादि प्रदेशांत जाण्याची मनाई आहे. लॅटिनें अमेरिकेची लोकसंख्या फार विरळ असल्यानें सध्यांच्या दसपट लोकांचा तेथें सहज समावेश होऊन, पिकांची अमर्यादपणें वाढ होऊं शकेल. कांहीं प्रदेशांत लोकसंख्येची वाढ होण्यासाठीं धडपड सुरू असते तर कांहींमध्यें लोकसंख्येची वाढ बेसुमार झालेली असते; असें असून सुद्धां वंशाभिमानानें आणि सत्तेच्या लोभानें प्रेरित झालेलीं माणसें 'न्याय' आणि 'आर्थिक अवश्यकता' वगैरे सर्व विचार गुंडाळून ठेवतात. मानववंशीय प्रश्न सोप्या रीतीनें सोडविण्याच्या मार्गांत येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणींचा विचार करण्याचा माझा हेतु नाहीं. या अडचणी मोठ्या आहेत; परंतु 'वसुधैवकुटुम्बकम्' अशी आपली भावना ठेवल्यानें आणि आपल्या सर्व व्यवहारांत या वृत्तीनें वागण्याचा प्रयत्न केल्यानें त्या सोडविणें शक्य आहे. ज्या जगामध्यें प्रत्येक मानववंशाला आपल्या खास विशिष्ट गोष्टींना चिकटून राहण्याला आणि त्यांतील उत्तम गोष्टींचा निकाल करण्याला वाव आहे आणि सर्व वंशांना एकत्र आणून त्यांच्यामध्यें समरसता उत्पन्न करणें शक्य आहे असें जग निर्माण करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

१८ हिंदु धर्माच्या इतिहासांत, अगदीं प्रारंभींच, 'निरनिराळ्या जाती म्हणजे स्थिर झालेल्या हिंदु समाजाचे निरनिराळे थर' असें मानण्यांत येऊं लागलें. एकत्र राहणाऱ्या कुलसंघांसाठीं केलेले नियम आणि निरनिराळ्या धंद्यांतील लोकांसाठीं केलेले नियम यांचा गोंधळ होऊन कुलसंघांचें वैशिष्ट्य राखण्यासाठीं केलेल्या नियमांचेंच जातिनियमांच्या कडक निर्बंधांत रूपांतर झालें. या चालीरीतींमुळें जातींना एक प्रकारचा एकलकोंडेपणा आला. ह्या एकलकोंडेपणाचा परिणाम जातींच्या घटनेचे नियम अधिक कडक करण्यांत झाला. सामाजिक दृष्टीनें पाहिलें असतां जात म्हणजे देवानें निर्माण केलेलें गूढ नसून मानवी संघटनेचें एक फल आहे. जात म्हणजे व्यवहारांत प्रत्यक्ष आढळून येणाऱ्या भिन्न भिन्न रूढी, चालीरीती आणि समाजाचें आदर्श स्थितींत आढळून येणारें ऐक्य ह्यांचा विचार करून समाजाचें निय-

१ लॅटिन अमेरिका म्हणजे दक्षिण अमेरिका. (आर्यवंशाचे जे लॅटिन गट आहेत त्यामध्यें फ्रेंच, स्पॅनिश आणि इटालियन लोकांचा समावेश होतो.) —अनुवादक.

मन करण्याचा झालेला प्रयत्न होय. जातींचा उल्लेख प्रथम 'पुरुषसूक्तां'त आला आहे. त्यांत समाजाचे निरनिराळे भाग हे परमात्म्याचे अवयव मानण्यांत आले आहेत. मानवी समाज ही एक संपूर्णपणें जिवंत अशी संस्था आहे. या संस्थेचे निरनिराळे भाग स्वाभाविकपणेंच परस्परांवर अशा रीतीनें अवलंबून आहेत कीं, प्रत्येक भाग आपापलीं विशिष्ट कृत्यें करीत असतां बाकीच्या भागांनींहि आपापलीं कामें केलीं पाहिजेत अशी अपेक्षा करतो आणि त्या भागानें सुद्धां आपलें काम केलें पाहिजे अशी इतरांचीहि अपेक्षा असते. याप्रमाणें सर्वांचे प्रत्येक भागाशीं संबंध असून सर्वांना प्रत्येक भागाची अवश्यकताहि आहे. आपल्या गरजा पुरविण्याचें काम करणारे संघ प्रत्येक समाजामध्यें असतात. निरनिराळे संघ एकाच ध्येयाकरितां काम करीत असल्यानें ते सामाजिक बंधुभावानें आणि ऐक्याच्या भावनेनें बांधलेले असतात. ब्राह्मण ( समाजाचें सांस्कृतिक आणि आध्यात्मिक काम करणारे ), क्षत्रिय ( लष्करी आणि राजकीय काम करणारे ), वैश्य ( आर्थिक काम करणारे ) आणि शूद्र ( वरील तीनहि वर्णांची सेवा करणारे मजूर ) अशी चतुर्विध जातिसंस्था आहे. मानवी कर्तव्यें स्पष्टपणें अलग करण्यांत आलीं आणि त्यांचें स्वतंत्र आणि परस्परावलंबी वैशिष्ट्य मान्य करण्यांत आलें. प्रत्येक जातीला विशिष्ट सामाजिक कार्य आणि हेतु असून तिचे नियम आणि तिची परंपरा निश्चित असतात. जात म्हणजे अन्न आणि लग्न यांसंबंधीं कांहीं चालीरीती पाळणारी संघटित संस्था होय. तिची कांहीं तरी विशिष्ट अशी परंपरा असतेच. तशीच तिची एक स्वतंत्र घटनाहि असते. दुसऱ्यांच्या ढवळाढवळीपासून मुक्त अशी प्रत्येक जात आपल्या ध्येयाप्रमाणें वागण्यास स्वतंत्र असते. निरनिराळ्या जातींची कामें सर्वंध हिंदुसमाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें सारख्याच महत्त्वाचीं आहेत असें मानण्यांत येई. अध्ययन–अध्यापन करणाऱ्या ब्राह्मणाचें गांभीर्य, क्षत्रियाचें शौर्य, वैश्याचा प्रामाणिकपणा आणि शूद्राची कार्यक्षमता आणि सहिष्णुता हीं सर्व सामाजिक विकासाला कारणीभूत होतात. प्रत्येक वर्ग आपापल्या परीनें पूर्ण असतो.

**१९ हिंदु समाजांतलि निरनिराळ्या वर्णांचे व्यवहार परस्परांना पोषक होतील अशा रीतीनें जातींचे नियम तयार करण्यांत आले आहेत.** आध्या–

त्मिक ध्येयांचा विकास करून त्यांचा प्रसार करण्यासाठीं ब्राह्मणांना स्वातंत्र्य आणि फुरसत देण्यांत आली होती. त्यांना दान करण्याकरितां इतर वर्णांना उत्तेजन देण्यांत येत असे एवढेंच नव्हे, तर धर्मशास्त्रांतून तशी आज्ञाहि असल्यामुळें उदरनिर्वाहाच्या काळजींतून ते मुक्त होते. त्यांची दृष्टि विशाल आणि निःपक्षपाती असून त्यांचा कोणत्याहि वर्गासंबंधीं लळा किंवा दुराग्रह नसे. सरकार जरी त्यांची सल्ला घेत असे तरी ते सरकारचे मिंधे नसत. समाजाचा एक संघ या दृष्टीनें 'सरकार' ही मुख्यतः लष्करी बाण्याची संस्था होती. शांतता आणि सुव्यवस्था राखणें आणि निरनिराळे वर्ण सलोख्यानें राहून त्यांच्यात्यांच्यावर सोंपवून दिलेल्या कामांसंबंधीं घोंटाळे उत्पन्न होऊं देत नाहींत एवढी खबरदारी घेणें हें सरकारचें विशिष्ट कर्तव्य होय. सरकार ही अंमलबजावणी करणारी संस्था असल्यानें तिनें लोकांच्या कल्याणाच्या गोष्टी घडवून आणाव्या अशी तिच्यापासून अपेक्षा आहे. ब्राह्मण हे सरकारचे सल्लागार असल्यानें, समाजाचें खरें कल्याण कशांत आहे हें ते दाखवून देतात.

२० समाजाच्या राजकीय आणि आर्थिक जीवनाला आध्यात्मिक जीवनापासून स्फूर्ति मिळावी अशी अपेक्षा असते. या तत्त्वामुळें ' सरकार ' म्हणजे ' केवळ लष्करी अरेरावी गाजविणारी संस्था ' असें होण्याची धास्ती राहिली नाहीं. राजाचें व्यक्तिविषयक सुख हें राजसत्तेचें साध्य मानलेलें नसून प्रजेचें कल्याण हेंच राजसत्तेचें अंतिम साध्य मानण्यांत आलें आहे. ज्याप्रमाणें धर्म ही समाजाचें धारण, पोषण आणि कल्याण करणारी संस्था आहे, त्याप्रमाणें सरकार म्हणजे जीवनाचा उत्तम विकास होण्याला सर्वस्वीं अनुकूल परिस्थिति निर्माण करून देणारी राजकीय संस्था होय. ' सरकार ' या संस्थेमध्यें ' व्यापारी संघ ' आणि ' कुटुंबव्यवस्था ' इत्यादिकांचा समावेश करण्यांत आला नाहीं. सरकार हें कला, शास्त्र, धर्म इत्यादि बाबतींत ढवळाढवळ करीत नसे; परंतु त्या सर्वांना अवश्यक असलेल्या 'शांतता' आणि ' स्वातंत्र्य ' यांसारख्या बाह्य गोष्टी संपादन करून देणें हें मात्र त्याचें कर्तव्य समजलें जात असे. आज सरकारचीं कामें जवळजवळ अमर्यादित झालीं आहेत. त्यांचा व्याप बहुतेक संपूर्ण सामाजिक जीवनापर्यंत जाऊन पोहोंचला आहे.

२१ अहिंसेच्या तत्त्वावर हिंदु समाजाची आसक्ति असूनहि समाजानें आपल्या चार वर्णांमध्यें 'बल'—उपासक क्षत्रिय वर्णाची योजना केली आहे. जोंपर्यंत मनुष्यस्वभाव सध्यां आहे तसाच राहणार आहे, जोंपर्यंत समाजानें उच्चत्तम ध्येय साध्य केलेलें नाहीं, तोंपर्यंत आपल्या शारीर बलाची (Force) गरज भासणारच. जोंपर्यंत 'शांतता' आणि 'सुव्यवस्था' यांचा प्रतिकार करणाऱ्या व्यक्ती असतील, तोंपर्यंत समाजानें समाजविरोधी गोष्टींचें नियंत्रण करण्याकरितां दमनाचे प्रकार वाढविलेच पाहिजेत. जेव्हां समाजरूपी मंदिर युद्धानें किंवा अंतर्गत फुटीनें खिळाखिळें होतें, तेव्हां समाजविरोधी गोष्टींचें केंद्रीभवन होऊन त्यांचा बंडामध्यें स्फोट होतो. इंग्लंडमध्यें नऊ दिवसपर्यंत चाललेल्या सार्वत्रिक संपामध्यें फार थोडे गुन्हे झाले आणि अत्यल्प गुंडगिरी झाली, याचें श्रेय ग्रेटब्रिटनच्या समाजमंदिराचे थर सापेक्षतया मजबूत होते या गोष्टीला दिलें पाहिजे.

२२ वैश्यांना आपल्या लोभाला आळा घालून संपत्तीबरोबर येणारी नैतिक जबाबदारी पत्करावी लागे. 'संपत्ति' हें सेवेचें साधन मानण्यांत येई. हिंदु धर्माच्या भरभराटीच्या काळांत श्रीमंत मनुष्यें आपली संपत्ति ही 'समाजाची ठेव' आहे असें मानून शिक्षण, वैद्यकीय मदत, पाण्याचा पुरवठा आणि समाजाचें मनोरंजन यांसाठीं आपल्या संपत्तीचा उपयोग करीत असत. दुर्दैवानें हल्लीं जगांतलि बहुतेक सर्व भागांत द्रव्यार्जनाचा इतका ताण पडत आहे कीं, द्रव्यार्जनाच्या पायींच पुष्कळांची सर्व शक्ति खर्च होत आहे. लोभ हा सामाजिक जीवनाचा बींमोड करीत असून आध्यात्मिक जीवनाचा कोंडमारा करण्याकडे त्याची प्रवृत्ति होत आहे. संपत्ति हें स्वार्थी विलासाचें साधन झालें आहे. जगामध्यें पुष्कळ प्रमाणांत आढळून येणारी 'क्षुद्रता' आणि 'क्रौर्य' यांचें कारण सार्वत्रिक 'लोभ' होय. 'धर्म आणि व्यवहार यांचें मिश्रण करणें म्हणजे त्या दोनहि गोष्टींचा बिघाड करणें होय' हें मत हिंदु धर्माला मान्य नाहीं. हिंदु धर्म म्हणतो कीं आपण जीवनापासून शाश्वत महत्त्वाच्या गोष्टींची फारकत करतां कामा नये.

२३ सामान्य मजूर आणि शेतकरी या दोहोंचा मिळून गरीब वर्ग होतो. आपल्या स्वतःची सर्वांगीण उन्नति करण्याकरितां झटणाऱ्या आणि दुसऱ्याशीं सहकार्यानें वागणाऱ्या जाती हीं सामाजिक शरीराचीं साक्षात् जिवंत

अंगें होत. हिंदु धर्मामध्यें जेव्हां एखादा नवीन संघ दाखल करण्यांत येतो, तेव्हां त्याला चार वर्णांपैकीं कोणत्या तरी वर्णांत समाविष्ट करण्यांत येतें. बाहेरच्या पुष्कळ मानव-वंशांना 'क्षत्रिय' म्हणून हिंदु समाजांत दाखल करण्यांत आलें. श्री० जॅकसन लिहितातः— "हिंदुस्थाननें मध्य आशियांतील भटकणाऱ्या जातींना नम्र बनवून त्यांच्यामध्यें कशी सुधारणा घडवून आणली हें ज्या हिंदी लोकांना बरोबर कळलें नाहीं त्यांची हिंदुस्थानच्या थोरपणाबद्दलची कल्पना अगदीं कोती आहे. हिंदुस्थाननें मध्य-आशियांतील भटकणाऱ्या जातींना इतकें सुसंस्कृत केलें कीं, त्यांच्यांतील तुर्कोमन लोकांसारख्या रानटी लोकांची उत्क्रांति होत होत त्यांच्यांतूनच पुढें अतिप्रसिद्ध रजपूत घराणीं उदयास आलीं[1]."

२४ सामाजिक जीवनाची मध्यवर्ती कल्पना 'प्रेमशून्य आणि निर्दय स्पर्धा' ही नसून 'सलोखा आणि सहकार्य' यांवर जातिसंस्थेचा कटाक्ष आहे. समाज म्हणजे व्यक्तींव्यक्तींमधील स्पर्धाक्षेत्र नव्हे. जातींजातींनीं परस्परांशीं स्पर्धा करणें या गोष्टीचा हिंदु धर्मानें निषेध केला आहे. एका विशिष्ट जातींत जन्मलेल्या मनुष्याचें धारणपोषण जर त्या जातीच्या रूढीप्रमाणें झालें तर त्याचे संस्कार इतके बलवत्तर असतात कीं, त्या जातीबाहेरील नव्या परिस्थितीशीं जुळवून घेणें त्याला फार जड जाईल. प्रत्येक मनुष्याच्या विशिष्ट जातिकर्माप्रमाणें त्याचा विशिष्ट स्वभाव बनत असल्यानें जाती बदलण्यास प्रोत्साहन देण्यात येत नाहीं. मनुष्यानें जीं कामें करावयाचीं त्यात जर एकदम फरक घडून आला आणि तीं कामें योग्य रीतींनीं करण्याकडे त्याची प्रवृत्ति नसली तर त्याचें व्यक्तित्वच नष्ट होईल. आपल्या जीवनाच्या विशिष्ट पद्धतींमध्यें फरक घडवून आणण्याची इच्छा आपण करीत असतों; परंतु ती इच्छा अंमलांत आणण्याची शक्ति आपणांला नसते. आपल्या इच्छेप्रमाणें, निसर्गांत झपाट्यानें फेरबदल घडवून आणणें शक्य नाहीं. हिंदु धर्मांतील चार वर्ण हे निरानिराळ्या सद्गुणांचे प्रतिनिधि आहेत. ब्राह्मण म्हणजे विचारवान्, क्षत्रिय म्हणजे क्रियावान्, वैश्य म्हणजे भावनावान् असून शूद्रामध्यें मात्र यांपैकीं कोणत्याहि एका

---

[1] Indian Antiquary, January 1911.

सद्‌गुणाचा विशेष विकास झालेला नाहीं[1]. याचा अर्थ एवढाच कीं ते ते गुण त्याच्यामध्यें प्रकर्षानें वास करीत असतात; दुसरे गुण त्यांच्यांत नसतात असें नाहीं. सर्व गुणांच्या निरानिराळ्या प्रमाणांतील मिश्रणामुळें संकर आणि मिश्र जाती झाल्या आहेत. चातुर्वर्ण्य हें गुणकर्मविभागशः झालें आहे असें गीतेचें वचन[2] आहे. गुणाला अनुसरून कर्म होत असतें आणि आपल्या स्वभावांतील गुणदोष आपण हळूहळूच बदलूं शकतों. प्रत्येक व्यक्तीची नैसर्गिक प्रवृत्ति कोणीकडे आहे हें ठरविणें शक्य नसतें; म्हणून प्रत्येकाचे आनुवंशिक संस्कार आणि शिक्षण यांना अनुसरूनच त्याचा धंदा ठरविला जातो. जरी धंदे हे वंशपरंपरेनें चालत आले आहेत असें समजण्यांत येई, तरी अपवादांना पूर्ण मोकळीक असे. 'बालादपि[3] सुभाषितं ग्राह्यम्' अशी परिस्थिति असे. सर्व लोकांमध्यें सर्व गुण असतात, परंतु ते निरानिराळ्या प्रमाणांत असतात. ब्राह्मणांमध्येंहि क्षत्रियोचित गुणांची संभवनीयता असते. प्राचीन काळचे ऋषी शेती करीत व प्रसंगोपात्त शस्त्रेंहि हातीं धरीत.

२५ 'वर्णाश्रमधर्माला अनुसरून परंपरेनें आपल्याकडे जें काम आलें आहे, तें करण्यांतच आपलें आध्यात्मिक कल्याण आहे', या भावनेनें समाजाची सेवा करावयाची असल्यानें 'स्वजात्यनुसार काम करणें ही अपमानास्पद गोष्ट असून गुलामगिरी आहे, ती नाखुषीनें आणि केवळ आर्थिक हेतूनें करावयाची आहे', अशा तऱ्हेच्या समजुतींस तिनें (त्या भावनेनें) कधींहि उत्तेजन दिलें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, वर्णाश्रमधर्मानुसार आपल्या वांट्याला आलेलीं कर्तव्यें अधिकाधिक चोख रीतीनें बजाविणें हें प्रत्येक धंद्याच्या लोकांनीं आपलें ध्येय ठरविलें होतें. आपलें कर्तव्य बजाविण्यांतच आपल्या जन्माचें सार्थक्य आहे असें त्यांना वाटत असे. जो कोणी योग्य रीतीनें निष्काम भावनेनें आपलें कर्तव्य बजावील त्याला,

---

१ सत्त्वगुणो ब्राह्मणो वर्ण. क्षत्रियस्तु रजोगुणः ।
तमोगुणस्तथा वैश्यो गुणसाम्यात्तु शूद्रता ॥

२ अध्याय (३), २१; अध्याय (१७), १३, ४१, ४५-६.

३ बाल म्हणजे अज्ञानी लोक

भगवद्गीतेप्रमाणें, मोक्ष मिळेल[1]. 'महासागरांतील मासे पकडणारे धीवर आपल्या गिऱ्हाइकाला मासे मिळावे म्हणून रोज आपलें जीवन धोक्यांत घालतात.' असें ठराविक विधान करून धर्मोपदेशक (पाद्री) आपल्या[2] वृत्ती उच्चंबळविण्याचा प्रयत्न करतो; परंतु हें विधान करतांना धर्मोपदेशक 'धीवरांना भव्य दर्यांत नाव हांकारण्यापासून होणाऱ्या समाधाना'कडे दुर्लक्ष करीत असतो. ते कोळी वस्तुतः लोकांना न्याहारीला मासे मिळावे म्हणून समुद्रांत उडी घेत नाहींत, तर हें काम केल्यानें आपल्या जीवनाला संतोष मिळतो म्हणून उडी घेतात. लोकाची होणारी सोय ही त्याच्या श्रमाचा यदृच्छया होणारा परिणाम होय. सुदैवानें जगाची अशी रचना करण्यांत आली आहे कीं, प्रत्येक मनुष्याचें कल्याण जगालाहि कल्याणकारक होत असतें. (प्रत्येक मनुष्याच्या कल्याणात जगाचेंहि कल्याण आपोआप होत असतें.) कलापूर्ण जीवनाच्या ऱ्हासाचा आमच्या कारागीर-वर्गावर अनिष्ट परिणाम झाला आहे. जुन्या काळांतील इमारत बांधणाऱ्या कारागिराला राजकीय हक्क कमी होते, पगार कमी होता व भौतिक सुखसोयीहि कदाचित् कमी असतील; परंतु आपलें काम करीत असतांना त्याच्या मनाला शांति निःसंशय अधिक होती. त्याच्या काळांत मतदानाची हल्लींची सुधारलेली पद्धति नसल्यामुळें तो आपलें मत द्यावयास गेला नाहीं, म्हणूनच केवळ मतदानाच्या हक्काचा उपभोग घेणारे आजच्या युगांतील कामगार त्याला गुलाम लेखतील; परंतु त्याच्या कामांत त्याचें जीवन व्यक्त होत होतें. कोंवळ्या संस्करणीय वयांतच आपल्या धंद्याच्या रहस्याची दीक्षा मिळालेला कामगार—मग तो गवंडी असो, लोहार असो अगर सुतार असो,—प्रचंड सहकारी संघाचा घटक असे. सुन्दर वस्तू निर्माण करण्याच्या प्रेरणेनें तो भारलेला असे. (विशिष्टीकरणानें (Specialisation) कामगारांचा धंद्यांतील अभिमान हिरावून घेतला आहे. 'कामा'चें आनंदाचें स्वरूप जाऊन, त्यास पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या विगारीचें स्वरूप प्राप्त झालें आहे; आणि म्हणून तो त्यापासून निसटूं पाहतो आणि आपल्या धंद्याबाहेर कोठें तरी चित्रपटगृहांत किंवा मजलसींत आपलें मन रंजविण्यासाठीं धडपड करतो.

---

१ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । —अध्याय १८, ४५.

२ ख्रिश्चन समाजाच्या.

'जीवनांत अधिक रसोत्पत्ति व्हावी आणि तें अधिक परिपूर्ण असावें' ही कामगारवर्गाची आकांक्षा न्याय्य आहे; परंतु सुखाची किंमत रुपये-आणे-पैंनीं ठरविण्याची प्रवृत्ति वाढत आहे ही मात्र दुर्दैवाची गोष्ट होय. सामाजिक सुधारणेच्या हल्लींच्या कल्पनेमध्यें आधिभौतिक सुखावर अधिक जोर देण्यांत येत आहे. 'मानवी स्वभावाची सुधारणा' हें सर्व प्रयत्नाचें खरें ध्येय आहे. अर्थात् यांत कामगाराला अत्यंत अवश्यक असणाऱ्या सुखसाधनांचाहि समावेश होतो हें सांगणें नकोच.

२६ सध्यां वर्गावर्गामधील कलह आपल्या पुढें दत्त म्हणून उभे आहेत. परस्परांबद्दल संशय आणि द्वेष व असूया आणि मत्सर या दोषांनीं युक्त अशी तीव्र स्वरूपाची जाणीव वर्गावर्गामध्यें उत्पन्न झाली आहे. आपलाच पेशा मुलांनीं पुढें चालवावा या पद्धतीचा पुरस्कार मागें पडून, ज्ञानसंपन्न लोकाना सर्व धंद्यांचे मार्ग खुले असावे असा अट्टाहास आम्ही करीत आहों. कांहीं धंदे आर्थिक दृष्ट्या अधिक किफायतशीर असल्यानें सर्व जण तेच धंदे करूं इच्छितात, या परिस्थितीमुळें अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. संपत्तीची अधिक समसमान वांटणी घडवून आणणें या अगदीं न्याय्य आकांक्षेचेंच केवळ नव्हे, तर 'सर्व बुद्धिमान् लोकाना एकाच भूमिकेवर ओढण्याच्या वाढत्या प्रवृत्तीचेंहि समर्थन करणें', असा लोकसत्तावादाचा अर्थ करण्यात येतो. परंतु सर्व बुद्धिमान् लोकांना एकाच भूमिकेवर ओढणें शक्य नाहीं. कारण समाजामध्यें समाजाचें नेतृत्व स्वीकारून मार्गदर्शक होणाऱ्या माणसांचा एक वर्ग आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या अनुयायांचा दुसरा वर्ग हे नेहमीं राहणारच. बुद्धिमान आणि चारित्र्यवान् माणसें हीं कोठेंहि ठेवलीं तरी तीं आपोआप वर येणारच असल्यानें लोकशाहींतहि मार्गदर्शकत्वाचें काम त्याला लायक असलेल्या अल्प जनसमूहाकडेच (Aristocracy of direction) येणार. 'जन्मतःच सर्व माणसें सर्व दृष्टींनीं समान दर्जाचीं आहेत; आणि देशाचा राज्यकारभार चालविण्याला किंवा जमीन नांगरण्याला सर्व सारख्याच योग्यतेचे आहेत' हें खरें नव्हे. कर्तव्यकर्मांतील भिन्नता नष्ट करणें शक्य नाहीं. विकासाचा प्रत्येक मार्ग स्वतंत्र असून त्याला कांहीं तरी वैशिष्ट्य असतेंच. जर आपण एका मार्गाचा अवलंब केला तर दुसऱ्या मार्गापासून आपलें लक्ष आपणांला काढून घ्यावें लागेल. आपण जनतेची

जुलमी बंधनें तोडावीं, तिचें अज्ञान नष्ट करावें, तिचा स्वाभिमान वाढवावा आणि तिला उच्च जीवन व्यतीत करण्याची संधि मिळेल असे मार्ग खुले करावे; परंतु असें करतांना बुद्धिमान् आणि मूर्ख व समर्थ योजक आणि सांगकाम्या मजूर यांच्यामधील भेद आपण नष्ट करूं शकूं अशा भ्रमांत असतां कामा नये. अर्वाचीन लोकसत्ताक पद्धतीचा कल सर्व माणसें सर्वांशीं सारखींच लेखण्याकडे आहे; परंतु सर्वांशीं सारखीं माणसें कोठेंहि नसतात हे लक्षांत ठेवलें पाहिजे.

२७ हिंदुस्थानांत औद्योगिक युग सुरू झालें आहे; म्हणून थोड्याच दिवसांत त्याला त्या युगाबरोबर येणाऱ्या संकटांशीं टक्कर द्यावी लागेल. गिरण्यामध्यें माणसें हीं यंत्रें बनतात. कारण, तेथें केवळ मजुरीचें काम करावयाचें असतें; तयार झालेल्या मालाशीं त्यांना कांहीं कर्तव्य नसतें. त्यामुळें माल तयार करण्याच्या पद्धतींत त्याना कोणत्याहि प्रकारचा आनंद वाटत नाहीं. तें काम त्यांच्या आत्म्याला शांति देत नाहीं. जर अशीं यांत्रिक स्वरूपाचीं कामें यंत्रांकडून होणें शक्य नसेल, जर माणसांना तीं करावींच लागणार असतील तर हीं त्यांना जितकीं कमी करावीं लागतील तितकें बरें. काम जसजसें अधिक यांत्रिक आणि कंटाळवाणें होईल, तसतशी कामगाराला अधिक फुरसत मिळेल आणि फुरसतीचा कुशलतेनें उपयोग करण्यास सुसज्ज साधनसामग्रीची अवश्यकता असते. मजुरांचा केवळ पगार वाढवूनच नव्हे तर त्यांच्या सुखांत भर घालून त्यांचा दर्जा वाढविला पाहिजे. कला–कुशल कारागिराच्या किंवा मुत्सद्द्याच्या कामापेक्षांहि यांत्रिक सांच्याचें ठरीव काम करणाऱ्यांना अधिक द्रव्यप्राप्ति व्हावी हें योग्य आहे. कारण कलाकुशल मनुष्यांच्या किंवा मुत्सद्द्यांच्या बाबतींत काम करतां करतां होणारा आनंद हाच त्यांच्या श्रमाचा मोबदला असतो. प्राचीन हिंदुस्थानांत आध्यात्मिक ज्ञानाचा ठेवा ठेवणें ही अतिशय उच्च दर्जाची सेवा समजली जात असूनहि तिजबद्दल वेतन अत्यल्प मिळत असे. ब्राह्मणांजवळ राजकीय सत्ता किंवा आधिभौतिक वैभव नसे. क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीं कामें आत्मविकासाला तितकीं पोषक नसल्यानें त्यांना अधिक सहानुभूति दाखविणाऱ्या या योजनेमध्यें कांहीं न्याय आहे असें मला वाटतें. शिवाय आपणांला हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आर्थिक बाबीला

मनुष्याच्या जीवनामध्यें अत्युच्च स्थान नसतें. मनुष्याचा दर्जा हा कांहीं त्याच्या आर्थिक परिस्थितीवरून ठरवावयाचा नसतो. प्रामाणिक कारागिरापेक्षां सट्टेबाज लक्ष्मीपुत्राची योग्यता अधिक नव्हे. द्रव्यलोभ हळूहळू चारित्र्याचा नाश घडवून आणील. शिवाय आपण हेंहि विसरूं नये कीं, राष्ट्राच्या घटक असलेल्या सर्वच्या सर्व व्यक्ती राजकीय नेतृत्व स्वीकारूं शकत नाहींत, किंवा लष्करी अंमलदारहि होऊं शकत नाहींत; परंतु राष्ट्राच्या पुष्कळ खात्यांमध्यें त्यांची विभागणी करता येईल. त्यामुळें विशिष्ट सवयी त्यांच्या अंगीं बाणतील आणि त्यांना विशिष्ट वर्गाबद्दल सहानुभूतिहि वाटेल. जरी एका धंद्यातून दुसऱ्या धंद्यांत जाणारे कांहीं लोक निघाले, तथापि असे लोक पुष्कळ निघण्याचा संभव नाहीं.

२८ समाजरचना व्यक्तिनिष्ठ असावी असें एका शतकापूर्वी जितक्या निश्चयानें आपण म्हणत होतों, तितक्या निश्चयानें आज आपणास म्हणता येत नाहीं. ' सबंध समाज ही एक अखंड जीवसंस्था ( Organic whole ) आहे ' या उच्च कल्पनेपासून होणाऱ्या नैतिक फायद्याकडे अधिकाधिक लक्ष जात आहे. जिवंत समाज म्हणजे वेतनाची वाढ आणि सुस्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं इतर सगळ्यांशीं स्पर्धा करणारे व्यापारी आणि शिक्षक, सावकार आणि वकील, शेतकरी आणि विणकर यांचा ढिला संघ नव्हे. जर निरनिराळ्या संघांच्या घटकांना आपापल्या सुप्त शक्ती प्रकट व्हाव्या असें वाटत असेल तर त्यांच्यात समान भावना काम करीत असल्या पाहिजेत आणि बरें होवो किंवा वाईट होवो, आपण सर्व एकत्र आहों ही भावना बाणली पाहिजे. या दृष्टीनें जातिसंस्थेच्या वर्तनानें पुष्कळ शिकण्यासारखें आहे. सर्व समाजाला एक अखंड देह मानणाऱ्या जातिसंस्थेनें " मनुष्यांनीं व्यक्तिनिष्ठ असा केवळ स्वार्थी अर्थार्जनाचा दृष्टिकोन बदलून त्याच्या जागीं उच्चतर असा ज्ञाति(समाज)सेवेचा मार्ग चोखाळावा " असा दंडक घालून दिला; " आपल्या बांधवांची सेवा करणें हें धार्मिक कर्तव्य आहे, या कर्तव्यापासून पराङ्मुख होणें पाप आहे, " अशी भावना तिनें उत्पन्न केली.

२९ लोकसत्ता म्हणजे सर्व वैशिष्ट्य नष्ट करून सर्वांना एका सांच्यांत

घालणें नव्हे. आपले आत्मे एका सांच्यांत बसणें शक्य नाहीं; त्यांस मारून मुटकून एका सांच्यांत कोंबणें ही शुद्ध अरेरावी होय. "निसर्गानें दिलेल्या कल्याणकारक शक्तींचा विकास करण्याचा सर्वांना सारखा हक्क आहे" हें लोकसत्ताक राज्यपद्धतीचें सूत्र आहे. प्रत्येक व्यक्ति किंवा जात म्हणजे एक प्रकारचा विशिष्ट पण संपूर्ण असा नमुना—भावी अद्वितीय कर्तबगारीची जणूं मूर्तिच अशी कल्पना जर आपण केली आणि अशा मूर्तींच्या कर्तबगारीला वाव न देतां आपण त्या मूर्तींचा तेथल्या तेथें नाश होऊं दिला तर तें जगाच्या योजनेमध्यें विकलता निर्माण करण्यासारखें आहे. व्यक्तींच्या किंवा जातींच्या सर्व उच्च आकांक्षांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. अखिल समाजाच्या दृष्टीनें विचार केला तर कोणत्याहि प्रकारें केलेली सेवा ही समाजाच्या दृष्टीनें सारख्याच महत्त्वाची आहे. आता जातींचा निरनिराळ्या दृष्टींनीं विचार करूं या. व्यवहार जरी नानाविध असले तरी उत्पत्ति आणि हेतु एकच असलेली जिवंत संस्था म्हणजे समाज होय. समाजाचे इतर भाग जोंपर्यंत गुलामगिरींत आहेत, तोंपर्यंत समाजांतील कोणत्याहि एका भागाला किंवा वर्गाला खरें स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. "जीवनांतील आपत्तिरूपी किल्ले सर्वजण चढून जावोत, सर्वांना सुख प्राप्त होवो, सर्वांना खरें ज्ञान प्राप्त होवो, आणि 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहोंकडे' असें होवो[1]!" हें लोकसत्ताक राज्यपद्धतीचें खरें ध्येय आहे. आधिभौतिक वैभव किंवा सुख संपादन करण्याच्या दृष्टीनें जात ही लोकनियंत्रित संस्था नसली तथापि आध्यात्मिक बाबतींत मात्र ती लोकनियंत्रित आहे; कारण प्रत्येक आत्म्यामध्यें अतींद्रिय आणि आत्म्याच्या श्रेणीमध्यें ज्यांचा स्थानानुक्रम तोलून मापून नक्की ठरवितां येणार नाहीं असें कांहीं तरी असतें हें ती (जात) मान्य करते, सामाजिक दर्जा, वैभव इत्यादि भेद लक्षांत न ठेवतां सर्व मानवी प्राण्यांना समान भूमिकेवर ठेवते आणि प्रत्येक व्यक्तीमध्यें जें अपूर्व असेल तें व्यक्त करण्याला तिला संधि मिळाली पाहिजे याबद्दल आग्रह धरते. आर्थिक दृष्ट्या आपण (आपला समाज) एक सहकारी संस्था किंवा बंधुत्वाच्या भावनेनें उभारलेला एक

---

१ सर्वस्तरतु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु ।
सर्वस्तद्बुद्धिमाप्नोतु सर्वः सर्वत्र नन्दतु ॥

संघ आहों. यांत आपण आपल्या सामर्थ्यानुरूप देत असतों आणि आपल्या गरजांप्रमाणें घेत असतों. राजकीय दृष्ट्या विचार करतां कायदा सर्वांना सारखें लेखीत असल्यानें आपण सर्वजण समान राजकीय हक्कांचा उपभोग घेतों. तेव्हां आर्थिक आणि राजकीय दृष्टि आपणांला आपलें खरें आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्यास समर्थ करते. आध्यात्मिक स्वातंत्र्य, राजकीय समता आणि आर्थिक बंधुभावना ह्यांवर समाजाची न्याय्य संघटना उभारली पाहिजे.

३० इतरत्र सामान्यतः सामाजिक संघटनेमध्यें आपणांला असें आढळून येतें कीं, एक वरचढ संघ दुसऱ्याला हटकून कह्यांत ठेवतो. सरंजाम–पद्धतींत-(Feudal Systemमध्यें) लष्करी कर्तबगारीचा अतिशय गौरव करण्यांत येत असे. आधुनिक भांडवलशाहीच्या काळांत 'लक्ष्मी'चें वर्चस्व दिसून येतें. परंतु हिंदु समाजाची अशी योजना आहे कीं, 'सांस्कृतिक' संस्था या श्रेष्ठ आणि 'आर्थिक' कनिष्ठ प्रतीच्या गणल्या जातात. कारण, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उन्नति हेंच त्या समाजाचें ध्येय आहे. सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संस्थांचा उपयोग दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टींचें साधन म्हणून करण्यांत येत नाहीं. समाजाच्या निरानिराळ्या वर्गांमध्यें श्रेष्ठतम स्थान खऱ्या ब्राह्मणाचेंच आहे. त्याच्याचमध्यें आपणांला विरुद्ध गोष्टींचें पूर्ण मीलन झालेलें आढळेल. खरी स्वतंत्रता ( मोक्ष ) मिळवून देणारा स्वार्थत्याग, उच्चतम सेवाधर्म साध्य करून देणारें आत्मसंयमन, व्यक्तिविषयक महत्त्वाकांक्षेचा अभाव असूनहि जगाबद्दल आत्यंतिक निष्ठा हे गुण खऱ्या ब्राह्मणाच्याच ठिकाणीं आढळून येतात. शूर, वीर, क्षत्रिय, सरदार हें कांहीं हिंदुस्थानचें ध्येय नव्हे. कारण, तो जगाचा साकल्यानें विचार करूं शकत नाहीं; दोन पक्षांपैकीं एका पक्षाकडे त्याची वृत्ति साहजिकपणेंच झुकते, त्याचा नेहमीं कोणीना कोणीतरी प्रतिस्पर्धी असतो आणि त्याला हाणून पाडण्यावर त्याचा कटाक्ष असतो. सदाचारी ब्राह्मणाला सबंध विश्वाचें ज्ञान झालें असल्यामुळें तो पक्षभेदातीत असतो; तो सर्व व्यक्त स्वरूपांचें निरीक्षण करून सर्वांचें कल्याण कसें होईल याकडे दृष्टि ठेवतो. जर तो एका पक्षाशीं तादात्म्य पावून दुसऱ्या पक्षाच्या विरुद्ध उठेल, तर त्याच्या ब्रीदाला बट्टा लागेल. याचें कारण तो झगडत नाहीं, सर्व झगडे

व्यर्थ आहेत असें समजून तो त्यांचा त्याग करतो हें नव्हे, तर त्या सर्व झगड्यांचा त्यानें अगोदरच निकाल लावलेला असतो. ' स्वतः आणि जग, यांमधील सर्व कलह त्यानें मिटविलेले असतात आणि तो त्यामुळें स्वस्थ असतो. सैतानानें बुद्ध आणि ख्रिस्त या दोघांवरहि आपलें मोहनी अस्त्र टाकलें होतें; परंतु त्या मोहांना जिंकून त्यांनीं सैतानाचा पाडाव केला तेव्हां ते मुक्त झाले. सर्वांशीं मित्रभावानें वागणें हा ब्राह्मणाचा मुख्य सद्गुण होय.[1] सर्वांवर सारखें प्रेम करण्याची हातोटी आपणांपैकीं पुष्कळांना साधत नाहीं; हळूहळू प्रयत्न केला तरच ती अंगीं बाणेल. चांगला लढवय्या होणें म्हणजे सुज्ञ द्रष्टा होण्याची पूर्वतयारी करणें होय. व्यवहारात उपयोगीं पडणारी तीव्र दृष्टि ही उत्तम योद्ध्याला रणांगणांतच प्राप्त होते आणि तो ज्ञानजन्य दिव्य शांतीचा उपभोग घेण्यास लायक होतो. शत्रूला घायाळ करतांना, स्वतः वार सोसतांना, मृत्यूशीं झगडतांना आणि मृत्यूला आलिंगन देतांना समरांगणावर दर्शविलेल्या शौर्याची ॲरिस्टॉटलनें आणि इतर युद्धप्रिय लोकांनीं स्तुति केली आहे. स्वतःच्या शरीराचें बलिदान देण्याची तयारी दाखविणें हें श्रेष्ठ पुरुषाचें लक्षण आहे. शौर्य हें क्षत्रियाचें मुख्य लक्षण आहे. परंतु ' क्षत्रिय ' हा सर्वश्रेष्ठ वर्ण नव्हे. कारण क्षत्रियाचें शौर्य कितीहि उच्च असलें तरी तें त्याच्या हृदयांतील जंगलीपणाचें द्योतक आहे. आपल्या अंतःकरणांतील पाशवी भावना सौम्य झाल्या नाहींत तोंपर्यंत युद्धें आणि सैनिक यांची जरुरी आपणांला भासणारच. अति सुसंस्कृत माणसें देखील कधीं कधीं पाशवी बनतात; कारण, त्यांच्यांतील क्रौर्याची प्रवृत्ति नष्ट होण्याऐवजीं फक्त दबून राहिलेली असते.

३१ ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे संस्कार निरनिराळे असल्यामुळें त्यांच्या वर्तनांत कसा फरक घडून येतो, हें खालील उदाहरणावरून स्पष्ट होईलः— डोळ्यांसमोर एखादा मोठा अन्याय घडत असलेला पाहून खेदानें आणि संतापानें अंतःकरण व्याप्त झालें असतां, क्षत्रिय गर्जना करील कीं ' आतां तुझ्या हातून तसलें कृत्य घडूं नये म्हणून मी तुला ठार करतों '; परंतु अन्याय करणाऱ्या माणसाला तसल्याच परिस्थितींत ब्राह्मण विनवील कीं ' तूं

१ मैत्रीकर्म समस्तेषु ब्राह्मणस्योत्तमं धनम् ।

असें करूं नकोस, त्यापेक्षां मी मरण पत्करीन '. मनुष्य जितका अधिक सुसंस्कृत तितके त्याचे हक्क कमी, परंतु कर्तव्यें मात्र अधिक.

३२ आपलीं ध्येयें अत्युच्च काळांत संपूर्णपणें साध्य झालेलीं पाहावीं अशी जरी इच्छा असली, तरी हिंदु स्मृतिग्रंथ हळूहळू ध्येयवाद्यांची सुधारणा घडवून आणण्यावर जोर देतात. ते समाजाची प्रत्यक्ष परिस्थिति आणि निसर्गाचे नियम लक्षांत घेतात. दिशाभूल झालेल्या ध्येयवाद्याच्या अंतःकरणाला मानवी मनाची अपूर्णता पाहून धक्का बसतो, प्रगति मंदगतीनें होत असल्यानें तो त्रासतो, ध्येयसिद्धिसाठीं आपल्याइतकाच उत्साह सर्वांना आहे असें गृहीत धरतो, सुवर्णयुगाला लवकर पोहोंचण्यासाठीं जवळचे मार्ग कल्पितो आणि अशा रीतीनें बंडखोर बनतो. याच कारणामुळें त्याचें अस्तित्व समाजाला धोक्याचें आहे असें समजून त्या दृष्टीनें सरकार त्याच्याकडे पाहतें. त्याच्यावर जीं नियंत्रणें घालण्यात येतात त्यांच्याविरुद्ध प्रतिकार करून तो समाजाचा त्याग करतो. त्याच्या वर्तनानें समाजविघातकांना समाजावर हल्ले करण्यास चांगलें फावतें. आकाशस्थ ताऱ्यांवर नजर स्थिर झालेली असली तरी जमिनीवर पाय रोवून भक्कमपणें उभे राहणें हाच शहाणपणाचा मार्ग होय. ध्येय (मोक्ष) हें केवळ शहाण्यांनींच साध्य करावयाचें नसतें. एकाच तऱ्हेच्या मानवी स्वभावरूपी राध्यापासून उच्च, नीच, शहाणे आणि मूर्ख बनविले जातात आणि अशा सर्व प्रकारच्या माणसांस हातीं धरून ध्येयप्राप्ति करून घ्यावयाची असते. जर सर्व माणसें शहाणीं असतीं तर जीवन सोपें झालें असतें; परंतु सामान्यतः माणसें शहाणीं होण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांत त्यांना कमीजास्त यश मिळतें, त्यामुळें मानवी जीवनाला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें आहे. विचारवंत हिंदु लोक हिंदु समाजाचे अल्प उत्क्रांत आणि अधिक उत्क्रांत असे दोन भेद करतात. अल्प उत्क्रांत लोकांमध्यें आत्मनिरीक्षण आणि स्वतःप्रवृत्ति या शक्ती ज्यांनीं प्राप्त करून घेतलेल्या नसतात अशा शूद्रांचा समावेश करण्यांत येतो आणि अधिक उत्क्रांत लोकांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्यांप्रमाणें ज्याचें वर्गीकरण झालें आहे अशा द्विजांचा अंतर्भाव होतो. भिन्नभिन्न जाती या आत्मसाक्षात्काराच्या मार्गावरील निरनिराळ्या टप्प्यांच्या ठिकाणीं असलेले मानवसमुदाय सूचित करतात. मनुष्य कितीहि कनिष्ठ दर्जाचा असला तरी तो

उत्क्रांतीच्या मामुली पद्धतीनें लवकर किंवा उशिरानें अत्युच्च दर्जाला पोहोंचूं शकतो आणि कालचक्राच्या फेऱ्यांतून मुक्ति मिळवूं शकतो. स्वतःच्या नैसर्गिक भूमिकेवर जाण्याला वाव आणि अनुकूल काल प्रत्येकाला मिळत असतात आणि जो जो मनुष्य वर चढण्याची प्रवृत्ति दाखवील त्या प्रत्येकाला जितक्या उंच त्याला जातां येईल तितक्या दर्जावर नेण्यांत येतें.

३३ कांहीं जाती धंद्याला अनुसरून करण्यांत आल्या आहेत, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. या जातींमध्यें कालांतरानें अमुक लोक 'उच्च' आणि अमुक लोक 'नीच' असे भेद पडले. उच्च लोकांना विशेष हक्क प्राप्त झाले आणि नीच लोकांवर कांहीं निर्बंध घालण्यांत आले. हे हक्क आणि हे निर्बंध जातींच्या अधःपतनास कारणीभूत झाले. जेव्हां समाजांतील 'उच्च–नीच' भेदामुळें निरानिराळ्या वर्गांचा आध्यात्मिक दर्जा आणि त्यांची समता हीं धोक्यांत येऊं लागलीं, तेव्हां 'उच्च–नीच' भेदाचे विरोध दृग्गोचर होऊं लागले: बुद्धीला न पटणाऱ्या दंभाचा निषेध करण्यांत आला व कारागीर हा योद्ध्याइतकाच सुधारलेला मनुष्य आहे असें सांगण्यांत आलें. असें म्हणतात कीं, मानववंशाच्या आरंभीच्या काळांत वर्णभेद नव्हते. कारण, "सर्वांची उत्पत्ति ब्रह्मापासून झाली[1]", सर्व जग ब्रह्मापासून झालें असल्यानें सर्वांचा दर्जा समान आहे, अशी तत्कालीन लोकांची मान्यता होती. 'धीवर, गुलाम आणि जुगारी हे सर्व दैवी प्राणी आहेत[2]' असें श्रुति म्हणते. भागवतांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "ज्याप्रमाणें देव एकच आहे त्याप्रमाणें माणसांचाहि एकच वर्ग आहे" मनु[3] म्हणतो, "जन्मतः सर्व माणसें (संस्कारहीन) शूद्र असतात; परंतु संस्कारानें—आध्यात्मिक जन्मानें त्यांना द्विजत्व प्राप्त होतें." जात शीलावर अवलंबून असते. मनुष्य अमुक एका जातींत किंवा कुटुंबांत जन्मल्यानें ब्राह्मण होत नाहीं, आपल्या कृत्यांनीं ब्राह्मण होतो; चांडाल सुद्धां शुद्ध असेल तर तो ब्राह्मणच आहे. ब्राह्मणांच्या आदरास

---

१ 'सर्व ब्रह्ममिदं जगत्'। —महाभारत, शांतिपर्व, १८६.

२ ब्रह्म दाशा ब्रह्म दासा ब्रह्मैवेमे कितवः।

३ मनुस्मृति, ९, (१४ व ४८.)

पात्र झालेले कांहीं मोठमोठे ऋषी संकरजातीय आहेत; वसिष्ठ वेश्येपासून, व्यास कोळिणीपासून आणि पराशर चांडाळ–कन्येपासून झाले आहेत. वस्तुतः जन्माचें महत्त्व नसून आचरणाचें महत्त्व असतें. मोक्षप्राप्तीचा विचार कर्तव्य असतां कनिष्ठ जातींना सुद्धां मोक्ष मिळविण्याचा सारखाच अधिकार आहे. भगवान् श्रीकृष्ण गीतेमध्यें म्हणतातः— "जे पापयोनींत जन्मले असतील ते सुद्धां आणि स्त्रिया, वैश्य तसेंच शूद्र—जे माझा आसरा घेतात ते—परम गति प्राप्त करून घेतात. भाविक अंत्यजांना परमेश्वराचें नांव घेतल्यानें स्वतः तरून जाण्याइतकें ज्ञान (मोक्षज्ञान) प्राप्त होत असतें. स्त्रिया, शूद्र आणि अधःपतित ब्राह्मण यांना तंत्रांच्या साह्यानें हें ज्ञान प्राप्त होत असतें.[4] मोक्षाच्या तळमळीची ज्योत जितक्या तीव्रतेनें लक्ष्मीपुत्रांच्या अंतःकरणांत जळते, तितक्याच तीव्रतेनें अनाथांच्या अंतःकरणांतहि जळते. व जितकी प्रबलांच्या अंतःकरणांत जळते, तितकीच दुर्बलांच्याहि अंतःकरणांत जळते. 'प्रेम' हा कांहीं एखाद्या विशिष्ट वर्गाचा मक्ता नव्हे, तसेंच मानसिक शुद्धि (पावित्र्य) हीहि कांहीं बाजारांत विकत घेण्याची वस्तु नव्हे. प्रेम आणि मनः–शुद्धि यांसारख्या ईश्वरी देणग्यांच्या बाबतींत सामाजिक भेदाभेद नष्ट होतात.

३४ मोक्षप्राप्तीचा हक्क जरी आपणां सर्वांना आहे, तरी निरनिराळ्या लोकांना आपापल्या सांप्रदायिकांकडून परंपरेनें आलेल्या विशिष्ट साधनांचा उपयोग करण्यास मुभा आहे. उच्च दर्जाच्या त्रैवर्णिकांना वैदिक यज्ञ करून मोक्ष

---

१ गणिकागर्भसम्भूतो वसिष्ठश्च महामुनिः ।
तपसा ब्राह्मणो जातः संस्कारस्तत्र कारणम् ।
जातो व्यासस्तु कैवर्त्याः श्वपाक्यास्तु पराशरः ।
बहवोऽन्येपि विप्रत्वं प्राप्ता ये पूर्वमद्विजाः ॥

२ ह्यालाच भागवत धर्म म्हणतात. परमेश्वराच्या दरबारीं उच्च-नीच हा भेद नाही, सर्व जातींना तेथें प्रवेश आहे. म्हणून नीच योनीच्या लोकांनी निराश होण्याचे कारण नाहीं. महाराष्ट्रीय संत—रोहिदास (महार), चोखामेळा (महार), गोरा (कुंभार), सांवता (माळी), सेना (न्हावी) इ० इ० हे अस्पृश्य किंवा शूद्र वर्गातील होते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

—अनुवादक.

३ मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ९,३२.

४ अन्त्यजापि च ये भक्ता नामज्ञानाधिकारिणः ।
स्त्रीशूद्रब्रह्मबन्धूनां तन्त्रज्ञानाधिकारिता ॥

मिळविण्याचा हक्क आहे, शूद्रांना हे यज्ञ करण्याची शास्त्राज्ञा नाहीं; उपनयन किंवा दीक्षाविधि आणि वैदिक अभ्यास यांची त्यांस मनाई आहे. या प्रश्नांच्या बाबतींत आपापसांतील तंटे विकोपास जाऊन समाजांतील उत्तमोत्तम व्यक्तींची प्राणहानि होऊं नये म्हणून समाजानें असें ठरविलें कीं, वैदिक अभ्यास आणि संस्कार नसले तरी मनुष्य स्वतः तरून जाण्याइतकें ज्ञान मिळवूं शकतो. श्रीमच्छंकराचार्य यांनी हें मान्य केलें आहे कीं 'सूत आणि विदुर' यांसारख्या शूद्रांनी आपल्या पूर्वजांच्या संस्कारांमुळें उच्चतम ज्ञान (मोक्षज्ञान) संपादन करून घेतलें. स्मृती आणि पुराणें यांचा अभ्यास, जप, उपवास, पूजा इत्यादि मार्गांनीं मनुष्य मोक्ष मिळवूं शकतो. मनुष्यमात्राला 'नराचा नारायण' होण्याची स्वाभाविक शक्ति आहे[1].

३५ भारतीय इतिहासाच्या सुरुवातीपासून आपण 'समते'साठीं झगडा करीत आहों ह्यासबधीं, आपल्याजवळ एका बाजूला पुराणमतांचा आधारस्तंभ आणि कोणत्याहि नवीन उपक्रमाचा शत्रु असा वसिष्ठ आणि दुसऱ्या बाजूला प्रागतिकाचा पुढारी आणि स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता विश्वामित्र यांच्यामधील भांडण, हा एक पुरावा आहे. पुराणप्रिय वासिष्ठाची अशी इच्छा होती कीं, वैदिक धर्म हा केवळ आर्यांपुरताच मर्यादित असावा; परंतु विश्वामित्रानें तो सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न केला. उपनिषदांची चळवळ ही तत्त्वतः लोकसत्तात्मकच होती. बौद्ध धर्मानें उच्चनीचत्वाच्या सर्व कल्पना पार उडवून दिल्या हें सुप्रसिद्धच आहे. श्रीमच्छंकराचार्यांचें तत्त्वज्ञान मुख्यतः लोकसत्तात्मकच होतें आणि श्रीरामानुजाचार्यांनींहि शूद्रांना आणि पंचमजातीच्या लोकांना 'आलवार' समजून त्यांचा सन्मान केला.

३६ वेदांमध्यें ग्रथित केलेल्या अनुभवांच्या प्रोत्साहनानें ज्यांनीं आपला विकास केला अशा लोकांपुरतेंच वैदिक जीवन मर्यादित होतें. त्यांच्या जीवनांत एक प्रकारचें वैशिष्ट्य होतें. इतर लोकांचें जीवन वैदिक जीवनापासून इतकें विसदृश होतें कीं, त्या दोहोंमध्यें भेद करणें समर्थनीय ठरे. घोंटाळ्यांत पाडणाऱ्या अगर आपलें ध्येय पुसट करणाऱ्या परकीय कल्पनांमध्यें स्वतःस गुंतवून न घेतां आपापल्या मार्गानें जीवनयात्रा कंठण्यास

१ पुरुषमात्रसम्बन्धिभि । —श्रीमच्छंकराचार्य, ब्रह्मसूत्रावरील भाष्य, ३-४ व ३८.

प्रत्येक संप्रदायाला मुभा असे. परंतु लगेच ह्या विशिष्ट संप्रदायांना एका तऱ्हेच्या आध्यात्मिक मक्त्याचेंच स्वरूप प्राप्त झालें आणि उच्चनीचतेच्या कल्पनांची वाढ झाली. जातिसंस्था समाजाच्या विकासार्थ—लोकानां तु विवृद्धयर्थम् ''[1] अस्तित्वांत आली असल्यामुळें समाजहिताच्या दृष्टीनें या मक्तेदारीच्या कल्पनेचा पूर्ण उच्छेद करणें अवश्यक आहे. (कारण) सर्वांना एकाच भूमिकेवर आणण्यानेंच ध्येयें अधिकाधिक लोकमतप्रदर्शक बनतील. सत्ययुगामध्यें केवळ ब्राह्मणांनीं, त्रेतायुगामध्यें ब्राह्मणांनीं आणि क्षत्रियांनीं, द्वापरामध्यें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अशा तिन्ही वर्णांनीं तप केलें. आणि कलीमध्यें तर चारी वर्णांनीं तप केलें आहे. याचा सरळ अर्थ असा आहे कीं, आतां हिंदुधर्मग्रंथ हे जातिभेद अथवा लिंगभेद लक्षांत न घेतां सर्वांना खुले ठेवण्यांत आले पाहिजेत.

३७ आपण आतां आपल्या व्याख्यानमालेच्या शेवटाला येऊन पोहोंचलों. आतां थोडक्यांत सिंहावलोकन करतों. आध्यात्मिक दृष्टीनें विचार करतां आपणांस असें आढळून येतें कीं, निरनिराळ्या नांवांनीं संबोधिल्या जाणाऱ्या एका परम चैतन्याची हिंदु लोकांना ओळख आहे. सामाजिक दृष्टीनें पाहतां हिंदु धर्मांत पुष्कळ जाती आहेत; परंतु त्या सर्व एकाच हिंदु समाजाच्या घटक आहेत. लोकसंख्येमध्यें पुष्कळ मानववंश आणि मानवसमूह यांचा समावेश झालेला आहे; परंतु ते सर्व एकाच सर्वसामान्य तत्त्वानें एकत्र बांधले गेले आहेत. लग्नाचे पुष्कळ प्रकार जरी मान्य करण्यांत आले आहेत, तथापि त्यांपैकीं एकच आदर्श म्हणून पुढें ठेवण्यांत आला आहे. पुष्कळ नानाविध शाखांमधून एकच हेतु दिसून येतो. हें सर्व विवेचन झाल्यावर आतां धार्मिक आणि सामाजिक प्रश्न सोडवितांना हिंदु धर्माचें मध्यवर्ति तत्त्व कसें अंमलांत आणावयाचें हें थोडक्यांत सांगून ही व्याख्यान-माला संपविणें उचित होईल असें वाटतें.

३८ प्रथम हिंदु धर्माचें मध्यवर्ति तत्त्व काय आहे, हें पुनः पाहूं या. जग म्हणजे सतत वाहणारा प्रवाह खरा; परंतु सत्स्वरूप त्यालाहि व्यापून उरलें आहे. जगाचा नियमबद्ध क्रम आणि त्याची पूर्णावस्था

---

[1] मनुस्मृति, १, ३२.

करून घेण्याकडे असलेली प्रवृत्ति या गोष्टी असें दर्शवितात कीं, तें आध्यात्मिक सत्यावर—चैतन्यावर उभारलेलें आहे आणि हें सत्य एखाद्या विशिष्ट पदार्थांत किंवा पदार्थसंघांत व्यक्त झाल्यानें संपून जाण्याइतकें परिमित नाहीं. परमेश्वर जगामध्यें आहे, परंतु जग हेंच परमेश्वराचें व्यक्त स्वरूप आहे असें नव्हे. त्याचे निर्मितीचे व्यापार केवळ उत्क्रांतीच्या मार्गावरील महत्त्वाच्या टप्प्यांपुरतेच संकुचित नाहींत. तो केवळ प्राण किंवा चेतना ओतण्यापुरताच पुढें येतो असें नव्हे, तर त्याचें कार्य सतत चालूच असतें. नैसर्गिक आणि अनैसर्गिक यांमध्यें द्वैतभाव नाहीं. आध्यात्मिकाचें मूळ निसर्गांत असून निसर्गातूनच त्याचा विकास झाला आहे. "दृश्य आणि आधिभौतिक ( विनाशि ) जगांत आढळून येणारें अनंत वैचित्र्य हें अदृश्य आणि शाश्वत तत्त्वावरच उभारलेलें आहे आणि त्यानेंच तो भार सोसला आहे," हें हिंदु धर्माचें जीवनसूत्र आहे.

३९ पाप, प्रमाद आणि कुरूपता हीं सापेक्ष आहेत. एखादा मनुष्य पापी आहे याचा अर्थ एवढाच कीं, पुण्यमंदिराकडे जाण्यासाठीं त्या मनुष्यास अधिक श्रम घ्यावयास पाहिजेत. सौंदर्याकडे जातांना अर्ध्या वाटेवर कुरूपतेचा टापू लागतो. प्रमाद हा सत्याच्या मार्गावरील एक टप्पा आहे. या सर्वांच्या पलीकडे जाणें हें आपलें ध्येय आहे. कोणतेंहि मत अगदीं चुकीचें नसतें किंवा कोणीहि मनुष्य पूर्ण शिक्षेला पात्र होण्याइतका दुष्ट नसतो. एक मानवी प्राणी जरी आपलें दैवी ध्येय गांठू शकला नाहीं, तरी तितक्या अंशानें विश्व विफल ठरेल. ज्याअर्थीं जगांतील प्रत्येक मानवी प्राण्याची आत्मविकासाची भूमिका दुसऱ्या सर्वांच्यांपेक्षां भिन्न आहे, त्याअर्थीं अतिशय पापी मनुष्याचा नाशहि जगाच्या योजनेमध्यें उणीव निर्माण करील. वस्तुतः नरकाचें अस्तित्व मानण्याचें कारण नाहीं. कारण, नरक मानणें म्हणजे ईश्वराचें अस्तित्व नसलेलें असें एक तरी स्थळ आहे आणि न निरसन होणारीं कांहीं पापें तरी आहेत असें मानण्यासारखें आहे. ईश्वराचें अमर्याद प्रेम हें जर थोतांड नसेल तर विश्वांतील यच्चयावत् व्यक्तींना खात्रीनें मुक्ति मिळाली पाहिजे. पण ती प्राप्त होईपर्यंत आपण अपूर्णच राहणार आणि आपल्या हातून चुका ह्या होणारच. सतत उत्क्रांतावस्थेंत असलेल्या विश्वा-

मध्यें पाप आणि प्रमाद हीं जरी क्रमाक्रमानें कमी होत असलीं, तरी तीं अपरिहार्य आहेत.

४० हिंदु धर्म आध्यात्मिक जीवनावर उभारलेला आहे आणि तो असें प्रतिपादन करतो कीं, भिन्न भिन्न प्रकृतींच्या लोकांना निरनिराळे धार्मिक अनुभव येत असल्यानें त्यांचे उपासनेचे प्रकारहि भिन्न भिन्न असणें अपरिहार्य आहे. मनुष्याच्या आणि जगाच्या जीवनांमध्यें परमेश्वर हें मध्यवर्ति सत्य आहे असें वाटेपर्यंत उपासनामार्गांत एकापाठीमागून एक असे दृष्टांत सुचत असतात. " माझ्या बागेंतील रोपें तेवढीं ईश्वरानें लाविलीं आहेत आणि माझ्या शेजाऱ्याच्या बागेंतील रोपें हीं मात्र रोपें नसून ' तण ' आहेत, तीं सैतानानें लावलेलीं आहेत आणि कांहीं झालें तरी तीं नष्ट केलीं पाहिजेत," असली जीवनाच्या द्वैती धोरणापासून उत्पन्न झालेली विचारसरणी हिंदु धर्म मान्य करीत नाहीं. एखादें तत्त्व 'उत्तम' असलें आणि दुसरें जरी तितकें उत्तम नसलें पण 'बऱ्या'पैकीं असलें तरी हिंदु धर्म त्याचा अव्हेर करणार नाहीं. हिंदु धर्माच्या या व्यापक धोरणामुळें तो सर्व प्रकारचीं मतें मान्य करतो आणि त्यांना अधिकाधिक उच्च अवस्थेला नेण्याचा प्रयत्न करतो. कारण हिंदु धर्माची अशी मान्यता आहे कीं अज्ञानांधकाराचा निरास अज्ञानी मनुष्याला बडगा दाखवून किंवा सुळावर चढवून म्हणजे जुलूम अगर जबरदस्ती दाखवून होणार नसून ज्ञानदीप प्रज्वलित केल्यानेंच होणार आहे.

४१ हिंदु धर्म ज्याप्रमाणें उपासनेचे निरनिराळे प्रकार मान्य करतो, त्याचप्रमाणें भिन्न भिन्न प्रवृत्तींच्या भक्तांनाहि हिंदु धर्मामध्यें स्थान आहे. कांहीं भक्त असे असतात कीं, ते साक्षात् परमेश्वराचें दर्शन घेऊं इच्छितात, तर कांहीं परमेश्वराविषयीं सत्य काय आहे हें जाणण्याच्या प्रयत्नांतच आनंद मानतात. कांहींना प्रवृत्तींत शांति मिळते तर कांहींना निवृत्तींत मिळते. हिंदु धर्माची मौज ही आहे कीं, उपास्य दैवत एकच, पण पूजनीय द्रव्यें मात्र व्यक्तीगणिक भिन्नभिन्न. त्याचप्रमाणें व्यापक धर्माचें ध्येय एकच, पण पंथ मात्र अनेक. आपला संप्रदाय हाच एक परमेश्वरप्राप्तीचा महत्त्वाचा आणि सर्वश्रेष्ठ मार्ग आहे असें आपण समजतां कामा नये. भक्त कोणत्याहि अवस्थेंत असो, ब्रह्मचारी असो, गृहस्थ असो वा संन्यासी असो, त्याला

मोक्ष मिळविणें शक्य आहे. सर्वांचा एकसारखाच दृष्टिकोन असावा अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. साधूंच्या पावित्र्याइतकीच, प्रेमळ पत्नीची पतिनिष्ठा किंवा बालकाचा अनागसपणा यांची योग्यता परमेश्वराच्या दरबारांत आहे. प्रत्येक नमुन्याच्या पूर्ण विकासांत दिव्यत्व प्राप्त होत असतें. "जें जें कांहीं विभूतियुक्त, लक्ष्मीयुक्त अथवा प्रभावशालि आहे तें तें सर्व माझ्या तेजाच्या अंशापासूनच झालें आहे असें जाण[१]." असें भगवान् श्रीकृष्णांचेंच वचन आहे.

४२ कर्ममीमांसा असें प्रतिपादन करते कीं, आपणांस प्राप्त झालेला सध्यांचा जन्म हा एक स्वयंपूर्ण कालखंड नसून, अनेक खंडांपैकीं एक आहे. आपण आपलें ध्येय साध्य करीपर्यंत, तें साध्य करण्याच्या नवीन नवीन संध्या आपणांला प्राप्त होतील. भूतकालीं आपण केलेल्या आपल्या कर्मांवर आपलीं भविष्यकालीन स्वरूपें अवलंबून राहतील. 'स्वर्ग' आणि 'नरक' हे शाश्वत मार्गावरील, आत्मसाक्षात्काराच्या--आत्मोन्नतीच्या मार्गावरील पुढचे आणि मागचे टप्पे आहेत. ते टप्पे आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेणाऱ्या व्यक्तीवर बाहेरून लादलेले नसतात. ते आपल्या वर्तनावर अवलंबून असतात. वासनाक्षयानें चित्तशुद्धि करावयाची असते. दुःख हें पापाचें फळ होय. 'पापबुद्धि आपल्या ठिकाणीं मूळचीच असते, आणि सद्‌गुण मात्र उसने घेतलेले असतात,' असें समजण्याचें कारण नाहीं. 'वर्णाश्रम-धर्माप्रमाणें, आपणांला जे कर्तव्य प्राप्त झालें आहे तें आपण करावें. आपणांपैकीं पुष्कळांना आपल्या धंद्याची निवड करण्याची मोकळीक नसते खरी; परंतु आपणांला निसर्गतः प्राप्त झालेल्या गोष्टींचा---आपलें कुळ, आपला स्वभाव व आपल्या मानसिक शक्ती यांचा---उत्तम उपयोग करण्याचें स्वातंत्र्य आपणांला असतें. निसर्गदत्त प्रत्येक शक्तीचा आणि प्रत्येक धर्माचा योग्य उपयोग केला तर तो आपल्या आत्मोन्नतीला पोषक होईल.

४३ आतां वैवाहिक जीवनाकडे वळूं या. पतिपत्नींमध्यें संपूर्ण मानासिक, आध्यात्मिक आणि शारीरिक एकवाक्यता होण्यास एकपत्नीकत्वाचें ध्येय,

---

१ यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥—श्रीमद्भगवद्गीता, १०, ४१.

हेंच जरी उत्तम साधन मानण्यांत येतें, तथापि लोकांचीं ध्येयें, हितसंबंध, संवयी आणि वासना हीं भिन्नाभिन्न असतात, ही गोष्ट लक्षांत घेऊन विवाहाच्या इतर प्रकारांनाहि परवानगी देण्यांत आली. वैवाहिक जीवन जितकें सुखदायि व्हावें अशी आपली अपेक्षा किंवा आकांक्षा असते, तितकें तें आरंभीं नसलें तरी धीमेपणानें आणि चिकाटीच्या प्रयत्नानें तें पुढें तसें करावें लागतें. पतीचा किंवा पत्नीचा 'विसंवादी स्वभाव' हें एकच कारण घटस्फोटाचें समर्थन करण्यास पुरेसें असेल, तर आपणांपैकीं पुष्कळांना घटस्फोट करावे लागतील. स्त्रियांचीं कर्तव्यक्षेत्रें पुरुषांच्यापेक्षां भिन्न असलीं म्हणून त्या कमी दर्जाच्या आहेत असें ठरत नाहीं.

४४ जातिसंस्थेचें जरी पुष्कळ वाईट गोष्टींमध्यें पर्यवसान झालें आहे तरी तिच्यामध्यें कांहीं हितकर तत्त्वेंहि अंतर्भूत झालीं आहेत. ज्यांना आपण मूळचे रहिवासी म्हणून संबोधितों, त्यांच्याशीं वागण्याचें आपलें धोरण सहानुभूतीचें असलें पाहिजे. 'मागसलेल्या जाती' म्हणून आपण ज्यांस म्हणतों, त्यांच्या शुद्ध आणि जिवंत भावना नष्ट न करतां, त्यांसंबंधीं आदर दाखवून त्यांचें पोषण करणें हें सुसंस्कृत लोकांचें कर्तव्य आहे. समाज ही भिन्नाभिन्न श्रेणींची बनलेली एक सजीव संस्था असून तिच्यांतील मानवी व्यापार कमीजास्त महत्त्वाचे व अनेक प्रकारचे असतात. जोंपर्यंत प्रत्येक व्यवहार एकाच ध्येयाकडे नेणारा आहे, तोंपर्यंतच त्याला महत्त्व आहे. समाजांतील प्रत्येक घटक व्यक्तींचें व जातींचें कांहीं तरी वैशिष्टय असतें; त्या वैशिष्टयाला अनुसरून घटक व्यक्तींनें व जातीनें वागावें. एकच मनुष्य, एकाच वेळीं संपूर्णतया संत, कारागीर आणि तत्त्वज्ञानी ह्यांची भूमिका घेऊं शकत नाहीं. प्रत्येक मनुष्य मर्यादांनीं पर्याप्त असतो. या मर्यादेबाहेर इतर गोष्टी त्याला करतां येत नाहींत. कार्यकर्त्यानें आपलें काम करीत असतां आपल्यामध्यें सुप्तावस्थेंत असलेल्या शक्ती—सद्‌गुण—जागृत कराव्या आणि सर्वांच्या कल्याणासाठीं त्या शक्तींचा उपयोग सेवाभावानें करावा. कारागिराच्या कामामध्यें हस्तकौशल्य असून समाजाची सेवाहि आहे. आमच्या वर्गावर्गामध्यें कलह आहेत, ह्याचें कारण निरानिराळ्या संघांना एकत्र बांधणारी ऐक्याची भावना आमच्यामध्यें नाहीं.

४५ हीं हिंदुधर्माचीं कांहीं मध्यवर्ति तत्त्वें आहेत. जर हिंदुधर्म आज

जिवंत असेल तर तो या कारणांमुळें आहे. परंतु हिंदु धर्म जीर्ण झाला आहे. पूर्वी जेथें जीवनोत्साह एकाद्या निर्झराप्रमाणें हंसत खेळत होता, तेथें आतां शैथिल्य पसरलें आहे. सध्यांचा हिंदु समाज आपली प्रगति करीत नसून कोठें तरी वाहवत चालला आहे आणि भविष्यकाळ आपोआप केव्हां निवळेल ह्याची वाट पाहत आहे. आमच्यांतील चैतन्य आटून गेलें आहे आणि अध्यात्माला ओहोटी लागली आहे. राजकीय स्थित्यंतरामुळें समाजाच्या विकासाच्या नियमाकडे आम्हीं दुर्लक्ष केलें. हिंदु संस्कृतीच्या भरभराटीच्या काळांत आम्हीं समुद्रपर्यटन केलें, नव्या वसाहती वसविल्या, जगाला धडे दिले आणि जगापासूनहि बोध घेतला; ह्यामुळें आमचें जीवन तेव्हां चैतन्यमय होतें. या सुवर्णयुगाच्या मध्यापर्यंत, आधिभौतिक शास्त्रें आणि कला व उदीम आणि व्यापार या बाबतींत तें जगांतील अति सुधारलेल्या राष्ट्रांच्या मागें नव्हतें. पण आज आमची आम्हांलाच भीति वाटूं लागली आहे. आणि म्हणून आत्मसंरक्षणासाठीं धर्माच्या केवळ बाह्यांगाला आम्हीं चिकटून बसलों आहों. आमच्या जीवनाचें संरक्षण करण्याचा प्रयत्न करणारें आवरणच—कांहीं धार्मिक संस्थाच—जीवनाचा विकास कुंठित करीत आहेत. वृक्षाच्या अंतरंगाचें संरक्षण करणारी साल ही अंतरंगाइतकीच जिवंत पाहिजे. तिच्यामुळें वृक्षाची वाढ खुरटतां कामा नये. जसजसा आंत जीवनरस भरला जाईल, तसतसा तिचाहि विस्तार होत गेला पाहिजे. मानवी विकासाच्या एका स्थितीला अनुकूल आणि पथ्यकर असलेली संस्था दुसऱ्या स्थितीला अपुरी पडते; इतकेंच नव्हे, तर हानिकारकहि होते. "आतांपर्यंत हेंच चालत आलें आहे" असें ओरडणारे पुराणमतवादी लोक, प्राचीन हिंदूंना स्पष्ट कल्पना असलेल्या, तत्त्वज्ञान आणि व्यवहार, अभिरुचि आणि नीति, राजकारण आणि समाजव्यवस्था यांतील सापेक्ष—मीमांसेच्या मूलतत्त्वाकडे डोळेझांक करतात. "अगणित शतकें झालीं, हिंदुस्थानांत कालचक्र फिरावयाचें थांबलें आहे आणि प्राचीन कालापासून बदल असा झालाच नाहीं" ही कल्पना धादांत खोटी आहे. भूतकालाची अखंड परंपरा कायम ठेवूनहि प्रगति होतच आहे. ओबडधोबड पूजाविधींचा पुरस्कार करणाऱ्या वेदकालीन धर्माला निखालसपणें मागें टाकणाऱ्या आध्यात्मिक चळवळीचीं फळें 'उपनिषदें' हीं होत. जेव्हां उपनिषदांची

चळवळ सांप्रदायिक वादविवादांमध्यें नष्ट झाली, जेव्हां प्रश्नोत्तरांना आणि वादविवादांना रंग चढून धर्माच्या स्वतंत्र तत्त्वांचा प्रकाश मंद झाला, तेव्हां बौद्ध धर्मानें लोकांना नैतिक नियमांची भव्यता आणि सत्याचा साधेपणा यांना चिकटून राहण्याची आज्ञा केली. जेव्हां आचारप्रधान संस्कृति आणि निरुपयोगी विद्या यांनीं रुक्ष पांडित्यालाच धर्म बनविलें, व जेव्हां या घटपटांच्या कसरतींत निष्णात असणारे लोक गर्वानें फुगून गेले आणि त्याबद्दल उपहासासहि पात्र झाले, . त्या वेळेला भगवद्गीतेनें शुद्ध अंतःकरणाच्या लोकांना स्वर्गाचे दरवाजे खुले केले! जेव्हां कर्मठ लोकांनीं धर्मतत्त्वाला कडक नियमांच्या कोंडाळ्यांत कोंडलें, तेव्हां खरे तत्त्वद्रष्टे, शैव आणि वैष्णव संत व श्रीमच्छंकराचार्य आणि श्रीरामानुजाचार्य यांसारखे धर्माचार्य यांनीं लोकांना खऱ्या देवाची उपासना करण्याचा उपदेश केला. श्रीमध्वाचार्य आणि चैतन्य, बसव[1] आणि रामानंद व कबीर आणि नानक यांची कामागिरीहि क्षुल्लक नाहीं. हिंदुधर्म गतिमान् आहे, स्थिर नाहीं; तो प्रवाहात्मक आहे, स्थित्यात्मक नाहीं; तो वार्धिष्णु परंपरा आहे, स्थायि मत नव्हे. त्याचा गतकालीन इतिहास आम्हांला असें मानण्यास उत्तेजन देतो कीं, भविष्यकालीं उद्भवणाऱ्या कोणत्याहि आपत्तीला, मग ती विचाराच्या क्षेत्रांत असो किंवा इतिहासाच्या क्षेत्रांत असो, टक्कर देण्यास तो समर्थ आहे.

४६ कांहीं शतकांच्या दीर्घकालीन हिंवाळ्यानंतर आज आपण हिंदु धर्मातील नवजीवनाच्या वसंतकालांत आलों आहों व आमच्या प्राचीन धर्माकडे नव्या दृष्टीनें पाहण्यास सुरुवात करीत आहों. आमचा समाज अजून स्थिर झाला नाहीं असें आम्हांस वाटतें. शुष्क आणि कीड लागलेलें पुष्कळ जंगल आहे, तें साफ केलें पाहिजे. हिंदुतत्त्वज्ञानाच्या आणि आचारधर्माच्या पुरस्कर्त्यांची खात्री झाली आहे कीं, बदललेल्या काळांत हिंदुधर्माच्या मूलतत्त्वांत फरक करण्याची आवश्यकता नाहीं; परंतु अधिक गुंतागुंतीच्या व गतिमान् अशा समाजाच्या गरजांकडे विशेष लक्ष देऊन त्या मूलतत्त्वांची नव्यानें मांडणी करण्याची आवश्यकता आहे. असा प्रयत्न म्हणजे हिंदुधर्माच्या इतिहासांत कित्येक वेळां घडून आलेल्या पद्धतींचीच पुनरावृत्ति

---

१ बसव हे लिंगायत धर्माचे संस्थापक.

करणें होय. हें कार्य सध्यांहि धीमेपणानें चालूच आहे. जेव्हां मुळें फार खोल गेलेलीं असतात, तेव्हां वाढ मंद गतीनें होत असते; परंतु जे लोक प्रथम अंधारांत मिणमिण जळणारी पणती लावतात, तेच पुढें सबंध आकाश प्रकाशमान करण्यास मदत करतात.

# सूचि

## ( आंकडे पृष्ठांचे आहेत )


### अ

अथर्ववेद २६
अनार्य ८३,८४
अंडरहिल एव्हिलिन २२
अनिर्वचनीयत्व १५
अनेकदेववाद १७
अनेकपत्नीत्व ७२
अनंत ६६
ॲरिस्टॉटल ५१,६९,८७,१०४
अर्धनारी नटेश्वर ७०
अमेरिका–लॅटिन ९२
अशोकाची सहिष्णुता ४३
अज्ञेयवाद ५६
अज्ञेयवादाचें रहस्य १४

### आ

आगम ग्रंथ २८
आगमिक २८
ऑगस्टाईन २३,५५
आनुवंशिक संस्कार ८४,८६, ८७,८८,९७
—धंदा ९७
आध्यात्मिक अनुभव १३
आर्य–आर्येतरांचा समेट २७
आर्यसमाज ११

### इ

ईन्स्टीन ५०
इष्टदेवता ३३

ईश्वरविषयक कल्पना १३,१४,१७, १९, २०
—कॅथॉलिक १७
—कल्पनेचें सहाय्य १५,१६
—देवमानुष १८
—प्रोटेस्टंट १७
—महंमद १६
—याज्ञवल्क्य १७
—रामकृष्णपरमहंस १७
—सामान्य हिंदूंची १८
—हिब्रू द्रष्टे १६
इसाया ३१

### उ

उपनिषदें ११, १०८, ११५
उपासक, विविध २०

### ऋ

ऋग्वेद २६
ऋत ५९

### क

कबीर ११
कर्माध्यक्ष ५९
कर्ममीमांसा ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६८
कल्लाकक मार्टिन ८८
कर्मविपाक ५९, ६०, ६२
कालि ३२
क्रोस १०, ५५

### ख

खिस्ती धर्माची श्रद्धेची व्याख्या ५

**ग**

गांधी २४
गाल्टन ८७
गृहस्थाश्रम ६९, ७७

**घ**

घटस्फोट ७३

**च**

चातुर्वर्ण्य ९७
चिच्छक्ति १९
चिरोल–व्हॅलेंटाईन ८४
चैतन्य ११

**ज**

जगाचें राजकीय ध्येय ४४
जयतीर्थ ७
जातिसंस्था ७९, ८९, ९३, १०९
—उत्पत्तीची विविधता ७९
—कामगिरी ९०
—कुलसंघ ९३
—चतुर्विधता ९३
—भिन्नता ओळखण्याचें साधन ८४
—मिश्र जाति ८५
—रूढि ८४
—शील १०६
जीझस ८, ३१, ३८, ५९
जैन ११
जोपासना (nurture) ८६, ८९
ज्यू लोक ३८, ४२

**ट**

टागोर २४
टयूटन ८१

**ड**

डार्विन ८७
डेव्हॅरिस ८७
डोनाल्डसन ७४

**त**

तत्त्वज्ञानाचा इतिहास ५४
तुकाराम १८
तैत्तिरीयोपनिषद् ६७
तंत्रग्रंथ ९
तांडय ब्राह्मण २६

**थ**

थिआसॉफी ८६

**द**

दुर्गा ३२
देवळें २१
दैववाद ६२, ६३
द्राविड संस्कृतीचा परिणाम २८
दृष्टिसृष्टिवाद ५२

**ध**

धर्म १२, ३८
—अनुभवाचा विषय ६, १२, १३
—आंतील बोल्शेव्हिझम् ४५
—तौलनिक अभ्यास ४६
—परिषदा ४६
धर्मवेडेपणा ४२

**न**

नानक ११
निर्गुण १८, २०
निर्वाण ७८
निसर्ग ८६, ८९
न्यायसुधा ७

**प**

परमेश्वराचें सर्वव्यापित्व ५७, ५८
परंपरेचे फायदे ७
—स्वरूप १०
पाशुपत १०

पुराणांचें स्वरूप ९
पुरुषार्थ ६५
पुरुषोत्तम ३३
पूर्णावस्था ५०, ५१
प्रॅगमॅटिस्ट २३
प्रस्थानत्रयी ११
प्रार्थना ६०
प्रेय ६५
प्लॅटिनस २२
प्लेटो २३, ५५, ८७

फ

फ्रेजर–सर जेम्स ३९

ब

बर्गसाँ ५५
बर्ट्रंड रसेल–मिसेस ७४
बर्न्स–रॉबर्ट ३०
बुद्ध ११, ७७, १०८, ११५
—वादविवाद ४३
ब्रॅडले ५४
ब्रह्मचर्याश्रम ६९
ब्रह्मसमाज ११
ब्रह्मसूत्रें ११
ब्राऊन २४
ब्राह्मण ९४, १००
१०३, १०५, १०९
ब्रिटिश लोक ८१

भ

भक्ति ६८
भगवद्गीता ११

महाभारत १२, ७६
मानववंश ८०, ८२, १०९
—निर्मेळ ८५
—त्यांच्यातील लढा ९०,९१,९२
मानवी स्वतंत्रता ६२
मायावाद–व्याख्या ४८, ५३, ५६
—विरुद्ध आक्षेप ४८
मिथ्यात्व ४९
मिल्नर–लॉर्ड [illegible]२
मिल्ल–जॉन स्टुअर्ट ५५
मूर्तिपूजा २८,३६
मोझेस ३१
मोक्ष ५०

य

यहवे ३१
याज्ञवल्क्य ४८,५८
युरेशियन ८६
युरोपांतील धर्मभोळासमाज ४०
योग १०
यौगिक अनुभवाचें ऐक्य २२

र

रजपुतांची उत्पत्ति ९६
राम ७२,८३
रामानुजाचार्य १०८
रामायण ७२
रेडइंडियन ८०

ल

लैब्निझ् ५५
लोकसत्तावाद ९९,१०१
लोभ–सार्वत्रिक ९५

व

वसिष्ठ १०७,१०८
वानप्रस्थाश्रम ७५
वासना ६४,६६,६७,६९
विश्वामित्र १०८
विवाह ७१

—विधवा ७३
—प्रकार आठ ७१
—अनिर्बंध ९०
—अनुलोम ८५
—पैशाच ७२
—प्रतिलोभ ८५
—मिश्र ८६
—सवर्ण ८५,८६
—व समान संस्कृति ८९
विवाह संस्था ७०,७१
वीसमन ८७
वेद–एकत्व १२
—प्रामाण्य मान्य १२
वेदांत १२
—संग्राहकत्व १२
वेल्स्लेची श्रद्धेची व्याख्या ५
वैदिक-अवैदिक मतांचा समेट २७
वैदिक संस्कृतीचें इतर संस्कृतींशीं साम्य २८
वैश्य ९५,१०५,१०९
वैष्णव १०
व्रात्यस्तोम २६

श

शक्तिगीता ३६
शाश्वत नरक ५१
शाश्वत स्वर्ग ५१
शिवाविष्णूंचें ऐक्य २५
शूद्र ९३,१०५
श्राद्ध ७०
श्रीकृष्ण २६,३३,८३
श्रेय ६५
श्वेताश्वतरोपनिषद् ४८

स

सगुण १९,२०
सत्य १९
संन्यासी ७६,७७
संप्रदायांचा आग्रह ३८,१०८
—ऐतिहासिकपणा २९
सरकार ९४
— व ब्राह्मण ९४
सरंजामपद्धति १०३
सांख्य १०
सापेक्ष मीमांसा ५०
सायनाचार्य ७४
सीझर-ज्यूलियस ८१
सुधारक-खरा ३८
सेंट जॉन २२
—पॉल २२
सेमेटिक धर्म २५
स्त्रियांचे वैशिष्ठ्य ८,७५
स्मिथ-व्हिन्सेंट ४
स्मृतिग्रंथ ६५,१०५
स्विफ्ट ४७

ह

हर्बर्ट स्पेन्सर ५१
हर्मन २२
हर्षाची सर्वधर्मसहिष्णुता ४४
हिंदु तत्वज्ञानाची अनुभवा उभारणी ८
हिंदुधर्म
—आक्षेप ५६
—कायद्याचे उपाय ३७
—जीवनसूत्र ११०,१११
—जुन्या कल्पना ३९
—झगडे मिटविण्याचा मार्ग ८३

—टीका-प्रो. क्लेमंट वेब ३५
—देवतामंडळ ३३
—धर्मयुद्धें ४२
—ध्येय एक ४५
—ध्येयच्युति ४२
—नानामतांची खिचडी नव्हे ११
—नांवाविषयीं आग्रह नाहीं ३३
—परपराविकास १०,११
—प्रगतीच्या लाटा ११
—प्रचारकार्याचें वैशिष्टय २५
—बीज ११
—भोळेपणा ३९
—मानववंश ९०
—लवचिकपणा ८४
—व्यवहार ६३
—व्याख्या ४,५,११
—व्याख्येची अडचण १
—व्यापक धोरण २४,२९,३०,
३७,३९,४५,४६
—श्रद्धा ३७
—संथ वाढ २९
—सांप्रदायिक कडवेपणाचाअभाव २५
—स्त्रीविषयक धोरण ७४
—सुधारणापद्धति २९,३१,३४,
३९,४१,४६
हिंदुस्थानांतील समाजभिन्नता ३
—मौलिक ऐक्य ११,४१
हिंदु संस्कृति २
—नांव ३
हिंदूंचें वेदांसंबंधीं धोरण ८
हेरॉक्लिटस ४६
हेगेल ५५
होसिया ३१

क्ष

क्षत्रिय ९६,१०४,१०५,१०९

ज्ञ

ज्ञान–मोक्षाचें साधन ६८
ज्ञानी पुढाऱ्यांची जबाबदारी २१

— —

# आमचें प्रकाशन

( शिल्लक नसलेल्या पुस्तकांची किमत दिलेली नाहीं. )

* १-२ सत्याचे प्रयोग ( द्वितीयावृत्ति ) : म. गांधी
* ३ खादी-मीमांसा ( द्वितीयावृत्ति ) : बाळूभाई मेहता
४ स्वराज्य-शिष्टाई : म. गांधी
५ संयम कीं स्वैराचार ? ( खंड १ ला ) : म. गांधी
६ हिंडलग्याचा प्रसाद : काका कालेलकर
* ७ हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना ( द्वितीयावृत्ति )
लेखक : एस्. राधाकृष्णन् — २-८-०
* ८ उपनिषदांतील दहा गोष्टी ( तृतीयावृत्ति )
लेखक : शंकरराव देव — ०-१२-०
* ९ विद्यार्थी-जीवन ( द्वितीयावृत्ति )
लेखक : श्री. स. महाजन
*१० फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास
लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर — १-४-०
११ कॉंग्रेसचा इतिहास ( द्वितीयावृत्ति )
लेखक : डॉ. पट्टाभिसीतारामय्या
१२ समाजवादच कां ? ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जयप्रकाश नारायण — २-०-०
१३ खानबंधू : महादेवभाई देसाई
१४ जवाहरलाल नेहरू : आत्मचरित्र ( द्वितीयावृत्ति ) : पं. नेहरू — १२-८-०
*१५ विश्राम ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी — १-४-०
*१६ भारतीय संस्कृति ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी — ३-०-०
१७ प्रसाददीक्षा : म. गांधी
१८ भिल्ल साधु गुलामहाराज : शं. वि. ठकार
*१९ आधुनिक भारत : आचार्य जावडेकर
*२० हिमालयांतील प्रवास ( तृतीयावृत्ति )
लेखक : काका कालेलकर — २-४-०